**MAPOL 1.3M**

# एम.ए (राज्यशास्त्र)

## सत्र - I

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

# आंतरराष्ट्रीय संबंध - I

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक (डॉ.) अजय भामरे**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख मानव्यविद्या शाखा**
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

: **डॉ. क्षिप्रा वासुदेव**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. बिजयसिंग कर्तारसिंग भाबरदोडे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई, बीड

**निलेश पाटील**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
गोगाटे पाटील महाविद्यालय, रत्नागिरी

**डॉ. भगवान लोखंडे**
डी. जी. तटकरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, तळा
जि. रायगड

**डॉ. श्रीकांत देविदास महादने**
सहाय्यक प्राध्यापक
डॉ. पतंगरव कदम महाविद्यालय, पेण, रायगड

**जुलै २०२४, मुद्रण - १**
ISBN 978-81-978283-8-6

**प्रकाशक**
**संचालक,** दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय. विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| 1 | जागतिक व्यवस्थेचा बदलता क्रम | १ |
| 2 | सत्तेची भूमिका | ३४ |
| 3 | आंतरराष्ट्रीय संबंधातील निर्धारक घटक | ६३ |
| 4 | शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरणाचे उपाय | ११६ |

## एम. ए. राज्यशास्त्र

## सत्र - I

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

## पेपर - 4

## आंतरराष्ट्रीय संबंध - I

## अभ्यासक्रम

**प्रकरण पहिले - जागतिक व्यवस्थेचा बदलता क्रम**

अ) आंतरराष्ट्रीय संबंधाचे बदलते स्वरूप

ब) सुरक्षेसमोरील महत्त्वाचे धोके/प्रश्न दहशतवाद

क) शांतता आणि संघर्ष

**प्रकरण दूसरे - सत्तेची भूमिका**

अ) सत्तेची संकल्पना, राष्ट्रीय सत्तेचे घटक, सत्तेचे प्रकार, सत्तेची साधने, सत्तेचा वापर

ब) सत्ता समतोल – एकध्रुवीयता, द्विध्रुवीयता, बहुध्रुवीयता

क) राष्ट्र-राज्य

ड ) राष्ट्रीय हित

**प्रकरण तीसरे - आंतरराष्ट्रीय संबंधातील निर्धारक घटक**

अ) राजनय

ब) आंतरराष्ट्रीय कायदा

क) अ-राज्यघटक

**प्रकरण चौथे - शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरणाचे उपाय**

अ) निशस्त्रीकरण

ब) शस्त्रनियंत्रण

क) पारंपारिक अस्त्रे, आण्विक अस्त्रे, इतर सर्वसंहारक अस्त्रे

**Subject code: C50311**
**International Relations I**
**(4 Credits, 60 Hours)**

**Course Objectives:**

1. To deal with complex problems in international relations in a creative, problem-solving way
2. To form a well-considered comprehensive approach towards the international relations
3. To apprehend the global challenges

**Module 1: World Order**

a) Emerging world order
b) Security Issues: terrorism and changing nature of conflicts
c) Peace and conflict-resolution: collective security, peacekeeping

**Module 2: Role of Power**

a) Concept of power
b) Balance of power: unipolarity, bipolarity and multipolarity
c) Nation-state, national interest, national power.

**Module 3: Determinants**

a) Diplomacy
b) International law
c) Non-state actors: multinational corporations, intergovernmental organizations, global civil society.

**Module 4: Arms Control and Disarmament Measures**

a) Conventional weapons
b) Nuclear weapons
c) Weapons of mass destruction (WMD)

**Course Outcome:**

1. Students will be able to develop critical thinking for the understanding the key issues.
2. Students can independently formulate a research questions on areas like foreign policy and diplomacy
3. The student will be aware about global issues
4. They can contribute for providing solutions to the various issues through discussions and class participation

**Reading List:**

1. Baldwin, D. A. (1993). *Neorealism and neoliberalism: The contemporary debate*. Columbia University Press
2. Baylis, J., Owens, P., & Smith, S. (2017). *The globalization of world politics: An introduction to international relations.* Oxford University Press.
3. Bell, D. (2010). *Political thought and international relations: Variations on a realist theme*. OUP Oxford.
4. Carlsnaes, W., Risse, T., & Simmons, B. A. (2012). *Handbook of international relations*. SAGE.
5. Calvocoressi, P. (2013). *World politics since 1945*. Routledge.

6. Costa, G. D. (2000). *Nuclear politics: Destruction and disarmament in a dangerous world*. Kanishka Publishers.
7. Daddow, O. (2017). *International relations theory*. SAGE.
8. Deutsch, K. W. (1968). *The analysis of international relations*. Prentice Hall.
9. Dunne, T., Kurki, M., & Smith, S. (2021). *International relations theories: Discipline and diversity*. Oxford University Press, USA.
10. *EGyanKosh: MPS-002 International Relations: Theory and Problems*. (n.d.). EGyanKosh. Retrieved July 2, 2023, https://egyankosh.ac.in/handle/123456789/5490
11. Haass, R. (2020). *The World: A Brief Introduction*. Penguin Press.
12. Heywood, A. (2014). *Global Politics* (2nd ed). Palgrave Macmillan.
13. Jackson, R. H., &Sørensen, G. (2016). *Introduction to international relations: Theories and approaches*. Oxford University Press.
14. Kaufman, J. P. (2022). *Introduction to international relations: Theory and Practice*. Rowman & Littlefield.
15. Knutsen, T. L. (1997). *A history of international relations theory* (2nd ed). Manchester University Press ; Distributed exclusively in the USA by St. Martin's Press.
16. Lawson, S. (2015). *Theories of international relations: Contending approaches to world politics*. John Wiley & Sons.
17. LSE (Director). (2014, October 20). *International Relations: An Introduction*. https://www.youtube.com/watch?v=NVCDnUZqLzU
18. McGlinchey, S. (2017). *International relations*. E-IR Foundations.
19. Starr, H. (2006). *Approaches, levels, and methods of analysis in international politics: Crossing boundaries*. Springer.
20. Waltz, K. N. (1979). *Theory of international politics*. McGraw-Hill Humanities, Social Sciences & World Languages.
21. Williams, P. D. (Ed.). (2008). *Security studies: An introduction*. Routledge.
22. लोखंडे भगवान , 'आंतरराष्ट्रीय संबंध' दूर व मुक्त अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठ, मुंबई, 2022 .
23. अग्रवाल रामेश्वर, दयाळू गुप्ता कैलास चंद्र, ' आंतरराष्ट्रीय राजनीति' जयप्रकाश नाथ कंपनी, मेरठ ,1972.
24. शर्मा प्रभुदत्त ,'आंतरराष्ट्रीय राजनीति की विचार भूमी' कॉलेज बुक डेपो, जयपुर, 1969.
25. शर्मा मथुराल, ' आंतरराष्ट्रीय संबंध' कॉलेज बुक डेपो ,जयपुर, 1978.
26. शिंदे ज.रा .,अमृतकर प्रशांत, 'समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद ,2005 .
27. दीवान चंद्रशेखर, ' भारताची विदेशनीती' 'विद्या प्रकाशन नागपूर '1992
28. तोडकर बी.डी .'आंतरराष्ट्रीय संबंध महत्त्वाच्या संकल्पना' डायमंड पब्लिकेशन्स ,पुणे 2012
29. गुप्ता माणिक लाल, 'आंतरराष्ट्रीय संबंध' अटलांटिक प्रकाशन ,नवी दिल्ली 2005

१

# जागतिक व्यवस्थेचा बदलता क्रम (ORDER)

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय-विवेचन

१.३ आंतरराष्ट्रीय संबंधाचे बदलते स्वरूप

१.४ सुरक्षेसमोरील महत्त्वाचे धोके/प्रश्न दहशतवाद

१.५ शांतता आणि संघर्ष

१.६ सारांश

## १.० उद्दिष्टे

- आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलत्या स्वरूपाचे विवरण करता येईल.
- सुरक्षेसामोरील धोक्याचे विवरण करता येईल.
- शांतात आणि संघर्ष या संकल्पनेचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करता येईल.
- आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी सामूहिक सुरक्षिततेची आवश्यकता स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

ह्या घटकामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विविध टप्प्यांच्या आधारावर त्याचे स्वरूप कालखंडानुसार कसे बदलत गेले त्याचे अध्ययन करावयाचे आहे. म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विकासाच्या प्रत्येक कालखंडामध्ये त्याची विवक्षित वैशिष्ट्ये व त्यानुसार बदलते स्वरूप आपणास अभ्यासावयाचे आहे.

राष्ट्रीय राजकारणात तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात आणि एकंदर मानवी समाजात सशस्त्र संघर्ष आणि हिंसाचार हा जीवनाचाच एक भाग बनला आहे. जगातील प्रत्येक राष्ट्रात आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सशस्त्र संघर्ष आणि हिंसाचार होतच असतो आणि हा संघर्ष व हिंसाचार आजच होत आहे असे नाही मानवी समाजात अगदी सुरूवातीपासूनच कोणत्या ना कोणत्या प्रकारचा संघर्ष आणि हिंसाचार झालेला दिसून येतो. तसेच या संघर्षाची आणि हिंसाचाराची मूलभूत कारणे मानवी स्वभावात किंवा प्रवृत्तीतच आहेत. मानवात शौर्य, साहस या प्रवृत्तीबरोबरच दोष, तिरस्कार, बदला, भांडखोरपणा, हिंसाचार, विध्वंस इत्यादी प्रवृत्ती आहेत. 'मानवाची विध्वंसक प्रवृत्ती' हेच युद्धाचे प्रमुख कारण आहे असे 'फ्राईड' या

विचारवंताने म्हटले आहे. मानवातील वरील प्रवृत्तीमुळे अगदी कुटूंब संस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंत, इतकेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आणि आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांमध्येही संघर्ष असतो आणि त्यातून हिंसाचार उद्भवतो.

दहशतवाद ही आता संपूर्ण जगाला भेडसावणारी समस्या बनली आहे. जगाच्या निरनिराळ्या भागांत दहशतवादी संघटनांचा उदय होऊ लागला असून त्यांनी अवघ्या मानवजातीला वेठीस धरण्याचा प्रयत्न चालविला आहे. दहशतवादी संघटनांनी विविध देशांत माजविलेल्या हिंसाचारामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात असुरक्षिततेची भावना उत्पन्न होऊ लागली आहे. आज आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांस निर्माण झालेला सर्वांत गंभीर धोका म्हणून दहशतवादाकडे पाहिले जाते. याच कारणासाठी आंतरराष्ट्रीय समुदायातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी दहशतवादाचा खंबीरपणे मुकाबला करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे.

## १.२ विषय-विवेचन

मानवी समाजातील संघर्ष आणि हिंसाचार अगदी सुरूवातीपासूनच आहे. त्याचे स्वरूप आणि संघर्षायी साधने किंवा शस्त्रे मात्र बदलत गेली आहेत. माणसाने कधी आपले अस्तित्व टिकविण्यासाठी तर कधी दुसऱ्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष केला आहे. आणि त्यामुळे प्रत्येक वेळी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात हिंसाचारही झाला आहे आणि आजही त्यात फरक पडलेला नाही. इतकेच नव्हे तर आधुनिक तंत्र, विज्ञानाच्या आधारे सशस्त्र संघर्षाचे आणि हिंसाचारचे प्रमाण पूर्वीपेक्षा कितीतरी पटींनी वाढले आहे त्याचे स्वरुपही इतके भयानक आहे की, त्यामुळे मानवाच्या अस्तित्वाला आणि मानवी संस्कृतीलाच धोका निर्माण झाला आहे.

## १.३ आंतरराष्ट्रीय संबंधाचे बदलते स्वरूप

आंतरराष्ट्रीय संबंधाचे बदलते स्वरूप अभ्यासताना आपणास दुसऱ्या महायुद्धानंतरचा कालखंड लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यावरून त्यापूर्वीच्या कालखंडाशी तुलना करून आपल्याला आंतरराष्ट्रीय संबंधाचे बदलते स्वरूप घेणे सोपे होईल.

अ) दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संबंध खऱ्या अर्थाने जागतिक स्वरूपाचे झाले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र राष्ट्रांची संख्या वाढली. आफ्रिका व आशिया खंडातील राष्ट्रे पूर्वीपेक्षा अधिक जोमाने व स्वतंत्र भूमिका घेऊन जागतिक राजकारणात भाग घेऊ लागली. प्रत्येक राष्ट्राचे मत लक्षात घेतले जाऊ लागले. हा आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्वरूपातील बदल पूर्वीपेक्षा फारच व्यापक प्रमाणात झाला.

आ) आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप बदलण्याचे अन्य एक कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती. संयुक्त राष्ट्र संघ १९४५ मध्ये स्थापन झाला. त्याच्या छत्राखाली अनेक संघटना विशिष्ट उद्दिष्टांसाठी निर्माण झाल्या. ह्या संघटनांमध्ये जगातील सर्व देश सहभागी झाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप अधिक व्यापक झाले आहे.

इ) आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप पूर्वीप्रमाणे केवळ युद्ध, शांती करार, साम्राज्यवाद ह्यांपुरते मर्यादित न राहता राजकीय व गैर लष्करी क्षेत्रांमध्ये त्याचा शिरकाव झाला

आहे. म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये केवळ राजकीय घटक नव्हे तर सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक असे अन्य घटकही समाविष्ट होतात. आंतरराष्ट्रीय संघटनांच्या माध्यमातून जागतिक स्तरावर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सहकार्य होत आहे.

ई) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आजचे स्वरूप पूर्वीपेक्षा तांत्रिकदृष्ट्या अधिक प्रगत झाले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संदेशवहन, दळणवळण, संपर्क व्यवस्था, माहिती-प्रसारण ह्या क्षेत्रांत क्रांती होऊन आंतरराष्ट्रीय संबंध अधिक गतिमान, आधुनिक व व्यापक झाले आहेत.

उ) वैज्ञानिक प्रगतीमुळे आंतरराष्ट्रीय संबंधावर काही घातक परिणामही झाले आहेत. उदाहरणार्थ, विज्ञानामुळे नवीन घातक व संहारक शस्त्रे निर्माण झाली आहेत, ज्यामुळे संपूर्ण जग एका भयगंडामध्ये वावरत आहे. विशेषतः अण्वस्त्रांच्या निर्मितीमुळे संपूर्ण जग विनाशाच्या उंबरठ्यावर आले आहे. अण्वस्त्रांमुळे अण्वस्त्र असणारे मूठभर देश व नसलेले इतर देश अशी जगाची विभागणी झाली आहे. मूठभर अण्वस्त्रसंपन्न देश साऱ्या आंतरराष्ट्रीय राजकारणावर वर्चस्व गाजवत आहेत आणि इतर देश स्वतःच्या अस्तित्वाच्या व विकासाच्या चिंतेत आहेत. अशी विषमता आजच्या आंतरराष्ट्रीय संबंधात आढळते.

ऊ) वरील मुद्यांवरून आपणास लक्षात येईल की, पूर्वीपेक्षा आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप जसे गतिमान, सुखकारक, अत्याधुनिक झाले आहे, तसेच ते अधिक संघर्षमय व धोकादायक झाले आहे. ह्याचे कारण आधुनिक शस्त्रे आणि युद्धशास्त्रामध्ये झालेला विकास होय. ह्या संघर्षमय स्वरूपामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे उद्दिष्टही बदलले आहे. पूर्वीच्या तुलनेत आजच्या आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये जागतिक शांतता प्रस्थापित करणे, देशादेशांमध्ये सहकार्य वाढवणे, युद्ध होऊ न देणे, व्यापक अर्थाने मानवाच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे, इत्यादी महत्त्वाची उद्दिष्टे विद्यमान आहेत.

ए) आजचे आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप गुंतागुंतीचे व परस्परावलंबी झाले आहे. जगाच्या एका कोपऱ्यात झालेल्या घटनेचे पडसाद सर्व जगभर उमटतात. त्याच-प्रमाणे राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा सर्व क्षेत्रांची सरमिसळ आंतरराष्ट्रीय संबंधात झाली आहे. त्यांन व शिष्टसंमत पद्धतीने समस्यांचे निराकरण, इत्यादी मूल्ये आज जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त आहेत. त्यांच्या जोडीला विकासाच्या पद्धतीच्या स्वरूपात काही विचारधारा तयार झाल्या. त्यातील साम्यवाद व भांडवलवाद ह्या परस्परविरोधी विचारधारांनी जगातील संघर्ष अधिकच वाढवला. अगदी अलीकडच्या काळात धार्मिक कट्टरवाद व दहशतवाद ह्या नवीन विचारांनी ह्या संघर्षात भर घालून आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये नवीन आव्हान निर्माण केले आहे.

ओ) आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप बदलत असताना, ज्याला आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणता येईल, अशा व्यवहारांमध्येही बदल झालेला दिसतो. आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये अधिक खुलेपणा आला आहे आणि शिष्टाचारांमध्ये अधिक तरलता आली आहे. राजदूतांचे कार्य अधिक सोपे व गतिमान झाले असले तरी त्यांच्यावरील

जबाबदारी व दडपण वाढले आहे. ह्या पार्श्वभूमीवर जुन्या आंतरराष्ट्रीय संबंधाचे उद्दिष्ट काही प्रमाणात वेगळ्या स्वरूपात आज आकार घेत आहे. उदाहरणार्थ, साम्राज्यवाद हा १७ व्या, १८ व्या शतकात थेट युद्धाद्वारे अमलात आणला जात असे. आज मात्र हा साम्राज्यवाद आर्थिक स्वरूपात मागील दाराने, दबाव तंत्राचा वापर करून आकार घेत आहे. त्यावरून आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप बदलले असल्याचे दिसत असले तरी हा बदल बाह्य स्वरूपाचा व तांत्रिक आहे. अंतर्गत स्तरावर राजकारणाच्या वृत्तीमध्ये बदल आढळत नाही. म्हणजेच आंतरराष्ट्रीय संबंध प्रभावित करणाऱ्या आंतरराष्ट्रीय नेत्यांच्या वृत्तींमध्ये बदल झालेला दिसत नाही. एकमेकांवर वर्चस्व प्रस्थापित करून सत्ता गाजवण्याची वृत्ती आजही पूर्वीसारखीच आहे. वृत्तीतून निर्माण होणारे संघर्षही तसेच आहेत. फक्त त्यांचे त्या बाह्यस्वरूप बदललेले दिसते

## १.४ राष्ट्रीय सुरक्षेसमोरील महत्त्वाचे धोके/प्रश्न दहशतवाद

Threats to security: terrorism, civil conflicts, failing states; changing nature of conflicts: from inter-state war to other types of conflicts

- **दहशतवाद म्हणजे काय?**

  अलीकडील काळात दहशतवादाने आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केले असले तरी दहशतवादाची सर्वमान्य व्याख्या देणे तसे कठीणच आहे. याचे कारण असे की, दहशतवाद हा शब्द वेगवेगळ्या अर्थांनी वापरला जातो. दहशतवादाकडे पाहण्याची प्रत्येकाची दृष्टी वेगळी असते; त्यामुळे प्रत्येकजण स्वत:च्या दृष्टिकोनातून दहशतवादाचा अर्थ लावत असतो. तथापि, दहशतवाद आणि हिंसाचार यांचा निकटचा संबंध असतो याबाबत सर्वांचेच एकमत आहे.

  दहशतवाद म्हणजे अशी पद्धती होय की ज्याद्वारे संघटित गट किंवा पक्ष नियोजनबद्ध हिंसाचाराच्या मार्गाने आपले उद्दिष्ट साध्य करण्यावर भर देत असतात. अशी दहशतवादाची व्याख्या आपणास करता येईल.

- **दहशतवाद व हिंसाचार**

  दहशतवाद व हिंसाचार यांचे अतुट नाते असले तरी त्यांमध्ये काही फरकही आहे. समाजात निरनिराळ्या कारणांमुळे लोकांकडून बऱ्याच वेळा हिंसाचाराचा अवलंब केला जातो. संप, बंद, हरताळ, मोर्चा अशा प्रसंगी जमाव काही वेळा हिंसक बनतो. त्याचप्रमाणे काही वेळा एखाद्या किरकोळ घटनेला अथवा प्रसंगाला हिंसक वळण लागू शकते. उदा- रस्त्यात एखादा अपघात झाला तर अपघाताचे दृश्य पाहून जमलेले लोक एकाएकी हिंसाचाराकडे वळतात. तथापि, अशा प्रसंगी होणारे हिंसाचार पूर्वनियोजित नसतात. लोकांचा जमाव नियंत्रणाबाहेर गेल्याने त्या प्रसंगाला अचानक हिंसक वळण लागते, परंतु दहशतवादी गट किंवा संघटना यांच्याकडून होणारा हिंसाचार नियोजनबद्ध असतो. त्यांनी काही विशिष्ट उद्देश मनाशी ठेवून हिंसाचार माजविण्याची योजना आखलेली असते आणि अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने ती योजना तडीस नेलेली असते. लोकांकडून उत्स्फूर्तपणे घडणाऱ्या हिंसाचारामागे असा काही उद्देश असतोच असे नाही. बऱ्याच वेळा लोकांच्या भावनांचा उद्रेक झाल्याने त्यांच्याकडून हिंसक घटना घडलेल्या असतात. दहशतवादी गट व संघटना यांच्याकडून केली जाणारी हिंसक कृत्ये मात्र अशी एकाएकी घडलेली नसतात.

- **दहशतवाद आणि क्रांतिकारक चळवळी**

काहीजण दहशतवाद आणि क्रांतिकारक चळवळी यांचीही गल्लत करतात. भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या काळात देशातील बंगाल, महाराष्ट्र, पंजाब इत्यादी प्रांतांत काही भारतीय स्वातंत्र्ययोद्ध्यांनी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने इंग्रजी सत्ता उलथवून टाकण्याचे उद्दिष्ट ठेवले होते आणि त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्नही केले होते. काही इतिहासकारांनी त्यांच्या कार्याचे वर्णन 'स्वातंत्र्य आंदोलनातील दहशतवादी चळवळी' अशा शब्दांत केले आहे; परंतु दहशतवाद आणि क्रांतिकारक चळवळी यांतील महत्त्वाचा फरक असा की, भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील किंवा अन्य कोणत्याही व्यापक लढ्यातील क्रांतिकारकांनी सामान्य जनतेला वेठीस धरण्याचा प्रयत्न कधीही केला नव्हता. आपल्या कोणत्याही कृतीचा सर्वसामान्य लोकांना उपसर्ग पोहचू नये याची दक्षता क्रांतिकारकांनी नेहमीच घेतली होती. क्रांतिकारक चळवळीतील कार्यकर्त्यांचा सामान्य लोकांच्या मनात दहशत निर्माण करण्याचा उद्देश कधीच नव्हता; म्हणूनच या कार्यकर्त्यांच्या कारवायांची सामान्य लोकांना कधीही भीती वाटली नाही. उलट त्यांच्या मनात क्रांतिकारकांविषयी कौतुकाची व आदराची भावना होती. दहशतवादी गट व संघटना यांचा मात्र सर्वसामान्य लोकांच्या मनात भीती किंवा दहशत उत्पन्न करणे हाच प्रमुख उद्देश असतो. आपल्या कारवायांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली किंवा निरपराध लोकांना उपसर्ग पोहोचला तरी त्याची त्यांना तमानसते. उलट हिंसाचाराचा अवलंब करून सर्व सामान्य लोकांना वेठीस धरण्यावरच त्यांचा विशेष भर असतो. जनतेला अशा प्रकारे वेठीस धरले तर आपले उद्दिष्ट साध्य करणे सोपे जाईल अशी त्यांची मनोधारणा असते.

- **मानवी मूल्याची अपेक्षा**

दहशतवादाचे आणखी एक वैशिष्ट्य असे सांगता येईल की, बहुतेक सर्वच दहशतवादी गट व संघटना मानवी मूल्यांची जराही तमा बाळगत नाहीत. मानवी मूल्ये पायदळी तुडविण्यात त्यांना कसलीही दिक्कत वाटत नाही; म्हणूनच दहशतवादी गट व संघटना कोणत्याही टोकाला जाण्याची तयारी ठेवून असतात. रक्तपात घडवून आणणे, निरपराध लोकांचा बळी घेणे, अमानुष कृत्ये करणे यांत त्यांना काहीही वावगे वाटत नाही. उलट, आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपणास याच मार्गाने वाटचाल करावयाची आहे अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बाळगलेली असते; म्हणूनच दहशतवाद व मानवी मूल्ये यांची एक प्रकारे फारकत झालेली असते असे म्हटले जाते.

- **उद्दिष्टाशी एकनिष्ठ**

दहशतवादी गट व संघटना यांचे आणखी एक वैशिष्ट्य असे सांगता येईल की, त्यांचे एक उद्दिष्ट ठरलेले असते आणि त्या उद्दिष्टाशी ते पूर्णपणे एकनिष्ठ व प्रामाणिक असतात. आपले उद्दिष्ट योग्य की अयोग्य यासंबंधीचा सारासार विचार त्यांनी केलेला असतोच असे नाही. मात्र ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणताही त्याग करण्याची तयारी त्यांनी ठेवलेली असते. अलीकडील काळात काही दहशतवादी संघटना आत्मघातकी पथके तयार करू लागल्या आहेत. या आत्मघातकी पथकांमधील सदस्य संघटनेसाठी स्वतःचे प्राण देण्यासही सिद्ध झालेले असतात; म्हणजे दहशतवादी संघटनांच्या सदस्यांना कसल्याही प्रकारच्या कारवाया करण्यास अडचण वाटत नाही. अपहरण, खून, गर्दीच्या ठिकाणी गोळीबार अथवा बॉम्बस्फोट, चालत्या रेल्वेगाडीत बॉम्बस्फोट, विमानाचे अपहरण यांसारख्या अनेक हिंसक कृत्यांमध्ये त्यांचा सहभाग असतो.

- **अनपेक्षित कृती**

  अनपेक्षित कृती हे दहशतवादाचे आणखी एक वेगळेपण सांगता येईल. बहुतेक दहशतवादी गट व संघटना सामान्य लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा मार्ग अवलंबत असल्याने धक्कादायक व अनपेक्षित कृती करण्यावर त्यांचा विशेष भर असतो. लोकांना दहशतवादाची भीती वाटण्याचे हेच मुख्य कारण असते. दहशतवादी कोणत्या प्रकारची कृती करतील याचा सहसा कोणालाही अंदाज येत नाही. बऱ्याच वेळा सरकारी यंत्रणेला गाफील ठेवण्यातही दहशतवादी यशस्वी होतात. त्यांच्या अशा प्रकारच्या कारवायांमुळे दहशतवादावर नियंत्रण ठेवणे किंवा त्यास पायबंद घालणे कठीण होऊन बसते.

- **दहशतवादाचे मार्ग**

  आतापर्यंतच्या आपल्या विवेचनात दहशतवादाच्या मार्गाचा उल्लेख येऊन गेला आहे. त्यांवरून एक गोष्ट अगदी स्पष्ट होते, ती म्हणजे दहशतवाद्यांचा शांततेच्या मार्गावर मुळीच विश्वास नसतो. साहजिकच चर्चा, विचारविनिमय, वाटाघाटी, तडजोडी यांसारखे सर्व मार्ग त्यांनी त्याज्य ठरविलेले असतात. लोकांच्या मनांत दहशत उत्पन्न करणे हाच त्यांचा प्रधान हेतू असल्याने जेणेकरून अशी दहशत उत्पन्न होईल ते सर्व मार्ग त्यांच्याकडून अवलंबिले जातात.

- **राज्यपुरस्कृत दहशतवाद**

  आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा एक प्रमुख प्रकार म्हणून राज्यपुरस्कृत दहशतवादाचा उल्लेख करता येईल. दहशतवादाने राष्ट्रीय सीमा कधीच ओलांडल्या आहेत. त्याची सुरुवात राज्यपुरस्कृत दहशतवादापासून झाली होती.

- **राज्यपुरस्कृत दहशतवाद म्हणजे काय?**

  राज्यपुरस्कृत दहशतवाद याचा अर्थ सार्वभौम राज्याने किंवा राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रात दहशतवादाची निर्यात करण्याचा केलेला प्रयत्न होय. एका प्रसिद्ध क्रांतिकारकाने क्रांतीसंबंधी असे विधान केले होते की, क्रांतीची एका राज्यातून दुसऱ्या राज्यात कधीही निर्यात करता येत नाही; परंतु दहशतवादाची मात्र अशा प्रकारे निर्यात केली जाऊ शकते, असे जगातील काही राज्यांनी स्वत:च्या कृतीतून दाखवून दिले आहे. आंतरराष्ट्रीय समुदायातील काही राष्ट्रे स्वत:चा दुष्ट हेतू साध्य करण्यासाठी दुसऱ्या राष्ट्रात दहशतवादाचा फैलाव करण्याचा मार्ग अवलंबत असतात. दुसऱ्या राष्ट्रात दहशतवादी कारवाया घडवून आणण्यासाठी मनुष्यबळ, पैसा, शस्त्रास्त्रे इत्यादी सर्व प्रकारची मदत त्यांच्याकडून केली जाते. याचा अर्थ असा की, ही राष्ट्रे दहशतवादाची उगमस्थाने किंवा मुख्य स्रोत बनलेली असतात. सामान्यतः ती आपल्या शेजारच्या राष्ट्रात अशा प्रकारच्या दहशतवादी कारवाया करण्यात गुंतलेली असतात. तथापि, क्वचित प्रसंगी जगाच्या कोणत्याही भागात दहशतवादाचा फैलाव करण्याची तयारीही त्यांनी ठेवलेली असते.

- **प्रमुख अपराधी अमेरिका**

  राज्यपुरस्कृत दहशतवादाचा प्रमुख आरोपी म्हणून अमेरिकेकडेच बोट दाखवावे लागेल. त्या देशाने आपल्या विरोधी गटात असलेल्या राष्ट्रात दहशतवादी कारवाया घडवून आणल्याची किंवा अशा कारवाया करणाऱ्या गटांना सक्रिय मदत केल्याची अनेक उदाहरणे दाखविता येतील. अमेरिकेच्या सी.आय.ए. या गुप्तहेर संघटनेने

शीतयुद्धाच्या काळात जगातील निरनिराळ्या देशांत अशा प्रकारच्या दहशतवादी कारवायांत नेहमीच भाग घेतला होता. अमेरिकेने दहशतवादाच्या मार्गाने अनेक देशांतील घटनात्मकसरकारे उलथून टाकली होती. आशिया व आफ्रिका खंडातील काही देशांनाही अमेरिकच्या राज्यपुरस्कृत दहशतवादाची झाल पोहोचली आहे. आजदेखील अमेरिका या मार्गाचा त्याग करण्यास तयार नाही असे तिच्या एकंदर आंतरराष्ट्रीय नीतीवरून वाटते.

- **भारत आणि राज्यपुरस्कृत दहशतवाद**

आपला देशदेखील राज्यपुरस्कृत दहशतवादाचा बळी ठरला आहे. भारतात आतापर्यंत झालेल्या दहशतवादी कारवायांपैकी बहुतेक सर्व कारवायांचा मुख्य स्रोत पाकिस्तानातच आहे. भारत व पाकिस्तान यांच्यात आतापर्यंत तीन युद्धे झाली आहेत. या तिन्ही युद्धांत पाकिस्तानने भारताकडून सपाटून मार खाल्ला आहे. त्या अनुभवावरून समोरासमोरच्या युद्धात आपला भारतापुढे निभाव लागू शकत नाही, ही गोष्ट पाकिस्तानच्या चांगलीच लक्षात आली. तथापि, भारताशी संघर्ष करण्याची त्याची खुमखुमी मात्र कमी होत नाही; तेव्हा भारताला उपद्रव देण्याचा एक मार्ग म्हणून पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी भारतात दहशतवाद पसरविण्याच्या पर्यायाची निवड केली आहे.

- **सीमापार दहशतवाद**

सीमापार दहशतवाद हा राज्यपुरस्कृत दहशतवादाचाच एक प्रकार होय. या प्रकारात दहशतवादाची केंद्रे एका राज्यात असतात, परंतु त्या केंद्रांमधून तयार झालेल्या दहशतवाद्यांच्या कारवाया मात्र दुसऱ्या राज्यात चालतात. सामान्यत: दोन शेजारी राष्ट्रांच्या बाबतीत अशा प्रकारचा दहशतवाद पाहावयास मिळतो. यावरून राज्यपुरस्कृत दहशतवाद आणि सीमापार दहशतवाद यांच्यात फारसा फरक नाही असे म्हणता येईल. त्या दोहोंमध्ये काही फरक असलाच तर त्यांच्यातील सीमारेषा अगदीच पुसट आहे. सीमापार दहशतवादाचे राज्यपुरस्कृत दहशतवादापेक्षा असलेले वेगळेपण असे सांगितले जाते की, राज्यपुरस्कृत दहशतवाद हा राज्याच्या प्रेरणेने व प्रत्यक्ष सहभागाने चालत असलेला दहशतवाद असतो. वर पाहिल्याप्रमाणे एखादे राज्य आपली काही राजकीय किंवा आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी दुसऱ्या राज्यात अशा प्रकारचा दहशतवाद फैलावण्याचा प्रयत्न करीत असते; म्हणजे राज्यपुरस्कृत दहशतवादाच्या पाठीशी राज्याचे पाठबळ असते. एखादे राज्यच या दहशतवादास कारणीभूत होत असते. सीमापार दहशतवादामध्ये राज्याचा प्रत्यक्ष सहभाग असेलच असे सांगता येत नाही. ज्या राज्यात दहशतवादी संघटनांची केंद्रे असतात त्या राज्याकडून दहशतवाद्यांना सक्रिय मदत केली जात असेलच असे नाही; म्हणजे ते राज्य दहशतवादाशी आपला प्रत्यक्ष संबंध नसल्याचा दावा करू शकते. तथापि, हा दावा तितकासा खरा नसतो. किंबहुना तो पूर्णपणे फसवा असतो, कारण त्या राज्याची दहशतवाद्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या मदत मिळत असल्याखेरीज तेथे दहशतवाद्यांची केंद्रे चालू राहणे मुळीच शक्य नसते. दहशतवादी केंद्रांमधून दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते; त्यांना शस्त्रास्त्रे पुरविण्याची व्यवस्था केली जाते; तसेच त्यांना अर्थसाहाय्य, वैद्यकीय उपचार इत्यादी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात; तेव्हा शासकीय यंत्रणेला अंधारात ठेवून इतक्या व्यापक प्रमाणावर अशा गोष्टी केल्या जाऊ शकत नाहीत.

याचा अर्थ असा की, सीमापार दहशतवाद हादेखील राज्याने पुरस्कृत केलेला दहशतवादच असतो. आंतरराष्ट्रीय समुदायापुढे आपले निर्दोषत्व सिद्ध करता यावे म्हणून संबंधित राज्य दहशतवादाशी आपला काही संबंध नाही असे दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न करते इतकेच! जगातील अनेक देशांना सध्या सीमापार दहशतवादाला तोंड द्यावे लागत आहे.

- **सीमापार दहशतवाद व भारत**

आपला देश अशा प्रकारच्या सीमापार दहशतवादाचा बळी ठरला आहे. गेल्या काही वर्षांपासून जम्मू-काश्मीर राज्यात हरकत-उल-मुजाहिदीन, लष्कर-इ-तोयबा, जैशे मोहमंद, हिज्बुल मुजाहिदीन, हरकत-उल्-अन्सार यांसारख्या दहशतवादी संघटना हिंसाचाराचे थैमान माजवित आल्या आहेत. या संघटनांच्या दहशतवाद्यांनी जम्मू-काश्मीरमधील सामान्य जनजीवन विस्कळीत करून सोडले आहे. त्यांच्या हल्ल्यात हजारो निरपराध नागरिकांचा बळी गेला आहे. या संघटनांची प्रशिक्षण केंद्रे पाकिस्तानात आहेत. पाकिस्तानची आय.एस.आय. ही गुप्तहेर संघटना दहशतवाद्यांना सर्व प्रकारची मदत पुरवित असते. पाकिस्तानच्या शासकीय यंत्रणेतील अनेक घटकांकडून दहशतवाद्यांना मदत दिली जाते. यावरून सीमापार दहशतवादाचा आपल्या देशाला किती मोठ्या प्रमाणात उपसर्ग पोहोचत आहे, हे स्पष्ट होते.

भारताच्या सीमेपलीकडून येणाऱ्या प्रशिक्षित दहशतवाद्यांच्या कारवाया आता जम्मू-काश्मीरसारख्या एखाद-दुसऱ्या राज्यापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत. देशाच्या अनेक भागांत हे दहशतवादी कार्यरत होऊ लागले आहेत. भारताच्या संसदेवर झालेला दहशतवादी हल्ला, मुंबईत लोकल रेल्वेगाडीत झालेले बॉम्बस्फोट, भारतातील काही धार्मिक स्थळांच्या ठिकाणी झालेले हल्ले व बॉम्बस्फोट या सर्व घटनांच्या मागे सीमेपलीकडून आलेल्या दहशतवाद्यांचाच हात होता, हे आता पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला हे सीमापार

- **आंतरराष्ट्रीय दहशतवाद**

आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे ताजे उदाहरण होय. या हल्ल्यात सहभागी असलेले सर्व दहशतवादी पाकिस्तानातील होत्या. आजदेखील त्या संघटना पाकिस्तानात सक्रिय आहेत. भारताला सीमापार दहशतवादाचा असलेला हा धोका लक्षात घेता आपल्या देशाने त्यावर मात करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. दहशतवादाने राष्ट्रांची सीमा कधीच ओलांडली आहे. आता दहशतवादाला स्वरूप प्राप्त झाले आहे. याचा अर्थ असा की, दहशतवादाने जगातील अनेक देशांत हातपाय पसरले आहेत; त्यामुळे ही समस्या आता काही थोड्या राष्ट्रांपुरती मर्यादित राहिलेली नाही. तिने आंतरराष्ट्रीय समुदायाला वेठीस धरले आहे. जगातील अनेक राष्ट्रांना दहशतवादाची समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावू लागली आहे; म्हणून दहशतवादावर मात करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे. अशा प्रकारच्या उपाययोजनेसाठी आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्व राष्ट्रांनी परस्परसहकार्याच्या भावनेने एकत्र येण्याची गरज आहे. सर्व राष्ट्रांच्या सामुदायिक प्रयत्नांद्वारेच आंतरराष्ट्रीय दहशतवादाला आळा घालता येणे शक्य आहे. सुदैवाने आंतरराष्ट्रीय समुदायातील बहुसंख्य राष्ट्रांना या वास्तवतेची जाणीव होऊ लागली आहे.

- **विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाची देणगी**

  आंतरराष्ट्रीय दहशतवाद ही विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाने जगाला दिलेली देणगी म्हणता येईल. याचा अर्थ असा नव्हे की, दहशतवादाची समस्या त्यापूर्वी जगाला ज्ञात नव्हती. दहशतवाद ही तशी जुन्या काळापासून चालत आलेली समस्या आहे; परंतु पूर्वीच्या काळी ही समस्या काही थोड्या राज्यांपुरती मर्यादित होती; तसेच तिने आजच्याप्रमाणे उग्र स्वरूप धारण केले नव्हते. मुख्य बाब म्हणजे पूर्वी संपूर्ण जगाला दहशतवादाचा धोका जाणवत नव्हता. आंतरराष्ट्रीय समुदायाच्या मनात धास्ती निर्माण करण्याइतका त्याचा फैलाव झाला नव्हता. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर मात्र जगाला दहशतवादाचा धोका जाणवू लागला. विसाव्या शतकाच्या अखेरच्या काळात तर आंतरराष्ट्रीय समुदायापुढील एक महत्त्वाची व गंभीर समस्या म्हणण्याइतपत दहशतवादाचा प्रसार झाला.

- **आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा उदय**

  दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात घडलेले काही बदल आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या उदयास कारणीभूत झाले होते. या संदर्भात इस्रायल राष्ट्राचा झालेला उदय या घटनेचा उल्लेख आपणास करता येईल. इस्रायलच्या निर्मितीनंतर त्या देशाच्या सरकारने तेथे अनेक शतकांपासून वास्तव्य करीत आलेल्या मूळच्या अरब रहिवाशांना त्या प्रदेशातून जबरदस्तीने हाकलून लावले, त्यामुळे या पॅलेस्टिनी अरबांवर निर्वासित होण्याची वेळ आली. अत्यंत प्रतिकूल व हलाखीच्या परिस्थितीत ते कसेबसे दिवस ढकलू लागले. अशा अवस्थेत जीवन जगणाऱ्या कोणत्याही लोकसमुदायाला वैफल्य येणे स्वाभाविक होते. आंतरराष्ट्रीय समुदायाकडून आपली दखल घेतली जात नाही अशी त्यांची भावना झाल्याने त्या वैफल्यात अधिकच भर पडली. वैफल्यग्रस्त पॅलेस्टिनी अरबापैकी काहींनी दहशतवादाचा आधार घेतला. त्यांनी आपल्या संघटना निर्माण केल्या आणि त्या संघटनांद्वारे दहशतवादी कारवाया सुरू केल्या. त्यांच्या कारवायांचा रोख प्रामुख्याने इस्रायलच्या दिशेने राहिला. तथापि, जगातील इतर काही राष्ट्रांनाही त्याची झळ पोहोचली.

- **शीतयुद्ध व दहशतवाद**

  शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सोव्हिएत युनियन या महासत्तांची काही धोरणेही दहशतवादाच्या वाढीस कारणीभूत झाली होती. राज्यपुरस्कृत दहशतवादाची चर्चा करताना अमेरिकेने दहशतवादाच्या वाढीस कसा हातभार लावला होता, याची माहिती आपण पाहिली आहे. सोव्हिएत युनियननेदेखील आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपला प्रभाव वाढविण्यासाठी थोड्याफार प्रमाणात त्याच नीतीचा अवलंब केला होता. अमेरिकेने दक्षिण अमेरिका खंडातील राष्ट्रांमध्ये आपणास अनुकूल असणाऱ्या सरकारांची स्थापना करण्यासाठी केलेल्या कारवायांमुळे त्या देशांत अमेरिकाविरोधी वातावरण तयार झाले. अमेरिकेला आणि अमेरिकेची बाहुले म्हणून कार्य करणाऱ्या राज्यकर्त्यांना धडा शिकविण्यासाठी लॅटिन अमेरिकन राष्ट्रांत काही दहशतवादी संघटना स्थापन करण्यात आल्या; त्यामुळे त्या भागात दहशतवादाचा बराच प्रसार झाला.

- **धार्मिक दहशतवाद**

  धार्मिक दहशतवाद हा दहशतवादाचा आणखी एक प्रकार अलीकडील काळात पुढे आला आहे. धार्मिक मूलतत्त्ववादी विचारांच्या संघटना या दहशतवादाच्या मुळाशी

आहेत. या संघटनांना बलप्रयोगाच्या माध्यमातून आपल्या धर्माचा प्रभाव निर्माण करावयाचा आहे. त्याकरिता त्यांनी दहशतवादाचा आधार घेतला आहे. धार्मिक दहशतवादाला खतपाणी घालण्याचे पापकर्म अमेरिकेच्या खाती जमा आहे. अफगाणिस्तानातील सोव्हिएत फौजांना पराभूत करण्यासाठी अमेरिकेने तालिबानसारख्या धार्मिक कट्टरतावादी व मूलतत्त्ववादी संघटनेला हाताशी धरले. तिने तालिबानला सर्व प्रकारची मदत केली. ओसामा बिन लादेनसारखे भस्मासुर पोसण्याचे कार्यही अमेरिकेनेच केले. सोव्हिएत युनियनच्या फौजा अफगाणिस्तानात असताना अमेरिकेनेच लादेनला शस्त्रास्त्रांची व अन्य स्वरूपाची मदत केली होती. जम्मू- आश्मीरमध्ये हिंसक कारवाया करणाऱ्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानकडून मदत दुष्कर्माकडे हेतुतः कानाडोळा केला होता. अमेरिकेच्या या नीतीमुळे अफगाणिस्तान व पाकिस्तान या देशांत धार्मिक दहशतवाद चांगलाच फोफावला. पुढे लवकरच त्याने इतर देशांतही हातपाय पसरले.

- **अमेरिकेवरील दहशतवादी हल्ला**

  विसाव्या शतकाच्या अखेरच्या काळात जगातील अनेक देशांना दहशतवादाचे चटके बसू लागले होते. अशा देशांमध्ये भारत, रशिया, इस्रायल, चीन, श्रीलंका इत्यादी देशांचा समावेश होतो. लॅटिन अमेरिकन व आफ्रिकन देशांपैकी काही देशही दहशतवादाचे बळी ठरले आहेत. तथापि, ११ सप्टेंबर, २००१ रोजी अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरातील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या बहुमजली जुळ्या इमारतींवर दहशतवाद्यांनी हल्ला केल्यानंतर मात्र दहशतवादाच्या धोक्याची खरी जाणीव अमेरिकेला झाली. दहशतवाद हा एकविसाव्या शतकातील जगापुढे निर्माण होऊ घातलेला सर्वांत गंभीर धोका असल्याचे अमेरिकेने जाहीर केले. त्यानंतर दहशतवादाविरुद्ध जागतिक पातळीवर सर्वंकष लढा उभारण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला. आज दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात जगातील बहुतेक सर्व देश सहभागी झाले आहेत; परंतु जगातून दहशतवाद निपटून काढण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात यासंबंधीचे चित्र अद्याप तरी स्पष्ट झालेले नाही.

- **संयुक्त राष्ट्रांचे प्रयत्न**

  आंतरराष्ट्रीय दहशतवादाने जगापुढे उभ्या केलेल्या आव्हानाची जाणीव आता सर्वांनाच झाली असल्यामुळे दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरून प्रयत्न केले जाऊ लागले आहेत. संयुक्त राष्ट्रांनी याबाबतीत पुढाकार घेणे स्वाभाविक होते. संयुक्त राष्ट्राच्या आमसभा व सुरक्षा समिती या विभागांनी दहशतवादाच्या धोक्याची जगाला जाणीव करून देण्यासाठी इ. स. १९७० च्या दशकापासूनच प्रयत्न सुरू केले होते. आमसभा व सुरक्षा समिती यांनी दहशतवादाच्या विरोधात वेळोवेळी अनेक ठराव समंत केले आहेत; तसेच त्यानी दहशतवादाला आळा घालण्याच्या उद्देशाने काही करारनामे प्रसिद्ध केले आहेत. संयुक्त राष्ट्रांनी चालविलेल्या या प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्व घटकांनी मनापासून सहकार्य करण्याची नितांत गरज आहे.

१) **नागरी संघर्ष :** संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेमागचा हा मुख्य उद्देश होता. गेल्या साठ वर्षांत संयुक्त राष्ट्राने शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. सऱ्या महायुद्धाच्या धोक्यापासून जगाला वाचविणे हा यू. एन. च्या स्थापनेमागचा हेतू होता आणि या कार्यात

यूएन ला यश प्राप्त झाले आहे. गेल्या साठ वर्षांत शंभरहून अधिक असे प्रसंग आलेत की ज्या वेळी दोन राष्ट्रांमधील युद्धाचे पर्यवसान महायुद्धात होऊ शकले असते. तथापि युद्ध झाले नाही ते यूएनच्या मध्यस्थीमुळे. राष्ट्राराष्ट्रांमधील संघर्ष, वाद, प्रश्न सोडविण्यासाठी यूएनला वेळोवेळी आमंत्रित केले गेले. असे संघर्ष सोडविण्यासाठी यूएनकडून अनेकदा लवाद, आयोग नेमले गेले. काश्मीरच्या प्रश्नावरून भारत आणि पकिस्तानमध्ये असलेला संघर्ष शांतता आणि चर्चेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी यूएन ने १९४८ साली लवाद नेमला. राष्ट्रांनी आपापसातील प्रश्न सोडविण्यासाठी संघर्षापेक्षा सहकार्याच्या मार्गाचा अवलंब करावा यासाठी यूएनने प्रयत्न केले. दोन राष्ट्रांमधील संघर्षामुळे विभागीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात येऊ नये यासाठी प्रयत्न केला. सुरक्षा परिषदेच्या माध्यमातून यूएनने दोन राष्ट्रांमधील वाद युद्धाचे रूप धारण करू नये यासाठी त्वरित पावले उचलली. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी यूएन चे महासचिव, आमसभा आणि सुरक्षा परिषदेने महत्त्वाची भूमिका पार पाडली. संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसैनिकांनी शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याच्या कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

२) **नागरी संघर्ष सोडविण्यात योगदान:** आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकावी म्हणून दोन राष्ट्रांतील संघर्ष सोडविण्याबरोबरच राष्ट्रांतर्गत नागरी स्वरूपाचे संघर्ष सोडविण्याचा प्रयत्न यू.एन.च्या माध्यमातून झाला आहे. शीतयुद्धोत्तर काळातील नव्वद टक्क्यांहून अधिक संघर्ष हे नागरी संघर्ष आहेत. नागरी संघर्ष सोडविण्यासाठी यूएनकडून खालील प्रमुख प्रयत्न केले गेले.

१) नागरी संघर्ष सोडविण्यासाठी राजनयाच्या माध्यमातून प्रयत्न

२) शांतिसैनिक मोहिमांचे आयोजन

३) नागरी संघर्षातील पक्षांमध्ये चर्चा आणि वाटाघाटी व्हाव्यात यासाठी मध्यस्थी

४) विभागीय संघटनांच्या मदतीने संघर्ष सोडविण्यासाठी प्रयत्न

५) संघर्षानंतर शांतता टिकून राहावी म्हणून प्रयत्न

६) सुरक्षा परिषदेने नागरी स्वरूपाचे संघर्ष सुटावेत यासाठी आर्थिक बहिष्कारापासून ते शांतिसैनिकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष हस्तक्षेप करण्यापर्यंत पावले उचलली आहेत.

७) अल-साल्वाडोर, ग्वाटेमाला, कंबोडिया, मोझांबिक यांसारख्या राष्ट्रांमधील नागरी स्वरूपाचे संघर्ष सोडविण्यात यूएनने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

८) सोमालिया, रवांडा आणि युगोस्लाव्हिया यांसारख्या राष्ट्रांमधील वांशिक दंगली आणि या दंगलींमधून मोठ्या प्रमाणात घडून येणारे मानव अधिकारांचे उल्लंघन थांबावे यासाठी यूएनने प्रयत्न केले आहेत.

९) १९९८ ते २००० या काळात संयुक्त राष्ट्रातर्फे कांगो, पूर्व तिमोर, कोसोवो, सिएरालोने यांसारख्या राष्ट्रांमध्ये यशस्वीपणे शांतिसैनिक मोहिमा राबविल्या गेल्या.

३) **शांतता बांधणीचे कार्य:** शांतता बांधणीचे कार्य हे शीतयुद्धोत्तर काळात यूएनच्या बदललेल्या भूमिकेचे प्रतीक आहे. युद्ध टाळून शांततेचे रक्षण करणे यूएनचे पारंपरिक कार्य आहे. शीतद्धाच्या काळात यूएनकडून हे कार्य पार पाडले गेले. तथापि शीतयुद्धोत्तर काळात या कार्याची व्याप्ती वाढली. आता केवळ शांततेचे रक्षण करणेच नाही तर शांतता कायमस्वरूपी कशी टिकून राहील यासाठी यूएन प्रयत्नशील आहे. एखाद्या राष्ट्रात संघर्ष घडून गेल्यानंतर

तिथे संघर्षाचे पुनरुज्जीवन घडू नये यासाठी यूएनचे शांतिसैनिक प्रयत्न करतात. शांतता टिकून राहावी यासाठी संबंधित राष्ट्राला शांतिसैनिक खालील क्षेत्रात मदत करतात.

१) आर्थिक विकासाच्या योजना आखून आर्थिक विकासाला हातभार लावणे.

२) सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी मदत करणे.

३) मानव अधिकारांचे रक्षण करणे.

४) लोकशाही पद्धतीने निवडणुका घेऊन स्थिर शासन प्रस्थापित करणे.

५) सुशासन (Good Governance) निर्माण करण्यासाठी मदत करणे.

४) सामूहिक हितसंबंधाशी निगडित प्रश्न सोडविण्यात योगदान

आपल्या प्रमुख उद्दिष्टांच्या पूर्ततेबरोबरच संयुक्त राष्ट्राने आपल्या सदस्य राष्ट्रांच्या सामूहिक हितसंबंधाशी निगडित अनेक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न गेल्या साठ वर्षांमध्ये केला आहे. या प्रश्नांमध्ये खालील प्रमुख प्रश्नांचा समावेश होतो.

१) पर्यावरणाचे संरक्षण

२) निर्वासितांचे प्रश्न

३) अंमली पदार्थाचा व्यापार

४) संघटित गुन्हेगारी

५) एड्ससारख्या रोगाचा सामना

६) आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा प्रश्न

हे प्रश्न सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून अनेक करार आणि ठराव केले गेले. या प्रश्नांची व्याप्ती एखाद्या विशिष्ट राष्ट्रांपर्यंत मर्यादित नाही. या प्रश्नांचा सामना सर्व आंतरराष्ट्रीय समुदायाला करावा लागत आहे. यूएनने या प्रश्नांविषयी आंतरराष्ट्रीय जनमत तयार करण्यात, या जनमताला संवेदनशील बनविण्यात महत्त्वाची भर टाकली आहे. यू.एन. च्या प्रयत्नांमुळे या प्रश्नांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्रांमध्ये एकजूट निर्माण झाल्याचे दिसते.

**५) विकासात्मक कार्याचे समन्वयन:** संयुक्त राष्ट्रातर्फे विकासात्मक कार्याचे समन्वयन गेल्या साठ वर्षांत होत आले आहे. हे कार्य संयुक्त राष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या माध्यमातून पार पाडले जाते. सदस्य राष्ट्रांचा आर्थिक आणि सामाजिक विकास घडवून आणणे हे संयुक्त राष्ट्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आर्थिक आणि सामाजिक परिषद सक्रिय आहे. विकासात्मक कार्याच्या व्यवस्थापनासाठी संयुक्त राष्ट्रांतर्गत एक स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला आहे. हा विभाग आर्थिक आणि सामाजिक व्यवहार विभाग म्हणून ओळखला जातो.

**६) मानव अधिकारांचे संरक्षण:** मानव अधिकारांचा प्रसार आणि संरक्षण हे यू.एन. च्या स्थापनेमागचे प्रमुख उद्दिष्ट आहे. गेल्या साठ वर्षांपासून यू.एन. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सक्रिय आहे. गेल्या साठ वर्षांत मानव अधिकारांच्या रक्षणासाठी संयुक्त राष्ट्रातर्फे सर्वसमावेशक मानव अधिकार राजवट उभी करण्यात आली आहे. ही राजवट विस्तृत अशा मानव अधिकार कायद्यांवर आधारलेली आहे. या राजवटीमुळे मानव अधिकारांच्या प्रश्नाचे

आंतरराष्ट्रीयकरण घडून आले. संयुक्त राष्ट्राच्या योगदानामुळे मानव अधिकारांचा प्रश्न हा देशांतर्गत व्यवहारातून आंतरराष्ट्रीय व्यवहारात हस्तांतरित झाला. गेल्या साठ वर्षांत मानवाधिकारांच्या विविध पैलूंशी निगडित शंभरहून अधिक ठराव, करार आणि कायदे संयुक्त राष्ट्रातर्फे करण्यात आले.

शीतयुद्धोत्तर काळात मानवाधिकारांच्या रक्षणासाठी यूएनतर्फे आता राष्ट्रांच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप व्हायला सुरुवात झाली आहे. हे हस्तक्षेप मानवतावादी हस्तक्षेप म्हणून ओळखले जातात. मानव अधिकारांच्या रक्षणासाठी संयुक्त राष्ट्राने आंतरराष्ट्रीय स्तरावर १९४८ पासूनच पावले उचलण्यास सुरुवात केली. आमसभेकडून १९४८ साली घोषित करण्यात आलेला मानव अधिकारांचा जाहीरनामा Universal Declaration of Human Rights या नावाने ओळखला जातो. संयुक्त राष्ट्राकडून उभारल्या गेलेल्या मानव अधिकार राजवटीचा हा पाया होता. पुढे १९६० च्या आणि १९७० च्या दशकात यूएन कडून करण्यात आलेल्या मानव अधिकार कायद्याची व्याप्ती वाढत गेली आणि मानव अधिकारांशी निगडित विविध पैलूंना त्यात समाविष्ट केले गेले. महिला, मुले, अपंग, अल्पसंख्याक, स्थलांतरित, कामगार आदींच्या मानवाधिकारांच्या संबंधात कायदे संयुक्त राष्ट्रांकडून केले गेले.

७) **आपत्कालीन परिस्थितीतील यूएनचे योगदान:** नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीच्या प्रसंगी जीवित आणि वित्तहानी टाळली जावी, मानव अधिकारांचे रक्षण व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्राने प्रभावी भूमिका पार पाडली आहे. नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी जसे महापूर, दुष्काळ, वादळ, भूकंप आदी प्रसंगी यूएनने सक्रिय भूमिका पार पाडली आहे. मानवनिर्मित आपत्तीच्या प्रसंगी जसे नागरी युद्ध, वांशिक दंगली आदी प्रसंगी यूएनने प्रत्यक्ष हस्तक्षेप केला आहे. आपत्कालीन परिस्थितीत संयुक्त राष्ट्राची भूमिका ही दोन प्रकारची राहिली आहे-

अ) आपत्कालीन परिस्थितीला बळी पडलेल्या लोकांसाठी तत्काळ मदतीचा हात देणे.

ब) आपत्कालीन परिस्थिती भविष्यात निर्माण होऊ नये यासाठी धोरण ठरविणे

सन २००० साली संयुक्त राष्ट्राने सोळा राष्ट्रांमधील पस्तीस दशलक्ष लोकांना दीड अब्ज डॉलर्सची आपत्कालीन मदत पुरविली. हे मदत पुरविण्याचे कार्य संयुक्त राष्ट्राच्या मानवतावादी व्यवहार समन्वयन कार्यालयामार्फत ही मदत दिली गेली. त्याचबरोबर विविध राष्ट्रांमधील निर्वासितांना मदत करण्यासाठी संयुक्त राष्ट्रातर्फे वेळावेळी आर्थिक मदत केली गेली. ही मदत संयुक्त राष्ट्राच्या निर्वासितांसाठीच्या उच्चायुक्तामार्फत मार्फत केली गेली. आपत्कालीन परिस्थितीचा सामना करणाऱ्या लोकांना संयुक्त राष्ट्रातर्फे पुरविली जाते. अन्नधान्याची मदत विश्व खाद्य कार्यक्रमांतर्गत

८) **निर्वसाहतीकरणाचे कार्य:** संयुक्त राष्ट्राची १९४५ साली जेव्हा स्थापना झाली, त्या वेळी आशिया, आफ्रिका खंडातील बहुसंख्य राष्ट्रे ही वसाहतवादी पारतंत्र्यात होती. संयुक्त राष्ट्राने वसाहतवादी पारतंत्र्यात जखडलेल्या लोकांना स्वातंत्र्य मिळावे, स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळावा, यासाठी प्रयत्न केले. संयुक्त राष्ट्राच्या घटनेतच समान अधिकार आणि लोकांच्या स्वयं अधिकाराचे तत्त्व अंर्तभूत आहे.

१९६० साली संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने एक महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करत वसाहतवादी पारतंत्र्यात असलेल्या राष्ट्रांना आणि लोकांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्रे वचनबद्ध असल्याची घोषणा केली. ही घोषणा Declaration on the granting of

Independence to colonical countries या नावाने ओळखली जाते. संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत वसाहतवादी पारतंत्र्यात असणारे ऐंशीहून अधिक देश स्वतंत्र होऊन संयुक्त राष्ट्राचे सदस्य बनले आहेत. तथापि अद्यापही एक कोटीहून अधिक जनता ही वसाहतवादी पारतंत्र्यात आहे. त्यांच्या मुक्ततेसाठी संयुक्त राष्ट्रे प्रयत्नशील आहेत. आमसभेने सन २००० साली २००१ ते २०१० हे दशक वसाहतवादाच्या निर्मूलनासाठीचे आंतरराष्ट्रीय दशक म्हणून घोषित केले.

९) **शांततानिर्मितीचे कार्य:** शांतता निर्मितीच्या कार्यात यूएनचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. शांततानिर्मितीचे कार्य यूएनकडून शांतिसैनिक मोहिमांच्या आधारे पार पाडले गेले. १९४८ पासून २००८ पर्यंत संयुक्त राष्ट्रांतर्फे त्रेसष्ट शांतिसैनिक मोहिमा राबविल्या गेल्या. सध्या सतरा राष्ट्रांमधून या शांतिसैनिक मोहिमा राबविल्या जात आहेत आणि या मोहिमांमधून ८२,९७८ शांतिसैनिक शांतता निर्मितीच्या कार्यात सक्रिय आहेत. यूएनच्या एकूण सदस्य राष्ट्रांपैकी १३० राष्ट्रांनी मनुष्यबळाच्या रूपाने या शांतिसैनिक मोहिमांसाठी योगदान दिले आहे. सध्या चालू असलेल्या सतरा शांतिसैनिक मोहिमांमध्ये ११९ राष्ट्रांचे शांतिसैनिक अंर्तभूत आहेत. यूएनच्या सदस्य राष्ट्रांकडून मनुष्य बळाच्या रूपाने शांतिसैनिक मोहिमांसाठी दिल्या जाणाऱ्या योगदानात जी चार राष्ट्रे आघाडीवर आहेत, ती चारही राष्ट्रे दक्षिण आशियातील आहेत. ही चार राष्ट्रे आणि त्यांच्याकडून मनुष्यबळाच्या रूपाने दिले जाणारे योगदान खालीलप्रमाणे आहे.

१) पाकिस्तान - १०,१७३

२) बांगलादेश - ९६७५

३) भारत - ९४७१

४) नेपाळ – ३६२८

मनुष्यबळाच्या रूपाने योगदान देणाऱ्या राष्ट्रात पाकिस्तान अव्वल स्थानावर तर भारत तिसऱ्या स्थानावर आहे. फिजीसारख्या छोट्या राष्ट्राने जवळपास सर्वच शांतिसैनिक मोहिमांमध्ये सहभाग घेतला आहे.

### संयुक्त राष्ट्राचे शीतयुद्धकालीन योगदान

संयुक्त राष्ट्राची निर्मिती आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवून युद्धाचा धोका टाळण्यासाठी वाटाघाटी, चर्चेचा मार्ग उपलब्ध व्हावा म्हणून झाली होती. ह्या उद्दिष्टाच्या परिपूर्तीसाठी सर्व सदस्य राष्ट्रांचे विशेषत: मोठ्या राष्ट्रांचे सहकार्य आवश्यक होते. ज्याप्रमाणे राष्ट्रसंघावर पक्षपातीपणाचे आरोप जर्मनी, इटलीसारख्या राष्ट्रांकडून झाले होते, तसे आरोप दुसऱ्या महायुद्धातील पराभूत राष्ट्रांकडून होऊ नये याची काळजी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या संस्थापकांना घ्यावी लागणार होती. दुर्दैवाने ह्या अपेक्षांची पूर्तता संयुक्त राष्ट्र संघटनेला सुरुवातीच्या काळात करता आली नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे जन्मापासून संयुक्त राष्ट्र संघटना शीतयुद्धाच्या राजकारणात सापडली. याचा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्यावर नकारात्मक परिणाम झाला.

अमेरिका आणि सोव्हिएट रशिया हे शीतयुद्धाच्या राजकारणातील प्रमुख देश सुरक्षा समितीचे

सदस्य असल्यामुळे ते चर्चेचे किंवा निर्णय घेण्याचे व्यासपीठ बनण्यापेक्षा त्याला युद्धभूमीचे स्वरूप प्राप्त झाले. संयुक्त राष्ट्र हा शीतयुद्धाच्या तराजूत तोलला गेला. शह-प्रतिशहाच्या शीतयुद्धाच्या राजकारणातून अनेक छोटे-मोठे लष्करी गट, संघटना निर्माण झाल्या. संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य असलेले अनेक देश विविध संघटनांचे सदस्य बनले. त्यांची बांधीलकी विभागली गेली. ध्रुवीकरणाच्या प्रक्रियेमुळे परस्पर अविश्वास, संशय आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले, अशा वातावरणात संयुक्त राष्ट्र संघटना सर्वानुमते कोणताही निर्णय घेऊ शकली नाही. सुरुवातीच्या तीन दशकांमध्ये निर्माण झालेले कोरिया, इंडोनेशिया, काश्मीर, सुएझ, क्यूबा, हंगेरी, बर्लिन, इत्यादी प्रश्न शीतयुद्धाच्या राजकारणामुळे चिघळले. तथापी अशा वातावरणातदेखील संघर्षाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अनेकदा शांतिसैन्य पाठवण्यात आले. सायप्रस, इस्त्रायल, लेबनान, इत्यादी ठिकाणी युद्धबंदी करारावर देखरेख ठेवण्यासाठी शांतिसैन्य पाठविण्यात आले. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध संस्था, समित्यांनी मागासलेल्या देशांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विकासासाठी विशेष प्रयत्न घेतले. आर्थक आणि तंत्रज्ञानाविषयक मदत पुरविण्यात आली.

मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी मानवी हक्क जाहीरनाम्याची सन १९४८ साली तर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकारांची सन १९६६ साली करण्यात आलेली घोषणा महत्त्वपूर्ण आहे. नि:शस्त्रीकरणाच्या क्षेत्रात संयुक्त राष्ट्र संघटनेकडून झालेले प्रयत्न लढ्यात घेण्यासारखे आहेत. सन १९६३ चा अणुचाचणी बंदी करार आणि १९६८ चा अण्वस्त्र प्रसारबंदी करार हे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने झालेले शीतयुद्धाच्या काळातील दोन महत्त्वपूर्ण निःशस्त्रीकरण करार आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेचे शीतयुद्धकालीन योगदान थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

(१) ज्या प्रमुख उद्दिष्टांसाठी संयुक्त राष्ट्र संघटना निर्माण झाली होती ते म्हणजे - तिसरे महायुद्ध टळावे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेला यश प्राप्त झाले. शीतयुद्धाच्या काळात दोन्ही महासत्तांमध्ये अनेकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली, पण प्रत्यक्ष युद्ध झाले नाही. त्याच श्रेय जाते संयुक्त राष्ट्र संघटनेमार्फत साधल्या गेलेल्या दोन महासत्तांमधील सत्तासमतोलाला.

(२) शीतयुद्धाच्या काळात दोन्ही महासत्तांमधील परस्परसंशय, अविश्वास आणि असुरक्षितता यामुळे शस्त्रास्त्रस्पर्धा मोठ्या प्रमाणात वाढली असली तरी यावर काही प्रमाणात वाढली असली तरी यावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेला यश प्राप्त झाले आहे.निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेसाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने आपले व्यासपीठ पुरविले.

(३) शांतिसेनेची कल्पना आणि ती कल्पना अमलात आणण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून झालेले प्रयत्न हे शीतयुद्धकाळातील संयुक्त राष्ट्र संघटनेचे मोठे योगदान आहे. सन १९४८ पासून आतापर्यंत ५४ वेळा शांतिसेनेचा वापर केला गेला. सध्या १५ देशांमध्ये शांतिसेनेचे कार्य चालू आहे.

(४) अनेक राजकीय संघर्ष शांततेच्या, वाटाघाटीच्या मार्गाने सोडवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेला व्यासपीठ उपलब्ध करून दिले. संयुक्त राष्ट्र संघटनेला आजपावेतो १७२ हून अधिक संघर्ष शांततेने सोडवण्यात यश प्राप्त झाले आहे. याचे श्रेय जाते तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रांना. संयुक्त राष्ट्र संघटनेला

(५) शीतयुद्धाच्या काळातही संयुक्त राष्ट्र संघटना एवढे कार्य करू शकली. कार्यरत ठेवण्यात विकसनशील राष्ट्रांच्या अलिप्ततावादी चळवळीने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली.

**संयुक्त राष्ट्र संघटनेचे अपयश**

रशियाच्या विघटनाबरोबरच चार दशकांपासून चालत आलेले शीतयुद्धाचे राजकारण, आंतरराष्ट्रीय राजकारणातील ध्रुवीकरण संपुष्टात आले. शीतयुद्धकालीन संशय, असुरक्षितता आणि त्यातून वाढलेली शस्त्रास्त्र स्पर्धा कमी होऊन संयुक्त राष्ट्र संघटनेला आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यात अडथळे कमी होतील असे आशेचे वातावरण निर्माण झाले. संयुक्त राष्ट्र संघटनेला आपली संपूर्ण क्षमता नि:पक्षपातीपणे वापरता येईल. छोट्या राष्ट्रांचा संयुक्त राष्ट्र संघटनेमधील विश्वास वाढेल, भिजत पडलेली अनेक प्रकरणे, वाद निकालात लागतील ही अपेक्षा होती. पण हा मार्ग वाटला तेवढा सोपा नव्हता. शीतयुद्धोत्तर काळात जी नवीन आंतरराष्ट्रीय विश्वरचना निर्माण झाली त्यात अमेरिकेचा एकमेव महासत्ता असल्याचा दावा निर्विवाद होता.

सन १९९० च्या दशकात शीतयुद्धकालीन सत्तासमतोल सामर्थ्याला नियंत्रित करू शकेल अशी समतुल्य दुसरी महासत्ता अस्तित्वात नसल्यामुळे अमेरिकेचा मनमानी कारभार सुरू झाला. संपूर्ण विश्वाच्या संरक्षणाची जबाबदारी जण आपल्यावरच आहे अशा थाटात अमेरिकेने आपला व्यवहार सुरू केला. विश्वाला याची प्रचीती पहिल्यांदा सन १९९१ च्या खाडी युद्धाच्या वेळी आली. खाडी युद्धादरम्यान इराकच्या आक्रमणातून कुवैतची मुक्तता किंवा संरक्षण हे जरी आंतरराष्ट्रीय समूहाचे कर्तव्य होते तरी त्यासाठी अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्र संघटनेला विश्वासात न घेता जो मार्ग अवलंबला तो अमेरिकेच्या एकाधिकारशाहीचे दर्शन घडवणारा होता. अमेरिकेच्या एकाधिकारशाहीचा अतिरेक सन २००१ साली अफगाणिस्तानविरुद्धच्या लष्करी कारवाईत दिसून आला. हा अफगणिस्तान आणि इराकच्या राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा सरळ सरळ अपमान होता. आपल्या राष्ट्रीय स्वार्थ्यासाठी अमेरिकेने संयुक्त राष्ट्र संघटनेचे व्यासपीठ वापरले.

अमेरिकेच्या ह्या एकाधिकारशाहीला बहुसंख्य राष्ट्रांनी विरोध केला असला तरी ह्या राष्ट्रांमध्ये युतीचा अभाव असल्यामुळे अमेरिकेची ही कारवाई त्यांना परतावून लावता आला नाही. परिणामी अमेरिकेची एकाधिकारशाही सहन करण्याशिवाय जगाला पर्याय नव्हता.

साम्यवादी राष्ट्रांचा शीतयुद्धाकालीन वॉर्सा करार संपुष्टात आला असला तरी अमेरिकेच्या नेतृत्त्वाखालील नाटो ही लष्करी संघटना अद्यापही अस्तित्वात आहे.

शीतयुद्धानंतर नाटोची भूमिका कमी होण्यापेक्षा ती वाढली आहे. नाटोच्या वाढत्या भूमिकेमुळे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अधिकारांवर नियंत्रणे पडली आहेत. अशा परिस्थितीमध्ये देखील पुढील क्षेत्रात संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे.

(१) निःशस्त्रीकरणाच्या दिशेने काही महत्त्वाची पावले संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने पडली आहेत. सन १९९५ साली अण्वस्त्र प्रसारबंदी कराराला अनिश्चित काळासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सन १९९६ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बहुसंख्य सदस्यांनी सर्वसमावेशक अण्वस्त्र चाचणी बंदी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. सन

१९९७ साली भुसुरुंग बंदी करारावर ओटावा परिषदेत १०० हून अधिक संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांनी स्वाक्षऱ्या केल्या. सन २००१ साली झालेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेत शस्त्रास्त्रांच्या व्यापारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

(२) राजकीय अस्थिरता, संघर्ष, वांशिक दंगली, हिंसाचार असणाऱ्या अनेक राष्ट्रांमध्ये शांतता आणि स्थैय निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने आपले शातिसैन्य पाठवले. कुवैत (१९९१), पश्चिम सहारा (१९९१), जॉर्जिया (१९९३), ताजिकिस्तान (१९९४), बोस्निया हर्जेगोविना (१९९६), अंगोला (१९९७), हैती (१९९७), क्रोएशिया (१९९७), कोसोवो (१९९९), सिएरा लिओने (१९९९), इस्ट टिमोर (१९९९) ह्या राष्ट्रांमध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतिसैनिकांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

(३) पर्यावरण संरक्षण, महिला आणि बालकल्याण, आरोग्य, आर्थिक आणि सामाजिक विकास, अल्पसंख्याक आणि निर्वासितांचे संरक्षण, पुनर्वसन, इत्यादी क्षेत्रांमध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका महत्त्वाची आहे. पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रात, सन १९९२ ची रिओ दी जानिरो (ब्राझील) परिषद, १९९५ ची क्योटो (जपान) परिषदेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मानवी हक्क संरक्षणासाठी सन १९९८ साली आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाची उभारणी करण्यात आली आहे. महिलांवरील अत्याचार कमी करून त्यांना समानतेची वागणूक मिळावी, त्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून सन १९९५ साली बिजिंग येथे पहिली महिला परिषद घेण्यात आली. ज्यात महिलांसंबंधी अनेक विषयांवर चर्चा झाली.

**सशस्त्र संघर्ष किंवा युद्ध व्याख्या :-**

एका राष्ट्राने आपली इच्छा दुसऱ्या राष्ट्रावर सत्तीने अहिंसात्मकरित्या किंवा युद्धावस्था निर्माण करून लादणे म्हणजे युद्ध होय. युद्धात इच्छांचा संघर्ष महत्त्वाचा असतो. अन्यथा त्यास युद्ध म्हणता येणार नाही. आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये राज्यांचे उद्देश व धोरणे परस्परांविरुद्ध असतात. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण होतात. परस्परांतील विरोध असह्य होतो किंवा त्यास भयानक स्वरुप प्राप्त होते अशा वेळी युद्ध होत असतात. काही वेळा एखादे राष्ट्र स्वतःचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी देखील उद्धात उतरत असते. स्वसंरक्षण हा देखील युद्धाचा हेतू असू शकतो.

एनसायक्लोपार्डीया ब्रिटनिकामध्ये युद्धाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे “परस्परविरोधी धोरण असलेल्या दोन मानवीय गटांमध्ये संघटीत शक्तीचा वापर करून एक गट आपले धोरण दुसऱ्या गटावर लादण्याचा प्रयत्न करतो. त्यास युद्ध असे म्हणतात.” युद्धाला वैधानिक स्वरूप देण्यासाठी दोन्ही पक्षांची स्थिती मान्य करणे आवश्यक असते मध्यमयुगात कायदेशीर युद्ध म्हणजे न्याययुद्ध समजले जात असे. मध्ययुगातील ‘ऑगस्टिन’ व ‘एक्विनास’ यांनी तर असे वर्णन केले आहे, युद्धाचा उद्देश विजय मिळविणे हा नसून कायदेशीर व्यवस्था पून्हा स्थापित करणे हा असतो.

युद्ध विभिन्न उद्धिष्टांसाठी उदा. क्षेत्रिय, राजकीय अर्थिक हित किंवा प्रतिष्ठेसाठी लढले जाते. युद्ध है क्षेत्रिय, राजकीय, आर्थिक, सैनिकी किंवा मनोवैज्ञानीक स्वरूपाचेही असू शकते. आजच्या युद्धाचे स्वरूप प्रचारत्मक आहे. युद्ध जिंकण्यासाठी प्रचाराचा उपयोग केला जातो.

या सर्व प्रकारात युद्धाचे सैनिकी स्वरूप, हे महत्त्वाचे व निर्णायक समजले जाते. या स्वरूपामुळे एका राज्यास दुसऱ्या राज्यावर आपली इच्छा लादता येते, सैनिकी स्वरूपाच्या युद्धात मनुष्य व वस्तूंची जमवाजमव करणे, परिवहन व पुरवठ्याची व्यवस्था करणे, शस्त्रनिर्मिती व त्यांचे वहन करणे, शत्रूसीमेवर आक्रमण करणे, शस्त्र निर्मिती व त्यांचे वहन करणे, शत्रूसीमेवर आक्रमण करणे किंवा स्वरंक्षणार्थ माधार येणे, शत्रूप्रदेश व्याप्त करणे किंवा शत्रूला त्याचा प्रदेश परत देणे, जय पराजय इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**युद्धासंबंधीचे दोन दृष्टीकोन :-**

युद्धाचा विचार मर्यादित आणि व्यापक अशा दोन दृष्टीकोनातून केला जातो, मर्यादित दृष्टीने आणि इंग्रजी शब्दकोशात केलेल्या व्याख्येनुसार "युद्ध म्हणजे परकीय सत्तेच्या विरुद्ध सैन्य दलाचा वापर करणे होय." दुसऱ्या शब्दात दोन परस्परविरोधी राष्ट्रांनी किंवा गटांनी परस्परविरोधी केलेला सशस्त्र संदर्ष म्हणजे युद्ध होय.

'क्विन्सी राईट' यांनी युद्धाची व्यापक आणि मर्यादित अशा दोन्ही अर्थानी व्याख्या केली आहे व्यापक अर्थाने "विभिन्न परंतु सारख्याच प्रकारच्या घटकांमधील सशस्त्र आणि हिसात्मक संघर्ष म्हणजे युद्ध होय." मयादित शनि दोन किंवा अधिक शत्रूत्व असलेल्या गटांनी सशस्त्र दलामार्फत संघर्ष चालू ठेवण्यास परवानगी देणारी 'मॅलिनोव्हस्की' यांच्या मतानुसार, "राष्ट्रीय धोरणाच्या पूर्तीसाठी, संघटीत सैन्यदलाच्या साहाय्याने केलेला दोन स्वतंत्र राजकीय घटकांमधील सशस्त्र संघर्ष म्हणजे युद्ध होय. "अशा प्रकारे युद्ध म्हणजे केवळ सशस्त्र संघर्ष नव्हे त्यामागे, राजकीय व्यवस्था, राजकारण अनि कायदेशीर स्थिती म्हणजे युद्ध होय." राजकीय व्यवहार असतो. युद्ध हे विशिष्ट राजकीय परिस्थितीतून उद्भवते. त्याचा राजकीय हेतू असतो आणि त्याची राजकीय व सशस्त्र अशी कृती असते, त्याचे परिणामही तशाच प्रकारचे होत असतात.

**युद्धाचे स्वरुप :-**

मानवी समाजात प्राचीन काळापासून युद्धे ही सतत होत आलेली आहेत मानवी इतिहासाची पाने युद्धाच्या घटनांनी भरलेली आहेत. मानवी इतिहासात युद्धविरहीत असा कोणताही कालखंड नाही परंतु युद्धाचे स्वरूप मात्र बदलेले आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळापेक्षा आजच्या युगातील युद्धे फार वेगळ्या प्रकारची आहोत. पूर्वी युद्धाचे प्रमाण जास्त होते. परंतु त्याची व्याप्ती मर्यादित होती. पूर्वीचे युद्ध रणभूमीवर लढले जात होते आणि ते दोन सैन्यापुरते मर्यादित होते. सर्व जनतेचा प्रत्यक्ष संबंध युद्धाशी येत नसे. पूर्वी युद्ध संहारकताही मर्यादित होती. युद्धाची तीव्रताही कमी होती. आजच्या युद्धाचे स्वत्य सर्वकष व अधिक विनाशक आहे. आधुनिक काळात युद्धे वारंवार होत नाहीत. परंतु जी काही युद्धे झाली ती अधिकाधिक संहारक झाली असल्याचे दिसून येते. आधुनिक काळातील युद्धे अधिक तीव्र, अधिक व्यापक आणि आणि खर्चाक स्वरूपाची झाली आहेत. युद्धाची नवीन शस्त्रे आणि नवीन तंत्रे यामुळे युद्धाची संहारकता भयानक झाली आहेत. याची साक्ष पहिल्या आणि दुसऱ्या जागतीक महायुद्धाच्या वेळी पटली आहे. पहिल्या महायुद्धाच्या काळात (१९१४ ते १९१८) युद्धात गुंतलेल्या सर्वच राष्ट्रांची जिविताची आणि संपत्तीची अतोनात हानी झाली या युद्धात एक कोटीपेक्षा अधिक माणसे मृत्युमुखी पडली. दोन कोटीपर्यंत माणसे जखमी आणि अपंग झाली हजारो घरादारांचा नाश झाला. हजारो कुटुंबे धूळीस मिळाली. दूसऱ्या महायुद्धाची (१९३९ ते १९४५) संहारकता पहिल्या महायुद्धापेक्षा अधिक तीव्र आणि भयानक होती. या युद्धात

झालेल्या हानीचा अंदाज लावणे कठीण आहे. पण दोन कोटीपेक्षा जास्त माणसे मृत्युमुखी पडली असावी, तीन कोटीहून अधिक जखमी झाली असावी. या युद्धाचा खर्चही अभूतपूर्व असाच आहे. अमेरिकेचा खर्च ३५०० कोटी डॉलर्स पेक्षा आणि इतर सर्व राष्ट्रांचा १००० कोटी डॉलर्सपेक्षा अधिक झाला असावा. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी १९४५ मध्ये हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबॉम्ब टाकण्यात आले. त्यात झालेला संहार अभूतपूर्व असा होता. ही दोन्ही शहरे पूर्णतः बेचिराख झाली. 'हायड्रोजन' आणि 'न्यूट्रॉन बॉम' शोधून काढण्यात आले आहेत. मागील युद्धात अणुशक्तीचे हे अतिसंहारक स्वरुप पाहिल्यानंतरही अण्वस्त्र निर्मिती थांबलेली नाही इतकेच नव्हे तर 'रशिया' आणि 'अमेरिका' यांच्या अण्वस्त्र निर्मितीची स्पर्धाच सुरू झाली आहे अण्वसस्त्रांच्या वारंवार चाचण्या घेतल्या जात आहेत.

संयुक्त राष्ट्रांनी केलेल्या अभ्यासानुसार जगात साधारणतः ५०,००० हाजार अण्वस्त्रे अस्तित्वात आहेत. या सर्वांची एकत्रीत संहारक शक्ती हिरोशिमावर टाकण्यात आलेल्या बॉम्बच्या दहालक्ष पट एवढी आहे. जगात दरवर्षी ५०० अब्ज डॉलर्स एवढी रक्कम शस्त्रास्त्रावर खर्च केली जाते. जगातील अनेक लहान मोठी राष्ट्रे आज उघटपणे किंवा गुप्तपणे अण्वस्त्रांची निर्मिती करीत आहेत. या अण्वस्त्रामुळे आणि त्यांच्या वापरामुळे मानवजातींचे अस्तित्वच आज नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. सर्व अण्वस्त्रांचा वापर झाल्यास मानव जातीबरोबरच सर्व सजीवसृष्टी नष्ट होऊन भविष्यात कोणत्याही सजीव जातीला राहण्यास निरुपयोगी ठरेल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. अण्वस्त्रांबरोबर अण्वस्त्रधारी बड्या राष्ट्रांनी मध्यम आणि दीर्घ पल्यांची, जमिनीवरून, समुद्रावर आणि समुद्रावरून जमिनीवर तसचे एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर मारा करणारी क्षेपणास्त्रेही निर्माण केली आहेत. ही सर्व विश्वविनाशकारी स्वरुपाची आहेत.

वरील प्रकारच्या भयानक शस्त्रनिर्मितीमुळे आणि त्यातून उद्भवणाऱ्या विश्वसंहारामुळे आज जगातील अनेक राष्ट्रांचे लक्ष निःशस्त्रीकरणाकडे केंद्रित झाले आहे. सुदैवाने अमेरिका आणि रशिया दोन महासत्ता त्यात सहभागी झाल्या आहेत. त्यांचे अण्वस्त्राचे साठे कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे आणि त्यात काहीसे यश येत आहे. रशियाचे अध्यक्ष 'मिखाईल गोर्बाचेव्ह' यांनी त्या दिशेने महत्त्वाची पावले उचलली होती. त्यामुळे, अण्वस्त्रांची निर्मिती बंद करणे असे विविध प्रकारचे करार 'रशिया आणि अमेरिका' या दोन महासत्तामध्ये होत आहेत. ३ ऑगष्ट १९९१ रोजी 'रशिया आणि अमेरिका' या देशात अण्वस्त्रांची ३० टक्के कपात करण्याचा १५ वर्षासाठी करार करण्यात आला आहे.

**युद्धाची कारणे :-**

कोणत्याही युद्धाची अनेक कारणे असतात. काही कारणे तात्कालीक असतात तर काही मूलभूत स्वरूपाची असतात. युद्धाची कारणे आणि उपाय चर्चा करण्यासाठी शिकागो विद्यापीठाने एक परिपद बोलावली होती. त्यावेळ युद्धाची एकूण २५० कारणे स्पष्ट केली होती. 'सिडने' या लेखकानेही आपल्या पहिल्या महायुद्धाची उमस्थाने' या ग्रंथात युद्धची अनेक कारणे स्पष्ट केली आहेत. त्याच्या मते, विविध राष्ट्रांनी परस्परांत, जे गुप्त लष्करी करार केले होते ते पहिल्या महायुद्धाचे सर्वात महत्त्वाचे कारण होते. त्याशिवाय अतिरेकी राष्ट्रवाद, आर्थिक साम्राज्यवाद आणि वृत्तपत्रीय प्रचार ही सुद्धा युद्धाची कारणे आहेत. असे सिडने याने स्पष्ट केली आहे. 'क्विन्सी राईट' या लेखकाने आपल्या 'स्टडी ऑफ वॉर, या ग्रंथात युद्धाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, वैचारिक, मनोवैज्ञानीक अशा विविध कारणांचा उल्लेख केला आहे.

**कारणे :-**

१. युद्धाची अगदी मुलभूत प्रेरणा मानवी स्वभावात आणि प्रवृत्तीत आहे. माणसात स्वार्थ, दुष्टपणा, घेण्याची प्रवृत्ती विध्वसंक वृत्ती, आक्रमक वृत्ती इत्यादी प्रकारच्या युद्धाला पोषक असा प्रवृत्ती आहेत. त्यामुळे मानवी समाजात संघर्ष होत असतो आणि त्यातून युद्ध होत असते. मनुष्य स्वभावात बदल होत नाही. तोपर्यंत युद्ध थांबणे शक्य नाही' असे 'लॉर्ड बेकेनहेड' याने म्हटले आहे.

२. जगातील विविध राष्ट्रांमध्ये आसलेली सांस्कृतिक भिन्नता आणि आपापली संस्कृती जोपासण्याची व सुरक्षित ठेवण्याची लोकांची इच्छा संस्कृतीबद्दलची अस्मिता इत्यादीमुळे मानवी समाजातील विविध गटात संघर्ष होत असतो आणि त्याचीच परिणती काही वेळा युद्धात होते. भारत-पाकिस्तान आणि अरब-इस्त्राईल संघर्ष आणि युद्धे ही सांस्कृतीक कारणातून झालेली आहेत असे म्हणता येईल तसेच पहिले आणि दुसरे जागतिक महायुद्ध हे वैचारिक संघर्षातून झाले आहेत. अमेरिका - रशिया यांच्यात जी शीतयुद्धे चालू आहेत ती सुद्धा वैचारिक संघर्षातून होत आहे.

३. प्रत्येक युद्धाची काही अर्थिक कारणेही असतात. यात आर्थिक स्वंयपूर्णता साधण्याचा प्रयत्न करणे, सुरक्षित व्यापारपेठ मिळविण्याचा प्रयत्न करणे, स्वस्त दराच कच्चा माल मिळविण्याचा प्रयत्न करणे, अतिरिक्त भांडवल गुंतवणे आणि अतिरिक्त उत्पादन करणे, त्यासाठी नव्या बाजारपेठा मिळविणे, या सर्वातून साम्राज्यवाद आणि वसाहतवाद उदयाला येतो आणि युद्धाला पोषक अशी परिस्थिती निर्माण होते व त्यातूनच युद्धाचा भडका उडत असतो. १८ व्या आणि १९ व्या शतकातील युरोपीय साम्राज्यवाद याच कारणांनी प्रेरित झालेला होता. युरोपीय देशांनी 'आशिया व अफ्रिका खंडात' आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. अनेक ठिकाणी युद्धे करण्यात आली होती. साधन, संपत्ती नसलेली राष्ट्रे आपली साधने आणि संपत्ती वाढविण्याच्या हेतूने इतर राष्ट्रांची जमीन व उत्पादनाची साधने आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असतात. दुसऱ्या महायुद्धांच्या पूर्वी जर्मनी, इटली, पान इत्यादी राष्ट्रांनी असे प्रयत्न केले आहेत. परिणामतः दुसरे महायुद्ध झाले होते आधुनिक काळातील युद्धांच्या मुळाशी प्रामुख्याने आर्थिक कारणे आहेत. जकात करातील वाढ व इतर आर्थिक सामर्थ्यशाली राष्ट्र साहित्याचे फार मोठ्या प्रमाणात उत्पादन करतात. इतर राष्ट्रांना त्यांची विक्री केली जाते, युद्ध साहित्याचा आणि शस्त्रास्त्रांचा वापर होणेही आवश्यक असते, त्यातूनच युद्धाची सुरूवात होते.

४. युद्धशी काही राजकीय कारणे असतात 'चार्लस हॉज' याने राजकीय कारणामध्ये राजसत्ताविषयक कारणे अंतर्गत राजकारण, अतिरेकी आणि आक्रमक राष्ट्रवाद साम्राज्यवादी धोरण, राजनयाचे अपयश इत्यादी कारणांचा समावेश केला आहे.

५. काही प्रसंगी डावपेचात्मक कारणामुळेही युद्ध होत असते. यात आक्रमण करणे, राज्याचा भूप्रदेश विस्तारित करणे, शस्त्रीकरण आणि निःशस्त्रीकरण करणे, जागतीक किंवा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपले स्थान उंचावण्याचा प्रयत्न करणे, स्वतःचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करणे इत्यादींचा समावेश करण्यात येतो.

६. आंतरराष्ट्रीय कायद्याचा अपुरेपणा हे सुद्धा युद्धाचे एक कारण आहे. राष्ट्रां-

राष्ट्रांमधील सहकार्याचे तसेच संघर्षाचे किंवा शांततेच्या आणि युद्धाच्या काळातील संबंध निश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा आहे. परंतु हा कायदा बऱ्याच प्रसंगी अपूर्ण ठरतो किंवा निरुपोयगी ठरतो.

७. आंतरराष्ट्रीय संघटनांची असमर्थता आणि अपयश हे सुद्धा युद्धाचे एक मुख्य कारण असल्याचे सांगता येईल पहिल्या महायुद्धानतर १९२० मध्ये स्थापन करण्यात आलेला राष्ट्रसंघ असमर्थ आणि अपयशी झाला म्हणूनच दुसऱ्या महायुद्धाची सुरूवात झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ मध्ये स्थापन करण्यात आलेली संयुक्त राष्ट्रसंघटना सुद्धा खऱ्या अथनि युद्ध टाळून जागतिक शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यात अयशस्वी ठरली आहे. आजही यगात अनेक ठिकाणी सशत्र संघर्ष चालू आहेत. आणि युद्धजन्य अशीच परिस्थिती आहे. यावर संयुक्त राष्ट्र संघटनेचे अपेक्षित असे नियंत्रण राहिलेले नाही. इराक-कुवेत युद्धात संयुक्त संघटनेचे अपयश पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

**जागतिक युद्धाची महत्त्वाची कार्ये :-**

मानवी समाजात आदिम काळापासून अजतागत युद्धे ही सतत होत आलेली आहे. मानवी इतिहासाची पाने युद्धांच्या घटनांनी भरलेली आहेत. मानवी इतिहासात युद्धविरहीत असा कोणताही कालखंड नाही. युद्धात अगणित अशी जीविताची आणि मालमत्तेची हानी झालेली आहे. परंतु युद्धे थांबलेली नाहीत. आजही जगाच्या पाठीवर कोठेना कोठे युद्ध हातच आहे.

मानवी समाजात आतापर्यत जी युद्धे झालेली आहे. आणि जाही जि युद्धे होत आहे, त्याला मनोवैज्ञानीक कारणे नाहीत. युद्धाची इतरही अनेक कारणे आहेत आणि युद्धाची अनेक दृष्टीने उपयक्तता आहे तसे नसते तर इतिहासात इतक्या वांरवार युद्धाच्या घटना झाल्या नसत्या, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विविध प्रकारच्या संस्था, संघटना आणि पद्धती उदयाला येतात, परंतु काळाच्या ओघात किंवा बदललेल्या परिस्थितीत इतिहासात युद्ध ही टिकून राहिलेली संस्था आहे. युद्ध हे अनिष्ट आहे, हनिकारक आणि संहारक आहे. खर्चिक युद्धावर सोडून दिलेली नाही, एक अखेरचा मार्ग म्हणून युद्धाचाच मार्ग स्वीकारला जातो. युद्धाला अजून तरी पूर्णतः पर्याय सापडलेला नाही.

युद्धावर जगी टीका केली जाते आणि युद्धाचे जसे अनिष्ट आणि वाईट परिणाम स्पष्ट केले जातात तसेच युद्धाचे समर्थनही केले जाते आणि युद्धाचे काही चांगले परिणामही स्पष्ट केले जातात. युद्ध ह उपयुक्त आहे. आणि युद्धापासून अनेक फायदे होतात असेही सांगितले जाते. युद्धामुळे काही प्राप्ती होऊ शकते असे ऐतिहासिक पुरावेही आहेत. युद्ध हे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या उपयुक्त असल्याचेही दिसून येते. युद्ध विविध प्रकारची कार्ये पार पाडत असते.

**युद्धाची प्रमुख कार्ये :-**

युद्ध ही दीर्घकाळ टिकणारी आणि परिणाम करणारी 'घटना' आहे. तसेच युद्धाची अनेक महत्त्वपूर्ण कार्येही असतात. युद्धाची काही प्रमुख कार्ये असतात. तर काही दुय्यम स्वरुपाची कार्ये असतात.

१. युद्ध हे दुसऱ्या देशाने केलेल्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे एक प्रमुख साधन आहे. आक्रमणांचा प्रतिकार केला नाही तर राज्याचे अस्तित्व धोक्यात येते, राज्याचे संरक्षण करण्यासाठी युद्धाचा उपयोग होऊ शकतो.

२. देशातील आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अन्याय परिस्थिती बदलण्यासाठी, स्वांतत्र्य प्राप्तीसाठी आणि गुलामगिरीतून व दडपशाहीतून मुक्त होण्यासाठी व लोकशाहीच्या रक्षणासाठी युद्धाचा मार्ग स्वीकारता येतो. अशी इतिहासात अनेक उदाहरणे सापडतात. फ्रेंच राज्यक्रांती राज्यक्रांती, अमेरिकन स्वातंत्र युद्ध, रशियन क्रांती, भारतीय स्वातंत्र्य युद्ध अशी अनेक उदाहरणे या बाबतीत देता येतील.

३. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायदे, आंतरराष्ट्रीय संस्था आणि संघटना, राजनय पद्धती, समतोलाची पद्धती इत्यांदीचे महत्त्व आहे. प्रत्यक्ष युद्ध झाल्यास आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील वरील प्रकारची सर्व व्यवस्था नष्ट होऊ शकते. युद्धाच्या भीतीमुळे मात्र वरील सर्व व्यवस्था टिकून आहे.

४. आज जगातिल सर्वच देश युद्ध नको असे म्हणून शांततेचा पुरस्कार करत असले तरी कोणत्याही देशाने आपला स्वतःचा युद्ध करण्याचा अधिकार सोडून दिलेला नाही. इतकचे नव्हे तर प्रत्येक राष्ट्रे युद्धाची तयारी करत असते. 'युद्धाची उत्तम तयारी हाच कोणत्याही देशाच्या संरक्षणाचा उत्तम मार्ग होय' तसेच सर्व राष्ट्रांनी धोरण स्वीकारलेले दिसते. शांततेसाठी युद्ध' असाही विचार कांही राष्ट्रांचे नेत मांडत असतात' यावरूनही युद्धाची उपयुक्तता सिद्ध होते.

**युद्धाची दुय्यम कार्ये :-**

युद्धाची काही दुय्यम स्वरुपाची कार्ये असतात. अर्थात युद्धाची प्रमुख कार्ये आणि दुय्यम कार्ये यात फारसा फरक नाही युद्धाच्या दुय्यम कार्यात पुढील कार्याचा समावेश करता येईल.

१. युद्धामुळे राष्ट्राची नैतिक आणि आत्मिक गुणवत्ता उचांवते, लोकांमध्ये समाजासाठी राष्ट्रासाठी त्याग करण्याची भावना जागृत होते. 'लोकांची संकुचित वृत्ती कमी होऊन त्यांची दृष्टी व्यापक बनते. युद्धामुळे लोक व्यक्तिगत हितपेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य देवू लागतात.

२. युद्धाची उपयुक्तता आणि युद्धाचे कार्य स्पष्ट करताना जर्मन विचारवंत हेगेल,' याने म्हटले आहे की, युद्धामुळे राज्यातील लोकांची आळशी वृत्ती, सुस्तपणा आणि मागासवृत्ती दूर होत असते युद्धात लोकांच्या राज्यनिष्ठेची कसोटी लागत असते, गुदामुळे लोक बलशाही व प्रगतिशाली बनत असतात. समुद्राला जशी पाण्याची तशीच राष्ट्रजीवनाला युद्धाची आवश्यकता असते.

३. युद्धाचे समर्थन करताना इटलीचा हुकुमशहा मुसोलीनीने म्हटले आहे की, 'स्त्रीला मातृत्व जेवढे नैसर्गिक, तेवढेच राष्ट्राला सुना होय" म्हणजेच प्रत्येक राष्ट्राला युद्ध हे नैसर्गिक आणि स्वभाविक असते.

४. आंतरराष्ट्रीय पात्रातील राजकीय परिस्थितीत बदल घडवून त्यांची पूर्नरचना करण्याच्या दृष्टीने युद्धाचा महत्वाचा वाटा असतो, जगाचा आजचा नकाशा हा

प्रामुख्याने युद्धभूमीवरच ठरविला गेला आहे. असे एका समान महटले आहे. युद्धाचे कार्य स्पष्ट करताना 'क्विन्सी राईटने' म्हटले आहे की, 'आधुनिक जगातील या महत्वाचे सादरला हे युद्धाच्या मागचा वापर करून साध्य करण्यात आले आहेत.

५. एका देशातील युद्धामुळे दुसऱ्या देशात ऐक्य आणि शांतता निर्माण होते.

६. युद्धामुळे नवीन शोध आणि संशोधनाला चालना मिळते.

**युद्धाचे भवितव्य :-**

युद्धाची वरील प्रकारची उपयुक्तता आणि कार्ये असली, तरी युद्धाचा मार्ग हा अतिशय अमानूष व हानिकारक असाच आहे, कारण कोणत्याही युद्धात जीवितांची व संपत्तीची फार मोठ्या प्रमाणात हानी होत असते. आधुनिक काळात युद्ध हे अतिशय भयानक व संहारक झाले आहे. त्यामुळेच दुसरीकडे शांततेसाठी प्रयत्न केले जात आहेत. जगातील अण्वस्त्रधारी राष्ट्रे अण्वस्त्रांची कपात आणि निःशस्त्रीकरणाचे प्रयत्न करीत आहेत, त्यांना अजूनही पूर्ण यश मात्र आलेले नाही. 'अमेरिका आणि रशिया' ही दोन्ही सामर्थ्यशाली राष्ट्रेही युद्ध टाळण्याच्या प्रयत्नात आहेत. ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट आहे. तिसरे जागतिक युद्ध झाल्यास त्यात संपूर्ण मानव संस्कृतीच नष्ट होण्याचा धोका आहे असा इशारा शास्त्रज्ञही देत आहेत. अशा परिस्थितीत पुद्ध टाळयण्याची निश्चित अशी उपाययोजना तयार करणे आणि त्यानुसार सर्वच राष्ट्रांनी वागणे हेच सर्वांच्या हिताचे होईल.

**युद्ध टाळण्याचे उपाय -**

युद्धाची कारणे, युद्धाचे स्वरुप आणि युद्धाचे परिणाम लक्षात होऊन युद्ध टाळण्याचे उपाय सुचविले जातात. युद्ध टाळण्यासाठी कोणताही. एकच किंवा एकमेव उपाय असू शकत नाही. युद्ध टाळण्यासाठी विविध प्रकारची उपाययोजना करण्याची आवश्यकता असते. युद्ध टाळण्यासाठी पुढील प्रकारचे उपाय करता येतील.

१. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आर्थिक सामाजिक, राजकीय इत्यादी प्रकारच्या भिन्नतेतून आणि विषमतेतून आणि संघर्षातून युद्धे उद्भवत असत, म्हणून आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील वरील प्रकारचे भेद दूर केल्यास युद्ध टाळता येईल, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील राजनय पद्धती, संधी किंवा करार पद्धती, पंच निवाडा पद्धती, आंतरराष्ट्रीय न्यायालयामार्फत वाद सोडविण्यास मान्यता इत्यादी पद्धतींचा स्वीकार केल्यास युद्धे होणार नाहीत.

२. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शत्रुत्वाऐवजी मैत्रीचे आणि संघर्षाऐवजी सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणे.

३. संयुक्त राष्ट्र संघटनेला आधिक सामर्थ्यशाली करून संघर्ष किंवा युद्ध टाळता येते.

४. परराष्ट्र धोरण निश्चित करणाऱ्या आणि त्यासंबंधीचे निर्णय घेणाऱ्या राष्ट्रीय नेत्यांवर आणि पुढाऱ्यांवर लोकांधे नियंत्रण प्रस्थापित करणे, त्यांच्यावर लोकांच्या इच्छेचे बंधन असले पाहिजे. परराष्ट्रीय धोरण आणि त्यासंबंधीचे निर्णय याबाबत राष्ट्रीय नेते जनतेला जबाबदार असले पाहिजेत. राष्ट्रीय धोरणावर लोकमताचा आणि लोकांच्या इच्छेचा जेवढा प्रभाव पडतो तेवढा परराष्ट्रीय धोरणावरही पडला पाहिजे.

## १.५ शांतता आणि संघर्ष

Peace and conflict-resolution: collective security, peacekeeping, enforcement of peace.

### सामूहिक सुरक्षितता : स्वरूप Nature of Collective Security

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संबंधांच्या व्यवस्थापनाविषयीच्या चर्चेत सामूहिक सुरक्षितता हा प्रमुख विषय आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय सत्तेचा दुरूपयोग टाळण्यासाठी त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सत्तेवर, राष्ट्रांच्या अतिरेकी महत्त्वाकांक्षांवर नियंत्रण, मर्यादा घालून आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता टिकवण्यासाठी सत्तासमतोलाप्रमाणेच सामूहिक सुरक्षितता हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेसारख्या आंतरराष्ट्रीय संघटना आणि नाटोसारख्या विभागीय लष्करी संघटना सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वावर आधारलेल्या आहेत. राष्ट्रांच्या आक्रमक उद्दिष्टांवर नियंत्रण ठेवून आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी अनेक राष्ट्रांकडून संघटितपणे झालेले हे कृत्य आहे. किंबहुना आक्रमक राष्ट्राला अशा प्रकारच्या संघटित प्रतिक्रियेची कल्पना असल्यामुळे आपल्या उद्दिष्टांना वास्तव रूप देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होत नाही. सामूहिक सुरक्षितता हे संघटित कृत्य असल्यामुळे याचे फायदे विशिष्ट राष्ट्राला किंवा राष्ट्रांच्या गटाला न होता संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदायाला होतात. आंतरराष्ट्रीय शांतता टिकवण्यासाठी आवश्यकता भासल्यास युद्धाच्या मार्गाचा अवलंब सामूहिक सुरक्षिततेच्या प्रक्रियेअंतर्गत अनैतिक किंवा बेकायदेशीर मानला जात नाही. संयुक्त राष्ट्र- संघटनेच्या घटनेतील सातव्या प्रकरणात (कलम ३९ ते ५१) याची स्पष्ट तरतूद आहे. कलम ५१ हे प्रामुख्याने सामूहिक सुरक्षिततेशीच निगडित आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय सुरक्षिततेचा प्रश्न हा फार जुना असून प्रत्येक राष्ट्र आपल्या सुरक्षिततेसाठी प्रयत्नशील असते. आधुनिक काळात राष्ट्रीय सुरक्षिततेचा प्रश्न आंतरराष्ट्रीय सुरक्षिततेशी जोडण्यात आला आहे. राष्ट्रीय सुरक्षा हा केवळ विशिष्ट राष्ट्राच्याच चिंतेचा विषय राहिलेला नसून त्याविषयी पूर्ण आंतरराष्ट्रीय समुदाय जागरुक आहे. परिणामी एका राष्ट्रावर झालेल्या आक्रमणाला संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदायावर झालेले आक्रमण म्हणून संबोधले जाते आणि आक्रमक राष्ट्राविरुद्ध संघटित कृती केली जाते. हाच सामूहिक सुरक्षिततेचा पाया आहे. सामूहिक सुरक्षिततेमुळे राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न सुटला आहे. म्हणूनच हन्स मॉर्गन्थ्यूनेसामूहिक सुरक्षिततेची व्याख्या 'एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक' अशी केली आहे.

### सामूहिक सुरक्षिततेचा अर्थ

सामूहिक सुरक्षिततेचा अर्थ अभ्यासकांनी विविध पद्धतींनी सांगण्याचा प्रयत्न केल्यामुळे ह्या संकल्पनेविषयीची संदिग्धता वाढली आहे. सामूहिक सुरक्षिततेविषयी काही विद्वानांनी केलेल्या व्याख्या, व्यक्त केलेली मते खालीलप्रमाणे आहेत.

अ) **श्वात्झेनबर्जर -** प्रस्थापित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे उल्लंघन करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध किंवा तसे कार्य करण्यापासून राष्ट्राला परावृत्त करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली संयुक्त कृतीची यंत्रणा.

**आ)** **प्रा. श्लैश्वर -** अशी व्यवस्था की ज्यात आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्व सदस्य राष्ट्रे आक्रमक राष्ट्राविरुद्ध संयुक्त कारवाईसाठी आणि आक्रमणाला बळी पडलेल्या राष्ट्राच्या मदतीसाठी वचनबद्ध असतात.

**इ)** **अर्नेस्ट ग्रॉस -** आंतरराष्ट्रीय सुरक्षितता टिकवण्यासाठी सामूहिक कृतीशिवाय पर्याय नाही. सामूहिक सुरक्षिततेच्या अभावी संपूर्ण असुरक्षितता निर्माण होते.

**ई)** **ऑर्गन्स्की -** सामूहिक सुरक्षिततेतून एखाद्या राष्ट्रावर झालेले आक्रमण केवळ थोपवता येणार नाही तर अशी वेळेच येऊ नये म्हणून आवश्यक वातावरण निर्माण होईल,

## सामूहिक सुरक्षिततेची आधारभूत तत्त्वे

सामूहिक सुरक्षिततेची व्यवस्था काही मूलभूत तत्त्वांवर आधारलेली आहे. ऑर्गन्स्की ह्या विद्वानाने आपल्या 'आंतरराष्ट्रीय राजकारण' ह्या पुस्तकात सामूहिक सुरक्षिततेची पाच आधारभूत तत्त्वे सांगितली आहेत.

१) प्रत्येक सशस्त्र संघर्षात आक्रमक राष्ट्र कोणते आहे याविषयी सर्व राष्ट्रांचे एकमत असायला हवे. पण असे एकमत होणे अवघड बाब आहे. कारण कोणतेही राष्ट्र स्वतःला कधीही आक्रमक म्हणवून घेणार नाही. शत्रू राष्ट्राने आपल्याला आक्रमणासाठी प्रवृत्त केले असे सांगून आपला बचाव करण्याचा प्रयत्न करेल. आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध लष्करी कारवाईसाठी जोपर्यंत सर्व राष्ट्रांमध्ये एकमत होत नाही तोपर्यंत कारवाई अवघड असते. याचे योग्य उदाहरण म्हणजे सध्याचे अमेरिकेचे इराकविषयीचे धोरण होय. इराकजवळ विध्वंसक रासायनिक शस्त्रास्त्रे आहेत. जोपर्यंत इराकी हुकुमशहा सद्दाम हुसेनविरुद्ध मित्र-राष्ट्रांची संयुक्त कारवाई होत नाही तोपर्यंत इराक शस्त्रास्त्रे बाळगल्याची कबुली देणार नाही. ह्या अमेरिकेच्या भूमिकेला नाटो संघटनेतील काही राष्ट्रांचा विरोध आहे. इराकविरुद्ध लष्करी कारवाई करायची किंवा नाही यावर जर्मनी, फ्रान्स, इंग्लंडसारख्या राष्ट्रांचे एकमत नाही. सन १९९१ च्या खाडी युद्धानंतर अमेरिका इराकवर पुन्हा एकदा लष्करी कारवाईसाठी आपल्या मित्रराष्ट्रांचे समर्थन मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. पण ह्या मुद्यावर एकमत होऊन शकल्यामुळे सन २००२ पर्यंत इराकविरुद्ध लष्करी कारवाई होऊ शकलेली नाही.

२) आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी सर्व राष्ट्रांची समान इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. अशी परिस्थिती प्रत्येकवेळी शक्य नसते. अनेकदा आक्रमक राष्ट्राला इतर राष्ट्रांचा छुपा किंवा उघड पाठिंबा असतो.

३) आक्रमण परतवून लावण्याची क्षमता इतर राष्ट्रांमध्ये असायला हवी.

४) सर्व राष्ट्रांची संघटित शक्ती आक्रमण परतवून लावण्यात यशस्वी ठरेल. सामूहिक प्रयत्नांमधून शांतता आणि सुरक्षितता निर्माण होईल.

५) जेव्हा अशा संघटित प्रतिकाराची शक्यता असेल तेव्हा कोणतेही राष्ट्र आक्रमणाचे किंवा आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करण्याचे धाडस करणार नाही.

## सामूहिक सुरक्षितता : संक्षिप्त इतिहास

सामूहिक सुरक्षिततेच्या व्यवस्थेअंतर्गत १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका ह्या राष्ट्रांनी युरोपमध्ये सत्ता असमतोलाची एक कृत्रिम यंत्रणा निर्माण केली होती. ह्या यंत्रणेने पहिल्या महायुद्धापर्यंत युरोपमध्ये शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यात महत्त्वाचे योगदान दिले होते. सामूहिक सुरक्षिततेची व्यवस्था निर्माण करण्यात आणि टिकवण्यात इंग्लंड आणि अमेरिकेचे योगदान मोठे होते.

आधुनिक सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाचे जनकत्व पहिल्या महायुद्धाच्या काळातील अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्याकडे जाते. वुड्रो विल्सन यांच्या मतानुसार पहिले महायुद्ध हे प्रामुख्याने सत्तासमतोलाच्या राजकारणातून घडून आले होते. परिणामी पहिल्या महायुद्धानंतर युरोपमध्ये कायमस्वरूपी शांतता आणि सुरक्षितता निर्माण व्हावी यासाठी सामूहिक सुरक्षिततेच्या आधारावर एक संघटनात्मक व्यवस्था निर्माण व्हावी असा विचार विल्सन यांनी आपल्या प्रसिद्ध चौदा कलमी योजनेत व्यक्त केला. ह्याच उद्दिष्टपूर्तीसाठी पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. राष्ट्रसंघाच्या घटनेतील कलम १० ते १६ मध्ये सामूहिक सुरक्षिततेविषयी सविस्तर आणि स्पष्ट तरतूद करण्यात आली होती. राष्ट्रसंघाने आपल्या वीस वर्षांच्या कारकिर्दीत सामूहिक सुरक्षिततेची व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न अनेकदा केले. सन १९२३ चा परस्पर सहकार्याचा करार, १९२४ चा जिनेवा प्रोटोकॉल, सन १९२५ चा लोकार्नो करार, सन १९२८ चा केलाग ब्रायंड करार हे सामूहिक सुरक्षिततेची यंत्रणा निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेली काही महत्त्वाची पावले होती. ह्या घटकाच्या सुरुवातीलाच स्पष्ट केल्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या घटनेत सामूहिक सुरक्षिततेची स्पष्ट तरतूद कलम ३९ ते ५१ दरम्यान करण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या निर्मितीनंतर गेल्या पन्नास वर्षांत सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाचा अवलंब अनेक वेळा करण्यात आला आहे. सन १९५० चा कोरिया संघर्ष, सन १९५६ चा सुएझ संघर्ष, सन १९६० चा कांगो संघर्ष, सन १९९१चेखाडी युद्ध अशा संघर्षांच्या वेळी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा परिषदेने सामूहिक सुरक्षिततेचे ठराव मंजूर केले. अर्थात, सुरक्षा परिषदेत सदस्य राष्ट्रांमध्ये एकमत होऊ न शकल्यामुळे सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकली नाही. अमेरिका आणि सोव्हिएत रशियामधील शीतयुद्धाचे राजकारण सामूहिक सुरक्षिततेतील मोठा अडथळा होता. दुसऱ्या महायुद्धानंतर सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वांवर आधारित काही विभागीय संघटनादेखील निर्माण झाल्या. यात नाटो ही संघटना महत्त्वाची आहे. शीतयुद्धाच्या काळात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली पश्चिम युरोपच्या संरक्षणासाठी निर्माण झालेल्या ह्या संघटनेच्या घटनेत एका सदस्य राष्ट्रावरील आक्रमण हे सर्व सदस्य राष्ट्रांवरील आक्रमण असेल' ह्या सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाचा समावेश करण्यात आला आहे.

## सामूहिक सुरक्षिततेचे कार्य

१) सामूहिक सुरक्षिततेची व्यवस्था प्रस्थापित आंतरराष्ट्रीय व्यवस्था किंवा रचना टिकवण्याचे कार्य करते. ह्या व्यवस्थेत परिवर्तन आणण्याचा किंवा तिचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याचा सामूहिक प्रतिकार केला जातो.

२) ह्या व्यवस्थेत सत्ता असमतोलाची कृत्रिम व्यवस्था धाक निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक निर्माण केली जाते. सामूहिक प्रतिकाराची भीती असल्यामुळे कोणतेही राष्ट्र आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उल्लंघनाचे धाडस करत नाही.

३) ह्या व्यवस्थेत सामूहिक सुरक्षिततेविषयी सर्वराष्ट्रांचे एकमत असते. सामूहिक सुरक्षिततेच्या व्यवस्थेतूनच राष्ट्रीय सुरक्षेचे संरक्षण होत असल्याकारणाने राष्ट्रे अशा यंत्रणेला पाठिंबा देतात.

४) ह्या व्यवस्थेत सामूहिक किंवा जागतिक कल्याणासाठी राष्ट्रांनी त्यांच्या संघर्षमय राजकीय हितसंबंधांचा त्याग करावा अशी अपेक्षा असते.

**शांतता आणि अंबलबजावणी Peacekeeping, enforcement of peace**

**सापेक्ष संकल्पना**

आंतरराष्ट्रीय संबंधात किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्र-राष्ट्रातील परस्पर संबंधाचा विचार करताना संघर्ष किंवा युद्धे यांचा जसा विचार केला जातो तसाच सहकार्य आणि शांतता यांचाही विचार केला जातो. कारण आंतरराष्ट्रीय संबंध हे नेहमीच शत्रूत्त्वाचे आणि संघर्षामय असतात असे नाही, तर आंतरराष्ट्रीय संबंध हे मैत्रिचे आणि शांततेचेही असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात युद्धांबरोबर शांतताही असते. प्रत्येक युद्धांच्या वेळी, युद्धापूर्वी व युद्धचालू असताना आणि युद्ध संपल्यानंतर शांततेचा युद्धाच्या वेळी विचार केला जातो आणि शांततेसाठी प्रयत्न केले जातात.

**सापेक्ष संकल्पना :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणातील शांततेची संकल्पना ही सापेक्ष स्वरूपाची आहे. बदलत्या काळानुसार आणि बदलत्या परिस्थितीत जागतकि किंवा आंतरराष्ट्रीय शांततेची संकल्पना बदलत गेली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात शांतता केव्हा आणि कशी प्रस्थापित करावी या प्रश्नावरूनही राष्ट्र-राष्ट्रांत संघर्ष झालेला आहे. 'शांततेशाठी संघर्ष' किंवा 'शांततेसाठी युद्ध' या पद्धतीचे वर्णन केले जाते.

**प्रादेशिक स्वरूप :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणातील शांततेचा विचार हा प्रादेशिक दृष्टीकोनातून करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात ज्या काळात युरोपीय राष्ट्रांचे प्रभावी आणि वर्चस्व होते त्या काळात युरोपीय देशातील ऐक्य, सहकार्य, आणि शांतता म्हणजेच आंतरराष्ट्रीय शांतता असा विचार केला जात होता आणि युरोपीय राष्ट्रांच्या विरोधात कोणतीही वृत्ती करणे म्हणजे आंतरराष्ट्रीय शांततेचा भंग करणे होय. असे मानले जात होते.

पहिल्या महायुद्धानंतर (१९१४ ते १९१९) ते दुसऱ्या महायुद्धापर्यंत (१९३९ ते १९४५) या काळात म्हणजेच दोन महायुद्धांच्या काळात आंतरराष्ट्रीय शांततेचा विचार वेगळ्याच दृष्टीकोनातून केला जात होता. मित्र राष्ट्रांचे (इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी व इटली) यांच्यावरील नियंत्रण आणि वर्चस्व म्हणजेच आंतरराष्ट्रीय शांतता असा विचार केला जात होता. म्हणूनच व्हर्सायचा तह (१९१९) करताना पराभूत राष्ट्रावर अन्यायकारक अशा अटी लादण्यात आल्या. पराभूत राष्ट्रांचा मान आणि राष्ट्रहित यांचा कोणताही विचार करण्यात

आला नाही, व्हायचा तह जर्मनीला मान्य करण्यास सक्ती करण्यात आली. दोस्त राष्ट्रांनी पाशवी सामध्यांच्या जोरावर व्हायचा तह जर्मनीवर लादला. असा जर्मन जनतेचा ग्रह झाला होता. परिणामतः नंतरच्या काळात या तहाच्या अटी पाळण्याची कोणतीही नैतिक जबाबदारी जर्मनीने स्वीकारली नाही. आणि दुसऱ्या महायुद्धाला पोषक अशी परिस्थिती निर्माण झाली आणि १९३९ मध्ये प्रत्यक्षात दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला.

**राष्ट्रसंघाची स्थापना :-**

पहिल्या महायुद्धात प्रचंड प्रमाणात जीवितांची आणि संपत्तीची हानी झाली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात युद्धविरोधी आणि शांतताप्रेमी विचारांची लाट पसरली जगात पुन्हा युद्ध होऊ नये आणि शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी एखादी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात यावी असा विचार सर्वत्र होऊ लागला. अमेरिकेने अध्यक्ष बुडो विल्सन यांनी पुढाकार घेतला. त्यांनी आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करून जागतिक शांतता स्थापित करण्यासंबंधीची चौदा कलमी योजना जाहिर केली. इतर राष्ट्रांनी त्याला पाठिंबा दिला आणि अखेर १० जानेवारी १०२० रोजी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे, त्यासाठी युद्धाच्या मार्गाचा अवलंब न करणे, राज्याराज्यात खुले आणि न्याय व सन्मान्य संबंध प्रस्थापित करणे, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे आणि करारांचे पालन करणे अशा प्रकारची राष्ट्रसंघाची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रसंघाच्या सभासद राष्ट्रांनी शपथ घेतली होती. आंतरराष्ट्रीय करार आणि कायदे सर्व राष्ट्रांना बंधनकारक असतील हेही मान्य करण्यात आले होते. तसेच राष्ट्रसंघाला आपली जबाबदारी पार पाडता यावी आणि कार्य करता यावे यासाठी राष्ट्रसंघाची महासभा, राष्ट्रसंघाची निर्मिती आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय व सचिवालयही स्थापन करण्यात आले होते. परंतु राष्ट्रसंघाला आपले उद्दिष्ट साध्य करण्यात यश आले नाही. विशेषतः राष्ट्रसंघाला शस्त्रस्पर्धा थांबविणे, शस्त्रेनिर्मितीला आळा घालणे, युद्ध थांबविणे या बाबतीत अपयश आले. १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाला सुरूवात झाली त्यात राष्ट्रसंघ नष्ट झाला.

**संयुक्त राष्ट्रांचे शांततेचे प्रयत्न :-**

१९३९ ते १९४५ या काळात दुसरे महायुद्ध झाले. पहिल्या महायुद्धानंत केवळ वीस वर्षाच्या आतच हे युट झाले आणि ते पहिल्या महायुद्धापेक्षा अधिक व्यापक स्वरूपाचे आणि अधिक संहारक होते. दुसऱ्या महाबुदाची अखेर 'हिरोशिमा व नागासाकी' या जपानी शहरांवर अणुबॉमचा वर्षाव करून झाली होती. ही घटना जगाला हादरा देणारी होती. तसेच युद्धाची भयानकता स्पष्ट करणारी होती. मानवाने युद्धाचा शेवट केला नाही, तर युद्धच मानवाचा शेवट करील अशी परिस्थिती निर्माण झाली होती, म्हणून अमेरिका, इंग्लंड, फ्रांस,रशिया, चीन व इतर सर्वच देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी जागतिक शांततेसाठी नवीन आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न केला आणि त्यातून २४ ऑक्टोबर १९४५ या दिवशी १ 'संयुक्त राष्ट्र' या संघटनेची स्थापना करण्यात आली आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता प्रस्थापित करणे आणि युद्धाच्या आपत्तीपासून भावी पिढ्यांचे रक्षण, करणे हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या पहिल्या कलमात ज्या आक्रमक कर्त्यांना पायबंद आणि न्याय व आंतरराष्ट्रीय कायदा यांना अनुसरून आंतरराष्ट्रीयचे तंटे सोडवणे हे संयुक्त

राष्ट्रांचे मुख्य उद्दिष्ट आहे. तसेच आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ही संघटना कार्यही करीत आहे. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि युद्ध टाळण्यासाठी ही संघटना प्रयत्नशील असली तरी स्वंयरक्षणासाठी युद्ध करण्याचा राष्ट्राचा अधिकार या संघटनेने अमान्य केलेला नाही. त्यामुळे संघटनेला अजूनही पूर्ण यश आलेले नाही.

सयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्तापित करण्याच्या उद्देशाने महासभेत १९५० मध्ये 'शांततेसाटी ऐक्याच्या ठरावा' नुसार जागतिक शांततेला धोका निर्माण झाल्यास अथवा आक्रमक कृत्य घडल्यास आणि त्याबाबत सुरक्षा परिषदेने आपली जबाबदारी पार न पाडल्यास त्या प्रकरणाचा विचार महासभा करू शकते आणि त्या संबंधात 'सामूहिक' सुरक्षेच्या उपायासहित कोणती उपाययोजना करावयाची त्याबाबत सभासद राष्ट्रांना शिफारस करू शकते. गेल्या ४५ वर्षात संयुक्त राष्ट्र संघटना आपले ध्यये साध्य करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. ही संघटना अस्तित्वात असतानाही या संघटनेच्या सभासद राष्ट्रांनी आक्रमणाची आणि युद्धाचा मार्ग वापरलेला आहे. उदा .कोरियातील युद्ध (१९५०) रशियाचे १९५६ मधील हंगेरीवरील आणि १९६८ मधील जेकोस्लोव्हकियावरी आक्रमण, अमेरिकेने डेनेनिकन रिपब्लीक यामध्ये देशावर केलेल आक्रमण, अमेरिकेन दहा वर्षे (१९६१ -७१) व्हिएतनामध्ये केलेला नरसंहार रशियाने अफगाणिस्तानमध्ये पाठविलेल्या फौजा इस्त्राईल - लैबनॉन संघर्ष, भारत - पाक युद्ध (१९६५ आणि १९७१) भारत - चीन (१९६२) इराण - इराक युद्ध, इराक - कुवेत (१९९०) संयुक्त राष्ट्र संघटनेने हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला, परंतु ते प्रश्न या संघटनेच्या प्रयत्नानी सुटलेले नसून इतर मार्गानी सुटले आहेत. थोडक्यात आंतरराष्ट्रीय राजकारणातील युद्धे ही संघटना टाळू शकले नाही. युद्ध उद्भवणे म्हणजे वाटाघाटीसाठी प्रयत्न करणे, मध्यस्थी करणे, युद्धबंदी घटवून आणून तेथे संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता रक्षक फौजा तैनात करणे इत्यादी मार्गाचा वापर या संघटनेने केला आहे.

## राष्ट्रीय सत्तेचा परिणाम :-

आंतरराष्ट्रीय राजकारणातील युद्ध आणि शांतता या दोन्ही गोष्टी सत्तेच्या प्रक्रियेवर अवलंबून असतात. अखेर राष्ट्रीय सत्ता हीच आंतरराष्ट्रीय राजकारणातील 'युद्ध' आणि 'शांतता' यांची व्याप्ती आणि काळ निश्चित करीत असते. राष्ट्रीय सत्तेकडून बऱ्याच वेळा शांततेपेक्षा युद्धाला अधिक महत्त्व दिले जाते. असे असले तरी राष्ट्रीय सत्ता ही सतत बदलणारी असते. राष्ट्रीय सत्तेत कधी वाढ होते तर कधी ऱ्हास होत असतो. त्यामुळे राष्ट्राच्या 'युद्ध' आणि 'शांतता' या संबंधीच्या ध्येय धोरणातही फरक पडत असतो.

## आंतरराष्ट्रीय शांतता आणि नैतिकता :-

आंतरराष्ट्रीय शांततेचा नैतिक दृष्टीकोनातूनही विचार करण्यात येतो कारण आधुनिक युद्धाचे स्वरूप भयंकर विनाशकारी बनल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात नैतिक मूल्यांचे महत्त्व सर्वांना पटू लागले आहेत. समान हितसंबंध आणि समान उद्दिष्टांची जाणीव यातून खऱ्या आंतरराष्ट्रीय नैतिक मूल्यांचा स्वीकार करण्यात येऊ लागला आहे. संयुक्त राष्ट्र आणि युरोपीय आर्थिक समूह, क्षेत्रीय सहकार्यासाठी दक्षिण, आशियाची संघटना (सार्क) यासारख्या क्षेत्रीय संघटना यांच्या विविध प्रकारच्या कार्यातून आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील नव्य नीतीमूल्यांच्या जाणीवांचा अविष्कार होत आहे. सूव्यवस्थित आणि स्थिर जागतिक व्यवस्था

निर्माण करण्याच्या दृष्टीने नीतीमत्तेचा विचार करण्यात येत आहे. राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी नैतिकतेचा जसा उपयोग होतो तसाच आंतरराष्ट्रीय राजकारणातही होऊ शकतो, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचे माजी सचिव 'कुर्त हाईम' यांनी म्हटले आहे की, 'संयुक्त राष्ट्रसंघाला अदिक प्रभावी करणे, आंतरराष्ट्रीय संबंधाबाबत असलेल्या आचारसंहितेचे पालन करणे, राष्ट्रांनी आणि राष्ट्रातील लोकांनी परस्परावर विश्वास ठेवणे यातूनच आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित होऊ शकेल. १९६७ मध्ये पॉल सहा याने मांडलेला विचारही आंतरराष्ट्रीय शांततेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. जगातील सर्व राष्ट्रांना त्यांच्या विकासाची ध्येय साध्य करण्याची पुरेशी संधी मिळाली तर आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थपित होईल, असे मत त्यांनी मांडले. आहे. अर्थात असे करतांना विकसित आणि विकसशील राष्ट्रांत तसेच सर्व विकसनशी राष्ट्रात परस्पर सहकार्य आणि ऐक्य असण्याची आवश्यकता आहे अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय शांततेचा संबंध राष्ट्रीय विकास आणि त्यासाठी आवश्यक असलेले परस्पर सहकार्य यांच्यात येतो. जगातील विविध राष्ट्रांचा विकास जितका सर्वागीण आणि उच्च प्रतीचा होईल, त्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित होईल.

**जागतिक शांतता मार्गातील अडचणी : -**

**अपयश :-**

जागतिक शांततेचा प्रश्न जागतिक महत्त्वाचा आहे. प्रत्येक युद्धानंतर आणि इतर वेळी सुद्धा जागतिक शांततेचा विचार करण्यात येते असतो. कोणतेही राष्ट्र दीर्घकाळापर्यंत दुसऱ्या देशाशी युद्ध करू शकत नाही किंवायुद्धात गुंतून राहू शकत नाही त्यामुळे प्रत्येक राष्ट्राला युद्धापूर्वी आणि युद्धकालात तसेच युद्ध संपल्यानंतरही शांततेचा विचार व प्रयत्न करावाच लागतो.

**शांततेचा प्रयत्न :- अपयसाची कारणे :-**

आंतरराष्ट्रीय शांततेचे प्रयत्न जगातील विविध राष्ट्रांचे राष्ट्रप्रमुख आणि आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना यांच्याकडून केले जातात. पहिल्या महायुद्धानंतर (१९१४- १९१९) त्यावेळचे अमेरिकेच अध्यक्ष विड्रो विल्पन यांच्या प्रेरणेने आणि पुढाकाराने जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी १० जानेवारी १९२० राजी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. राष्ट्रसंघाची स्थापना जाली तेंव्हा या संघटनेत २७ सभासद राष्ट्रे होती. १९३४ मध्ये सभासदांची संख्या ६० झाली होती आणि राष्ट्रसंघ नष्ट झाला तेव्हा या संघटेत ४३ सभासद होते. या अर्थाने विचार केल्यास राष्ट्रसंघ ही खऱ्या अर्थाने जागतिक संघटना नव्हती, सुरूवातीला पहिल्या महायुद्धात पराभूत झालेल्या जर्मनी, इटली, हंगरी या राष्ट्रांना सभासदत्व देण्यात आले नव्हते. सुरूवातीला रशियासुद्धा,राष्ट्रसंघाचा सभासद नव्हता. इतकेच नव्हे तर अमेरिकेच अध्यक्ष 'वुड्रो विल्सन' यांच्या प्रेरणेने राष्ट्रसंघाची स्थापना झाली होती. परंतु अमेरिकेला सुद्धा राष्ट्रसंघाचे सभासदत्व नव्हते कारण अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी राष्टसंघ स्थापन करण्यासाठी केलेल्या करारांनी अमेरिकेच्या सिनेटने मान्यता दिली नव्हती. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. परंतु राष्ट्रसंघाला आपले उद्दिष्ट साध्य करण्याच्या कार्यात अपयश आले. राष्ट्रसंघाच्या अपयशाची अनेक कारणे आहेत.

**राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे :-**

१. राष्ट्रसंघाचे उद्दिष्ट स्पष्ट नव्हते. आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षितता आंतरराष्ट्रीय कायदा इत्यादींच्या व्याख्या करण्यात आल्या नव्हत्या.

२. राष्ट्रसंघाच्या एकंदर रचनेत आणि कार्यपद्धतीत बड्या राष्ट्रांचे वर्चस्व होते.

३. आंतरराष्ट्रीय राजकारणाबाबत पहिल्या महायुद्धातील विजयी राष्ट्रे आणि पराभूत राष्ट्रे यांच्यात तीव्र मतभेद होते.

४. राष्ट्रसंघाच्या सभासद राष्ट्रात बदला घेण्याची प्रवृत्ती.

५. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. परंतु जगातील अनेक राष्ट्रात आंतरराष्ट्रीयवृत्तीचा अभाव होता. साम्राज्यवादी राष्ट्र साम्राज्य सोडून द्यायला तयार नव्हती.

६. जगातिक शांततेसाठी आणि सुरक्षिततेसाठी राष्ट्रसंघ अस्तित्वात असतानाही विविध राष्ट्रे परस्परात ते गुप्त तह आणि करार करीत होते. तसेच स्वयंरक्षणासाठी आपपाल्या सैन्यात वाढ करीत होते.

७. राष्ट्रसंघात आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील संघर्षावर, शांततेला विरोध करणाऱ्या ‘घटनावर चर्चा होत होत.

**जागतिक शांततेच्या मार्गातील अडचणी :-**

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यात निरनिराळ्या राष्ट्रांना त्यांच्या राष्ट्रप्रमुखांना आणि आंतरराष्ट्रीय संघटना व संस्था यांना अपयश आले आहे, त्याची कारणे अनेक आहेत.

१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या वेळी मित्र राष्ट्रात मैत्रिचे संबंध होते. परंतु नंतरच्या काळात मात्र त्यांच्यात संघर्ष आणि शीतयुद्ध सुरू झाले आहे. अमेरिका व रशिया या दोन महासत्तामध्ये सतत स्पर्धा आणि संघर्ष चाल असतो ही शीतयुद्धाची परिस्थिती जागतिक शांततेला पोषक अशी नाही.

२. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ स्थापन करण्यात आलेला असूनही अमेरिका, रशिया, या राष्ट्रांनी लष्करी गट आणि करार केले आहेत. उदा. नाटो, सिटो, यालष्करी गटांमुळे जगात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे आणि जागतिक शांततेला धोका निर्माण झाला आहे.

३. संयुक्त राष्ट्रसंघ स्थापन करतेवेळेस सर्व सभासदा राष्ट्रांनी या संघटनेच्या तत्त्वाचे आणि नियमांचे पालन करण्याचे मान्य केले होते. परंतु नंतरच्या काळात अनेक राष्ट्रांनी विशेषतः सुरक्षा समितीमधील कायम सभासद राष्ट्रांनी ब्रिटन, अमेरिका, रशिया, फ्रांस आणि चीन या राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या नियमांचे, तत्त्वांचे, आंतरराष्ट्रीय कायद्याचे आणि आंतरराष्ट्रीय नियमाचे पालन केले नाही.

४. जागतिक शांततेच्या मार्गात सर्वात महत्त्वाची आडचण सुरक्षा समितीमधील पाच

कायम सभासद राष्ट्रांना असलेल्या नकारधिकाराचीच आहे. ज्या आंतरराष्ट्रीय प्रश्नात पाच कायम सभासद राष्ट्रांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. या प्रश्नाबाबत संयुक्त राष्ट्रसंघ निश्चित स्वरूपाचा निर्णय होऊ शकत नाही. सुरक्षा समितीमधील पाच कायम सभासद राष्ट्रांच्या नकाराधि कारामुळे अनेक राष्ट्रीय प्रश्नाबाबत सुरक्षा समिती कारवाई करण्यास असमर्थ ठरली आहे.

५. जागतिक शांततेला सर्वात मोठा धोका महासत्तांमध्ये आणि इतर राष्ट्रांमध्ये चालू असलेल्या शस्त्रास्त्र स्पधेचा आहे. विशेषतः अण्वस्त्र स्पर्धेने जागतिक शांतता आणि सुरक्षिततेला एक नवीनच धोका निर्माण केला आहे. अमेरिका, रशिया आणि इतर अण्वस्त्रधारी राष्ट्रे इतकी सामर्थ्यवान झाली आहेत की, त्यांच्याविरूद्ध सामुहिक सुरक्षा व्यवस्था निरर्थक बनली आहे.

६. जागतीक शांततेला धोका निर्माण करणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध कृती करण्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रसंघाला असला तरी संयुक्त राष्ट्रसंघाकडे स्वतःचे सैन्य नसल्यामुळे सामूहिक कारवाईसाठी संयुक्त राष्ट्रसंघाला सदस्य राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते, त्यामुळे सामूहिक सुरक्षा व्यवस्ता निर्माण करण्यास आणि जागतिक शांतता प्रस्थापित करण्यात राष्ट्रसंघाला अपेक्षित यश आले नाही.

**जागतिक शांततेची उपाय योजना :-**

जागतिक शांततेचे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी विविध प्रकारची आणि विविध स्तरावर उपाययोजना करण्याची गरज आहे. जागतिक शांततेसाठी साधारणताः पुढील प्रकारचे उपाय करता येतील.

१. बदललेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार करून जागतिक शांततेसाठी स्थापन केलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाचा नव्याने विचार करण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रसंघांची घटना बदलली पाहिजे किंवा नवीनच घटना केली पाहिजे.

२. जागतिक शांततेच्या दृष्टीने सुरक्षा समितीमधील पाच कायम सभासद राष्ट्रांना असलेल्या नकाराधिकारांचाही फेरविचार होणे आवश्यक आहे.

३. जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने सुरक्षा समितीची पूर्नरचना झाली पाहिजे. अशिया व अफ्रिका खंडतील नवीन स्त्रोत झालेल्या राष्ट्रांना सुरक्षा समितीत पुरेसे प्रतिनिधीत्व देण्याची गरज आहे.

४. जागतिक शांततेसाठी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात उदयास आलेला नवा साम्राज्यवाद नष्ट करण्याची नितांत गरज आहे. जागतिक सांततेसाठी आंतरराष्ट्रीय राजकारणातील 'स्वरक्षण' आणि 'आक्रमण' यांच्या स्पष्ट व्याख्या करण्याची गरज आहे. कारण अनेक राष्ट्रे 'स्वरक्षणाच्या नावाखाली परराष्ट्रावर आक्रमण करतात आणि इतर राष्ट्रांचे हक्क डावलून आपला अधिकार आणि ताबा जमवितात.

६. संयुक्त राष्ट्रसंघावर जागतिक शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. परंतू या संघटनेकडे जागतिक शांततेला धोका निर्माण करणाऱ्या किंवा आक्रमण करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध प्रत्यक्ष कृती करण्यासाठी स्वतःचे सैन्य किंवा

जागतिक शांतता दल स्थापन करत आले पाहिजे आणि त्या प्रमाणात क्रमाक्रमाने प्रत्येक सैन्यात कपात करण्यात आली पाहिजे.

७. युद्धाची तयारी करणाऱ्या आणि दुसऱ्या देशावर आक्रमण करणाऱ्या राष्ट्रावर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभासदांनी बहिष्कार टाकला पाहिजे अशा राष्ट्रांशी व्यापार, दळवळण राजनैतिक संबंध तोडून टाकले पाहिजेत.

८. जागतिक शांतता ही केवळ, राजकीय बाब नाही, जागतिक शांतता आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगकि, शेतीविषयक अशा अनेक गोष्टीवर अवलंबून आहे त्यामुळे या सर्व क्षेत्रातील विषमता नष्ट करण्यासाठी संघटीत प्रयत्न केले पाहिजे.

९. जागतिक शांततेसाठी आंतरराष्ट्रीय समाज निर्माण झाला पाहिजे.

१०. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील वादांच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेले निर्णय संबंधित राष्ट्रांना बंधनकारक करण्यात आले पाहिजे.

## १.६ सारांश

आंतरराष्ट्रीय संबंधाचे शास्त्र अधिक व्यापक, सर्वसमावेशक, गतिमान, तांत्रिकदृष्ट्या प्रगत, सुखकारक, खऱ्या अर्थाने जागतिक झाले असले तरी मानवाच्या मूळ सत्तापिपासू वृत्तीमुळे संघर्षही नव्या स्वरूपात वाढले आहेत. हे शास्त्र एकीकडे शांती, सहकार्य वाढवण्यास धडपडत आहे तर दुसरीकडे विनाशकारी शस्त्रनिर्मिती बंद होण्यास प्रयत्नशील आहे. हे शास्त्र अभ्यासकांसाठी आंतरविद्याशाखीय स्वरूपाचे असल्याने अभ्यासासाठी विविध दालने व आव्हाने समोर येत आहेत. ह्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संबंध हे मानवी विकासाची नोंद घेणारे, त्या विकासातून निर्माण होणारे नवीन विचार, नवीन आव्हान यांचा अभ्यास करणारे आणि एकूण मानवाच्या भविष्यासाठी काही मार्गदर्शन करणारे शास्त्र आहे असे आपल्याला म्हणता येईल.

सुदैवाने गेल्या काही वर्षापासून आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील परिस्थिती बदलत आहे. सोव्हिएत रशियाच्या नव्या धोरणामुळे विशेषतः रशियाचे अध्यक्ष मिरवाईल गोर्बाचेव्ह यांच्या प्रयत्नामुळे परिस्थितीत क्रांतीकारक बदल होत आहेत. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील शीतयुद्धे संपुष्टात येत आहेत. अमेरिका रशिया या महासत्तांनी अण्वस्त्रसाठे नष्ट करण्यास सुरूवात केली आहे.

❄❄❄❄❄❄❄

# २

# सत्तेची भूमिका

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ विषय विवेचन

२.३.१ सत्तेची संकल्पना, राष्ट्रीय सत्तेचे घटक, सत्तेचे प्रकार, सत्तेची साधने, सत्तेचा वापर

२.३.२ सत्ता समतोल – एकध्रुवीयता, द्विध्रुवीयता, बहुध्रुवीयता

२.३.३ राष्ट्र-राज्य

२.३.४ राष्ट्रीय हित

२.४ सारांश

२.५ सरावासाठी प्रश्न

२.६ संदर्भ ग्रंथ

## २.१ उद्दिष्टे

१) सत्ता ही संकल्पना समजून घेऊन राष्ट्रीय सत्तेचे घटक, सत्तेचे प्रकार, सत्तेची साधने आणि सत्तेचा वापर किंवा उपयोग कसा केला जातो ते पाहणे

२) सत्ता समतोल म्हणजे काय ? आणि सत्ता समतोलाचे प्रकार अभ्यासणे

३) राष्ट्र-राज्य व्यवस्थेची निर्मिती, उदय आणि विकासाचा आढावा घेणे

४) राष्ट्रीय हिताची संकल्पना समजून घेणे.

## २.२ प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय संबंधांचा अभ्यास करत असताना विविध घटकांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते कारण हेच घटक आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करीत असतात. या पाठात आपण सत्ता, सत्ता संतुलन, राष्ट्रीय हित, राष्ट्र राज्यव्यवस्था आणि तिचा उदय-विकास इ.चा अभ्यास करणार आहोत.

राष्ट्रीय सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू असून संपूर्ण राजकारण हे सत्ये भोवतीच फिरत असते. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांची जोपासना करण्यासाठी राष्ट्रीय सत्तेचा साधन म्हणून उपयोग करत असते. सत्ता, सत्तेचे घटक, सत्य चे प्रकार, सत्तेचा वापर इ. घटकांचा आपण अभ्यास करणार आहोत.

सत्येप्रमाणेच सत्तासंतुलन हीदेखील आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक महत्वाची संकल्पना आहे. सत्ता समतोलाची व्यवस्था म्हणजे राष्ट्रांच्या राजकीय वर्तणुकीला निमंत्रण करणारा कायदा आहे. यामध्ये सत्तेचे समान वितरण करून संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला जातो. या व्यवस्थेचा संबंध मुख्यत: सत्ता आणि सत्तेच्या व्यवस्थापनाशी आहे. सत्ता समतोलामुळे शांतता स्थिरता निर्माण होते. एकाधिकारशाहीला आळा बसून आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण होते. या घटकात आपण बहुध्रुवीय व्यवस्था ने एक ध्रुवीय व्यवस्थेपर्यंत जगाची झालेली वाटचालही अभ्यासणार आहोत.

सार्वभौम राज्ये हा जागतिक व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. आंतरराष्ट्रीय संबंधात राज्या राज्यातील संबंधाचा अभ्यास केला जातो. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत स्वातंत्र्य, सार्वभौम राज्ये ही महत्वाची कर्ते घटक असतात. राष्ट्र -राज्य व्यवस्था आधुनिक राज्ये ही राष्ट्र-राज्य आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण राष्ट्र -राज्य व्यवस्था म्हणजे काय? तिचा उदय विकास, तिचे वैशिष्ट्ये, तिचे भवितव्य इ. चा अभ्यास करणार आहोत.

राष्ट्रीय हितसंबंध ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक व्यापक संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात शत्रु किंवा मित्र कायम नसतात; परंतु राष्ट्रीय हितसंबंध कायम असतात. कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरण आणि राजनयाचा प्रमुख उद्देश हा राष्ट्रीय हितसंबंधांची जपणूक करण्याचा असतो. राष्ट्र लहान असो अगर मोठे असो ते आपले राष्ट्रीय हित संबंधाच्या संवर्धनाचे प्रयत्न सातत्याने करीत. यावरून राष्ट्रीय तिथे संबंधाचे महत्व लक्षात येते. या घटकांमध्ये आपण राष्ट्रीय हितसंबंध म्हणजे काय? राष्ट्रीय हित संवर्धनाचे मार्ग राष्ट्रीय इतर संबंधाचे प्रकार इ.चा अभ्यास करणार आहोत.

## २.३ विषय विवेचन

### २.३.१.१ सत्ता

सत्ता ही संकल्पना राज्य शास्त्रातील प्रमुख संकल्पना आहे. सत्ता आज सर्व राजकीय घडामोडीचा केंद्रबिंदू आहे. राष्ट्रीय राजकारणापासून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत सत्ता या संकल्पनेला महत्वाचे स्थान आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या वास्तववादी दृष्टिकोनाचा केंद्रबिंदू सत्ता आहे. तसेच राष्ट्रीय सुरक्षा आणि हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन म्हणून सत्तेकडे पाहिले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राचा दर्जा हा त्या राष्ट्राच्या सामर्थ्यावर, सत्तेवर अवलंबून असतो. परिणामी प्रत्येक राष्ट्र आपली सत्ता सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करीत असते. सत्ता प्राप्तीसाठी राष्ट्र-राष्ट्रांमध्ये स्पर्धा सुरू असते. त्यावरच राष्ट्राचे अस्तित्व, राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा चे संरक्षण, राष्ट्रीय हितसंबंध अवलंबून असतात.

हॅन्स मॉर्गेन्थ्यू च्या मते, सत्तेसाठी संघर्ष हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील निरपवाद आणि सर्वकालीन सत्य असून राष्ट्राच्या परराष्ट्र धोरण आणि राजनयाचे अंतिम उद्दिष्ट राष्ट्रीय सामर्थ्याच्या आधारावर आपल्या राष्ट्रीय हित संबंधाची जपणूक करण्याचा असतो.

**सत्तेचा अर्थ आणि स्वरूप-**

सत्ता ही एक गुंतागुंतीची संकल्पना अजून अनेक अभ्यासकांनी सत्तेच्या व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे

सर्वसाधारणपणे सत्ता म्हणजे एकाची दुसऱ्यावर प्रभाव पडण्याची क्षमता होय. एखादी व्यक्ती, समूह, राज्य जी गोष्ट एरव्ही करणार नाही ती गोष्ट त्यास करायला लावण्याची दुसऱ्या व्यक्ती, समूह, राज्याची क्षमता म्हणजे सत्ता होय.

**सत्तेच्या व्याख्या खालील प्रमाणे सांगता येतील**

१) जॉर्ज श्वेन बर्जर-

"आपली इच्छा दुसऱ्यावर थोपवण्यासाठी आणि इतरांनी विरोध केला तर तो विरोध मोडून काढून आपली इच्छा लागण्याची परिणामकारक शक्ती म्हणजे सत्ता होय"

२) हॅन्स मॉर्गेन्थ्यू-

"सत्ता म्हणजे एखाद्या व्यक्तीचे असलेले प्रभुत्व"

३) रॉबर्ट ढाल-

"सत्ता म्हणजे एखाद्यावर प्रभाव पाडून त्याच्याकडून काम करवून घेण्याची क्षमता असणे"

४) ड्युचेक-

"मला अपेक्षित अशी इतरांना वागण्यास लावण्यासाठी वापरलेली क्षमता म्हणजे सत्ता"

**सत्तेच्या वरील व्याख्यान वरून सत्तेची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील**

- सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू असून आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्र सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्नशील असते. सामर्थ्यवान राष्ट्रीय आपल्या सामर्थ्याच्या जोरावर दुर्बळ, कमकुवत राष्ट्रांवर दबाव टाकून आपली इच्छा लागण्याचा प्रयत्न करतात
- राष्ट्राचे हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन म्हणजे सत्ता होऊन
- सत्ता ही सापेक्ष आणि परिवर्तनीय संकल्पना आहे स्थळ- काळ परिस्थितीनुसार सत्तेत बदल होत असतात.
- राष्ट्राच्या सत्तेतून राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्रावर प्रभाव पाडण्याची क्षमता व्यक्त होते यावरून त्या राष्ट्राच्या सामर्थ्याचा अंदाज लावता येतो.
- सत्ता अनेक परस्परावलंबी, परिवर्तनीय अशा घटकांवर असेल. त्यामुळे सत्तेचे मोजमाप करणे अवघड आहे. सत्तेच्या काही घटकांचे परिमाणीकरण करता येत नाही उदा. राजकीय नेतृत्व, नोकरशाही, शासनप्रणाली इ.

### २.३.१.२ राष्ट्रीय सत्तेचे घटक

सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या आणि प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरण निर्मितीचा महत्त्वाचा घटक आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत सर्वच राजकीय विचारवंतांनी सत्ता या घटकाला आपल्या विचारांमध्ये आणि साहित्यात केंद्रस्थान दिले आहे. सत्ता या घटकाचा प्रभाव व्यक्ती, व्यक्ती समूह यांच्याशी निगडीत राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्वच घटकांवर पडत असतो. आंतरराष्ट्रीय राजकारण हे तर पूर्णपणे सत्ते भोवतीच फिरताना दिसते

सत्तेचा अर्थ आणि स्वरूपाचा अभ्यास केल्यानंतर सत्तेच्या प्रमुख घटकांची माहिती आपण घेणार आहोत सर्वसाधारणपणे एखाद्या राज्याची सत्ता म्हणजेच त्यांचे लष्करी सामर्थ्य असे समजले जाते. परंतु लष्करी सामर्थ्य हा सत्तेचा एक महत्त्वाचा घटक आहे. राज्याच्या सत्तेच्या घटकांची स्थायी/परिमागीकरण करता येणारे घटक आणि अस्थायी/परीमाणीकरण करत न येणारे घटक अशा दोन घटकात विभागणी केली जाते हे दोन्ही गटातील घटक परस्परावलंबी आणि परिवर्तनीय आहेत. राष्ट्राचे भौगोलिक स्थान, लोकसंख्या, नैसर्गिक साधन संपत्ती, तंत्रज्ञान, आर्थिक विकास, लष्करी सामर्थ्य हे स्थायी/ परीमाणीकरण करता येणारे घटक आहे तर राजकीय नेतृत्व, नोकरशाही, शासनप्रणाली, जनतेचे मनोबल हे अस्थायी/परिमानीकरण करताना येणारे घटक आहेत

१) **राष्ट्राचेभौगोलिक स्थान:** राष्ट्राचे सामर्थ्य त्याच्या भौगोलिक स्थानावर अवलंबून असते. राष्ट्राचे भौगोलिक स्थान, विस्तार, हवामान, क्षेत्रफळ, सीमारेषा त्यांच्या आणि त्या राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थान राष्ट्रीय सामर्थ्य त्यांचा घनिष्ठ संबंध आहे.

राष्ट्रांचा भौगोलिक आकार क्षेत्रफळ विस्तार जितका मोठा तितके त्यांचे सामर्थ्य अधिक समजले जाते भारत आणि चीन या उभरत्या महासत्तांच्या बाबतीत हे तत्व पूर्णत: लागू पडते. या राष्ट्रांनी आपला सलग भूभाग विशाल आणि खंडप्राय भूमीचा उपयोग आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढवण्यासाठी केला आहे.

भारताच्या भौगोलिक स्थानावरच राष्टाचे परराष्ट्र धोरण राजनय युद्धनीती या गोष्टी अवलंबून असतात एखाद्या राष्ट्राचे स्थान शत्रूराष्ट्रदरम्यान असेल तर त्या राष्ट्राला आपले परराष्ट्र धोरण ठरविताना काळजी घ्यावी लागते

उदा. भारत. भारताचेस्थान पाकिस्तान आणि चीन या दोन शत्रुराष्ट्रादरम्यान असल्याने भारताला आपले परराष्ट्र धोरण विचारपूर्वक आखावे लागते.

भौगोलिक स्थानाबरोबरच देशातील हवामान, खनिज संपत्ती या घटकांचाही राष्ट्राच्या सामर्थ्यावर परिणाम होत असतो. प्रतिकूल हवामानाचा राष्ट्रीय सामर्थ्यावर नकारात्मक परिणाम होतो मध्यम हवामान असलेल्या राष्ट्रांचा विकास जलद गतीने झाला आहे.

सीमारेषा आणि सत्तेचा जवळचा संबंध आहे. राष्ट्रांच्या सीमारेषांची आखणी व्यवस्थित केलेली असेल तर शेजारील राष्ट्रांबरोबर शांतता प्रस्तापित करण्यास मदत होते. परिणामी संरक्षणात्मक खर्च वाचतो. परंतु सीमा रेषांवरून राष्ट्रांमध्ये संघर्ष असेल तर असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते उदा. भारत-चीन सीमावाद

२) **लोकसंख्या:** राष्ट्राची लोकसंख्या किंवा मनुष्यबळ हे राष्ट्रीय सामर्थ्याच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्र उपलब्ध मानवी साधन संपत्तीचा उपयोग राष्ट्र विकासासाठी योग्य रीतीने करीत असेल तर जास्त लोकसंख्या राष्ट्रीय सामर्थ्याच्या दृष्टीने वरदान ठरते. परंतु अतिरिक्त लोकसंख्येमुळे राष्ट्रांमध्ये अनेक समस्या निर्माण होतात.

राष्ट्रांच्या लोकसंख्येइतकीच मनुष्य बाळाची ही गुणवत्ता महत्त्वाची ठरते .लोकसंख्या आणि आर्थिक विकास यांचाही जवळचा संबंध आहे उच्च गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ असलेल्या रस्त्यांचा विकास लवकर घडून येतो.

उदा. जपानची लोकसंख्या भारत आणि चीनपेक्षा कितीतरी कमी आहे परंतु आज जपान हे जगातील श्रीमंत राष्ट्र म्हणून ओळखले जाते जपानी माणूस हा कार्यक्षम, कष्टाळू, म्हणून ओळखला जातो. परिणामी दुसऱ्या महायुद्धातील प्रचंड संघाला नंतरही जपानने आपला आर्थिक विकास साधला.

३) **नैसर्गिक साधन संपत्ती:** नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिजसंपत्ती हे ह सत्तेचा प्रमुख घटक आहे. राष्ट्राला नैसर्गिक साधन संपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असतील राष्ट्र मोठी औद्योगिक व आर्थिक प्रगती साधू शकते. नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करण्यासाठी राष्ट्राकडे आवश्यक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ भांडवलाची आवश्यकता असते.

उदा. पश्चिम आशियामध्ये तेलासारख्या खनिजाच्या उपलब्धतेवर आखाती राष्ट्रे जगावर आपले वर्चस्व गाजवतात. परंतु या तेल खाणीतून खनिजतेल खणून वर काढण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान त्यांना पाश्चात्य राष्ट्रांकडून मिळवावे लागते तंत्रज्ञान आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची सांगड घातल्यानंतर तेल उत्पादन व निर्यात वाढली. यांच्या आधारावर ही राष्ट्रे आज श्रीमंत व प्रभावशाली बनली आहेत.

दुसऱ्या विश्व युद्धानंतर आशियाई आफ्रिका खंडातील राष्ट्रांनी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जोरावर आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढवण्याचा प्रयत्न केला आहे.

४) **आर्थिक विकास:** राष्ट्राची सत्ता आर्थिक विकासावरही अवलंबून असते. आर्थिक दृष्ट्या प्रगत असलेले जपान, जर्मनी, अमेरिका सारखी प्रभळ राष्ट्रे आपल्या आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर जगावर प्रभुत्व गाजवण्याचा प्रयत्न करतात. विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांना मदत करून आपल्या प्रभावाखाली आणण्याचा प्रयत्न करतात.

उदा. युरोपातील साम्राज्यवादापासून रोखण्यासाठी सोवियत रशियाने भारताला प्रचंड आर्थिक व तांत्रिक मदत केली.

५) **लष्करी सामर्थ्य:** लष्करी सामर्थ्य हा राज्याच्या सत्तेचा प्रमुख घटक आहे. लष्करी सामर्थ्यात सैन्यातील लढाऊ सैनिकांची संख्या, शस्त्रास्त्रांची संख्या आणि गुणवत्ता, अत्याधुनिक संरक्षणात्मक तंत्रज्ञान या घटकांचा समावेश होतो.

उदा. पहिल्या आणि दुसऱ्या विश्वयुद्धात आधुनिक शस्त्रास्त्रे आणि संरक्षण पद्धतीचा वापर करणारी इंग्लंड फ्रान्स आणि रशिया सारखी राष्ट्रे विजयी झाले १९४५ मध्ये जपानवर अमेरिकेने टाकलेल्या दोन अणुबॉम्बनंतर जपानने तत्काल शरणागती पत्करली.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका-सोवियत रशिया या महासत्तांनी शीतयुद्धात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्रे, बॉम्ब, लढाऊ विमाने, युद्धनौका, पाणबुड्या इ.ची साधनांची निर्मिती करून एकमेकांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला.

६) **जनतेचे मनोबल:** देशातील जनतेचे मनोबल हा राष्ट्रीय सत्तेच्या या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रीय मनोबल म्हणजे राष्ट्रांविषयी नागरिकांना वाटणारे नितांत प्रेम. राष्ट्रांवरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रांसाठी सर्वत्याग करण्याची, राष्ट्रांसाठी कष्ट घेण्याची तयारी होय.

जनतेचे मनोबल ही एक अशी कार्यशक्ती आहे जी नागरिकांना राष्ट्रीय प्रगती, उन्नतीसाठी कार्य करण्यास प्रवृत्त करते. संकटकालीन परिस्थितीमध्ये संघटित शक्ती बनून राज्याच्या पाठीशी उभी राहते. धर्म, जात, भाषा, प्रदेश इ.ची बंधने बाजूला सारून जनता एकात्मतेचे दर्शन घडविते.

दुसऱ्या महायुद्धात आर्थिक झळ सहन केलेल्या जपान ने नागरिकांचा स्वार्थत्याग त्याग परिश्रमातून आर्थिक प्रगती घडवून आणली.

७) **राष्ट्रीय चरित्र:** वास्तववादी सिद्धांताचे पुरस्कर्ते राष्ट्रीय चरित्राला सत्तेचा महत्त्वाचा घटक मानतात. राष्ट्रीय चरित्र आणि राष्ट्रीय मनोबल या दोन्ही घटकांचा जवळचा संबंध आहे राष्ट्रीय चरित्र जनतेच्या मनोबलाचा महत्त्वाचा घटक आहे. मनोबल हे राष्ट्रीय चारित्र्यावर अवलंबून असते.

राष्ट्रीय चारित्र्याचा आधारे विशिष्ट राष्ट्रांमधील जनते संबंधी विशेषणे वापरतो उदा. जर्मन माणूस म्हणजे कणखर, शिस्तप्रिय, कार्यकुशल तर रशियन माणूस चिवट असतो.

राष्ट्रीय चरित्रे हा घटक परिवर्तनीय आहे. विशिष्ट परिस्थिती मध्ये जनतेच्या प्रतिसादाचा राष्ट्रीय चारित्र्यात समावेश होतो. परिस्थिती बदलली की प्रतिसादात बदल होऊ शकतो.

८) **राजकीय नेतृत्व:** राष्ट्राचे सामर्थ्य वाढविण्यात देशाचे राजकीय नेतृत्व महत्त्वाची भूमिका बजावतो. राष्ट्राची प्रगती प्रगतीला योग्य दिशा देण्याचे कार्य राष्ट्रीय नेतृत्व करीत असते. युद्धकालीन परिस्थितीत सूज्ञ, विचारी, कणखर, प्रभावी निर्णय क्षमता असलेले नेतृत्व राष्ट्राला विजय मिळवून देते. तसेच शांततेच्या काळात देशातील नैसर्गिक -मानवी साधनसंपत्तीचा विचारात्मक कार्यासाठी उपयोग करून घेण्यात राजकीय नेतृत्वाचा कार्यभाग महत्त्वाचा असतो.

उदा. तुर्कस्तानमधील मुस्तफा केमाल भारताचे पंडित नेहरूंचे नेतृत्व इजिप्तमधील कर्नल नासेर चे नेतृत्व यांचे नेतृत्व कणखर, सकारात्मक होते परंतु युरोपमध्ये पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी- इटलीत उदयाला आलेल्या हिटलर व मुसोलिनीच्या आक्रमक नेतृत्वाचे दोन्ही राष्ट्रांना युद्धाच्या खाईत लोटले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्लंड मधील विस्टन चर्चिल अमेरिकेचे रूझवेल्ट आणि सेवियर रशियाच्या स्टॅलिन घ्या कणखर नेतृत्वाने दोस्त राष्ट्रांना विजय मिळवून दिले

राजकीय नेतृत्वाकडून जनतेचे मनोबल वाढविण्याचे त्यात सातत्य ठेवण्याचे प्रयत्न केले जातात त्यासाठी विचारधारा, प्रचारतंत्रे, प्रतीके इ.चा वापर केला जातो.


उदा. नाझी जर्मनीतील हिटलरचे नेतृत्व दिव्य वलयांकित नेतृत्वात जनतेत चैतन्य निर्माण करण्याची अलौकिक शक्ती असते अशा नेतृत्वामुळे लोकांना प्रेरणा मिळून ते प्रभावित होतात उदा. महात्मा गांधींचे नेतृत्व.

९) **नोकरशाही:** राज्यकर्त्या बरोबरच देशातील प्रशासकीय नेतृत्व ही राष्ट्राचे सामर्थ्य वाढवण्यास कारणीभूत ठरते.नोकरशाहीच्या गुणवत्तेवर देशाचे सामर्थ्य अवलंबून असते. अचूक माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण, कार्यक्षमता यातून नोकरशाही राजकीय नेतृत्वाला पूरक कार्य करते.

राष्ट्राची सत्ता ही वरील घटकांवर अवलंबून असते. यातील कोणत्याही एका घटकांची परिस्थितीत बदल झाला की देशाच्या सामर्थ्यावरही त्याचा कमी अधिक प्रमाणात परिणाम होत असतो.

### २.३.१.३ सत्तेचे प्रकार

**सत्तेचे खालील प्रकार पडतात**




१) **भौतिक सत्ता:** भौतिक सत्ता ही राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यावर आधारित असते. लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान राष्ट्रांची दुर्बल राष्ट्रांवर प्रभाव पाडण्याची क्षमता तूलनेने जास्त असते.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या दोन महासत्तांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात आपला प्रभाव वाढवण्यासाठी लष्करी सामर्थ्याचा वापर केला. लष्करी सामर्थ्य वाढवण्यातून शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली आणि त्यामुळे हजारो अण्वस्त्रांची निर्मिती करण्यात आली.

आजही विश्वातील अमेरिका, चीन, भारत, इस्त्राईल, पाकिस्तान यासारखी राष्ट्रे आपले भौतिक सामर्थ्य वाढवण्यासाठी प्रयत्नशील आहे. असे असले तरी शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर भौतिक सामार्थ्यापेक्षा आर्थिक सामर्थ्य वाढवण्यावर राष्ट्रे भर देत असल्याने सत्तेचा हा प्रकार मागे पडला आहे.

२) **मानसशास्त्रीय सत्ता:** परराष्ट्रीय धोरणासाठी महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय निर्णयासाठी राज्यकर्ते जनतेची अधिमान्यता मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशी अधिमान्यता मिळवण्यासाठी मानसशास्त्रीय सत्तेचा वापर केला जातो. त्यासाठी विविध

प्रचारतंत्राचा आधार घेतला जातो. प्रामुख्याने मानसशास्त्रीय सामर्थ्याचा वापर राष्ट्रांतर्गत आणि देशाबाहेरील जनमताला प्रभावित करण्यासाठी केला जातो.

देशाच्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन करून जनतेमध्ये राष्ट्राभिमान राष्ट्रप्रेम जागृत केले जाते. हा ही मानसशास्त्रीय सत्तेचा वापर आहे.

जनतेत मानसशास्त्रीय सत्तेचा प्रभाव पाडण्यात प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात.

उदा. अमेरिकेच्या धोरणांना अनुकूल जागतिक लोकमत बनावे म्हणून सी एन एन ही दूरचित्रवाहिनी, रेडिओ अमेरिका ही आकाशवाणी सतत प्रयत्नशील असतात

३) **आर्थिक सत्ता:** एखादे श्रीमंत, विकसित राष्ट्र आपल्या आर्थिक विकासाच्या बळावर गरीब, विकसनशील राष्ट्रावर प्रभाव पाडून आपली सत्ता गाजवण्याचा प्रयत्न करते, तेव्हा त्याला आर्थिक सत्ता असे म्हणतात. कर्ज, आर्थिक मदत, आयात-निर्यात करांमध्ये सवलत परकीय विकास निधी ही सत्तेची प्रमुख साधने आहेत.

उदा. अमेरिकेसारखे श्रीमंत राष्ट्र आपल्या इच्छा विकसनशील ;अविकसित राष्ट्रांवर साधण्याचा प्रयत्न करीत असते.

शीतयुद्धाच्या काळात राष्ट्रांच्या भौतिक सत्तेला महत्त्व होते. शीतयुद्धाच्या अंतानंतर भौतिक सत्तेची जागा आर्थिक सत्तेने घेतली आहे. त्यातून प्रादेशिक पातळीवर विविध व्यापार संघ निर्माण झाले आहे. उदा. युरोपियन युनियन आसियान.इ.

जपानसारखे लहान राष्ट्र आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर आंतरराष्ट्रीय राजकारणावर आपला प्रभाव पाडत आहे. १९९७ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेच्या हंगामी सदस्यपदासाठी झालेल्या निवडणुकीत जपानने भारताचा आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर पराभव केला.

### २.३.१.४ सत्तेची साधने किंवा सत्ता वापरण्याच्या पद्धती

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रे आपल्या सत्तेच्या जोरावर परस्परांवर प्रभाव पाडण्याचा त्याद्वारे आपले हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करतात त्यासाठी विविध साधनांचा वापर केला जातो. सत्तेची साधने खालील प्रमाणे.

१) **मन वळवणे/मताचा आग्रह किंवा पाठपुरावा:** सत्तेद्वारे प्रभाव पाडण्याचे हे महत्त्वाचे साधन असून त्याचा वापर दुसऱ्या राष्ट्राचे मन वळवून आपल्या मताचा आग्रह धरून त्याच्या धोरणात अपेक्षित बदल घडवून आणता येतो .या साधनाचा आपण वापर विविध विभागीय -आंतरराष्ट्रीय साधनांच्या व्यासपीठावरील चर्चेच्या प्रसंगी केला जातो. यातून राष्ट्रांची सौदेबाजीची क्षमता व्यक्त होते.

उदा. काश्मीर प्रश्नावरून भारत आणि पाकिस्तान ने नेहमीच आपली बाजू कशी योग्य आहे हे UNO च्या व्यासपीठावरून आंतरराष्ट्रीय समुदायाला पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

शीतयुद्धाच्या काळात नवस्वातंत्र्य आशियाई -अफ्रीका राष्ट्रांच्या मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी नाम संघटनेने महत्त्वाची भूमिका पार पाडली.

**२) बक्षीस देणे-**

बक्षीस हे सत्तेचे दुसरे महत्वाचे साधन आहे. राष्ट्रांना आर्थिक मदत, कर्ज, निधी, लष्करी -संरक्षणात्मक मदत, राजकीय समर्थन अशा स्वरूपात दिले जाते बक्षीस देऊन राष्ट्रांवर प्रभाव पाडण्याचा प्रयोग आंतरराष्ट्रीय राजकारणात पूर्वीपासून केला जातो.

बक्षिसांचे तीन प्रकार आहेत ते म्हणजे आर्थिक -राजकीय -लष्करी /संरक्षणात्मक

- आर्थिक प्रकार-यामध्ये राष्ट्रांना कर्ज, निधी, आर्थिक मदत केली जाते.
- लष्करी प्रकार- सामर्थ्यवान राष्ट्र इतर राष्ट्रांना शस्त्रास्त्र पुरवठा, शस्त्रास्त्र खरेदीसाठी मदत, शस्त्रास्त्र निर्मितीचे तंत्रज्ञान पुरवते
- राजकीय प्रकार- यात राजकीय मुद्द्यांवर पाठिंबा दिला जातो.

शीतयुद्धाच्या काळात अमेरिका-सोव्हियत रशिया या महासत्तांनी राष्ट्रांना अशा प्रकारची मदत देऊन आपल्या गटात ओढण्याचा प्रयत्न केला होता.

काश्मीर प्रश्नावरून अमेरिकेने पाकिस्तानला तर सोव्हियत रशियाने भारताला पाठिंबा दिला.

**३) शिक्षा देणे-**

अनेकदा शिक्षा देऊन किंवा शिक्षेची भीती दाखवून सामर्थ्यवान राष्ट्र दुर्बल राष्ट्रांवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करते. अशी शिक्षा बक्षिसे नाकारून, आर्थिक बंधने लादून, आंतरराष्ट्रीय राजकारणात एकटे पाडून, लष्करी करार अमान्य करून दिली जाते.

उदा. भारताने जेव्हा१९७४ व १९९८ मध्ये पोखरण अनुचाचण्या केल्या तेव्हा भारतावर अमेरिकेने आर्थिक निर्बंध लादले.

१९९१ मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण केल्याबद्दल इराकला युनोने आर्थिक नाकेबंदीची शिक्षा दिली.

**४) सक्ती किंवा प्रत्यक्ष बळाचा अथवा दमनाचा वापर-**

सक्ती किंवा प्रत्यक्ष बळाचा वापर ही शिक्षेची पुढची पायरी असून तिचा वापर शेवटचा पर्याय म्हणून केला जातो. त्यामध्ये युद्ध किंवा लष्करी कारवाई या साधनांचा वापर केला जातो. बळाचा वापर प्रत्यक्षात केला नाही तरी तसे करण्याची धमकी देण्याचे तंत्र वापरले जाते.

उदा.२००१ मध्ये अमेरिकेने अफगानिस्तानवर केलेली लष्करी कारवाई २००३ मध्ये अमेरिकेने इराकमधील सद्दाम हुसेनची राजवट बरखास्त करण्यासाठी सक्तीचा वापर केला.

### २.३.१.५ सत्तेचा वापर किंवा उपयोग

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचा वापर राष्ट्र विविध उद्दिष्टांसाठी करीत असतात.

१) **राष्ट्रीय सुरक्षा:** राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हे प्रत्येक राष्ट्राचे आद्य कर्तव्य मानले जाते. राष्ट्राची राष्ट्रीय सुरक्षा, हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक राष्ट्र प्रयत्नशील असते. त्यामुळे आपल्या राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्यासाठी राष्ट्र जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. त्यासाठी अण्वस्त्रे निर्मिती लष्करी सामर्थ्यात वाढ असे उपाय राष्ट्रांकडून योजिले जातात.

२) **प्रस्थापित व्यवस्थेचे संरक्षण:** आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितेसाठी प्रस्थापित सत्ता विभागणीची, सत्ता समतोलाची व्यवस्था टिकवणे आवश्यक असते. या व्यवस्थेच्या संरक्षणासाठी सत्तेचा वापर केला जातो.

उदा. युरोपात वॉटरलूच्या युद्धात नेपोलियन बोनापारीच्या पाडावानंतर १८१५ मध्ये युरोपियन राष्ट्रांची व्हिएन्ना परिषद झाली. यावेळी झालेल्या करारातून निर्माण झालेल्या सत्ता समतोलाची व्यवस्थेच्या संरक्षणासाठी इंग्लंड, फ्रान्स या राष्ट्रांनी प्रयत्न केले, पश्चिम आशियातील विभागीय सत्ता समतोल टिकवण्यासाठी२००३ मध्ये अमेरिकेने इराकवर लष्करी कारवाई करून सद्दाम हुसेनची हुकूमशाही नष्ट केली.

३) **प्रस्तापित व्यवस्थेत बदल घडवून आणणे:**काही राष्ट्रे सत्तेचा वापर प्रस्थापित राजकीय व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी करतात दोन परस्परविरोधी उद्दिष्टे असणाऱ्या राष्ट्रांच्या गटातील संघर्षातून जगात युद्धे घडून येतात.

उदा. भारत -चीन या दोन राष्ट्रात गेल्या अनेक वर्षापासून सीमावाद सुरू आहे. भारताच्या अरुणाचल प्रदेश व सिक्कीम या दोन राज्यांवर चीन आपला हक्क सांगत आहे. कारण चीनला प्रस्थापित व्यवस्थेत बदल हवा आहे. त्यासाठी चीनने लष्करी सामर्थ्याचा अवलंब करून भारताव दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले.

४) **आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा:** अनेकदा राष्ट्रांकडून सत्तेचा वापर जागतिक राजकारणात आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी एक साधन म्हणून केला जातो. राष्ट्रे आपल्या आर्थिक-लष्करी सत्तेचे प्रदर्शन करून इतरांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात.

उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर अण्वस्त्र संपन्नता प्राप्त करणे हे आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठेचे मानले जात.

२६ जानेवारीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवण्याच्या दृष्टीने भारताकडून नवी दिल्ली येथे पार पडणाऱ्या संचलनात लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन केले जाते. मित्र आणि शेजारी राष्ट्रांमध्ये आदर, शत्रु राष्ट्रांमध्ये भीती निर्माण व्हावी हा या प्रदर्शनामागील उद्देश असतो.

अशाप्रकारे सत्तेचा वापर विविध उद्दिष्टांसाठी केला जातो.

## २.३.२ सत्तासंतुलन / सत्तासमतोल (Balance of Power)

सत्तासमतोल ही आंतरराष्ट्रीय संबंधातील जुनी आणि संदिग्ध संकल्पना आहे. हे युद्ध टाळण्याचा किंवा युद्धाला नियंत्रित करण्याचा प्रभावी मार्ग म्हणून सत्तासमतोलाचा वापर केला जातो. आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षिततेसाठी सत्तासमतोलाची निर्मिती आणि त्याचं संरक्षण हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सत्तासमतोलाची व्यवस्था म्हणजे राष्ट्रांच्या राजकीय वर्तणुकीला नियंत्रित करणारा वैश्विक कायदा होय. या सत्तेचे समान वितरण करून संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला जातो. थोडक्यात, या संकल्पनेचा संबंध सत्ता आणि सत्तेच्या व्यवस्थापनाशी आहे. आंतरराष्ट्रीय संबंधात शांतता आणि सुरक्षिततेच्या निर्मितीला प्राधान्य असते. त्याकरिता राष्ट्रीय सत्ता व सामर्थ्यावर नियंत्रण ठेवणे, त्याला मर्यादा घालणे आवश्यक असते. राष्ट्रीय सत्तेचा वापर सकारात्मक ( शांतता - सुरक्षिततेचे रक्षण) आणि नकारात्मक कार्यासाठी ही केला जातो. उदा. अनेकदा राष्ट्रीय भौतिक सामर्थ्याचा वापर करून आपली इच्छा. इतरांवर लादण्याचा प्रयत्न करतात. एखादे राष्ट्र अनियंत्रित सत्तेचा वापर करून आक्रमक धोरणाचा स्वीकार करते तेव्हा इतर राष्ट्रांकडून त्याचा सामूहिक प्रतिकार केला जातो, हेच सत्तासमतोलाचे प्रमुख तत्त्व आहे.

जेव्हा आंतरराष्ट्रीय राजकारणात संघर्षाचे वातावरण निर्माण होते तेव्हा हा दोन परस्पर विरोधी गटांची निर्मिती होऊन होऊन सत्ता समतोल प्रस्थापित होतो. अशा परिस्थितीत दोन्ही गटांना परस्परांच्या क्षमतेची आणि युद्ध झाल्यास त्याच्या परिणामांची कल्पना असल्याने युद्धाचा धोका टळतो.

थोडक्यात, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी राष्ट्रीय सत्तेवर नियंत्रण आवश्यक असून, असे नियंत्रण प्रस्थापित करणारी व्यवस्था म्हणजे सत्ता समतोल होय.

### २.३.२.१ सत्ता समतोलाचा संक्षिप्त इतिहास-

सतराव्या शतकात राष्ट्र- राज्यांच्या निर्मितीबरोबरच सत्ता समतोलाची व्यवस्था संघटित आणि सूत्रबद्ध रूपात अस्तित्वात आली. १६४८ च्या वेस्ट फेलीयाच्या कराराद्वारे राष्ट्र- राज्यांची निर्मिती झाली. त्यातूनच युरोपच्या राजकारणात शांतता आणि स्थिरता निर्माण करण्यासाठी सत्ता समतोल याची सूत्रबद्ध व्यापक व्यवस्था बनविण्यात आली. १९ व्या शतकापर्यंत टिकली.

पाश्चात्य राजकीय विचारवंत बर्नाडों रुसेलियन आणि मॅकीव्हेली (१४६७ - १५२७) यांनी राष्ट्र राज्यांची निर्मिती पूर्वी सत्तानियंत्रणा साठी अशा व्यवस्थेच्या निर्मितीची आवश्यकता सांगितली.

फ्रान्सचा १४ व्या लूईने युरोपातील प्रस्तापित सत्ता समतोलाच्या व्यवस्थेला आव्हान देण्याचा प्रयत्न केला तेव्हा इंग्लंड आणि नेदरलँडच्या संयुक्त प्रयत्नाने लुईच्या महत्त्वाकांक्षेला नियंत्रित केले. १७१४ च्या युट्रेश तहाने सत्तासमतोलाची व्यवस्था अधिक बळकट केली गेली. म्हणूनच १८ व्या शतकाच्या पूर्वार्ध हा सत्तासमतोलाच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.

१८व्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रान्सच्या नेपोलियन बोनापार्टाने युरोपा तील सत्तासमतोलाची व्यवस्था मोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा इंग्लंडच्या नेतृत्वाखाली युरोपियन

राष्ट्रांनी वॉटर्लू च्या युद्धात त्याचा पराभव केला. १८१५च्या व्हिएन्ना काँग्रेसमध्ये बहुपक्षीय करार करून सत्तासमतोलाची नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली.

१९व्या शतकात सत्तासमतोलाची व्यवस्था युरोपपुरती मर्यादित न राहता तिला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले. १७ व्या शतकापासून १९व्या शतकापर्यंत युरोपातील सत्तासमतोलाची व्यवस्था टिकवण्यात इंग्लंडची भूमिका महत्वाची होती. इंग्लंडची आर्थिक औद्योगिक प्रगती, जगभर पसरलेले साम्राज्यामुळे युरोपियन राजकारणाचे नेतृत्व इंग्लंडकडे आले. या काळातील इंग्लंडची भूमिका सत्तासमतोलची होती.

पहिल्या महायुद्धानंतर युरोपच्या राजकारणात नवा सत्तासमतोल आकाराला आला. अमेरिका, सोव्हिएट रशियाचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रवेश व ब्रिटिश साम्राज्याला लागलेली उतरती कळा यामुळे नवीन सत्तासमतोलाच्या निर्मितीला चालना मिळाली.

दुसऱ्या महायुदधानंतर विश्व राजकारणाचे चित्र बदलले. अमेरिका आणि आणि सोव्हिएट राशियात शीतयुद्धाचे राजकारण पेटले. त्यामुळे जगातील राष्ट्रांचे ध्रुवीकरण होण्यास सुरुवात झाली. जगाची विभागणी दोन गटात झाली. त्यालाच द्वि ध्रुवीय सत्तासमतोल म्हणतात.

### २.३.२.२ सत्तासमतोल - अर्थ, स्वरूप, व्याख्या

सत्तासमतोल ही संदिग्ध संकल्पना असून तिची सर्वसमावेशक व्याख्या करणे अवघड आहे.

१) **पार्मर आणि पार्कीन्स :** "सत्तासमतोलात परस्परविरोधी दबावाची एक प्रक्रिया निर्माण केली जाते. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट राष्ट्राला किंवा राष्ट्रांच्या गटाला इतरांच्या तुलनेत शक्तिशाली बनवण्यापासून परावृत्त केले जाते.

२) **हार्टमन:** सत्तासमतोलामुळे गट-प्रतिगट निर्मितीची एक शृंखला तयार होते ज्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात स्थिरता निर्माण होऊन युद्धाचा धोका टळतो.

३) **प्रा. क्विन्सी राईट:** सत्तासमतोल म्हणजे अशी व्यवस्था की, ज्यात राष्ट्रे सामूहिक प्रतिकाराच्या भीती मुळे आक्रमक कृत्यापासून परावृत्त होतात.

**थोडक्यात वरील व्याख्यांवरून सत्तासमतोलाचे स्वरूप स्पष्ट होते.**

सत्तासमतोल म्हणजे अशी परिस्थिती ज्यात राष्ट्रांमधील सत्तासंबंध सामान्यतः समान असतात. कोणतेही राष्ट्र आपली इच्छा इतरांवर लादण्याचा प्रयत्न करीत नाही. सत्ता समतोल ही सत्तेच्या समान विभागणीची आणि सत्तेत समतोल साधणारी व्यवस्था आहे. सत्ता समतोलामुळे राष्ट्रांमधील सत्ताप्राप्तीसाठीचा व ती वाढविण्याची स्पर्धा कमी होते. सत्तेच्या नियंत्रणासाठी सत्तेचे समान वितरण आवश्यक आहे. ते सत्तासमतोलाद्वारे साधले जाते. सत्ता समतोलामुळे विश्वशांती व सुरक्षितता निर्माण होण्यास मदत होते.

सत्तासमतोलामुळे कोणतेही राष्ट्र इतरांवर आक्रमण करण्याचे धाडस करीत नाही. कारण त्याला दुसरे राष्ट्र किंवा गटाकडून होणाऱ्या प्रतिकाराची जाणीव असते. सत्ता नियंत्रणाचे एक मार्ग म्हणजे सत्तासमतोल होय.

### २.३.२.३ सत्तासमतोलाची वैशिष्ट्ये

१) **परिवर्तनीयता:** सत्तासमतोल ही परिवर्तनीय अवस्था आहे. संतुलनाकडून असंतुलनाकडे आणि पुन्हा असंतुलनाकडून संतुलनाकडे असा बदल या व्यवस्थेत होत राहतात. त्यासाठी बहुपक्षीय पातळीवर करार केले जातात.

उदा. वेस्टफेलिया करारातून सत्ता संतुलनाची व्यवस्था निर्माण केली गेली. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात नेपोलियनने तिला आव्हान दिले. त्यातून निर्माण झालेल्या असंतुलनातून युरोपात युद्धे घडून आली. नेपोलियनच्या पराभवानंतर १८१५ च्या व्हिएन्ना कॉंग्रेसद्वारे पुन्हा सत्तासंतुलनाचा प्रयत्न झाला. ते पहिल्या विश्वयुद्ध पर्यंत टिकले. सत्ताअसंतुलनातून दुसरे विश्वयुद्ध घडून आले. व्हर्साय तहाद्वारे सत्तासंतुलन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अशाप्रकारे सत्तासमतोलाची शृंखला संतुलित आणि असंतुलनाच्या या माध्यमातून अखंड सुरू असते.

२) **कृत्रिम अवस्था :** सत्तासमतोलाची व्यवस्था राष्ट्रांच्या सक्रिय हस्तक्षेपातून निर्माण झालेली कृत्रिम व्यवस्था आहे. ती दैवी देणगी नसून, राष्ट्रामध्ये झालेल्या बहुपक्षीय कराराचा परिणाम आहे. एखादे राष्ट्र जेव्हा सत्ता आणि बळाचा अधिक वापर करते तेव्हा इतर राष्ट्र त्याला सामूहिकरीत्या शह देण्याचा प्रयत्न करतात. आक्रमक राष्ट्रांविरुद्ध त्यांची युती प्रस्थापित होते.

उदा. १९९१ मध्ये अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराक विरुद्ध निर्माण करण्यात आलेली युती. तिने इराकचे कुवैतवरील आक्रमण परतवून लावले.

३) **स्थितीवादी व्यवस्था:** सत्तासमतोलाच्या व्यवस्थेत विश्व राजकारणातील जैसे थे परिस्थिती टिकविण्याचा प्रयत्न केला जातो. प्रस्थापित रचना टिकवून धरण्यातच मोठया राष्ट्रांचे हितसंबंध गुंतवलेले असतात. जुना सत्तासमतोल टिकविण्यात इंग्लंडचे योगदान महत्वाचे होते.

४) **खऱ्या स्वरुपाचा सत्तासमतोल अवघड:** खऱ्या सत्ता समतोलाची निर्मिती अवघड आहे. युद्ध ही सत्तासमतोलाची चाचणी असून, युद्ध टाळण्यात सत्तासमतोल यशस्वी झाल्यास खऱ्या स्वरूपाचा सत्तासमतोल अस्तित्वात येतो.

५) **मोठ्या राष्ट्रांचा खेळ:** सत्तासमतोलाची व्यवस्था हा मोठ्या राष्ट्रांचा खेळ असून त्यात छोट्या राष्ट्रांची भूमिका नगण्य असते. त्यांचा वापर मोठी राष्ट्रे बुद्धिबळातील प्याद्यांप्रमाणे होतो. मोठी राष्ट्रे आपले श्रेष्ठत्व टिकवण्यासाठी, हितसंबंध जोपासण्यात सत्ता वाढवण्यासाठी सत्तासमतोलाची व्यवस्था निर्माण करतात.

६) **सत्तासमतोलकाची भूमिका:** सत्तासमतोलाची व्यवस्था यशस्वी होण्यासाठी एका सत्तासमतोलकाची आवश्यकता असते. सत्तासमतोलाच्या रक्षण आणि अंमलबजावणीसाठी सत्तासमतोलक महत्वाची भूमिका पार पाडतो.

जुन्या सत्तासमतोलात ही भूमिका इंग्लंडने पार पाडली म्हणूनच हा समतोल एकेरी सत्तासमतोल म्हणून ओळखला जातो.

दुसऱ्या महायुद्धानंतर द्विध्रुवीय सत्तासमतोला मध्ये ही भूमिका अमेरिका - सोव्हिएट रशियाने पार पाडली.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर सलासमतोलकाची भूमिका अमेरिकेकडे आली आहे.

### २.३.२.४ सत्तासंतुलन साधण्याचे मार्ग / सत्तासमतोल निर्मितीचे तंत्र

सत्ता समतोल ही कृत्रिम व्यवस्था असून, ती व्यक्ती किंवा राष्ट्रांच्या सक्रिय हस्तक्षेपाद्वारे करावी लागते. या व्यवस्थेच्या निर्मितीसाठी अनेक तंत्रांचा वापर केला जातो.

१) **युती- प्रति युतीची निर्मिती:** सत्तासमतोलाची व्यवस्था निर्माण करण्याचे हे सर्वात जुने आणि प्रसिद्ध तंत्र आहे. युक्ती म्हणजे विशिष्ट उद्देशपूर्तीसाठी राष्ट्रांनी एकत्र येऊन स्थापन केलेला गट किंवा संघ होय. प्रति पक्षाविरुद्ध आपली बाजू बळकट करण्यासाठी राष्ट्रे मित्र राष्ट्रांच्या युती स्थापन करतात. हा सामूहिक प्रतिकाराचा मार्ग असून एखादे राष्ट्र प्रबळ प्रतिपक्षाचा सामना करू शकत नाही तेव्हा हा आत्मरक्षणासाठी ते युतीत प्रवेश करते. उद्देश सफल झाल्यानंतर अशा युती अनेकदा तुटतात. युतीचे स्वरूप आक्रमक किंवा बचावात्मक असते. आक्रमक युती प्रस्थापित सत्तासमतोलांची व्यवस्था नष्ट करून आपल्या हितसंबंधांना सोयीस्कर नवी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. तर बचावात्मक युती प्रस्थापित सत्तासमतोलांची व्यवस्था टिकवण्याचा प्रयत्न करतात. युती - प्रतियुतीतील शह - प्रतिशहाच्या राजकारणाचे रूपांतर युद्धात होऊ शकते.

२) **मोबदला:** सत्तासमतोल टिकवण्यासाठी भूप्रदेशाची मोबदला म्हणून वाटणी करणे हे सत्तासमतलाचे जुने तंत्र आहे. १९ व्या शतकात युरोपातील सत्तासमतोल टिकवण्यासाठी या तंत्राचा वापर केला गेला.

युद्धात पराभूत राष्ट्राच्या ताब्यातील प्रदेशाची विजयी राष्ट्रे विभागणी करून त्याची इतर राष्ट्रांमध्ये समान वाटणी केली जाते. त्यामुळे पराभूत राष्ट्राचे भौगोलिक खच्चीकरण होऊन सत्तासमतोलाला आव्हान देण्याचे धाडस करीत नाही.

उदा. पहिल्या महायुद्धानंतर विजयी राष्ट्रांनी जर्मनी विषयी या तंत्राचा मोठया प्रमाणात वापर केला.

३) **फाळणी:** सत्ता समतोल टिकवण्याचे एक तंत्र म्हणून फाळणीचा वापर पूर्वीपासून केला जातो. यात युद्धखोर किंवा आक्रमक राष्ट्राची फाळणी अशाप्रकारे केली जाते की पुन्हा त्या राष्ट्राकडून युद्धाचे धाडस होणार नाही. या तंत्राचा वापर बऱ्याचदा युद्ध समाप्तीनंतर केला जातो. विजयी राष्ट्रांकडून सक्तीचा वापर करून ती पराभूत राष्ट्रांवर लादली जाते.

उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीची करण्यात आलेली फाळणी. १८ व्या शतकात पोलंडची तीनदा फाळणी करण्यात आली. पोलंडचा भूप्रदेश प्राशिया, रशिया, हंगेरीने आपसात वाटून घेतला.

४) **शस्त्रीकरण आणि नि:शस्त्रीकरण:** प्रत्येक राष्ट्राला आपल्या सुरक्षेसाठी शस्त्रास्त्रे

बाळगण्याचा अधिकार आहे. हे राष्ट्र सुरक्षेसाठी भौतिक / लष्करी सामर्थ्य वाढवण्यावर भर देतात. यातूनच राष्ट्रा- राष्ट्रात शस्त्रास्त्र स्पर्धा वाढीस लागते. राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यात संतुलन निर्माण होते तेव्हा समतोल साधला जातो.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका सोव्हिएट रशियात शस्त्रास्त्र स्पर्धा समतोल टिकवण्यास सहाय्यक ठरले.

शस्त्रीकरणामुळे सत्ता समतोलाची व्यवस्था जशी टिकवली जाते, तशीच ती नष्टही होऊ शकते. शस्त्रीकरणाप्रमाणे नि:शस्त्रीकरणही सत्ता समतोल टिकविण्यास कारणीभूत अथवा नष्ट करण्यास कारणीभूत ठरते. लष्करी सामर्थ्यात संतुलन प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रे शस्त्रास्त्र नियंत्रण - नि:शस्त्रीकरणासाठी तयार होतात. त्यासाठी विविध करार केले जातात.

उदा SALT-१ व SALT -२ करार, अण्वस्त्र प्रसारबंदी करार

५) **हस्तक्षेप आणि युद्ध:** सत्ता समतोल टिकविण्याचा अंतिम पर्याय म्हणून हस्तक्षेप व युद्ध या तंत्राचा वापर केला जातो. हस्तक्षेप तंत्रांतर्गत एखादे मोठे राष्ट्र लहान राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करून आपली इच्छा त्या राष्ट्रावर लादण्याचा प्रयत्न करते. बऱ्याचदा हस्तक्षेप युतीतील राष्ट्रे फुटून बाहेर जाऊ नये म्हणूनही केले जातात.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका सोव्हिएट रशियाने राजकीय अस्थिरतेच्या नावाखाली अनेक राष्ट्रांच्या कारभारात हस्तक्षेप केला. अमेरिकेने क्युबा, लेबेनॉन, लाओस मध्ये तर रशियाने उत्तर कोरिया, उत्तर व्हिएतनाम, अफगाणिस्तानात हस्तक्षेप केले. या हस्तक्षेपातून युद्धेही घडून आली. उदा. १९५० चे कोरियन युद्ध, १९६५ चे व्हिएतनाम युद्ध.

१९८७ मध्ये मालदीव मधील बंड मोडण्यासाठी भारताने तेथे हस्तक्षेप केला. १९९१ मध्ये इराकने कुवैतवर आक्रमण केल्यानंतर अमेरिकेने हस्तक्षेप करून कुवैतला मुक्त केले आणि पश्चिम आशियातील बिघडलेले संतुलन दुरुस्त केले.

६) **फोडा आणि राज्य करा:** सत्ता समतोलाच्या या तंत्रांतर्गत प्रतिपक्षाची भौगोलिक विभागणी करून त्याच्या सामर्थ्याचे खच्चीकरण टिकवले जाते. मित्रराष्ट्रे जोडून स्वतःची ताकद वाढवून संतुलन साधता येते. तसेच प्रतिस्पर्धी राष्ट्रांचे मित्र पळवूनही संतुलन साधले जाते.

रोमन साम्राज्याने विखुरलेल्या साम्राज्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी या तंत्राचा अनेकदा वापर केला. फ्रान्सने जर्मनीला कमकुवत करण्यासाठी या तंत्राचा वापर पहिल्या महायुद्धापर्यंत केला.

अशाप्रकारे सत्तासमतोलामुळे शांतता, स्थिरता निर्माण होते. राष्ट्रांच्या एकाधिकारशाहीला आळा बसतो आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण होते.

### २.३.३.५ सत्तासंतुलनाचे प्रकार

एकध्रुवीकरण, द्विध्रुवीकरण, बहुध्रुवीकरण हे या तिन्ही संकल्पना सत्तासंतुलनाशी निगडित आहेत. कारण त्यावरून सत्तेचे विभाजन आणि वाटणी कशा पद्धतीने झाली हे समजून येते.

### १) बहुध्रुवीयकरण

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेची विभागणी अनेक राष्ट्रांमध्ये झालेली असते तेव्हा त्या सत्तासमतोलास बहुध्रुवीयकरण असे म्हटले जाते. बहुधुवीय रचनेत सत्तेची केंद्रे अनेक असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व कोणत्याही एका राष्ट्राकडे नसून, अनेक राष्ट्रांकडे असते. जागतिक नेतृत्वासाठी राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये स्पर्धा असते. बहुध्रुवीकरणाच्या व्यवस्थेत कोणतेही एक राष्ट्र शक्तिशाली नसते तर अनेक राष्ट्रांचे सत्ता सामर्थ्य कमी - अधिक प्रमाणात एकसमान असते. या व्यवस्थेमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणत्याही एकाच राष्ट्राची दादागिरी, मक्तेदारी निर्माण होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. राष्ट्रा- राष्ट्रांमध्ये स्पर्धा जरी असली तरी समान हितसंबंधाच्या रक्षणासाठी राष्ट्रांची युती होण्याची शक्यता असते. उदा. १९९१ च्या आखाती युद्धाच्या वेळी अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराकविरुद्ध सामूहिक सुरक्षेच्या तत्त्वांतर्गत लष्करी कारवाई करण्यात आली. या कारवाईला रशिया, चीन, जपान या राष्ट्रांनी समर्थन दिले होते.

१६४८ च्या वेस्टफेलिया करारानंतर युरोपात आस्तित्वात आलेली राष्ट्र - राज्य व्यवस्था ही बहुध्रुवीय सत्तासंतुलनाच्या तत्त्वावर आधारित होती. या कराराद्वारे युरोपियन राजकारणात शांतता आणि स्थिरता आणण्यासाठी सत्तासमतोलाची एक व्यापक व्यवस्था बनविण्यात आली. ती १९ व्या शतकापर्यंत टिकून राहिली. ही व्यवस्था बहुकेंद्री व्यवस्था होती. वेस्टफेलियाच्या करारातून युरोपात निर्माण झालेली सत्तासमतोलाची व्यवस्था मोडण्याचा प्रयत्न फ्रान्सचा नेपोलियन बोनापार्टने केला तेव्हा इंग्लंडच्या नेतृत्वाखाली युरोपियन राष्ट्रांनी नेपोलियनला लढा दिला. नेपोलियनच्या पराभवानंतर १८१५ च्या व्हिएन्ना परिषदेत अनेक बहुपक्षीय करार करण्यात येऊन सत्ता असमतोलाची नवीन व्यवस्था निर्माण करण्यात आली. पहिल्या महायुद्धापर्यंत ही व्यवस्था टिकली. त्यानंतर ही व्यवस्था कोलमडून पडली.

**बहुध्रुवीय विश्व व्यवस्थेची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे -**

**१) बहूसत्ताकेंद्री व्यवस्था -**

या व्यवस्थेत सत्तेची केंद्रे अनेक असतात. विश्व राज्यकारणाचे नेतृत्व कोणतेही एक राष्ट्र करत नाही.

**२) सामर्थ्यामध्ये समानता**

बहुध्रुवीय व्यवस्थेत राष्ट्रांचे सामर्थ्य कमी अधिक प्रमाणात समान असते.

**३) सामूहिक नेतृत्व**

बहुध्रुवीय व्यवस्था सामूहिक नेतृत्वाच्या तत्त्वावर आधारित आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व कोणत्याही एका राष्ट्राच्या हातात नसून, अनेक राष्ट्रे सामूहिकपणे जगाचे नेतृत्व करतात.

**४) सत्तासमतोलावर आधारित व्यवस्था-**

बहुध्रुवीय व्यवस्था ही सत्तासमतोलावर आधारित व्यवस्था असून, ती १९ व्या शतकात युरोपात आस्तित्वात असलेल्या व्यवस्थेवर आधारित आहे. या व्यवस्थेत इंग्लैंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, नेदरलॅण्ड, बेल्जियम अशी सत्तेची केंद्रे अनेक होती. या राष्ट्रांमध्ये आशिया - आफ्रिका खंडात वसाहती निर्माण करण्यासाठी तीव्र स्पर्धा होती. त्यातूनच पहिले महायुदध घडून आले.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अशी बहुध्रुवीय व्यवस्था अगर सत्ता समतोल आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झाल्याचे बोलले जाते.

## २) द्विध्रुवीयकरण

द्विध्रुवीय सत्तासमतोल म्हणजे दोन राष्ट्रांभोवती केंद्रित असलेली व्यवस्था होय. यामध्ये सत्तेची केंद्रे दोन राष्ट्रे असून, जागतिक नेतृत्वाची धुरा त्या राष्ट्रांकडे असते. आतरराष्ट्रीय राजकारणातील सत्ता, नेतृत्वासाठी त्या राष्ट्रांमध्ये स्पर्धा, चढाओढ असते. शह- प्रतिशहांचे राजकारण, गट- प्रतिगटांचे राजकारण यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण तणाव निर्माण होतात.

दुसऱ्या विश्वयुद्धानंतर युरोपातील मोठ्या सत्तांची जागा अमेरिका आणि सोव्हियत राशिया या दोन नव्या महासत्तांनी घेतली. या महासत्तामध्ये विचारधारेमुळे संघर्ष निर्माण झाला. त्याला शीतयुद्ध असे म्हटले जाते. हे शीतयुद्ध १९४५ पासून १९९१ पर्यंत म्हणजेच सोव्हियत रशियाचे विघटन होईपर्यंत सुरू होते. शीतयुद्धामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात नवे सत्तासंतुलन निर्माण झाले.

अमेरिका भांडवलशाहीचे तर सोव्हियत रशिया साम्यवादी विचारसरणीचे प्रतिनिधित्व करीत होता. महायुद्धानंतर युरोप-आशियात साम्यवादाचा वाढता प्रचार-प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेने साम्यवादाच्या प्रतिरोधाचे धोरण स्वीकारले त्याअंतर्गत युरोप - आशियातील राष्ट्रांबरोबर लष्करी करार करून नाटो, सिएटो, सेम्टो या लष्करी संघटनांची निर्मिती केली. सदस्य राष्ट्रांच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेने घेतली.

सोव्हियत रशियाही या स्पर्धेत मागे नव्हता. पूर्व युरोपातील राष्ट्रांबरोबर त्याने लष्करी करार केले. त्यामुळे शीतयुद्धाचा विश्व पातळीवर केवळ प्रसार झाला नाही तर जगाची विभागणी भांडवलशाही विरुद्ध साम्यवादी अशा दोन गटात झाली. म्हणूनच शीतयुद्धकालीन जग द्विध्रुवीयकरणाच्या व्यवस्थेवर आधारित असल्याचे बोलले जाते. या व्यवस्थेमध्ये कालांतराने शैथिल्य येत गेले. शेवटी १९९१ मध्ये सोव्हियत राशियाचे विघटन होऊन अमेरिका ही एकमेव महासत्ता उरली. द्विध्रुवीय सत्ता समतोलाची व्यवस्था कोलमडून एकधुवीय सत्तासमतोल अस्तित्वात आला.

### द्विध्रुवीय व्यवस्थेची वैशिष्ट्ये -

**१) सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित व्यवस्था-**

द्विध्रुवीय व्यवस्था ही सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित व्यवस्था असते. जागतिक राजकारणाची सत्ता दोन राष्ट्रांच्या हातात असते.

उदा. शीतयुद्धाच्या काळात जगाची विभागणी अमेरिका आणि सोव्हिएत रशिया

या दोन महासत्तांमध्ये झाली.

२) **दोन्ही राज्ये अधिक शक्तिशाली**

द्विध्रुवीय व्यवस्थेत जगाचे नेतृत्व करणारे दोन्ही राष्ट्रे कमी- अधिक प्रमाणात आर्थिक आणि भौतिक दृष्ट्या शक्तिशाली मस असतात. एका राष्ट्राची कृती दुसऱ्या राष्ट्राच्या प्रतिकृतीला जन्म देते.

उदा. शीतयुद्धात अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन्ही महासत्ता आण्विक व लष्करी दृष्ट्या बलशाली होत्या.

३) **जागतिक नेतृत्वासाठी संघर्ष**

द्विध्रुवीय व्यवस्थेत सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या दोन्ही राष्ट्रांमध्ये जागतिक नेतृत्वासाठी संघर्ष असतो. त्यासाठी दोन्ही राष्ट्रे प्रयत्नशील असतात.

उदा. दुसऱ्या विश्वयुद्धानंतर जगाची विभागणी अमेरिकाप्रणित भांडवलशाही आणि सोव्हिएट रशिया प्रणित साम्यवाद अशा दोन विचारधारांच्या आधारावर झाली. जागतिक नेतृत्वाच्या स्पर्धेतून शीतयुद्धाचा उदय झाला.

४) **युती-प्रतियुतींची निर्मिती**

द्विध्रुवीय व्यवस्थेत जागतिक नेतृत्व करणारी राष्ट्रे जगातील इतर राष्ट्रांना आपापल्या गटात ओढण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी आपापल्या मित्र राष्ट्रांसमवेत लष्करी करार करून युती - प्रतियुती निर्माण करतात. उदा शीतयुद्धाच्या काळात अमेरिका-सोव्हिएट रशिया आपल्या मित्र राष्ट्रांबरोबर लष्करी करार करून त्यांना लष्करी - आर्थिक मदत पुरवली. परिणामी स्थानिक विभागीय पातळीवर शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. अमेरिकेने नाटो तर सोव्हियत राशियाने वॉर्सा पॅक्ट या लष्करी संघटनांची सामूहिक सुरक्षेच्या तत्वावर आधारित निर्मिती केली.

५) **दोन राष्ट्रांच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था**

द्विध्रुवीय व्यवस्था ही दोन राष्ट्रांच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था असते.

३) **एकध्रुवीयकरण**

एकध्रुवीय विश्वव्यवस्था ही एकाच राष्ट्राभोवती केंद्रित असणारी व्यवस्था असून, जागतिक नेतृत्वाची धुरा त्या राष्ट्राकडे असते. विश्व राजकारणातील प्रमुख निर्णय त्याच राष्ट्राच्या मर्जीने घेतले जातात. तसेच विश्वशांती आणि सुरक्षितता टिकविण्याची जबाबदारी त्या राष्ट्रावर असते. त्या राष्ट्राशी स्पर्धा करू शकेल किंवा त्याच्या सत्तेला आव्हान देऊ शकेल, अशी दुसरी सत्ता या व्यवस्थेत अस्तित्वात नसते.

१९९१ मध्ये सोव्हियत राशियाचे विघटन होऊन शीतयुद्धाची समाप्ती झाली. शीतयुद्धोतर काळात एकध्रुवीय व्यवस्था अस्तित्वात आली असल्याचे अमेरिकन अभ्यासकांचे मत आहे. शीतयुद्धोतर काळात अमेरिका ही एकच महासता उरली आणि एकध्रुवीय सत्तासंतुलनाचा उदय झाला. सोव्हियत रशियाच्या विघटनानंतर

अमेरिकेशी स्पर्धा करू शकेल, अशी दुसरी सत्ता अस्तित्वात नाही. त्यामुळे नवीन विश्वरचनेत अमेरिकेची पकड निर्विवाद आहे.

१९९१ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश सिनियर यांनी शीतयुद्धोतर काळातील नवीन विश्वरचनेची घोषणा केली. नवीन विश्वरचनेत अमेरिकेची भूमिका विश्वरक्षण कर्त्याची असेल. त्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचा सक्रिय सहभाग असेल, असा सूर

४) **लोकशाही विरोधी व्यवस्था**

एकध्रुवीय व्यवस्था ही प्रामुख्याने लोकशाहीविरोधी व्यवस्था असते. जगाचे नेतृत्व करणारे राष्ट्र बऱ्याचदा इतरांशी हुकुमशाही पद्धतीने वर्तन करते.

५) **एकध्रुवीय व्यवस्थेत आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व करणारे राष्ट्र विभागीय तसेच आंतरराष्ट्रीय सत्तासमतोलात सत्ता समतोलकाची भूमिका पार पडते.**

उदा. १७ व्या शतकापासून १९व्या शतकापर्यंत युरोपमधील सत्तासमतोलाची व्यवस्था टिकवून धरण्यात इंग्लंडची भूमिका महत्वाची होती. इंग्लडची आर्थिक-औद्योगिक प्रगती, जगभर पसरलेलं साम्राज्य यामुळे युरोपच्या राजकारणाचे नेतृत्व इंग्लंडकडे आले. या काळातील इंग्लंडची भूमिका सत्तासमतोलकाची होती.

### २.३.३ राष्ट्र- राज्य व्यवस्था

आज विश्वात आस्तित्वात असलेली राज्यव्यवस्था ही राष्ट्र-राज्य व्यवस्था आहे. जगातील सर्व मानव समाज राष्ट्र-राज्यांमध्ये विभागला असून, ही राष्ट्र-राज्ये एकमेकांशी संबंधित असून एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यांच्या परस्परावलंबी संबंधातून आंतरराष्ट्रीय जीवनाचे स्वरूप ठरत असते. ही सर्व राष्ट्रे मिळून आंतरराष्ट्रीय समाजाची स्थापना करतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्र-राज्ये महत्वाची भूमिका पार पाडतात.

पामर आणि पार्किन्सच्या मते, "कमी-जास्त प्रमाणात आणि विविध प्रकारे परस्परांशी संबंधित असणाया सार्वभौम राज्यात, जिथे लोक संघटित झालेले आहेत, अशा राजकीय जीवनाचा आकृतिबंध म्हणजे राष्ट्र राज्य व्यवस्था होय.

राष्ट्र-राज्य या संकल्पनेमध्ये 'राष्ट्र' आणि 'राज्य' या दोन घटकांचा अंतर्भाव होतो. म्हणून राष्ट्र-राज्य ही संकल्पना समजून घेताना राष्ट्र 'राष्ट्र' आणि 'राज्य' या दोन्ही संकल्पना समजून घ्याव्या लागतात.

"निश्चित भूप्रदेशावर कायम वस्ती करून राहणारा, बाहय सत्तेपासून मुक्त, स्वतंत्र असणारा आणि एकाच शासनसंस्थेच्या नियंत्रणाखाली राजकीय दृष्ट्या सुसंघटित समाज म्हणजे राज्य होय, " म्हणजेच भूप्रदेश, लोकसंख्या, शासनयंत्रणा आणि सार्वभौम हे राज्याचे चार मूलभूत आणि अनिवार्य घटक आहे. राज्य ही प्रादेशिक आणि सार्वभौम स्वरूपाची कल्पना आहे.

राष्ट्र म्हणजे 'आपण सर्व एक आहोत' या भावनेने एकत्र आलेला समाज. राष्ट्र ही एक भावना

आहे. सामान भाषा, परंपरा, समान इतिहास, समान धर्म, समान संस्कृती, समान वंश, समान भूप्रदेश, समान राजकीय इच्छा-आकांक्षा इ. चे समानतेतून एकतेची भावना लोकसमूहात निर्माण होते, अशा लोकसमूहाला इतरांपासून स्वतंत्र आणि आणि वेगळे राहण्याची इच्छा असते, त्यांना राष्ट्र म्हणतात.

थोडक्यात, राष्ट्र-राज्य या संकल्पनेत 'राष्ट्र' आणि 'राज्य' या दोन्ही तत्त्वांचा समावेश होतो.

आधुनिक राज्ये ही राष्ट्र राज्य आहेत. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या क्षेत्रात राष्ट्र- राज्ये हीच पायाभूत घटक म्हणून कार्य करतात.

### २.३.३.१ राष्ट्र राज्य व्यवस्थेचा उदय आणि विकास -

प्रारंभीची अस्तित्वात असलेली गणराज्ये, प्राचीन काळात विविध नद्यांच्या काठी निर्माण झालेली इजिप्त, भारत, चीन या देशात उदयास आलेली पौर्वात्य साम्राज्ये, ग्रीक नगरराज्ये, रोमन साम्राज्य, सरंजामशाही राज्ये, आणि आधुनिक राष्ट्र-राज्य या अवस्थेतून राष्ट्र-राज्य व्यवस्थेचा उदय आणि विकास घडून आला आहे.

१७ व्या शतकाचा मध्य हा राष्ट्र - राज्य व्यवस्थेच्या उदयाचा काळ मानला जातो. राष्ट्र - राज्य व्यवस्थेचा उदय युरोपमध्ये झाला. त्यानंतर तिचा संपूर्ण जगात विस्तार झाला.

युरोप खंडात १६ व्या आणि १७ व्या शतकात प्रबोधनाच्या चळवळीने जोर धरला. सरंजामशाहीचा अंत होऊन पोपच्या धार्मिक सत्तेविरुद्ध प्रखर आंदोलन झाले. १६१८ मध्ये पोपची सत्ता नष्ट करण्यासाठी सुरु झालेले युद्ध ३० वर्षे चालले. धर्मसत्तेपेक्षा राज्यसत्ता प्रबळ बनली. प्रबळ, अनियंत्रित राजसत्तेच्या उदयाने राष्ट्र-राज्याच्या निर्मितीला चालना मिळाली. १६४८ च्या वेस्ट फेलिया करारानंतर युरोपमध्ये नवीन राज्यव्यवस्था प्रस्थापित होऊन इंग्लंड, फ्रान्स, स्पेन ही राष्ट्र - राज्ये म्हणून उदयास आली. हॉलंड आणि स्वित्झर्लंड या प्रजासत्ताक राज्यांचा उदय झाला. या काळात इंग्लंड, फ्रान्स, स्पेन स्वीडन या प्रबळ सत्ता तर डेन्मार्क, पोर्तुगाल, स्वित्झर्लंड, हॉलंड या दुय्यम सत्ता होत्या. औद्योगिक क्रांती, प्रातिनिधिक लोकशाहीचा उदय, आंतरराष्ट्रीय कायद्याचा उदय, आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती, आर्थिक परस्परावलंबित्व, विविध क्षेत्रातील क्रांती, अण्वस्त्रांची निर्मिती अशा विविध घटकांचा परिणाम राष्ट्र राज्य व्यवस्थेवर झालेला आहे.

**राष्ट्र राज्य व्यवस्थेच्या उदय आणि विकासाचे विविध टप्पे पडतात, ते खालील प्रमाणे:**

**१) वेस्टफेलियाचा करार ते युट्रेन्चचा करार (१६४८ ते १७१३)**

१६४८ च्या वेस्टफेलियाच्या करार राष्ट्र-राज्य व्यवस्थेचा प्रारंभ मानला जातो. या करारामुळे प्रॉस्टेस्टंट आणि कॅथलिक या दोन ख्रिश्चन धर्मीय पंथामध्ये शांतता प्रस्थापित झाले. या करारामुळे पवित्र रोमन साम्राज्याचा अंत होऊन स्वतंत्र सार्वभौम राज्यांनी आधुनिक राजकीय व्यवस्थेला जन्म दिला. हॅप्सबर्ग, बर्बन्स आणि जर्मनीतील राज्ये यांच्यातील युद्ध संपून हा तह झाला.

या कालखंडात फ्रान्सचा सम्राट १४ वा लुई याचा प्रभाव होता. त्याने युरोप खंडात सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे इंग्लंड आणि ऑस्ट्रियाने

फ्रान्सची सत्ता संतुलित करण्याचा प्रयत्न केला. फ्रान्सच्या विस्तारवाराला इंग्लंड आणि ऑस्ट्रियाकडून शह देण्यात आला. त्यातूनच ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड, स्पेन या प्रमुख युरोपीयन सत्तामध्ये वसाहती निर्माण करण्याची स्पर्धा सुरू झाली. त्यातूनच या चारही राष्ट्रांमध्ये युद्ध झाले. युद्ध संपल्यानंतर १७१३ मध्ये नेदरलँड मधील युट्रेन्च या ठिकाणी युट्रेन्चचा करार करण्यात आला. या संधीमुळे फ्रांस चे नुकसान झाले.

### २) युट्रेन्चचा करार ते व्हिएन्ना काँग्रेस (१८७५)-

इ.स. १७१३ ते १८१५ हा कालखंड तह आणि कूटनैतिक संबंधाचा कालखंड मानला जातो. युट्रेन्चच्या तहाने प्रस्थापित केलेली सत्तासंतुलनाची व्यवस्था १८१५ पर्यंत टिकून राहिली. या काळात इंग्लंड, प्राशिया, राशिया, ऑस्ट्रिया, फ्रान्स या प्रमुख सत्ता होत्या.

१७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. या राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता, बंधुता या तीन नवीन संकल्पना दिल्या. याच काळात फ्रान्सच्या नेपोलियन बोनापार्टाचा उदय झाला. नेपोलियने युरोपात आपले साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु ब्रिटनने वॉटरलूच्या लढाईत त्याचा पराभव केला. ब्रिटन, रशिया, प्रशिया, ऑस्ट्रीया, स्वीडन यांच्या सामर्थ्यापुढे नेपोलियनचा निभाव लागला नाही. नेपोलियनच्या पराभवानंतर ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथे १८१५ -मध्ये एक परिषद् भरविण्यात आली. तिला Concert of Europe किंवा व्हिएन्ना काँग्रेस असे म्हटले जाते. या परिषदेने जुनी सत्तासंतुलनाची व्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. या परिषदेने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विविध संकल्पना उदयास आल्या. उदा. सत्ता समतोल, प्रोटोकॉल परराष्ट्र धोरण, राजनय इ. या परिषदेने अधी मान्यतेचे तत्व स्वीकारले. त्याप्रमाणे राज्यांनी पाळावयाचे राजशिष्टाचार प्रस्थापित करण्यात आले. मात्र याच काळात अमेरिका या नवीन सत्तेचा प्रवेश आंतरराष्ट्रीय राजकारणात झाला.

### ३) व्हिएन्ना काँग्रेस ते पहिले विश्वयुद्ध (१८१५ ते १९१४-१८)

व्हिएन्ना कांग्रेस नंतरच्या काळात जगाला दोन बलशाली राष्ट्रांची ची देणगी मिळाली. जर्मन सम्राट बिस्मार्कच्या कणखर आणि राजनीति कुशल नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण घडून आले. पण तसेच काहूरच्या नेतृत्वाखाली इटलीचे एकीकरण घडून आले. त्यामुळे युरोपात जर्मनी आणि इटली या दोन नव्या सत्तांचा उदय झाला.

बाल्कन प्रदेशात तुर्की साम्राज्याचे पतन होऊन ग्रीस, कमानिया, सर्बिया, बल्गेरिया आणि अल्बानिया या सार्वभौम राज्यांचा उदय झाला युरोप खंडाबाहेर अमेरिका आणि जपान ही शक्तीशाली राज्ये म्हणून उदयाला आली. १८९८ च्या अमेरिका-स्पेन युद्धात स्पेनचा पराभव होऊन अमेरिकेला प्रमुख सत्ता म्हणून मान्यता मिळाली. १८९४ -९५ मध्ये जपाने चीनचा पराभव केला. जपानची वाढती शक्ती लक्षात घेऊन ब्रिटनने १९०२ मध्ये जपानशी करार केला. जपानने १९०४-०५ मध्ये रशियाचा पराभव केल्याने जागतिक राजकारणात जपानचे महत्त्व वाढले. या सर्व सत्तांमध्ये साम्राज्यवाद आणि वसाहतवादाच्या स्पर्धेतून १९१४ मध्ये युद्ध पेटले. त्याला पाहीले विश्वयुद्ध असे म्हटले जाते. मित्र राष्ट्रीय विरुद्ध शत्रू राष्ट्र गट अशा दोन गटात हे युद्ध

झाले. महायुद्धात जर्मनी-ऑस्ट्रिया यांचा पराभव होऊन १९१९ मध्ये व्हर्सायचा तह झाला. या तहात मित्रराष्ट्रांनी जर्मनी आणि इटलीचे पूर्णपणे खच्चीकरण केले.

**४) पाहिले विश्वयुद्ध ते दूसरे विश्वयुद्ध (१९१९-१९३९)**

१९१९ च्या व्हर्सायच्या तहानंतर जर्मनी-इटली या पराभूत राष्ट्रांवर मित्र राष्ट्रांनी आपले नियंत्रण आणले. परंतु १९३० पासून जर्मनीत ॲडॉल्फ हिटलर आणि इटलीत बेनिटो मुसोलिनी यांचा उदय झाला. हिटलरच्या नाझीवादाने तर मुसोलिनीच्या फॅसिस्टवादाने विजयी राष्ट्रांना आव्हान दिले. याच काळात १९१७ मध्ये रशियात बोल्शेविक क्रांती होऊन लेनिनचा उदय झाला.

जगात सर्वकलवादी आणि लोकशाही विचारधारा निर्माण झाल्या. या परस्परविरोधी विचारधारा असलेल्या देशांमध्ये १९३९ पासून युद्ध पेटले. त्याला द्वितीय विश्वयुद्ध म्हटले जाते. हे युद्ध १९४५ मध्ये संपुष्टात आले. १९४५ मध्ये जागतिक शांततेच्या निर्मितीसाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. वसाहतवादाचा अंत होऊन, आशिया आफ्रिका खंडात नवोदित स्वतंत्र राष्ट्रांचा उदय झाला. या सार्वभौम राष्ट्रांनी युनोचे सदस्यत्व स्वीकारले. आज युनोमध्ये १९३ सदस्य राष्ट्र आहे.

**५) १९४५ ते आतापर्यंतचा कालखंड-**

दुसऱ्या महायुद्धापर्यंत युरोप हेच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे प्रमुख केंद्र होते. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर या परिस्थितीत बदल घडून आला. युरोपियन देशांचे जागतिक राजकारणातील महत्व कमी होऊन अमेरिका रशिया या महासत्ताचा उदय झाला. या महासत्तामध्ये भांडवलशाही विरुद्ध साम्यवाद असा विचारसरणीवर आधारित संघर्ष पेटला. त्याला 'शीतयुद्ध' असे म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणावर त्याचा अधिकाधिक प्रभाव पडला. त्याचप्रमाणे जागतिक शांतता, नि:शस्त्रीकरण, आंतरराष्ट्रीय संघटनेला शक्तिशाली बनविण्याचे प्रयत्न सुरू झाले. १९९१ मध्ये शीतयुद्धाचा अंत होऊन नवीन जागतिक व्यवस्था उदयास आली.

### २.३.३.२ राष्ट्र-राज्यव्यवस्थेची वैशिष्ट्ये -

पहिल्या आणि दुसऱ्या विश्वयुद्धानंतर राज्य व्यवस्थेच्या स्वरूपात अनेक मूलगामी बदल घडून आले. परंतु या व्यवस्थेचे स्वरूप आजही कायम आहे. प्रादेशिक राष्ट्रवाद, राष्ट्रीय सत्ता, सार्वभौमत्व ही राष्ट्र-राज्य व्यवस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये आहे. राष्ट्र-राज्य व्यवस्थेची तीन पैलू आहेत. ती म्हणजेच प्रादेशिकत्व, राष्ट्रीयत्व आणि सार्वभौमत्व.

१) **प्रादशिकत्व :** प्रत्येक राज्याला निश्चित भू-प्रदेश असतो. या भूप्रदेशावर त्या राज्याच्या सत्तेचे पूर्णपणे नियंत्रण असते. एक राज्य दुसऱ्या राष्ट्राच्या भूप्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित करू शकत नाही. प्रादशिकत्व ही संकल्पना मध्ययुगाच्या अखेरीस उदयाला आली. आज प्रत्येक राज्याची निश्चित सीमारेषांची आखणी करण्यात आलेली आहे. निश्चित भूप्रदेश, त्याअंतर्गत खनिज संपत्ती, नद्या आणि इतर साकृतिक घटक, सागर किनाऱ्यालगतचा भाग इ.भागावर राज्याचे वर्चस्व असते.

भूप्रदेश हा राष्ट्र सत्तेचा महत्वाचा घटक असतो. आपल्या भूप्रदेशाचे संरक्षण करणे हे प्रत्येक राष्ट्राचे नैतिक कर्तव्य मानले जाते. त्यादृष्टीने ते राष्ट्र आपल्या राष्ट्रीय

हितसंबंधाची जोपासना करते. भूप्रदेशाशी अस्मिताही निगडित असते. उदा. हिमालय हा भारताचा, तसेच फुजियामा पर्वत हा जपानच्या अभिमानाचा विषय आहे. राष्ट्राची सामर्थ्य ची भूप्रदेशावर अवलंबून असते. भौगोलिकदृष्ट्या मोठ्या राज्यांना संरक्षणाच्या दृष्टीने भूप्रदेशाचा निश्चितच फायदा होतो. त्याचप्रमाणे भूप्रदेशांतर्गत साधन संपत्तीही राज्यांची सत्ता वाढविण्यास हातभार लावते. उदा. अरब राष्ट्रे खनिज तेलाच्या उपलब्धतेमुळे श्रीमंत बनलेली आहे. प्रादेशिक एकात्मतेतून सार्वभौमत्व व राष्ट्रवादाची भावना विकसित होते.

२) **राष्ट्रवाद:** राष्ट्रवाद ही एक मानसिक भावनात्मक कल्पना आहे. राष्ट्र-राज्य व्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. राष्ट्रवाद हा देशभक्ती, देशप्रेम, जातीय, धार्मिक व भौगोलिक पात्रता, समान राजकीय महत्त्वाकांक्षा या धारणेतून विकसित झाला आहे. राष्ट्रवाद प्रत्येकाला मला आपल्या देशावर प्रेम करण्यास शिकवतो. राष्ट्रवाद हा आधुनिक सार्वभौम राज्य व्यवस्थेचा आधार मानला जातो.

१९ व्या शतकाच्या प्रारंभापासून राष्ट्रवाद ही महत्त्वाची शक्ती बनत गेली. १८७१ पर्यंत इटली जर्मनीचे एकीकरण घडून आले. राष्ट्रीयत्वाच्या आधारे राज्यांची निर्मिती होऊ लागली. पहिल्या महायुद्धानंतर पॅरिस शांतता करार राष्ट्रांच्या स्वयंनिर्णयाचे तत्त्व मान्य करण्यात आले. एकजिनसी संस्कृती असलेल्या समाजाला स्वतंत्र राज्य निर्मितीचा हक्क मंजूर करण्यात आला.

समान भाषा, समान धर्म, समान संस्कृती, समान इतिहास, यास प्रतीके हे घटक लोकांमध्ये राष्ट्रवाद निर्माण करतात. राष्ट्रवाद ही उदात्त विचारसरणी असून, राष्ट्रवाद व्यक्तीला एक अस्मिता प्राप्त करून देतो. देशाचा आर्थिक विकास आणि सांस्कृतिक जोपासना करण्याची प्रेरणा राष्ट्रवाद देतो. परंतु अतिरेकी- आत्यंतिक राष्ट्रवाद धोकादायक ठरतो. दुसऱ्या महायुद्ध होण्यास अतिरेकी राष्ट्रवाद कारणीभूत ठरला.

३) **सार्वभौमत्व:** सार्वभौमत्व हा राज्याचा मूलभूत घटक असून राज्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. सार्वभौमत्वामुळेच राज्यसंस्था इतर संस्थांपेक्षा भिन्न, वेगळी ठरते. सार्वभौमत्व म्हणजे सर्वोच्च, अंतिम सत्ता. तिच्या पेक्षा श्रेष्ठ दुसरी सत्ता असू शकत नाही.

१६ व्या शतकात प्रदेश- राज्य उदयाला आली. त्याकाळात सार्वभौमत्व ची कल्पना मांडली गेली. फ्रेंच विचारवंत जीन बॉद दा या संकल्पनेचा जनक मानला जातो. हॉब्ज, लॉक, रुसो, ऑस्टिन यांनी सार्वभौमत्वाचा संकल्पनेचा पुरस्कार केला.

तत्वत: राज्य सार्वभौम असले तरी ज्याच्या सार्वभौम सत्तेचा वापर प्रत्यक्षात शासन संस्था करते. राजेशाहीत राजाची सत्ता सार्वभौम मानली जात, लोकशाहीच्या उदयानंतर जनता सार्वभौम मांडली जाऊ लागली. प्रतिनिधीक लोकशाहीत प्रत्यक्ष सत्ता जनतेच्या हातात नसते तर ती जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या हातात असते.

सार्वभौमत्वाचे अंतर्गत आणि बाह्य सार्वभौमत्व असे दोन प्रकार पडतात. राज्यांतर्गत कोणत्याही व्यक्ती, संस्था, सत्तेपेक्षा राज्याच्या सत्तेचे श्रेष्ठत्व म्हणजे अंतर्गत सार्वभोमत्व होय, इतर कोणत्याही बाह्य, परकीय सत्तेचे नियंत्रण राज्यावर नसणे म्हणजे बाह्य सार्वभौमत्व होय.

सार्वभौमत्व हे निरपेक्ष, अविभाज्य आणि आणि अदेय असते.
सार्वभौमत्व हे राष्ट्र-राज्यव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते.
अशा प्रकारे वरील तिन्ही घटकांनी राष्ट्र-राज्यव्यवस्थेला निश्चित स्वरूपाचा आधार प्राप्त करून दिला आहे.

### २.३.३३ राष्ट्र राज्य व्यवस्थेपुढील आव्हाने

आधुनिक राष्ट्र राज्य व्यवस्था ही स्थायी स्वरुपाची नसून, नेहमीच या व्यवस्थेत स्थल कालानुसार बदल होत गेले आहे. हे राष्ट्र-राज्य व्यवस्थेला विविध प्रकारच्या आव्हाने घेरले आहेत. राष्ट्र-राज्य व्यवस्थेपुढील प्रमुख आव्हाने खालीलप्रमाणे-

१) **राष्ट्रवादी चळवळीची पुनर्जागृती:** आज जगामध्ये राष्ट्रवादी प्रवृत्ती प्रबळ बनत आहे. तिसऱ्या जगातील नवोदित स्वतंत्र राष्ट्रांमध्ये प्रबळ राष्ट्रवादी भावना दिसून येतात. युरोप सारख्या प्रगत विकसीत खंडातही राष्ट्रवादी चळवळीची उभारणी झाली आहे. उदा. ब्रिटनमधील आयरिश राष्ट्रवाद तसेच आशिया आफ्रिका सारख्या अविकसित खंडातील अनेक राष्ट्रे आपला वेगळेपणा प्रस्थापित करण्यासाठी धडपड करताना दिसतात. त्यांच्या या प्रयत्नातून त्रीवर राष्ट्रवादी भावना दिसून येतात. त्याचप्रमाणे वंश, वर्ण इ. वरून विविध राष्ट्रांमध्ये राष्ट्रवादी चळवळी उभारल्या गेल्या आहेत. उदा. रवांडातील वांशिक संघर्ष, इराक इराण व तुर्की राष्ट्रांमधील कुर्दिष वंशातील लोकांच्या चळवळी इ. अशा राष्ट्रवादी चळवळीमुळे राष्ट्र-राज्य व्यवस्थेपुढे आव्हान निर्माण झाले आहेत.

२) **प्रादेशिक विभागीय संघटना:** दुसऱ्या महायुदधानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रादेशिक वादाचा उदय झाला. सुरक्षितता, आर्थिक विकासासाठी आज जगात अनेक विभागीय बहुराष्ट्रीय संघटना निर्माण झालेल्या आहेत. उदा. सार्क, आसीयान, युरोपियन युनियन, आपेक इ. परिणामी राष्ट्रांमध्ये विश्व एकात्मतेच्या या भावनेने ऐवजी प्रादेशिकत्वाची भावना बळावताना दिसते. पूर्वीच्या राष्ट्र-राज्य व्यवस्थेचे कायदेशीर रूप आजही कायम असले तरी जग सावकाश रीतीने या व्यवस्थेपासून दूर जात आहे. ते ज्या आर्थिक सामाजिक परिस्थितीने राष्ट्र-राज्य व्यवस्था निर्माण केली त्या घटकांचे महत्त्व कमी होत आहे.

३) **राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न:** राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे आपल्या राष्ट्रांचे सीमांचे रक्षण करणे तसेच परकीय आक्रमण व अंतर्गत क्रांतीपासून आपल्या राष्ट्राचे सार्वभौमत्व अबाधित राखणे. आज विश्वातील प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या संरक्षणासाठी प्रयत्नशील आहे. त्यासाठी आंतरखंडीय क्षेपणास्त्रे, अण्वस्त्रे, दीर्घ पल्ल्याची जी स्वप्नातीत विमाने इ. मुळे संरक्षणाच्या पारंपरिक पद्धतीचे स्थान दुय्यम बनले आहे. आधुनिक अण्वस्त्रांची विध्वंसक शक्ती निरपवाद असून त्यामुळे जगात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अण्वस्त्रांमुळे भविष्यात अणुयुद्धाचा

धोका जगासमोर निर्माण झाला आहे.

याशिवाय दहशतवाद, पर्यावरणीय प्रश्न अशी अनेक आव्हाने राष्ट्र राज्य व्यवस्थेपुढे आहेत. भविष्यकाळात आंतरराष्ट्रीय व्यवहारात राष्ट्र राज्ये ही प्रमुख घटक म्हणून कार्य करत राहतील. परंतु हे बदललेल्या परिस्थितीशी होऊन घेत त्यांना कार्य करावे लागेल.

### २.३.४ राष्ट्रीय हित (National Interest)

आंतरराष्ट्रीय राजकारणात शत्रू किंवा मित्र कायम नसतात परंतु राष्ट्रीय हित किंवा हितसंबंध कायम असतात. पूर्वीपासून हे तत्व आंतरराष्ट्रीय राजकारणाचा मुख्य आधार आहे. कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा आणि राज्य नयनाचा प्रमुख उद्देश राष्ट्रीय हितसंबंधांची जपणूक करणे हा असतो.

राष्ट्रीय हितसंबंध ही व्यापक संकल्पना असून प्रत्येक राष्ट्राची राष्ट्रीय हितसंबंधांची कल्पना वेगळी असू शकते ते राष्ट्रीय -आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर अवलंबून असू शकते .परिस्थिती बदलली की राष्ट्रीय हितसंबंध बदलतात.

हॅन्स मॉगैन्थुने राष्ट्रीय हितासाठी वेगवेगळे शब्द वापरले आहे. जसे सामूहिक हित, समान हित, प्राथमिक हित, दुय्यम हित, अल्पकालीन-दीर्घकालीन हित, राष्ट्रीय हित कोण ठरवते? यावरही त्याचा अर्थ स्वरूप अवलंबून असते .निर्णय घेणाऱ्याचा/शासणाचा स्वभाव आणि शासनाचे स्वरूप यांचाही राष्ट्रीय हित संबंधावर परिणाम होत असतो म्हणजेच राष्ट्रीय हितसंबंधाचा अर्थ, स्वरूप सातत्याने बदलत असते.

#### २.३.४.१ राष्ट्रीय हितसंबंधाच्या व्याख्या-

राष्ट्रीय हितसंबंधाचा अर्थ स्पष्ट करणे कठीण असले तरी अभ्यासकांनी त्याच्या व्याख्या स्पष्ट केल्या आहे.

१) **डाईक:** "राष्ट्रीय हितसंबंध म्हणजे असे हितसंबंध जे प्रत्येक राष्ट्र इतर राष्ट्रांच्या तुलनेत जोपासण्याचा प्रयत्न करीत असते"

२) **चार्लस लेर्च आणि अबुल सैद:** "दीर्घ मुदतीचे आणि सातत्यपूर्ण सर्वसामान्य उद्दिष्टे जी राष्ट्रे आणि शासनाच्या दृष्टीने फायद्याची असतात आणि ज्याच्या जपणुकीसाठी राष्ट्रे प्रयत्नशील असतात त्याला राष्ट्रीय हित असे म्हटले जाते."

३) **जोसेफ फॅंडेल:** "कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा पाया म्हणजे राष्ट्रीय हितसंबंध होय."

**वरील व्याख्यावरून राष्ट्रीय हितसंबंधांची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील-**

१) राष्ट्रीय हितसंबंध ही व्यापक आणि परिवर्तनीय संकल्पना असून देशांतर्गत-आंतरराष्ट्रीय परिस्थितीत बदल घडून आला की, राष्ट्रीय हितसंबंधात बदल घडून येतो.

२) राष्ट्रीय हितसंबंधांची यादी बनवणे अवघड असले तरी राष्ट्रीय स्वातंत्र्याचे रक्षण, राष्ट्राची प्रगती, राष्ट्राचे अखंडता टिकवणे हे सर्वसामान्य आणि कायमस्वरूपी हितसंबंध असतात.

३) परराष्ट्र धोरण आणि राजनयाचा प्रमुख उद्देश म्हणजे राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करणे. म्हणून हितसंबंध परराष्ट्र धोरणाचा पाया मानला जातो.

४) आंतरराष्ट्रीय संबंधात कोणत्याही दोन राष्ट्रांचे हितसंबंध समान नसतात.

५) राष्ट्रीय हितसंबंधामध्ये शासनकर्ता किंवा निर्णय घेणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव, राजकीय व्यवस्थेचे स्वरूप, जनमत इ.चे प्रतिबिंब पडत असते.

६) प्रामुख्याने अल्पमुदतीचे-दीर्घमुदतीचे, मूलभूत किवा दुय्यम राजकीय किंवा अराजकीय अशी राष्ट्रीय हितसंबंधांची विभागणी करता येते.

## २.३.४.२ राष्ट्रीय हितसंबंधाचे प्रकार-

राष्ट्रीय हितसंबंधाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी राष्ट्रीय संबंधाचे प्रकार समजून घेणे आवश्यक आहे.

थॉमस रोबिन्सन या अभ्यासकाने राष्ट्रीय हितसंबंधाचे एकूण सहा प्रकार सांगितले आहेत.




१) **प्राथमिक हितसंबंध:** राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण करणे, राष्ट्राची प्रादेशिक एकात्मता-अखंडत्व टिकवणे, राष्ट्राची प्रगती घडवून आणणे हे राष्ट्राची प्राथमिक हितसंबंध असतात. त्यासाठी राष्ट्रे प्रयत्नशील असतात.

२) **दुय्यम हितसंबंध:** यात परदेशात वास्तव्य करणाऱ्या आपल्या देशातील नागरिक - राजदूतांची सुरक्षितता करणे यासाठी राष्ट्राकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा समावेश होतो.

३) **कायमस्वरूपी हितसंबंध:** यात अशा स्वरूपाच्या हितसंबंधाचा समावेश होतो जे कायमस्वरूपी आहेत आणि ज्यात सातत्य आहे.

उदा. भारतातील काश्मीर बद्दलचे धोरण. काश्मीर राज्य भारतात कायदेशीर रित्या विलीन झाले असून ते भारताचा अविभाज्य घटक आहे. भारताची ही भूमिका गेल्या

५० वर्षापासून कायम आहे. हा भारताच्या कायमस्वरूपी हितसंबंधाचा भाग आहे. गेल्या काही शतकापासून समूह मार्गाचे संरक्षण हा इंग्लंडच्या कायमस्वरूपी हितसंबंधाचा भाग होता.

४) **परिस्थितीसापेक्ष हितसंबंध**: हे परिवर्तनीय हितसंबंध असतात .देशांतर्गत - आंतरराष्ट्रीय परिस्थितीत परिवर्तन घडून आले की असे हितसंबंध बदलतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोव्हिएत रशिया दरम्यान सुरू झालेल्या शीतयुद्धाच्या राजकारणात साम्यवादाच्या प्रसाराला आळा घालणे हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट होते. पण सण १९९० च्या शतकात शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर हे उद्दिष्ट कालबाह्य झाले आता अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक हितसंबंधाच्या जपणूकीला प्राधान्य देण्यात आले आहे.

५) **सामान्य हितसंबंध:** यात राष्ट्राची आर्थिक प्रगती व्हावी व्यापार वाढावा इतर राष्ट्रांना बाजारपेठेमध्ये प्रवेश मिळावा यासाठी सकारात्मक परिस्थिती निर्माण करणे त्यासाठी प्रयत्नशील राहणे अशा उद्दिष्टांचा समावेश होतो यासाठी मोठी राष्ट्रे सत्ता संतुलनाचे राजकारण खेळत असतात.

६) **विशेष हितसंबंध:** परिस्थिती आणि वेळेनुसार असे हितसंबंध निर्धारित केले जातात.उदा. आंतरराष्ट्रीय दहशतवादाची समस्या आज अनेक लोकशाहीवादी राष्ट्रांना सतावत आहे. भारत, अमेरिका, रशिया, चीन सारख्या राष्ट्रांना दहशतवादाचा सामना करावा लागत आहे .सप्टेंबर ११, २००१ च्या अमेरिकेतील दहशतवादी हल्ल्यानंतर दहशतवादाचे निर्मूलन हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भारतानेही अमेरिका आणि रशियाच्या मदतीने दहशतवादविरोधी संयुक्त मोहीम उघडली आहे.

### २.३.४.३ राष्ट्रीय हितसंबंधाच्या संवर्धनाचे मार्ग

राष्ट्रीय हितसंबंधाच्या जपणुकीसाठी तसेच संवर्धनासाठी प्रत्येक राष्ट्र प्रयत्नशील असते. त्यासाठी विविध मार्गाचा अवलंब केला जातो. जसे जबरदस्तीचा मार्ग किंवा दमनशक्तिचा मार्ग (coercive measures), इतर राष्ट्रांशी युती करणे(alliance) राजनयाचा मार्ग(diplomacy), आर्थिक मदत आणि प्रचार, सामूहिक सुरक्षितता(collective security) अशा अनेक मार्गाने राष्ट्रे आपल्या हितसंबंधांचे संरक्षण करतात.

१) **जबरदस्ती किंवा दमनशक्तीचा मार्ग:** जबरदस्ती किंवा दमनशक्तीच्या मार्गात प्रत्यक्ष लष्करी सामर्थ्याचा वापर, आर्थिक बहिष्कार, राजनैतिक संबंध तोडणे, विशिष्ट राष्ट्राला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न न करणे. आक्रमणाचा प्रतिकार करणे या मार्गाचा समावेश होतो.

उदा. शीतयुद्धधोतर राजकारणादरम्यान अमेरिकेचे इराक, उत्तर कोरिया, अफगाणिस्तान या राष्ट्रांविषयीचे धोरण१९९१ च्या खाडी युद्धानंतर(इराक-कुवैत युद्ध) इराककडे अण्वस्त्रे, रासायनिक अस्त्रे असल्याच्या संशयावरून इराकवर आर्थिक बहिष्कार टाकण्यात आला.

११ सप्टें. २००१ च्या अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख सूत्रधार ओसामा -बिन -लादेन ला अफगाणिस्तानातील तालिबान शासनने आश्रय दिल्याच्या संशयावरून अफगाणिस्तानाविरुद्ध केलेली लष्करी कारवाई.

सन.१९९८ मध्ये भारत-पाकिस्ताने केलेल्या अनुचाचण्यानंतर अमेरिकेने दोन्ही राष्ट्रांविरोधी आर्थिक बंदीचे अवजार वापरले.

२) **दोन किंवा अधिक राष्ट्रांची युती:** समान राष्ट्रीय हितसंबंधाच्या संरक्षणासाठी अनेकदा दोन किंवा अधिक राष्ट्रांच्या युती प्रस्थापित होतात. विशिष्ट उद्दिष्टपूर्ती हा अशा युतींचा आधार असतो. उद्दिष्ट पूर्ती नंतर अशा युक्ती लयाला जातात.

उदा. पहिल्या व दुसऱ्या विश्वयुद्धाच्या काळात अमेरिका, लंडन, फ्रान्स, सोव्हियत रशिया या मित्र राष्ट्रांची युती तयार झाली दुसऱ्या विश्वयुद्धानंतर ही युती लोकशाही - भांडवलशाही आणि साम्यवादी राष्ट्रांमध्ये विभागली गेली.

इराकचा कुवेत वरील हल्ला परतून लावण्यासाठी १९९१ मध्ये आणि २००१ मध्ये दहशतवादाच्या निर्मूलनासाठी अफगाणिस्तानातील तालिबान शासनाविरुद्ध अमेरिका व मित्र राष्ट्रांची युती.

समान आर्थिक संबंधाच्या संरक्षणासाठी स्थापन झालेले आशियान एपेक युरोपियन युनियन यासारख्या विभागीय संघटनांची निर्मिती.

३) **राजनय:** राष्ट्रीय हितसंबंधाच्या जपणुकीसाठी राजनयाचा वापर पूर्वीपासून होत आला आहे. हॅन्स मॉगैन्थु सारखे वास्तववादी विचारवंत राष्ट्रीय हितसंबंधाच्या जपणुकीसाठी

## २.४ सारांश

अशा प्रकारे आपण या पाठात आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाच्या संकल्पनांचा अभ्यास केला. सत्ता, सत्ता समतोल, राष्ट्रराज्य व्यवस्था, राष्ट्रीय हित इ. चा परिचय करून घेतला. या संकल्पना वास्तवात कशा अनुभवास येतात हे राष्ट्रांच्या विविध उदाहरणांवरून समजले.

## २.५ सरावासाठी प्रश्न

१) सत्ता म्हणजे काय? ते सांगून सत्तेचे विविध घटक स्पष्ट करा.

२) सत्तेचे विविध प्रकार सांगून, सत्तेचा वापर कसा केला जातो?

३) सत्ता म्हणजे काय? सत्तेचे विविध साधने सांगा.

४) सत्ता संतुलन म्हणजे काय? सत्ता संतुलनाचे विविध मार्ग विशद करा.

५) सत्ता समतोल म्हणजे काय ?सत्ता समतोलाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

६) सत्ता संतुलन म्हणजे काय ?सत्ता संतुलनाचे प्रकार सोदाहरणासहित स्पष्ट करा.

७) राष्ट्र-राज्य व्यवस्थेचा उदय आणि विकास स्पष्ट करा.

८) राष्ट्रीय हित म्हणजे काय? राष्ट्रीय हितसंवर्धनाचे मार्ग सांगा.

९) टीप लिहा-राष्ट्रीय हितसंबंधांचे प्रकार

## २.६ संदर्भ ग्रंथ

१) अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे -आंतरराष्ट्रीय संबंध; शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट ब्लॉक रचना मुंबई

२) शैलेंद्र देऊळकर आंतरराष्ट्रीय संबंध विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद

३) प्रा. रघुनंदन वराडकर, आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर

❄❄❄❄❄❄❄

# ३

# अंतर्राष्ट्रीय संबंधातील निर्धारक घटक

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टये

३.२ राजनय

३.३ आंतरराष्ट्रीय कायदा

३.४ अ- राज्यघटक

३.५ सारांश

३.६ आपण काय शिकलो?

३.७ संदर्भसूची

## ३.१ उद्दिष्टये

राजनय, आंतरराष्ट्रीय कायदा व अ- राज्य घटक यांचा आंतरराष्ट्रीय संबंध या संदर्भातील प्रभाव, भूमिका, स्वरूप व या घटकां नमोतील आव्हाने आणि मर्यादा यांचा अभ्यास करने हा या घटाकातील प्रधान उद्धेश आहे. आंततराष्ट्रीय संबंधच्या दृष्टीने राजनय या घटकाचे स्थान प्राचीनतम आहे. त्यामुळे राजनयाचे आंततराष्ट्रीय संबंधामधील स्थान अभ्यासतांना या घटाकत राजनय संकल्पनेला अर्थ, इतिहास, स्वरूप, प्रकार याबरोबरीनेच राजनयाचे महत्त्व व मर्यादांची मांडणी ही करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय कायदा ही संकल्पना आधूनिक आंतरराष्ट्रीय संबंधामधील एक महत्वाची संकल्पना असून त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय कायदा संकल्पनेचा अर्थ, स्वरूप, मर्यादा व महत्त्व यांचे विश्लेषण करने सहज जावे हा या घटकाचा उद्देश आहे. त्याचबरोबर अ- राज्य घटकांनी समकालिन संदर्भात आंतरराष्ट्रीय संबंधाना मोठ्या प्रमाणात प्रभावित केलेले दिसते. त्यातही बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय संघटना, क्षेत्रीय संघटना व नागरी समाजाचे स्थान अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. यादृष्टीने या घटकामध्ये राजनय, आंतरराष्ट्रीय कायदा व अ- राज्य घटक यांची सविस्तर मांडणी करण्यात आली आहे. ज्या माध्यमातून आपली आंतरराष्ट्रीय संबंध विषयक समज अधिक प्रगल्भ होईल अशी अपेक्षा आहे.

## ३.२ राजनय

राष्ट्राचे हित सुरक्षित ठेवण्याचे तसेच त्यात वृद्धी करण्याचे महत्वाचे तसेच प्रभावी साधन म्हणून राजनयाचे महत्व प्राचीन काळापासून ते आजतागायत सर्वांनी मान्य केले आहे. आजही राष्ट्रा- राष्ट्रातील संबंध हे प्रामुख्याने राजनयाच्या माध्यमातूनच स्थापित केले जातात. त्यामुळेच राष्ट्रभक्तीच्या विकासात सर्वात मोठी भर टाकणारे साधन म्हणून राजनयाकडे पाहिले जाते. राष्ट्रीय शक्तीची अन्य तत्वे वा घटक ही कच्च्या साधन सामग्रीप्रमाणे असतात. उत्तम राजनयाच्या सहकार्याने त्यांचा खऱ्या अर्थाने राष्ट्रशक्तीच्या विकासाकरीता उपयोग होत असतो. राष्ट्रीय हितसंबंध साध्य करण्याचा आराखडा म्हणजे

देशाचे परराष्ट्रधोरण मानले जाते, तर परराष्ट्रधोरणाची अंमलबजावणी करण्याचे साधन म्हणून राजनयाकडे पाहिले जाते. राजनय ही त्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेली संपर्क व्यवस्था आहे. ज्यातून राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध प्रत्यक्ष आकार घेतात. त्यामुळे राजनय हे एक असे तंत्र आहे वा पद्धती आहे ज्याद्वारे एक राज्य विविध राज्यांशी संबंध स्थापित करीत असते. राजनय जेव्हा अयशस्वी होतो तेव्हाच युद्ध आवश्यक बनते. परंतु युद्ध सुरू झाल्यानंतर ही राजनयाची शेवटी आवश्यकता असतेच. म्हणजेच शांततेसाठी, युद्ध यशस्वीपणे चालू ठेवण्यासाठी व युद्ध समाप्तीनंतरही राजनयाची अनिवार्यता स्पष्टपणे दिसते. या दृष्टीने राजनयाचा अर्थ, प्रकार व राजनयापुढील आव्हाने या प्रमुख मुद्दयांबरोबरच राजनयाची व्याख्या, वैशिष्टये, उद्दिष्टये, स्वरूप, कार्य व उपयुक्तता यांचाही अभ्यास करणे आवश्यक ठरते. यादृष्टीने या प्रकरणात आपण राजनय या संकल्पनेचा आढावा घेणार आहोत.

### ३.२.१ राजनय संकल्पनेचा अर्थ :

'राजनय' हा शब्द आपण इंग्रजी भाषेतील 'Diplomacy' या शब्दासाठी योजतो. Diplomacy हा इंग्रजी शब्द Diplour या ग्रीक भाषेतील शब्दापासून आलेला आहे. त्याचा मूळ अर्थ मांडणे वा घडी करणे असा होतो. म्हणजेच राजनय ही संकल्पना इतर राष्ट्राची ध्येयधोरणे किंवा निर्णय आपल्या राष्ट्राच्या हिताशी अनुकूल करून घेण्याशी संबंधित संकल्पना आहे. या संकल्पनेच्या निर्मितीचा इतिहास सांगताना असे म्हटले जाते की, 'रोमन काळात पासपोर्ट अथवा रस्त्यावरून चालण्याकरीता अनुमती पत्रे दिली जात असता. त्यांना Diploma असे म्हटले जात असे. कालांतराने हा शब्द शासकीय पत्रव्यवहारा करीता ही वापरला जाऊ लागला. पुढे हाच शब्द इतर राष्ट्रांशी तह, करार, संधी करण्यासंदभार्त ही योजनला गेला. पुढे त्यास राजकीय अभिलेखागार म्हटले जाऊ लागले. राज्याभिलेखागारात डिप्लोमरांची संख्या वाढत गेली. त्यास 'राज्यभिलेखापाल' असे संबोधले जात असे. व पुढच्या काळात Diplomacy हा शब्द परिभाषिक शब्द म्हणून आंतरराष्ट्रीय राजकरणात रूढ झाला.

### ३.२.२ राजनय व्याख्या :

राजनय ही संकल्पना पुढील काही विचारवंताच्या व्याख्यांवरून अधिक स्पष्ट करता येईल.

१) **हेन्स मॉर्गेथों:** 'शातातामय मार्गाने राष्ट्रीय हितांची अभिवृद्धी करणे म्हणजे राजनय होय'

२) **क्विन्सी राईट**': आंतरराष्ट्रीय वाटाघाटीत किंवा व्यवहारात बुद्धीमत्ता व कौशल्य यांचा वापर करून आपली उद्दिष्टये साध्य करणे म्हणजे राजनय वा राजनीती होय.

३) **ऑक्सफर्ड इंग्लिश शब्दकोश:** 'राजनय वा राजनीती म्हणजे वाटाघाटी करून आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन करणे होय.

४) **हॅरॉल्ड निकोल्सन:** राजनय म्हणजे संधिकर्ताद्वारे आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करण्याची पद्धत की ज्याद्वारे राजनयज्ञ अशा प्रकारचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.

५) **ऑर्गेस्की:** 'दोन किंवा दोनपेक्षा अधिक देशांच्या प्रतिनिधींमध्ये होणारी समझोत्याची प्रक्रिया म्हणजे राजनय होय'

६) **पणिक्कर:** “राजनय ही आंतरराष्ट्रीय संबंधात आपले राष्ट्रहित दुसऱ्या देशाच्या संदभार्त सादर करण्याची कला होय.'

७) **अर्नेस्ट सेंटो:** ‘स्वतंत्र राज्याच्या शासनामधील वा अंकित राज्यांच्या अधिकृत संबंधाबाबत उपयोगात आणला जाणारा बुद्धी व चातुर्य यांचा प्रयोभ म्हणजे राजनय होय.

८) **पामर व पार्किन्स:** ‘राजनय वा राजनिती एखाद्या यंत्राप्रमाणे असून त्याला नैतिक अथवा अनैतिक म्हणता येणार नाही. ज्या व्यक्तीकडून त्यांचा वापर करण्यात येतो त्या व्यक्तींच्या परस्पर क्रिया आणि कौशल्यावर राजनयाचे मूल्य आधारीत असते.

९) **जे. आर. चाईल्ड:** 'परराष्ट्रीय धोरणाची अमंलबजावणी ज्या प्रक्रियेद्वारे होते ती प्रक्रिया म्हणजे राजनय होय. ' एकंदरीत राजनय या संकल्पनेचा वापर 'धोरण अमंलबजावणीचे एक साधन असा घेतला जातो.

### ३.२.३ राजनयाची वैशिष्टये :

पामर आणि पार्किन्स यांनी राजनयाची काही प्रमुख वैशिष्टये विशद केली आहेत. ती संक्षिप्त स्वरूपात पुढील प्रमाणे मांडता येतील.

१. राजनयाचे स्वरूप हे मूलतः नैतिक वा अनैतिक स्वरूपाचे नसते तर त्याचे स्वरूप हे त्याचा वापर ज्यांच्याकडून होतो त्याचे उद्देश्य व योग्यता या आधारावर राजनयाचे मूल्यमापन केले जाते.

२. राजनयाचा वापर व उपयोग प्रामुख्याने परराष्ट्रातील दूतावास, कचेऱ्या, राजदूत व अन्य राजकीय प्रतिनिधी यांच्या माध्यमातून प्रामुख्याने केला जातो.

३. राजनयाचे स्वरूप मुख्यता द्विपक्षीय असते. कारण त्याचा वापर संबंधित दोन राष्ट्रांमध्ये होत असतो.

४. समकालिन संदभार्त आंतरराष्ट्रीय संघटना, संमेलने, प्रादेशिक सुरक्षा यासारख्या घटकांचे महत्व वाढल्याकारणाने राजनयाच्या बहुपक्षीय स्वरूपाचे महत्व वाढले आहे.

५. राजनय तंत्राचा वापर शांतता व युद्ध अश्या दोन्ही परिस्थितीत केला जातो.

### ३.२.४ राजनयाची उद्दिष्टये :

राजनयाचा प्रमुख उद्देश अन्य राष्ट्रे व त्यांचे राजनयज्ञ यांच्या विचारांवर व कायार्वर आपल्या राष्ट्रांचे नियंत्रण प्रस्थापित करणे हा मानला जातो. यामाध्यमातून आपल्या राष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणाची उद्दिष्टये पूर्ण करता येतात. त्याबरोबरच विविध मागण्या अन्य राष्ट्रावर लादता येतात. तसेच त्या राष्ट्राकडून अन्य प्रकारच्या सोयी, सवलती, आपल्या अटी त्याच्यावर लादून प्राप्त करता येतात. राजनयाचा उद्देश स्पष्ट करतांना पणिक्कर यांनी असे म्हटले आहे की, राजनयाचा मुख्य उद्देश आपल्या राष्ट्राच्या हिताचे रक्षण करण्याचा असतो व राज्याचा मुख्य उद्देश स्वत: ची सुरक्षितता हा असतो. या प्रमुख उद्देशाच्या संदभार्त राजनयाची उद्दिष्टये व उद्देश पुढील प्रमाणे मांडती येतील.

१. आपल्या विरोधात अन्य राष्ट्रे वा देश एकत्र येऊन एक गट निर्माण करीत असतील तर तो प्रयत्न पूर्णत्वास जाणार नाही याची काळजी घेणे.

२. युद्धकाळात आपल्या भूमिकेला जागतिक मान्यता मिळवून देण्याकरिता युद्धकाळात आपल्या राष्ट्राने सुरू केलेले युद्ध हे न्यायावर आधारलेले असून त्यांचा उद्देश न्यायाची प्रस्थापना करणे हे आहे हे जगातील इतर राष्ट्रांना पटवून देणे.

३. राजनयाचे सर्व प्रयत्न अपयशी ठरल्यानंतरच युद्धाचा मार्ग अवलंबिणे.

४. मित्रराष्ट्रासमवेत असणारे संबंध अधिक दृढ करणे व मतभेद असणारी राष्ट्र वा राष्ट्रदूत यांच्या सोबत अलिप्ततेच्या धोरणाचा अवलंब करणे.

५. राष्ट्राच्या आर्थिक व व्यापारिक हिताचा विकास व विस्तार घडवून आणण्यास प्राधान्य देणे व त्याकरिता नवीन बाजारपेठांचा शोध घेणे, खनिजद्रव्ये प्राप्त करणे, तंत्रज्ञान व तत्सम मदत इतर राष्ट्रांकडून प्राप्त करणे.

६. राजनयाची प्रक्रिया द्विपक्षीय वा बहुपक्षीय स्वरूपात कार्यन्वीत करणे.

७. राजनय हे राष्ट्र-राष्ट्रांमधील परस्पर संबंध प्रस्थापित करण्याकरिता व राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करण्याचे साधन म्हणून विकसित करणे.

८. विशिष्ट विषयासंदभार्तील राष्ट्राची भूमिका जागतिक राष्ट्रसमूदायापर्यंत पोहचवणे.

९. दोन राष्ट्रांमधील वा राष्ट्रसमूहांमधील मैत्रीपूर्ण संबंधाचे प्रदर्शन जागतिक राष्ट्रसमूदायापर्यंत पोहचविणे.

१०. राष्ट्रीयिहतसंबंधाच्या जपणूक व पूर्ततेकरीता प्रसंगी राजनयाचा वापर राजकीय सौदेबाजीच्या दृष्टीनेही करणे.

### ३.२.५ राजनय उदय व विकास :

राजनय ही आधूनिक काळात राष्ट्र-राज्य व्यवस्थेच्या नीतीनिर्धारण व धोरण अंमलबजावणीतील महत्वाचा घटक म्हणून प्रस्थापित झाला असला तरी राजनय पद्धतीचा अवलंब अगीद प्राचीन काळातही जगात सर्वत्र होत होता असे निदर्शनास येते. प्राचीन काळापासूनच राजनयज्ञ वा राजदूत यांना इतर राज्यात ठेवण्याची प्रथा प्रचलित होती यांचे संदर्भ सापडतात. प्रागऐतिहासिक काळात 'हर्मेस' देवाचे दूत राजकीय संघर्षात कार्यरत होते असे दिसते. बायइतेनटाइन काळातही असे राजदूत पाठविले जात असत. ग्रीक नगरराज्यातील अथेन्स व स्पार्टा या नगरराज्यांमध्ये ही राजदूत पद्धतीचा अवलंब केला जात होता असे स्पष्ट दिसते. भारतीय पौरणिक काळापासून राजदूत या संकल्पनेचा अवलंब 'देवदूत' या माध्यमातून कार्यरत असल्याचे दिसते. देवर्षी नारद हे प्रथम देवलोकीय राजनज्ञ होते असे या संदभार्तील कथा सांगतात. हनुमान हे ही राम यांचे एक प्रकारे राजदूत म्हणूनच कार्य करत होते असे मानले जाते.

आधूनिक अर्थाने राजनय पद्धतीचा विकास घडून येण्याची प्रक्रिया ग्रीक नगरराज्याच्या कालखंडात खऱ्या अथार्ने पार पडली असे मानावे लागेल. ग्रीक नगरराज्यांमध्ये संम्मेलन, परिषदांच्या माध्यमातून राज्या-राज्यांमधील संबंधावर चर्चा व निर्णयप्रक्रिया घडून येत असे. या सभा-संमेलनाच्या व परिषदांच्या माध्यमातूनच 'राज्या-राज्यांचे संबंध, त्यांच्या समस्या प्रश्न सोडवले जात असत. या सभा- संमेलने व परिषदांमध्ये राजनयिकांची भूमिका महत्वाची होती असे 'हेरॉल्ड निकोल्सन' यांनी स्पष्ट केलेले दिसते. ग्रीक नगरराज्यानंतर राजनय पद्धतीच्या दृष्टीने रोमन साम्राज्याचा कालखंड प्रतिकूल ठरला. कारण रोमन साम्राज्य हे

सैनिक शक्ती, अनुशासन, आज्ञापालन, संघटन, शांततेची मनोवृत्ती या घटकांना प्रामुख्याने प्राधान्य देणारे असल्याकारणाने या कालखंडात राजनयाचा फारसा विकास झाला नाही. राजनयाच्या अभावामुळेच रोमन साम्राज्याचे पतन घडून आले असे ही अभ्यासक नोंदवतात.

मध्ययूगीन कालखंडात राजनयास एक विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले. साम्राज्यांच्या ??? बरोबर मध्ययुगीन कालखंडात सामंतशाहीचा उद्य व विकास घडून आला. युद्ध ही मध्ययुगीन काळातील एक सार्वत्रिक व नित्याची बाब बनली. युद्धापासून वाचण्यासाठी व विजय संपादन करण्याकरीता यूरोपमधील राज्य अधिकाधिक शक्तीसंपन्न होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू लागली. याचवेळी औद्योगिक क्रांतीने व्यापारास चालना देण्याची अपिरहार्यता सर्वच राष्ट्र-राज्यांपुढे निर्माण झाली. परंतु या काळात धूर्त असणाऱ्या बायझेन्टाइन साम्राज्याचा प्रभाव सर्वच राष्ट्र राज्यांवर पडला व त्यातून राजनयाचे विशिष्ट स्वरूप प्रचलीत झाले. या काळातील राजनयाचे स्वरूप हे एक प्रकारे गुप्तहेरा प्रमाणे होते. राजदुताने खोटे बोलणे हे ही त्याची सर्वश्रेष्ठ पात्रता ठरली होती. त्यातच १५१९ साली प्रकाशित झालेल्या मॅकीव्हली या तत्वज्ञाच्या The Prince या ग्रंथाने राजनयास अधिकच व्यावहारिक व वास्तविक कला म्हणून प्रस्तुत केले. राजाच्या दृष्टीने यश हेच सर्व कृतींचे आधारतंत्र म्हणून त्याने प्रस्तुत केले. राजाने यश मिळवणाऱ्या सर्व बऱ्यावाईट तंत्राचा अवलंब करण्यास त्याने मूभा दिली. त्यामुळे राजनयाचे स्वरूप अधिकच विकृत होण्यास हातभार लागला. त्यामुळे मध्ययुगीन कालखंड हा राजनयाच्या भ्रष्ट होण्याचा कालखंड मानावा लागेल.

आधूनिक काळात राष्ट्र-राज्य व्यवस्थेस खऱ्या अर्थाने स्पष्टता आली. सरजांमशाहीच्या -हासाबरोबरच आधूनिक ज्ञान-प्रबोधनाने मानवी मूल्यांचा सागर घडवून आणला. औद्योगिक क्रांतीने मानवी विकासाच्या नव्या कक्षा प्रस्तुत केल्या नव-नवीन देशांचा शोध लागून त्यातून साम्राज्यवादी चढाओढ ही दुसऱ्या बाजूने गतीमान झाली. औद्योगिक क्रांतीने प्रगत झालेल्या राष्ट्रांमध्ये वसाहतीराज्यांच्या मालकीवरून संघर्ष सुरू झाले. पहिले महायुद्ध हे वसाहतवादाचे एक प्रमुख कारण होते. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर मात्र राजनयास जगात शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने संघर्षाऐवजी वाटाघाटीच्या मार्गाने प्रश्न सोडवण्या संदर्भात प्राधान्य मिळू लागले. राजनयास जागतिक मान्यता मिळण्याकरीता वुट्रोविन्सन यांच्या संकल्पनेतून राष्ट्रसंघ १९१९ साली स्थापन झाल. मात्र बड्या राष्ट्रांच्या असहकार्यामुळे राष्ट्रसंघाच्या व राजनयाच्या कार्यास मर्यादा घडत गेल्या. राजनय व राष्ट्रसंघाच्या अपयशातूनच १९३९ साली दूसरे महायुद्ध प्रारंभ झाले. १९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यानंतर मानवी समूहास परत अशा पद्धतीच्या महायुद्धाचा सामना करण्याची वेळ येऊ नये याकरीता संयुक्तराष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर राजनय पद्धतीच्या विकासा करीता प्राधान्य देण्यात आले. अशा पद्धतीने प्राचीन देवदुतांपासून आजच्या राजदुतांपर्यंतचा 'राजनय' पद्धतीचा विकास हा घडून आलेला दिसतो.

### ३.२.६ राजनयिक प्रतिनिधीचे प्रकार:

आधूनिक काळात राजनयिक व्यवस्थेने स्थिर व निश्चित स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे प्रत्येक देशाचे राजनयिक अधिकारी हे दुसऱ्या देशात नियुक्त केले जातात. त्या देशात नियुक्त करण्यात आलेल्या राजनयिक अधिकाऱ्यास दोन्ही देशातील संबंध अधिकाधिक दृढ बनविण्याची जबाबदारी दिलेली असते. प्रामुख्याने राष्ट्रप्रमुखाद्वारे राज्याचे प्रतिनिधित्व परराज्यात करण्याकरिता राजदूतांची नियुक्ति केली जात असते. समकालिन संदर्भात तर

राजनयिक प्रतिनिधींचे कार्य अधिकच व्यापक झाले असून त्यांना विविध संस्था व संमेलनांच्या माध्यमातून ही प्रतिनिधित्व करण्यासाठी पाठविले जाते. राजकीय व्यक्तींशिवाय जो कायम स्वरूपात अधिकारी वर्ग परराष्ट्रात नेमलेला असतो त्या विशेषज्ञांची विविध वर्गात वर्गवारी केली जाते. त्याची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

१. **राजदूत (Ambassador):** राजदूत नेमण्याचा अधिकार केवळ सार्वभौम राज्ये, संयुक्त राष्ट्रसंघ व पोप यांना देण्यात आला आहे. पोपच्या दूतास राजदूत ही संज्ञा न वापरता 'लिगेट' वा 'नन्शिओ' असे संबोधले जाते. राष्ट्र-राज्याच्या दृष्टीने राजदुताची नेमणूक राष्ट्रप्रमुखाकडून केली जाते. परराष्ट्रात तो राष्ट्र प्रमुखाचा खास प्रतिनिधी म्हणून ओळखला जातो. नियुक्तीनंतर संबंधित राष्ट्राचा प्रमुख त्याचे स्वागत करतो यावरूनच त्याचे महत्व स्पष्ट होते. ते दुसऱ्या राज्याच्या शासनाधिकाऱ्यांशी सरळ वार्तालाप करू शकतात. राजदूतांना परमश्रेष्ठ (His Excellency) असे म्हणतात. राजनयिक व्यवस्थेतील स्थायी पदात राजदुतांचे स्थान सर्वात महत्वाचे व श्रेष्ठ समजले जाते.

२. **असाधारण दूत (Envoy Extra Ordinary):** राजनयिक व्यवस्थेतील हे दुसऱ्या क्रमांकाचे पद होय. यांना राष्ट्रप्रमुखांचे व्यक्तिगत प्रतिनिधी म्हणून दर्जा प्राप्त नसतो. हे प्रतिनिधी स्वागतकर्त्या राष्ट्रध्यक्षाची सरळ भेट घेऊ शकत नाहीत. तो संबंधित राष्ट्रप्रमुखाशी चर्चा करू शकत असला तरी राजदूतासारखा सन्मान त्यास दिला जात नाही. असाधारण दूत हा त्या राष्ट्रात विशिष्ट कार्याकरिता नियुक्त केलेला असतो त्यामुळे राजदूताप्रमाणे हा त्याराष्ट्रात कायमस्वयरूपी वास्तव्यास नसतो व त्यांची नियुक्तीही अस्थायी कार्यापूरतीच सिमीत असते.

३. **निवासी मंत्री (Minister Resident):** राजनयिक व्यवस्थेतील यांचे स्थान तिसऱ्या श्रेणीचे असते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी राजनयिक प्रकारात हा नवीन वर्ग निमार्ण झालेला दिसतो. यांची नेमणूकही राष्ट्रप्रमुखांकडून केली जाते. मात्र ज्या देशात त्यांना नियुक्त केले जाते त्या राष्ट्राच्या प्रमुखास भेटण्याचा वा त्यांच्याशी चर्चा करण्याचा अधिकार मात्र त्यांना नसतो. निवासी मंत्री म्हणून असणाऱ्या नेमणुका या अपवादात्मक परिस्थितीतच केल्या जातात. अलिकडच्या काळात या पदाची नेमणूक राज्यांकडून क्वचितच केली जाते. यांना सौजन्यादाखल ही परमश्रेष्ठ असे संबोधले जात नाही.

४. **कार्यदूत (Charge D. Affairs):** एका राज्याच्या परराष्ट्र विभागाद्वारे दुसऱ्या राज्याच्या परराष्ट्रविभागाकडे हे प्रतिनिधी पाठविले जातात त्यास कार्यदूत असे म्हटले जाते. कार्यदुतांची नेमणूक राष्ट्रप्रमुखाकडून केली जात नाही तर विशिष्ट विभागाच्या मंत्र्याकडून खाजगी प्रतिनिधीच्या स्वरूपात त्यांची नेमणूक केली जाते. या नेमणूकीचा उद्देश नियुक्त झालेल्या देशाच्या परराष्ट्रमंत्र्याशी चर्चा करण्याचा असतो. कार्यदूत पदी नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती आपले परिचयपत्र राष्ट्रप्रमुखां ऐवजी संबंधित मंत्र्यालाच सादर करतात. त्यांचे स्थान व श्रेणी उपरोक्त तीन प्रतिनिदींपेक्षा खालच्या दर्जाची असते.

५. **उच्चायुक्त (High Commissioner):** यांची नेमणुक प्रामुख्याने राष्ट्रकुलातील सदस्य राष्ट्रांमध्ये केली जाते. राष्ट्रकुल सदस्य असणाऱ्या राष्ट्रात नियुक्त झालेल्या उच्चयुक्तांचे स्थान हे राजदुतासारखे असते.

या महत्वाच्या पदाधिकाऱ्यांशिवाय व्यापार व वाणिज्य वा तशाच प्रकारच्या कार्यासाठी काही प्रतिनिधींची नेमणूक स्थायी स्वरूपात करण्यात येते. त्याचे कार्य आपल्या देशाच्या व्यापारिक हिताचे संवर्धन करण्याचे असते. याशिवाय प्रत्येक दूतावासात अधिकारी वर्ग, सचिव आणि अनेक सहाय्यक असतात. त्यांचे स्थान परराष्ट्र सेवेतील कायम शासक वर्गाचे असते. एका देशातील वरील सर्व राजदूतांच्या समुदायास राजनयिक वर्तुळ असे म्हटले जाते. सर्वात वरीष्ठ दूतास डॉयन किंवा दूतशिरोमणी असे म्हटले जाते.

**३.२.७ राजनयज्ञांचे स्वातंत्र्य व विशेषाधिकार :** राजनयिक प्रतिनिधी वा राजनयज्ञ हे आपल्या राष्ट्राच्या हिताच्या रक्षणासाठी तसेच दोन्ही राष्ट्रातील संबंधाना वृद्धीगंत करण्याकरिता कार्यरत असतात. या उद्दिष्टांची पूर्तता करण्याकरिता त्यांना काही विशेष अधिकार व स्वातंत्र्य प्रदान करणे आवश्यक ठरते. पामर व पार्किन्स यांनी यासंदर्भात राजनयज्ञांच्या विशेष अधिकारांचे समर्थन करताना प्रामुख्याने दोन कारणे नमूद केलेली दिसतात. एक म्हणजे राजनयज्ञ हे आपल्या राष्ट्राच्या प्रमुखाचे व्यक्तिगत प्रतिनिधी मानले जातात. त्यामुळे स्वाभाविकरीत्या राष्ट्र-प्रमुखांना जो सन्मान दिला जातो. जे विशेषाधिकार दिले जातात ते राजनयज्ञांना ही मिळणे आवश्यक ठरते. दूसरे म्हणजे राजनयज्ञांना आपले कार्य समाधानकारकपणे पूर्ण करण्याकरिता नियुक्त राष्ट्रातील कायद्यापासून स्वातंत्र्य मिळणे गरजेचे ठरते. राजनयज्ञांना जे विशेषधिकार व स्वातंत्र्य प्राप्त असतात त्यांची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

१) **व्यक्तिगत संरक्षण :** व्यक्तिगत संरक्षण हा राजनयज्ञांचा विशेषअधिकार मानला जातो. राजनयज्ञांना जर विशेष व व्यक्तिगत संरक्षण प्राप्त झाले नाही तर तो संबंधित राष्ट्राचा अपमान मानला जातो. राजनयज्ञांना जर व्यक्तिगत संरक्षण संबंधित राष्ट्र देत नसेल तर त्या राष्ट्रातून आपल्या राजनयज्ञांना परत बोलावण्याचे टोकाचे पाऊल ही राष्ट्रांकडून उचलले जाते.

२) **फौजदारी कायद्यापासून मुक्त :** ज्या राष्ट्रात राजदूत नेमल्या जातात त्या देशाच्या फौजदारी कायद्याच्या बंधनातून ते मुक्त असतात. फौजदारी कायद्याअंतर्गत त्यांना अटक करण्याचा वा तुरूंगात टाकण्याचा अधिकार त्या राष्ट्रातील पोलिस यंत्रणेस नसतो. राजनयज्ञाने एखादे अवैध कृत्यकेले असेल वा गुन्हा केला असेल तर ते सरकार तसा अहवाल संबंधित राष्ट्राकडे पाठवतात व त्यांना परत बोलावून घेण्याची मागणी करतात.

३) **दिवाणी कायद्यापासून स्वतंत्र :** राजनयज्ञ हे नियुक्त झालेल्या देशात तेथील दिवाणी कायद्यांपासून मुक्त राहतील याची काळजी घेतली जाते. कोणत्याही दिवाणी मुल्यांसंदर्भात त्यांना न्यायालयात साक्ष देण्यासाठी वा उपस्थित राहण्यासंदर्भात सक्ती केली जाऊ शकत नाही.

फौजदारी व दिवाणी कायद्यांपासूनचे संरक्षण हे केवळ राजनयज्ञांना व्यक्तिगत स्वरूपातच प्राप्त झालेले नसते तर त्यांच्या बरोबर असणारे त्यांचे नातेवाईक व त्यांच्या मदतीसाठी नियुक्त करण्यात आलेला कर्मचारीवर्ग ही फौजदारी व दिवाणी स्वरूपाच्या कायद्यांपासून मुक्त असतो.

४) **निवासासंबंधीचे विशेषाधिकार :** प्रत्येक राष्ट्रामध्ये राजनयज्ञांना स्वतंत्र दूतावास दिलेले असतात. हा दूतावासाचा परिसर नियुक्त झालेल्या देशाचा भूभाग मानला जात नाही तर राजनयज्ञाच्या देशाचा भूभाग मानला जातो. त्यामुळे राजदूताचे जे सरकारी निवासस्थान असते त्या निवासस्थानातील मालमत्ता ही संबंधित राष्ट्राची समजण्यात येऊन त्या देशाचे नियम त्यांना लागू केले जात नाहीत.

५) **करांपासून मुक्त :** राजनयज्ञांना आपले कार्य मुक्त व स्वतंत्रपणे पार पाडता यावे याकरीता नियुक्त झालेल्या राष्ट्राचे जे करविषयक नियम असतात ते राजनयज्ञांना लागू केले जात नाहीत. प्रत्यक्ष कर, सीमा शुल्क कर व अन्य तत्सम करांपासून राजनयज्ञांना संरक्षण प्राप्त असते.

६) **संचार स्वातंत्र्य :** कर्तव्य पूर्तता करण्याच्या दृष्टीने राजनयज्ञांला आपल्या देशाशी सातत्याने संपर्क ठेवण्याची आवश्यकता असते. त्यादृष्टीने त्यास संचार करण्याची सर्व साधने उपलब्ध असतील याच काळजी घेतली जाते. राजनयज्ञांना आपल्या देशात जाताना इतर आणखी काही देशातही संचार करता येतो. तसेच तिथे आवश्यकता वाटेल तेंव्हा थांबता ही येते. त्याला त्याच्याकडून वा देशाकडून किंवा अन्य राष्ट्रांकडून येणाऱ्या पत्रांवर निर्बंध ही टाकता येत नाहीत.

## ३.३ राजनयज्ञांची कार्य :

राजदूतांना विविध प्रकारची कार्य पार पाडावी लागतात. म्हणूनच त्यांना विनोदाने Telephone Girls of History असे म्हटले जाते. राजदूत हे त्याच्या शासनाचे 'कान व डोळे' समजले जातात. राजदूत आपल्या शासनास संबंधित राष्ट्राच्या संदर्भात जगातील प्रमुख उलाठालीची माहिती देत असतात. राजनयज्ञांची प्रमुख कार्य पुढील प्रमाणे मांडता येतील.

१) **राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणे :** प्रत्येक देशाच्या राजदूताचे किंवा राजनयज्ञाचे प्रमुख कर्तव्य म्हणजे आपल्या राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणे होय. राजनयज्ञ हे आपल्या शासनाचे व जनतेचे प्रतिनिधित्व करत असतो. दोन राष्ट्रांचे संबंध जोडतांना राजनयज्ञांना संबंधित राज्यातील प्रतिष्ठीत व्यक्ती, महत्वपूर्ण गट व सर्व क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींशी संबंध प्रस्थापित करावे लागतात. यादृष्टीने राजदूत व मेहनती, संयमी, चतुर व प्रभाव पाडणारा असावा लागतो. आपले राष्ट्र व आपल्या नागरिकांबद्दल स्वागतकर्त्या देशात सद्भावना निर्माण करण्यात व मैत्री वाढविण्यात तो यशस्वी झाला पाहिजे. सारांश, आपल्या देशाची व लोकांची प्रतिष्ठा स्वागतकर्त्या देशात वाढविणे राजनयज्ञाच्या कौशल्यावर अवलंबून असते. यादृष्टीने राजदूताला आपले विचार व्यक्त करताना आपल्या सरकारचा दृष्टीकोन किंवा विचारच व्यक्त करावे लागतात. त्या प्रश्नासंबंधी त्याच्या व्यक्तिगत विचाराला मात्र अर्थ नसतो. आपला देश आणि जनता यांची परराष्ट्रात प्रतिष्ठा वाढविणे हाच त्याच्या प्रतिनिधित्वाचा प्रमुख उद्देश असतो.

२) **वाटाघाटी करणे:** राजनयज्ञाची व्याख्याच मूलत: सामोपचाराच्या वाटाघाटीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन अशी केली जाते. यादृष्टीने परिणामी सामोपचारादरम्यान वाटाघाटीच्या मार्गाने आपल्या राष्ट्राची भूमिका मांडणे, गैरसमज परस्परसंशय, असुरक्षितता दूर करणे यासारखी कार्य राजनयिक प्रतिनिधिना पार पाडावी लागतात. पामर व पार्किन्स याच्या मते राजनयज्ञ म्हणजे वाटाघाटी होय. तर चाईल्डस यासंदर्भात म्हणतात की, राजदूताचे मुख्य कार्य म्हणजे द्विपक्षीय व बहुपक्षीय संधी करार यासाठी मसूदा तयार करण्याचे असते. हे करार वा संधी आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक स्वरूपाच्या असतात. सध्या मात्र द्विपक्षीय कराराऐवजी वा पक्षीय करारांना महत्व प्राप्त होत असल्यामुळे राजदूताचे कार्य बऱ्याच प्रमाणात कमी होऊन राष्ट्र प्रमुख व परराष्ट्र मंत्र्याच्या कार्यात वाढ झाली आहे. राजदूताचे हे पारंपारिक स्वरूपाचे कार्य समजले जाते. राजनयज्ञांच्या माध्यमातून दोन राष्ट्रांमध्ये द्विपक्षीय वा बहुपक्षीय कराराद्वारे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय स्वरूपाचे संबंध प्रस्थापित करावे लागतात. यासोबतच व्यापार, औद्योगिकीकरण, आधूनिक तंत्रज्ञानाचे हस्तांतरण व आयात निर्यात याबाबत महत्वपूर्ण करार करावे लागतात. त्यादृष्टीने राजनयज्ञांची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

३) **अहवाल सादर करणे :** राजनयज्ञाचे तिसरे महत्वाचे कार्य म्हणजे संबंधित राष्ट्रातील घडामोडीचे इतिवृत्त अहवाल वा निवेदने आपल्या देशास सादर करावीत. त्यामुळेच राजनयज्ञास मातृभूमीचा विश्वासू हस्तक मानले जाते. संबंधित राष्ट्रातील नवे विचार प्रवाह कोणते आहेत याचा अभ्यास करून त्यानुसार आपल्या राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने शासनाने कोणते धोरण निर्धारित करणे आवश्यक आहे याविषयीच्या सूचना राजनयज्ञ अहवालाच्या माध्यमातून आपल्या देशाच्या शासनकर्त्यांना करत असतात. पामर व पार्किंस यांच्या मते हेच अहवाल परराष्ट्र धोरण ठरविताना महत्वाचे मानले जातात, वा अशा अहवालांच्या आधारावरच परराष्ट्र धोरण निश्चित केल्या जाते. उदा. १९४० मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्लडमधील अमेरिकेचे राजदूत जोसेफ सी. केनेडी यांनी अमेरिकेच्या अध्यक्षांना एकंदर परिस्थितीसंबंधी दिलेली माहिती ब्रिटन युद्धात पराभूत झाला अशी होती. परंतु अमेरिकेच्या राष्ट्रध्यक्षांनी अन्य सूत्रांद्वारे मिळविलेल्या अचूक माहिती नुसार ब्रिटन युद्धात पराभूत झालेले नाही अशी होती. त्यामुळे परराष्ट्र धोरणासंबंधी पूढे होणारी चूक घडली नाही.

४) **हितसंबंधाचे संरक्षण करणे :** राजनयज्ञाचे हे प्रमुख कार्य व उद्दिष्ट मानले जाते. आपल्या स्वराष्ट्राचे हितसंबंध जोपासणे हे राजनयज्ञांचे प्रधान उद्दिष्ट मानले जाते. हा दृष्टीकोन आंतराष्ट्रीय नैतिकतेच्या दृष्टीने भले ही स्वार्थी वा संकुचित वाटत असला तरी राजनयज्ञाचा मात्र हा प्रमुख आधार असतो. याकरीता राजनयिक प्रतिनिधी परराष्ट्रीय देशात आपल्या राष्ट्राची बाजू विविध आघाड्यांवर मांडत असतो. आपले राष्ट्रीय हितसंबंध साध्य करण्याकरीता परराष्ट्रात अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याबरोबरच परराष्ट्रात स्थायिक झालेल्या आपल्या राष्ट्रातील नागरिकांचे, उद्योगपती, व्यावसायिकांचे हित साध्य करण्याकरीता राजनयिक प्रतिनिधी त्यांना मार्गदर्शन सहकार्य व संरक्षण पुरवित असतात. परदेशी सरकार वा नागरिकांकडून जर त्यांच्यावर अन्याय होत असेल तर तो दूर करण्याचे काम राजनयिक प्रतिनिधिनां करावे लागते. याव्यतिरिक्त आपल्या देशातून संबंधित देशात काही कामानिमित्त

व्यापारीवर्ग गेलेला असेल तसेच काही विद्यार्थी सहलीकरिता गेलेले असतील तर त्यांना तेथे कोणतीही अडचण येऊन नये वा संबंधित राष्ट्रांकडून त्यांना वाईट वागणूक मिळू नये याकरीता राजनयज्ञ काळजी घेतात. राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करणे हे राजनयज्ञाचे प्रमुख कार्य असल्याकारणाने हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने त्यांच्या वागण्यात व बोलण्यात अंतर पडले तरी चालेल हे एक प्रकारे गृहीत धरले जाते. आर्य चाणक्य यासंदर्भात असे म्हणतात की 'राजदूताने साम, दंड, भेद अशा सर्व उपायांचा अवलंब करून राष्ट्रीय हित साध्य करावयास हवे. नैतिकता व अनैतिकता या कल्पनांच्यावर राहून राजदूताने राष्ट्रीय हिताची जोपासनल करावी. वास्तविकता तर अशी असावी की राजदूताच्या शब्दात व कार्यात कोणताच संबंध नसतो. असा संबंध जर असेल तर तर त्यास राजनयज्ञ म्हणताच येणार नाही."

५) **इतर कार्य :** या प्रमुख प्रमाणे - कार्याशिवाय राजनयज्ञांना काही अन्य स्वरूपाची ही कार्य पार पाडावी लागतात. ती पुढील

१. राजनयज्ञांची काही कार्य ही कौटुंबिक स्वरूपाची असतात. त्याकरीता विदेशी शासनाशी संपर्क राखण्याची आवश्यकता नसते. उदा. आपल्या देशातील नागरिकांचे जन्म, मृत्यु, विवाह इत्यादीची नोंद ठेवणे.

२. काही संदर्भात राजनयज्ञांना परराष्ट्र सरकारशी गैर शासकीय पद्धतीने ही कार्य करून घेता येतात. उदा. विदेशी शासनाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक धोरणांचे निरीक्षण करणे, आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीने त्याचा अर्थ लावणे, विश्लेषण व परीक्षण करून ते शासनास कळविणे.

३. विशिष्ट प्रसंगामध्ये राजदूतांना परराष्ट्र शासनाशी सरळ संपर्क साधावा लागतो. उदा. अपराधी, गुन्हेगारां संदर्भात, नागरिकांना पारपत्र प्रदान करणे, त्यांचे विधिवत करणे, त्यांच्या जिवीताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे इत्यादी संबंधीची कार्य.

एकंदरीत राजनयज्ञांना अशी विविध स्वरूपाची कार्य पार पाडावी लागतात. जी प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्रधोरणाच्या आखणी मध्ये व राष्ट्रीय हितसंबंधाच्या पूर्ततेसंदर्भात महत्वाची ठरतात.

### ३.३.१ राजनयाचे प्रकार :

राजनयांचे स्वरूप कार्य व कालनुरूप विविध प्रकार प्रचलित झालेले दिसतात. त्यातील काही प्रमुख प्रकारांची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल –

१) **जुना राजनय :** साधारणत: १५ व्या शतकापासून ते प्रथम महायुद्धाच्या शेवटपर्यंतचा काळ म्हणजे १९१९ पर्यंतच्या राजनयास 'जुना राजनय' असे संबोधन वापरले जाते. जुना राजनय ही पद्धती यूरोपिय राष्ट्रांपुरतीच मर्यादित होती. १९ व्या शतकापर्यंत जगातील अनेक देशात काही शक्तीशाली यूरोपीय राष्ट्रांच्या वसाहती होत्या. काही स्वतंत्र राज्य राज्ये अस्तित्वात असली तरी मोठी राष्ट्रे त्यांचा उपयोग सभा संतूलना करीता करीत असत. जूना राजनय पद्धतीचा प्रमुख उद्देश हा जे मित्र राष्ट्र असतील त्यांना शत्रू राष्ट्रापासून दूर करून आपल्याकडे वळविणे व आपल्या मित्र राष्ट्रांच्या

संख्येत वाढ करणे हा होता. या प्रक्रियेत घृणा निर्माण होईल वा हिसेंस प्रोत्साहन मिळेल अशा कोणत्याही कृतीस मान्यता प्रदान करण्यात आलेली नव्हती. कारण संपूर्ण यूरोप त्यावेळी राजतंत्र व कुलीन तंत्र शासनातंर्गत एक यूरोपीय समूदाय या स्वरूपात संघटित होता. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात जुन्या राजनयाचे स्वरूप हे उदार मानवीय, नम्रतेने अमंलात आणावयाची कला असे असून बुद्धीमत्ता व सहिष्णूता हे त्याचे आधार होते. जुना राजनय हा गुप्ततेवर प्रामुख्याने आचारलेला होता. देशातील सामान्य जनतेस वा अन्य राष्ट्रे यांना यासंदर्भात कोणतीच माहिती दिली जात नसे. जुना राजनय पद्धतीचा प्रमुख उद्देश हा राष्ट्रहिताऐवजी राजाचे व्यक्तिगत हितसंबंध सुरक्षित राखणे हाच होता. या राजनय पद्धतीच्या गुप्ततेच्या तत्वामुळे जगास पहिल्या महायुद्धाच्या विपत्तीस सामोरे जावे लागले.

२) **नवा राजनय :** १९१९ पासून 'नवीन राजनयास सुरूवात झाली असे मानण्यात येते. १९१९ पर्यंतच्या कालखंडात मध्यपूर्व व जपान यांना अपवाद करता आशिया खंडातील सर्व देश यूरोप मधील राष्ट्रांच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे राजनैतिक दृष्ट्या या गुलाम राष्ट्रांना कोणतेच स्वतंत्र अस्तित्व नव्हते. पहिल्या महायुद्धानंतर आशिया व अफ्रिका खंडातील पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्रांमध्ये स्वातंत्र्य चळवळींनी व स्वयंनिर्गयाच्या मागणीने जोर धरला. द्वितीय महायुद्धानंतर या खंडातील राष्ट्रे मोठया प्रमाणात स्वतंत्र झाली. त्यांनी संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व स्वीकारत आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या स्वतंत्र राजनयाच्या माध्यमातून वेगळा ठसा निर्माण केला. याच राष्ट्रांच्या माध्यमातून अलिप्ततावादी चळवळ ही पुढे गतिमान झाली. अमेरिकेने ही जागतिक राजकारणातील अलिप्ततेची भूमिका त्यागून प्रत्यक्ष हस्तक्षेपास सुरूवात केली. दुसऱ्या महायुद्धात फ्रांन्स व ब्रिटन या महासत्ता राष्ट्रांचे सर्वच दृष्टीने कंबरडे मोडले व अमेरिका आणि रशिया या दोन देशांना महासत्ताक राष्ट्र म्हणून दर्जा प्राप्त झाला. दुसऱ्या महायुद्धात सोव्हीएट रशिया व अमेरिका हे मित्र राष्ट्र म्हणून लढले असले तरी या दोन राष्ट्रांचे प्रामुख्याने एकमेकांविषयी संशय हा सोव्हीएट काल क्रांती पासूनच होता. दुसऱ्या महायुद्धानंतर हा विचारप्रणालीचा संघर्ष अधिक टोकदार झाला. त्यातूनच १९४५ नंतरचे जग हे शीतयुद्धाच्या छायेत विभागले गेले. अशा परिस्थितीत जुन्या राजनयाची पद्धती जी केवळ युरोपमधील राष्ट्र-राज्यांपूरतीच मर्यादित होती ती अपूरी व अप्रस्तूत ठरली. त्यातूनच नवीन राजनय पद्धतीचा विकास झाला. गुप्त राजनयाची जागा मुक्त राजनयाने घेतली. या पद्धतीत प्रामुख्याने कर्त्या व्यक्तिऐवजी जनतेस आव्हान करणे, चांगली वा वाईट बाजू सांगण्यासाठी व्यापक प्रचारावर भर, टिका, प्रतिटिका, धमकी, आक्रमणाची भाषा, शस्त्रास्त्र निर्मिती करून दबाव वाढवणे यासारख्या तंत्राचा प्रामुख्याने वापर केला जातो. श्री. पणिक्कर यांनी नवीन राजनय पद्धतीची काही वैशिष्टये नमूद केली आहेत. त्यातील काही प्रमुख वैशिष्टयांची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

१. शत्रू राष्ट्रातील शासनकर्त्यांना वा नेतृत्वास आवाहन करण्याऐवजी त्या राष्ट्रातील जनतेस आवाहन करण्यावर भर देण..

२. प्रचारतंत्राच्या विविध माध्यमांचा वापर करून शत्रू राष्ट्रातील शासनकर्त्यांना बदनाम करणे.

३. दोन्ही राष्ट्रातील जनतेत असणाऱ्या सामाजिक संबंधावर नियंत्रणे लावून राजनयिक संबंध केवळ अधिकारी स्तरावर प्रस्थापित करण्यावर भर देणे.

४. वाटाघाटी करताना प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याऐवजी सतत आक्रमक भाषेचा वापर करून प्रतिपक्षातील राष्ट्रावर, राज्यकर्त्यांवर अटी लादण्याचा प्रयत्न करणे.

५. शत्रू राष्ट्रास घाबरविण्याच्या दृष्टीने शस्त्रास्त्र निर्मितीवर व्यापक प्रमाणात खर्च करून आधूनिक शस्त्रास्त्रांच्या निर्मितीस प्राधान्य देणे.

**३) गुप्त राजनय :**

गुप्त राजनय हा जुन्या राजनयाचा प्रमुख प्रकार मानला जातो. प्राचीन काळापासून गुप्त राजनयाचे असतित्व आंतरराष्ट्रीय राजकारणात आढळते. राजनयाच्या तंत्रात गुप्तता ही स्वाभाविक बाब मानली जाते. दोन राष्ट्रे वा राष्ट्र प्रमुख यांच्यात जी चर्चा होते, वाटाघाटी होतात त्यास कधीच सार्वत्रिक केले जात नाही. परंतु गुप्त राजनयाची पद्धती ही दोन राष्ट्रांमध्ये होणाऱ्या करारांना ही गुप्त ठेवण्यावर प्राधान्य देते. गुप्त राजनयाचा हा प्रमुख दोष मानला जात असला तरी ज्या गोष्टी राष्ट्रांना उघडपणे करता येणे शक्य होत नाही त्या गोष्टी गुप्त राजनयातून करणे सहज शक्य होते. त्याचबरोबर एखाद्या बाबी संदर्भात देशातील सामान्य जनतेचा दृष्टीकोन हा काहीसा वेगळा असतो जो खरेतर राष्ट्रहितविरोधी जाणारा असतो अशावेळी शासनकर्त्यांना राष्ट्रहिता करीता सामान्य जनतेस कल्पना न देता काही करार, संधी करणे आवश्यक ठरते गुप्त राजनयाद्वारे ते शक्य होते.

गुप्त राजनयाच्या सर्वात मोठा परिणाम म्हणजे पहिले महायुद्ध होय. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वाधात यूरोपमधील अनेक राष्ट्रांनी आपआपसात अनेक गुप्त प्रकारचे करार करून आंतरराष्ट्रीय राजकारणात एक प्रकारे संशय भीती व असुरक्षितेचे वातावरण गडद केले होते. त्यातूनच पहिले महायुद्ध घडून आले. १८७८ साली भरलेली बर्लिन काँग्रेस ही गुप्त राजनयाचे उत्तम उदाहरण मानले जाते.

**४ ) प्रकट राजनय :**

पहिल्या महायुद्धानंतर गुप्त राजनय हे टिकेचे प्रथम लक्ष्य बनले त्यातूनच जगास महायुद्धाच्या अनुभवापासून वाचवण्या करीता प्रकट राजनयाचा पुरस्कार पुढे आला. अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष प्रे. विल्सन यांनी १४ कलमी कार्यक्रम प्रस्तूत करून प्रकट राजनयास प्राधान्य दिले. या चौदा कलमी कार्यक्रमास राष्ट्रसंघाच्या संविधानात ही स्थान देण्यात आले होते. प्रकट वा मुक्त राजनयाचा सर्वसामान्यत: असा अर्थ घेण्यात आला की, 'दोन राष्ट्रात ज्या वाटाघाटी, चर्चा होतात तसेच वाटा घाटीनंतर जे करार, संधी होतात त्यांना पूर्णपणे प्रसिद्धी देण्यात यावी व जनतेस त्यासंबंधी पूर्ण माहिती मिळून त्यासंबंधी आपली मते भावना व्यक्त करता यावीत.

आंतरराष्ट्रीय राजकारणात पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने प्रकट राजनय हा घटक महत्वाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा तत्वचिंतकाना होती. मात्र वास्तवात प्रकट राजनयाने आंतरराष्ट्रीय राजकारणातील समस्यांची उकल होण्याऐवजी तो गुंता

अधिक वाढत जात असल्याचे प्रत्ययास आले. त्यासंदर्भात पुढील काही बाबी समस्यांच्या स्वरूपात प्रकट झालेल्या दिसतात.

१. मुक्त राजनयाच्या संदभार्नी प्रमुख समस्या म्हणजे अने राष्ट्रे एकत्र येऊन उघडपणे करार वा संधी करत असले तरी ते ईमानदारीने अंमलात आणण्यासंदभार्त फारसे गंभीर असल्याचे आढळत नाहीत. उदा. १९२८ मध्ये पॅरीस संधी वर जगातील सर्व प्रमुख राज्यांनी स्वाक्षरी केली होती व यापुढे जगास यापुढे महायुद्धाचा अनुभव मिळणार नाही अशी घोषणा ही संयुक्तपणे प्रस्तुत केली होती मात्र प्रत्यक्षात या कराराच्या कोणत्याही राष्ट्राने वास्तवात पालन केले नाही.

२. राजनय पद्धतीची प्रक्रिया व परिणाम मागील फरक ही ही गुप्त राजनयाच्या कार्यन्वयनावरील प्रमुख मर्यादा ठरतांना दिसते. सैध्दांनिक दृष्टया लोकांना राजनयाच्या परिणामांची माहिती देणे आवश्यक असते. परंतु वास्तवात सामान्य जनतेस राजनयाची पद्धती वा त्याच्या प्रक्रियेविषयी माहिती देणे देशहिताच्या दृष्टीने हितकारक ठरत नाही. कारण परराष्ट्र संबंधात सौदेबाजीची क्षमता ही राष्ट्रहिताच्या दृष्टीने अधिकाधिक वापरणे आवश्यक असते. या सौदेबाजीमध्ये अनेक बाबी अशा असतात की ज्या राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या दृष्टीने नाजुक स्वरूपाच्या असतात. अशा बाबींसंदर्भात राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने गुप्तता ठेवणे अत्यावश्यक असते. राजनयिक वार्ता अशा मुद्दयांसंदर्भात प्रकटपणे होत असेल वा ती जाहीर केली जात असेल तर प्रतिनिधींनी स्वत:च्या देशहिताच्या दृष्टीने केलेले प्रतिपादन व दुसऱ्या पक्षाने त्या प्रतिपादनासंदर्भात व्यक्त केलेली प्रतिक्रया यामुळे सामान्य जनतेत प्रक्षोभ निर्माण होऊ शकतो.

३. लोकशाही शासनपद्धती ही मुक्त राजनयास सर्वाधिक अनुकुल आहे असे म्हटले जाते. मात्र वास्तवात लोकशाही शासनप्रकारात ही प्रकट पद्धतीचा राजनय कार्यन्वीत करणे शक्य होत नाही वा अव्यवाहारिक ठरते. कारण देशातील सर्वच जनतेस आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयी रूची असेल असे नव्हे व ज्यांना रूची आहे त्यांना त्यासंबंधीची योग्य समज वा प्रतिसाद असतेच असे नव्हे. आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवहारात त्यासाठी प्रशिक्षित वर्गाची अपरिहार्यता वेळोवेळी प्रत्ययास येते.

४. प्रकट राजनयाने देशातील राजकर्त्यांना ही अनेकवेळा मर्यादा आणलेल्या दिसतात वा त्यांचा संभ्रम वाढवलेला दिसतो. ज्यातून देशाचे राष्ट्रप्रमुख व सामान्य जनता यांच्यात एक प्रकारे अविश्वासाची झालर निर्माण झालेली दिसते. लोकशाही शासन व्यवस्था असणाऱ्या देशातील राजकर्त्यांसमोर सातत्याने हा प्रश्न निर्माण झालेला दिसतो की राजनयाबद्दल लोकांना किती सांगावे, कसे सांगावे व काय सांगावे?

अशा पद्धतीने काही दोष गृहीत धरूनही समकालिन संदर्भात प्रकट राजनय पद्धतीच्या तंत्राचाच प्रामुख्याने वापर केला जाता.

५) **हुकुमशाही राजनय :** लोकशाही व हुकुमशाही या दोन्ही देशांच्या राजनया संबंधीचा दृष्टीकोन पूर्णत: भिन्न स्वरूपाचा आढळतो. हुकूमशाहीत सर्व सत्ता एका व्यक्तीच्या हाती सोपवलेली असते व जनतेस विश्वासात न घेता राजनयिक स्तरावर सर्व निर्णय घेतले जातात. हुकूमशाही पद्धतीचा राजनय हा विशिष्ट भावनांचा अभिमान बाळगत असल्याकारणाने त्यास आंतरराष्ट्रीय क्षेत्रात चांगले संबंध प्रस्थापित करण्यावर वा शांतता स्थापित करण्यावर त्याचा विश्वास नसतो. हुकूमशाही पद्धतीचा राजनय तोपर्यंतच आंतरराष्ट्रीय कायद्यास मानतो की जोपर्यंत राष्ट्राचे हित साध्य होत आहे. स्वहितास आणणाऱ्या कोणत्याही बाबी तो मान्य करत नाही वा त्याचे पालनही करत नाही. हुकूमशाही शासनपद्धती असूनही जर एखादे राष्ट्र इतर राज्यांशी राजनयिक संबंध स्थापन करू इच्छित असेल तर सर्वंकष राजनयाच्या दृष्टीने ते राष्ट्र दुर्बल आहे असा सरळ अर्थ लावला जातो. हुकूमशाही स्वरूपाच्या राजनयात प्रसार व प्रचार तंत्राचा प्रभावी वापर करण्यावर प्रामुख्याने भर असतो. इतर राष्ट्रांशी करार, संधी करणे व त्याविरूद्ध वर्तन करणे हा या राजनयाचा स्थायीभाव असतो. हेरगिरी करणे, घातपात घडवून आणणे, युद्ध व राज्याचा विस्तार करणे ही सर्वंकषपद्धतीच्या राजनयाची प्रमुख तत्वे असतात. सर्वकष स्वरूपाय राज्याशी संबंध कसे जोडावेत व पूर्वीचे संबंध असल्यास ते कसे टिकवावेत हा महत्वाचा प्रश्न हा इतर राष्ट्रांसमोर असतो. कारण हुकूमशाही स्वरूपाच्या राजनयात विश्वासाचा भाग अनिवार्य नसतोच पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात इटलीमध्ये मुसोलिनी, जर्मनीत हिटलर व रशियामध्ये स्टॅलिन यांनी परराष्ट्र संबंधासंदर्भात जे राजनयाचे तंत्र स्वीकारले ते प्रामुख्याने सर्वंकष स्वरूपाच्या राजनयाचेच होते.

६) **लोकतांत्रिक पद्धतीचा राजनय :**

६० वे शतक हे लोकशाही शासनव्यवस्थेचे शतक म्हणून ओळखले जाते. याच शतकात लोकतांत्रिक राजनय पद्धतीचा ही विकास घडून आला. लोकतांत्रिक राजनयामध्ये राज्यकर्त्यांची इच्छा नव्हे तर त्या देशातील जनमताचा कौल महत्वाची भूमिका बजावताना दिसतो. लोकशाही शासनव्यवस्थेत परराष्ट्रसंबंधा संदर्भात ही सामान्य जनता आपल्या भावना स्पष्ट स्वरूपात व्यक्त करत असतात. शिवाय राष्ट्रा-राष्ट्रातील सामान्य जनतेत औपचारिक व अनौपचारिक पातळीवर अनेक बाबतीत थेट संबंध प्रस्थापित झालेले दिसतात. त्यामुळे राजनयज्ञांना शासनकर्त्यांच्या आदेशांबरोबरच सर्वसामान्य जनतेच्या भाव-भावनांचा ही आदर ठेवावा लागतो. शासनकर्त्यांनी केलेल्या करारांना, संधीना संसदेची मान्यता अनिवार्य असते. अशा परिस्थितीत जनता लोकप्रतिनिधींच्या मार्फत परराष्ट्र धोरणावर ही अप्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित करतांना दिसते. लोकतांत्रिक राजनयपद्धतीची प्रमुख वैशिष्टये पुढील प्रमाणे मांडता येतील.

१. लोकतांत्रिक राजनयात जे करार व संधी केल्या जातात त्याचे पालन करण्यावर व ते प्रत्यक्षात कार्यन्वीत करण्यावर भर दिला जातो. इतर राजनय पद्धतीमध्ये याची शाश्वती नसते.

२. लोकतंत्रिक राजनयात युद्ध व संघर्ष टाळून शत्रू राष्ट्रा समवेत संवादाच्या माध्यमातून प्रश्नांची सोडवणुक करण्याचा प्रामुख्याने प्रयत्न केला जातो.

३. लोकतांत्रिक राजनयात विरोधी वा शत्रु राष्ट्रांना प्रलोभने दाखवून आपल्या बाजूने करण्याचा वा अंकित करण्याचा प्रामुख्याने प्रयत्न होतो.

४. लोकतांत्रिक राजनयात राजनयज्ञांना दुसऱ्या देशातील शासनाशी संबंध प्रस्थापित करतांना आपल्या देशातील राज्यकर्त्यांच्या आदेशांबरोबरच देशातील सर्वसामान्य जनतेच्या भावभावनांची ही दखल घेणे भाग पडते. त्यामुळे राजनयाच्या दृष्टीने कोणता ही निर्णय घेतांना त्या निर्णयाचा देशातील जनतेवर कोणता व कसा प्रभाव पडेल याचा अंदाज राजनयज्ञांना घ्यावा लागतो.

५. इतर राजनय पद्धतींमध्ये सर्वसाधारण स्तरावर ज्या राजनयिक घडामोडी, वाटाघाटी घडून येतात त्याचा सविस्तर वृत्तांत जनतेस देणे आवश्यक नसते. मात्र लोकतंत्रिक राजनयात यासंबंधीची तपशिलवार माहिती सर्वसामान्य जनतेसाठी खुली ठेवावी लागते.

६. लोकतंत्रिक राजनयाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्टये म्हणजे शासनकर्त्यांकडून परराष्ट्रांसमवेत

जे करार, संधी केल्या जातात त्यांना विरोध करण्याचा अधिकार देशातील लोकांना, संघटनांना वा राजकीय पक्षांना ही असतो. प्रसंगी झालेले करार वा संधी या विरोधाच्या प्रभावातून राज्यकर्त्यांना रद्द ही कराव्या लागतात.

लोकतांत्रिक राजनायाच्या जमेच्या बाजू अनेक असल्यातरी त्यात दोष ही मोठ्या प्रमाणात कार्यन्वीत असलेले दिसतात. लोकतांत्रिक राजनयान अज्ञान व अपूर्ण माहितीच्या आधारे मत बनविणाऱ्या जनतेचा दबाव शासनकर्त्यांवर सतत असल्याकारणाने निर्बंधबाबत विलंब तर होतोच शिवाय निर्णयासंबंधी संदिग्धता व अनिश्चितताही कायम राहते. पामर व पार्किन्स सारखे विचारवंत लोकतांत्रिक राजनय पद्धतीचा निराशाजनक अनुभव मांडताना म्हणतात, साधारण नागरिक हे परराष्ट्रातील घडामोडीं संबंधी पूर्णपणे अनभिज्ञ असतात. त्यामुळे अशा प्रश्नाचे होणारे परिणाम ते जाणू शकत नाही. यामुळे निर्णय करताना नेत्यांची कुंचबणा होते. तर निकल्सन यासंदर्भात टिका करतांना म्हणतात की, “अज्ञानापेक्षा अधिक भयानक स्थिती तेंव्हा उत्पन्न होते की जेंव्हा व्यक्तीजवळ एखाद्या प्रश्नासंबंधी फारच अत्यल्प माहिती असते. अर्धवट माहिती असलेल्या व्यक्तीजवळ कोणत्याही प्रश्नावर उत्तर असते व कोणत्याही प्रश्नावर मार्ग सुचविताना त्याचे मन थोडेसेही कचरत नाही.

**(७) परिषदपद्धतीचा राजनय :** परिषदपद्धतीचा राजनय हा प्रकार वर्तमानकाळात अधिक प्रचलित असला तरी प्राचीन काळातही याचे संदर्भ आढळतात. १८१५ साली झालेल्या व्हिएन्ना परिषदेनंतर या पद्धतीचा राजनयतंत्राचा प्रकार अधिक प्रसारीत झाला. २०व्या शतकात परिषद पद्धतीचा राजनय अधिक प्रचलित झाला. १९१९ ची शांतता परिषद १९४५ची सॅनफ्रान्सिको परिषद या दृष्टीने महत्वाची ठरली. राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्रे यासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांची स्थापना ही परिषद राजनयाच्या माध्यमातून झालेली दिसते. अलिकडच्या काळात जगभरात वर्षाला दहा हजारापेक्षा अधिक परिषदांचे आयोजन केले जाते. संमेलनीय राजनय पद्धतीचे महत्व विशद

करतांना लॉर्ड मॉरीज हॉके म्हणतात, "संमेलनीय राजनयपद्धती ही जगातील युद्ध प्रवृत्तीवर प्रतिबंध घालणारी उत्तम पद्धती होय. अशा संमेलनातील लवचिक कार्यपद्धती, कमी संख्या अनौपचारिकता, परस्परसंबंध व शक्य असल्यास प्रमुख प्रतिनिधींचे मित्रत्वाचे संबंध, चचेर्तील गोपनीयता व निर्णयाबाबतची प्रसिद्धी, विश्वासपात्र सचिव व दुभाषिक इ. महत्वपूर्ण लक्षणे असल्यास संमेलनीय राजनय पद्धती यशस्वी होऊ शकते."

परिषद पद्धती राजनयाच्या काही मर्यादा ही स्पष्ट स्वरूपात दिसतात. परिषदांमध्ये उपस्थित असणारे विविध देशांचे प्रतिनिधी हे स्वत:वर कोणतीही बंधने लादून घेत नाहीत. शिवाय अशा पद्धतीच्या परिषदांचा वापर हा राज्याच्या भूमिकेचा प्रचार करणे, मित्र मिळवणे व जनमत प्रभावित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो. अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट राहिलेले डिन अँचेसन यांनी परिषद पद्धतीच्या राजनयावर टिका करताना म्हटले होते. "युद्धोत्तर काळातील आंतरराष्ट्रीय परिषदा या संघर्ष वा वाद सोडविण्याचे अयशस्वी साधनमात्र ठरल्या आहेत." या परिषद पद्धतीच्या राजनयाच्या मर्यादा लक्षात घेऊन राज्यांनी परत द्विपक्ष वा विपक्ष संमेलनातून वाटाघाटी करून निर्णय घेण्याची व प्रश्न निकालात काढण्याची पद्धती सुरू केलेली दिसते. एकंदरीत असे म्हणता येईल की परिषद पद्धतीच्या राजनयाचे यश हे संमेलनात भाग घेणाऱ्या प्रतिनिधींचा समजूतदारपणा, निर्णयाप्रत पोहचण्याचा पूर्वनिर्धार व एकमेकांबद्दलच्या सहकार्यावर अवलंबून आहे.

८) **शिखर राजनय :** राजनयिक विषयाच्या समाधान व पूर्ततेकरीता राजनयज्ञाऐवजी जेंव्हा संबंधित राष्ट्राचे परराष्ट्रमंत्री, पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष यांनीच प्रत्यक्ष वाटाघाटी करणे म्हणजे व्यक्तिगत वा शिखर राजनय होय. शिखर राजनय हा प्राचीन काळापासून प्रचलित असलेला दिसतो. राष्ट्राध्यक्ष सम्राट, राजे वा पंतप्रधानांच्या पातळीवर प्राचीन काळातही व्यक्तिगत स्वरूपाच्या राजनयिक बैठका होत असत. असे असले तरी शिखर राजनय पद्धतीचा विकास हा प्रामुख्याने २० व्या शतकातच घडून आलेला दिसतो. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान चर्चिल, रूझवेल्ट, स्टॅलिन यांच्यात घडून आलेली १९४३ मधील तेहरान व १९४५ मधील याल्टा परिषद ही शिखर राजनयाची महत्वाची वैशिष्ट्ये होत. यानंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवहारात राजनयाच्या दृष्टीने शिखर राजनयाचे प्रतिमान हे मोठ्या प्रमाणात प्रचलित झालेले दिसते. या राजनय पद्धतीमध्ये ही काही दोष प्रामुख्याने येतात. त्यात प्रामुख्याने असे दिसते की, राष्ट्र प्रमुख व मंत्र्याचे कार्य हे धोरण निश्चित करण्याचे असते. त्याची अंमलबजावणी करण्याचे नसते. त्यामुळे यापद्धतीचे कार्य प्रशासकीय वर्गाकडे सोपवणेच अधिक योग्य ठरते. सफल राजनयाकरीता वा समाधानकारकरित्या प्रश्न सोडविण्याकरीता प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीस त्या विषयाची संपूर्ण माहिती असणे आवश्यक असते तशी सवड ही गरजेची ठरते. प्रत्यक्षात मात्र राष्ट्रप्रमुखाच्या वा मंत्री यांना याविषयाच्या तज्ञ नसतात व पूरेसा ही वेळी ही त्यांना याकरीता देणे शक्य नसते. त्यानाच राष्ट्रप्रमुख या मंत्री या विषयाकडे व्यक्तिगत दृष्टीकोनातूनच पाहत असतात. त्यामुळे व्यक्तिगत मते, पूर्वग्रह याच्या प्रभावामुळे राष्ट्र प्रमुख राजनयाकरिता जी देवघेवीची वृत्ती आवश्यक असते ती ते धारण करतीलच असे नव्हे त्यामुळे शिखर राजनय यशस्वी होण्यात मर्यादा येतात.

शिखर राजनयावर टिका करतांना डीन रज्क असे म्हणतात की, "संपूर्ण जगाचे लक्ष अशा बैठकीकडे लागलेले असते. अशा परिषदा अयशस्वी झाल्या तर जगात निराशेचे वातावरण निर्माण होते. बैठकीस बसण्यापूर्वीच प्रतिनिधींवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो. तरीही असे म्हणता येऊ शकते की, अशा पद्धतीच्या शिखर राजनयामुळे क्लिष्ट अशा आंतरराष्ट्रीय समस्यांवर श्रेष्ठ पातळीवर चर्चा व विचाविनियम होऊन आंतरराष्ट्रीय तणाव कमी होऊ शकतो व समस्यांना निराकरणातील मार्ग उपलब्ध होऊन शकतात.

९) **संसदिय राजनय पद्धती :** संसदीय राजनय ही संज्ञा प्रथम अमेरिकन परराष्ट्रमंत्री डिन रज्क यांनी प्रथम वापरली. डिन रज्क यानी याची मांडणी करतांना असे म्हटले होते की, 'संयुक्त राष्ट्रसंघातील कार्यवाहीचे स्वरूप हे एखाद्या राज्यातील कार्यवाही प्रमाणेच असते. राज्यातील संसदेत ज्याप्रमाणे विभिन्न गटाचे वा पक्षाचे प्रतिनिधी चर्चा व वादविवादात भाग घेतात त्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रातील बैठकीचे स्वरूप असते. देशात ज्याप्रमाणे विविध राजकीय पक्ष व दबावगट आपला प्रभाव संसदेत पाडण्याचा प्रयत्न करतात. त्याप्रमाणेच संयुक्त राष्ट्रात सदस्य राष्ट्रांचे गट आपल्या हितसंबंधानुसार विचार करून पुढे आलेल्या विषयासंदर्भात आपले मत व्यक्त करीत असतात. याच पद्धतीने संयुक्त राष्ट्रातही कार्यवाही होत असल्याकारणाने डीन रज्क त्यास संसदीय राजनय असे संबोधन वापरतात.

सासंदिय राजनय पद्धतीवर ही मोठ्या प्रमाणात टिका केली जाते. मॉर्गेलों यांनी संसदिय राजनय पद्धतीतील दोषांचे विवेचन करताना असे म्हटले आहे की 'मूलतः संयुक्त राष्ट्रांमधील बहुमताने निर्णय घेण्याची पद्धती ही दोषपूर्ण आहे. संयुक्त राष्ट्रांमध्ये निर्णय घेण्याकरिता जी पद्धती योजिली आहे त्यातून प्रश्न सुटण्याऐवजी तो अधिक गुंतागुंतीचा होतो. त्याचबरोबर सांसदिय राजनय पद्धतीत कोणत्याही समस्येचा खोलवर विचार केला जात नाही. आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे विभाजन केले जाते, महाशक्तींचे आपसातील मतभेद हे निर्णयक ठरतात याही दोषांवर टिकाकार लक्ष वेधताना दिसतात. भारतीय राजनयज्ञ म्हणून राहिलेले के. एम. पण्णिष्कर यासंदर्भात मार्मिक विश्लेषण करतांना म्हणतात, "संयुक्त राष्ट्रात होणाऱ्या चर्चा, भाषणे व घोणणांना राजनय असे संबोधन वापरणे चुकीचे ठरते. राजनायिक चर्चेत शांतता व गंभीर चिंतन अपेक्षित असते. संयुक्त राष्ट्रातील भाषणे तर जगभर प्रचार करण्यासाठी दिली जातात. राजनयात ज्यावेळी समन्वय साधण्याचा, संधी करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याऐवजी संयुक्त राष्ट्रांमध्ये मात्र प्रचारास प्राधान्य दिले," अशा पद्धतीचे दोष संसदीय राजनय पद्धतीत असले तरी एखाद्या प्रश्नासंदर्भात विश्व जनमत जागृत करणे व अधिकाधिक राष्ट्रांचे सहकार्य प्राप्त करून सामूहिक सुरक्षिततेच्या मार्गानुसार प्रश्न सोडविण्याची तयारी करणे यासारखे गुण यापद्धतीत प्रामुख्याने आहेत हे मान्य करावे लागते.

### ३.३.२ राजनया समोरील आव्हाने वा मर्यादा :

राजनय हे संघर्ष नियंत्रणाचे व राष्ट्रीय धोरणाचे एक साधन या दृष्टीने जरी महत्वपूर्ण असले तरी आज राजनयापुढे विविध घटकांमुळे आव्हाने उभी राहिलेली दिसतात. ही आव्हाने राजनय तंत्राच्या मर्यादा ही ठरत आहेत. त्याची मांडणी पुढील मुद्दयांच्या आधारे करता येईल.

१) **दळणवळण साधनांचा विकास :** प्राचीन काळात राजनयज्ञ हे शासनकर्त्यांचे प्रतिनिधी म्हणून दुसऱ्या राज्यात जात असत आपल्या देशाचे हितसंबंध पूर्णत्वास नेण्याकरीता स्वत:च निर्णय घेत असत. राजनयज्ञांनी घेतलेल्या निर्णयांना त्यावेळी राज्यकर्त्यांना मान्यता देण्याशिवाय गत्यंतर नसे. कारण दळणवळणच्या प्रभावी साधनांअभावी राजनयज्ञांशी सतत संपर्क ठेवणे त्यांना शक्य होत नव्हते. परंतु आधूनिक काळात दळणवळणाच्या व संचार साधनांच्या दृष्टीने क्रांतिकारी बदल घडून आले. ज्यामुळे एखाद्या प्रश्नासंदर्भात शासनकर्त्य राजनयज्ञांना तात्काळ मार्गदर्शन वा सूचना देऊ शकतात.

दळणवळणाच्या साधनांमध्ये झपाटयाने झालेल्या प्रगतीमुळे शासनास आपल्या राजनयिक प्रतिनिधींशी संपर्क साधण्यास फारसा विलंब लागत नाही. कोणत्याही निर्णया संदर्भात, परिषदा व संमेलनांमध्ये शासनकर्त्य राजनयज्ञांना तात्काळ सूचना देऊ शकतात. ही प्रगती एका बाजूने राजनयिक संबंध प्रस्थापित करण्यास ज्या प्रमाणात पूरक आहे. त्याच प्रमाणात ती राजनयज्ञांपुढे आव्हान व मर्यादा ही निमार्ण करणारी आहे. उदा. पूर्वीच्या काळात युद्ध टाळण्याचे एक प्रमुख साधन म्हणून राजनयाकडे पाहिले जात असे कारण राजनयिक प्रतिनिधी प्रत्यक्ष वाटाघाटी करून तोडगा काढीत असत. मात्र आज तशी परिस्थिती नाही कारण आजच्या काळात राजनयज्ञा ऐवजी शासनच प्रत्यक्ष हस्तक्षेप करते. त्यामुळे दळणवळण व संचार साधनांचा विकास हा राजनज्ञाच्या तंत्रापुढील एक आव्हान मानले जाते.

२) **राजनयज्ञाचे अवमूल्यन :** आजच्या काळात राजनयाचे झालेले अवमूल्यन हे राजनयाच्या ऱ्हासाचे एक प्रमुख कारण सांगितले जाते. राजनय ही एक कला, कौशल्य व विशिष्ट स्वरूपाचे ज्ञान आहे. ज्यामाध्यमातून इतर राष्ट्रांमध्ये राहून आपल्या देशाच्या हितसंबंधाचे रक्षण करणे सहज होते. परंतु हे राज्य होण्याकरीता राजनयज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तीस पुरेशी मुभा मिळणे. आवश्यक ठरते. त्याचबरोबर अनुभवी, प्रशिक्षित व विवेकी राजनयज्ञांची नेमणुक होणे ही तितकेच आवश्यक असते. मात्र या दोन्ही पातळ्यांवर मोठ्या प्रमाणात राजनयज्ञाचे अवमूल्यन अलिकडच्या काळात घडून येतांना दिसत आहे. आजच्या काळातील राजनयज्ञांच्या नेमणुकांमध्ये राजकारणाने शिरकाव केलेला दिसतो. त्यामुळे राजनयज्ञाची यंत्रणा अननुभवी राजकीय पुढाऱ्यांच्या हाती गेल्यामुळे राजनयापुढे एक मोठे आव्हान निर्माण झालेले दिसते. त्याचा प्रत्यय जागतिक पातळीवरील परिषदांमधून वा संमेलनांमधून सातत्याने येतो. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्येही राजनयज्ञांऐवजी निर्वाचित प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात सहभागी होतांना दिसतात. त्यांना राजनयातील शिष्टाचार, गुप्तता, धूर्तता व नम्रतेचा अनुभव नसल्याकारणाने त्यांच्याकडून राष्ट्रहित साध्य होण्याऐवजी अहितच मोठ्या प्रमाणात साधले जाते. त्यामुळे राजनयाचे होत असलेले अवमूल्यन हे एक राजनयापुढील एक मोठे आव्हान ठरतांना दिसते.

३) **मुक्त व संसदीय पद्धतीच्या राजनयाचे आव्हान :** राजनय यंत्रणेत मुक्त राजनय व संसदीय पद्धतीच्या राजनयाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसतो. पहिल्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या राष्ट्रसंघ व दुसऱ्या महायुद्धानंतर कार्यरत झालेली संयुक्त राष्ट्रे ही संघटना संसदीय पद्धतीच्या व मूक राजनयाच्या प्रभावास अनुकूल ठरली. या पद्धतीमुळे आंतरराष्ट्रीय समस्या या संयुक्त राष्ट्रांच्या कार्यक्रमपत्रिकेवर ठेवल्या जातात. या समस्यांबाबत सर्व प्रतिनिधींच्या उपस्थित

खुली चर्चा होते. त्यातून बहुमताच्या आधारावर राष्ट्रांचे त्या समस्यांविषयी मते आजमावली जातात व निर्णय घेतले जातात. त्यामुळे राजनयाच्या तंत्रात गुप्तता व द्विपक्षीय चर्चा या घटकांना फारसे महत्व राहिलेले दिसत नाही. त्यातच संसदीय पद्धतीने राजनयिक व्यवहारांची पूर्तता करण्याची वृत्ती, कायदेमंडळे, वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे इत्यादी माध्यमातून राजनयिक व्यवहाराची होणारी चर्चा ही राजनयिक यंत्रणेपुढे एक आव्हान म्हणून उभी राहिलेली आहे. कारण राजनयिक व्यवहारामध्ये तडजोड हा स्थायीभाव असतो. राजनयिक व्यवहारात तडजोह करतांना ती गुप्त ठेवणे, देशाची गुपिते परिस्थितीसदृश्य ठेवणे यास प्राधान्य दिले जाते. त्यामुळे आहे ते पदरी पाडून नाही ते मिळविण्याचे प्रयत्न राजनयिक मार्गाने करणे हा राजनयिक तंत्राचा महत्वाचा भाग असतो. मुक्त व संसदीय पद्धतीच्या राजनयामुळे मात्र राजनयाच्या प्रत्येक व्यवहाराविषयीची माहिती प्राप्त करण्याची जनतेची मागणी राजनयायमध्ये गुप्त व्यवहार व सुदृढ देवाणघेवाणीपुढे एक प्रमुख आव्हान ठरते आहे.

४) **जागतिक लोकमताचा प्रभाव :** जागतिक लोकमताचा वाढता प्रभाव हाही राजनयिक यंत्रने समोरील एक प्रमुख आव्हान म्हणून पुढे आलेले दिसते. आज जगातील कोणत्याही देशातील राज्यकर्त्यांला संधी वा करार करताना जनतेच्या भावना लक्षात घेणे अनिवार्य ठरत आहे. राज्यकर्त्यांनी करार केल्यानंतर त्या करारास प्रसिद्धी माध्यमांद्वारे जाहीर केले जाते. सर्वसामान्य जनतेस संघटितरीत्या या करारांविरोधात विरोध प्रकट करण्याचा अधिकार असतो. जनतेने झालेल्या करारांना विरोध केला तर राज्यकर्त्यांना अशा पद्धतीचे करार प्रसंगी रद्द करण्याची नामुष्की पत्करावी लागते. त्यामुळे जागतिक लोकमताचा प्रभाव हा ही

राजनयिक यंत्रणेपुढे आव्हान म्हणून पुढे आला आहे. एखाद्या प्रश्नासंबंधी जागतिक लोकत जर विरोधी जात असेल तर महासत्ताक राष्ट्रांनाही आपले निर्णय बदलावे लागतात हे अनेक वेळा निदर्शनास आले आहे. व्हिएटनाम, इराक संदर्भातील भूमिकेत अमेरिकेला जागतिक लोकमताच्या प्रभावातून बदलने भाग पडले हे त्याचे उत्तम उदाहरण होय.

५) **सत्तासंतूलनाची समाप्ती :** सत्तासंतूलन व्यवस्थेत शासनाच्या कार्यास अधिक गतिमानता येऊ शकते. पहिल्या महायुद्धापूर्वीच्या कालखंडापर्यंत सत्तासंतुलन पद्धतीचा कार्यकाल होता. पहिल्या महायुद्धापूर्वी पर्यंत सत्तासंतूलन पद्धतीमुळे जागतिक शांतता प्रस्थापित झालेली होती. परंतु त्यानंतर विध्वसंक शस्त्रांची निर्मिती, राजकीय व सामाजिक क्रांती व नवोदित स्वतंत्र राज्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणात पदार्पण झाल्यामुळे सत्ता संतूलन व आंतरराष्ट्रीय शांततेचा भंग झाला आहे. पूर्वीच्या काळी राजनयपद्धती यूरोप पुरतीच मर्यादित होती परंतु ती नवोदित स्वतंत्र राज्यांच्या पदार्पणामूळे विश्वव्यापी बनली आहे. त्यामुळे ही राजनयाचे महत्व कमी झालेले दिसते. सत्तासंतूलन पद्धतीचा ऱ्हास हा राजनय तंत्रा समोरील एक अडथळा ठरला आहे.

६) **राजनयिक प्रतिनिधींची प्रतिमा :** राजनय पद्धतीच्या व्युवहनीतीचा परिपाक म्हणून पहिले महायुद्ध घडून आले. त्यामुळे जगभरात राजनय तंत्राविषयी नकारात्मक प्रतिमा निर्माण झाली. राजनयिक हे लबाड, कपटी व कूटनीतीत वाक्बगार असतात ही राजनयज्ञांची प्रतिमा राजनया समोरील एक आव्हान ठरते. त्यामुळे गुप्त राजनयाऐवजी मुक्त राजनयाच्या तंत्राचा प्रभाव वाढला. व त्या प्रमाणात राजनयिक यंत्रनेचा प्रभाव ही ओसरला.

७) **महासत्ताक राष्ट्रांची भूमिका :** परराष्ट्रधोरणात पूर्वीच्या काळी प्रत्येक राष्ट्र आपले राजनयिक कौशल्य वापरून ध्येय गाठण्याचा प्रयत्न करत असत. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र यात आमूलाग्र स्वरूपाचे बदल घडून आले. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची द्विध्रुवी विश्वरचना आकारास आली. या महासत्ताक राष्ट्रांनी परस्परांना शह-प्रतिशह देण्याच्या दृष्टीने काही योजना आखल्या व परस्पर गटातील राष्ट्रांकडे त्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य सोपविण्यात आले आहे. जगातील बहुतेक राष्ट्रे दोन महासत्ताक राष्ट्रांपैकी कोणत्यातरी एका गटात असल्यामुळे या राष्ट्रांनी आपले स्वतंत्र अस्तित्व गमावले. परिणामतः अशा राष्ट्रांच्या राजनयिक प्रयत्नांना कोणताच अर्थ उरत नसल्यामुळे राजनयाचे महत्व कमी झाले आहे. शीतयुद्ध काळात रशिया व अमेरिका ही राष्ट्रे दोन परस्पर विरोधी विचारांचे प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे त्यांचे कोणत्याही बाबतीत एकमत होणे शक्य नसते. त्यामुळे ही परिस्थितीत सुद्धा राजनयाला महत्व राहिले नाही. सारांश, महासत्ता व राष्ट्रांची भूमिका ही राजनयिक तंत्रापुढे एक आव्हान ठरली आहे.

८) **जटिल स्वरूपाचा ध्येयवाद :** १९९१ साली सोव्हीएट रशियाच्या विघटनाबरोबर शीतयुद्धाची समाप्ती झाली. परंतु अल्पावधितच सोव्हीएट रशियाची जागा चीन ने घेतलेली दिसते. त्यामुळे आजही चीन व अमेरिका यात जगाची वर्चस्व स्पर्धा कार्यरत आहे. अशा पद्धतीचा महासत्ताक राष्ट्रांचा असणारा ध्येयवाद जगातील कोणत्याही राष्ट्रास सहज पक्षबदल करून सभासमतोल करू देत नाही. दुसऱ्या महायुद्धापर्यंत जगातील राष्ट्रे सहजपणे सभासमतोल घडवून आणत असत. हे आजच्या काळात शक्य होत असलेले दिसत नाही. त्यामुळे कोणताही प्रश्न वा समस्या ही राजनयाच्या माध्यमातून सुटण्याऐवजी ती अधिक बिकट स्वरूप प्राप्त करून घेते व शेवटी अर्धवट सुटलेल्या अवस्थेत संघर्षमय परिस्थिती निर्माण करते की त्यात शेवटी तडजोडीला वाव ठरत नाही. उदा. अलिकडच्या काळात दक्षिणी चीनी समुद्रामध्ये काही बेटाच्या समस्यांवरून चीन व जपान यांच्यात वाद सुरू आहे. अमेरिकेने जपानची बाजू घेतल्यामुळे हा वाद अधिकच चिघळलेला दिसतो. वास्तविकता हा प्रश्न राजनयिक माध्यमातून सहज सुटणे शक्य होते. मात्र दोन गटांच्या दुराभिमानामुळे तो अधिक गुंतागुंतीचा बनलेला दिसतो. त्यामुळे राष्ट्रा-राष्ट्रांचा व राष्ट्रगटांचा जटिल स्वरूपाचा ध्येयवाद हा राजनयिक व्यवस्थे समोरील एक आव्हान ठरले आहे. ९) राजनयाची क्षेत्रवाढ :

समकालिन संदर्भात साम्राज्यवाद नष्ट होऊन राजनयिक संबंधाचे क्षेत्र जगव्यापी बनलेले दिसते. आशिया व आफ्रीका खंडातील नवस्वतंत्र राष्ट्रांनी राजनयाच्या क्षेत्रात घेतलेल्या भूमिकेतून एक प्रकारे राजनयिक क्रांती घडून आलेली दिसते. त्यातच नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आप-आपल्या गटात सामील करून घेण्याकरीता महासत्ताक राष्ट्रांमध्ये झालेली स्पर्धा, शस्त्रांबाबतची स्पर्धा, दहशतवादाने निर्माण केलेले आव्हान, अलिकडच्या काळात कोरोना - १९ महामारीने झालेली जगाची विभागणी यामुळे एक बाब स्पष्ट झाली की, जगातील कोणत्याही क्षेत्रात घडणाऱ्या संघर्षाचे पडसाद जगातील इतर सर्व राष्ट्रांवर उमटतात. जागतिक संबंधाच्या व्यापकतेमुळे राजनज्ञाचे क्षेत्र ही व्यापक बनलेले आहे. त्यामुळे काही बाबींसंदर्भात तडजोड करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे हे राजनयिक व्यवस्थेपुढे एक आव्हान म्हणून उभे राहतांना दिसत आहे.

सारांश ज्या कारणांनी राजनयाचे महत्व कमी झाले त्याच करणांनी राजनयाचे स्वरूपही बदलून गेले आहे. राजनय हे राजनयज्ञाच्या माध्यमातून चालत नसून आज प्रामुख्याने राष्ट्रप्रमुख स्वत:च दुसऱ्या राष्ट्रप्रमुखाशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करतांना दिसतात. एकंदरीत राजनयाचे आजच्या काळात महत्व कमी झाले असून आजचा राजनय हा राष्ट्र प्रमुखांच्या प्रयत्नांशी संबंधित झाला आहे. त्यास बहुतांशी संमेलनीय व लोकतंत्रात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे.

### ३.३.३ राजनयाची प्रस्तूतता :

राजनयाच्या तंत्रापुढे आजच्या संचारक्रांतीने व जागितक राजकारणाच्या बदलत्या स्वरूपाने अनेक आव्हाने निर्माण करून राजनयाच्या एकूण प्रक्रियेस प्रश्नांकित केलेले दिसत असले तरी राजनयास प्रस्तुत करणारी अनेक घटक कार्यरत असलेली दिसतात. त्यातील प्रमुख घटकांची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

१. **आण्विक युद्धापासून बचाव :** आजचे जग हे आण्विक शस्त्रास्त्रांनी सज्ज झालेले आहे. आण्विक युद्धाचा सामना जगास करावा लागला तर या पृथ्वीवर मानवप्राणी शिल्लक राहणार नाही असे म्हटले जाते. म्हणून आईन्सन्टाइन या संदर्भात म्हणाले होते, तिसरे महायुद्ध कोणत्या शस्त्रास्त्रांनी लढले जाईल हे मला सांगता येणार नाही मात्र चौथे महायुद्ध हे नक्कीच दगड-धोंडे व काठ्यांनी लढले जाईल म्हणजे जगात तिसरे महायुद्ध घडून आले तर संपूर्ण पृथ्वीतलाचा विनाश होण्याची भीती जागतिक मानवजातीवर आहे. अशा परिस्थितीत आण्विक युद्धापासून जगास वाचवण्याचे आश्वासक साधन म्हणून राजनयाकडेच पाहिले जाते. यादृष्टीने असे म्हटले जाते की, “आंतरराष्ट्रीय व्यवहारात प्रत्येक राष्ट्रापुढे साधारणत: तीन मार्ग उपलब्ध असतात. एक म्हणजे युद्ध करणे, आपल्या राष्ट्रीय हितास तिलांजली देणे वा राजनयाचा उपयोग करणे. आजच्या आण्विक युगात युद्धाचा मार्ग सर्व राज्यांनी त्याज्य ठरविला आहे. कोणतेही राष्ट्र आपल्या राष्ट्रीय हितसंबंधापासून दूर राहू शकत नाही अश्या परिस्थितीत राजनयाचा एकमेव मार्ग राज्यांकडे उपलब्ध असलेला दिसतो.

२. **शांतता प्रस्थापित करण्याचे साधन :** जगामध्ये कोणत्याही ठिकाणी युद्ध वा युद्धावस्था निर्माण झाली तर जगात परत शांतता व सौहादर्याचे वातावरण निर्माण करण्याकरिता राजनयाच्या तंत्राचाच तातडीने मार्ग स्वीकारला जातो. त्यामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे महत्वाचे उत्तरदायित्व राजनयाकडे आलेले दिसते. राजनयावरील या उत्तरदायित्वाने राजनयाचे स्वरूप केवळ द्विपक्षीय वा बहुपक्षीय न राहता ते जागतिक झाले आहे. त्यामुळे समकालिन संदर्भात राजनयाचे महत्व संपलेले नसून ते अधिक प्रस्तूत व अनिवार्य ठरलेले आहे असे दिसते.

३. **संवादाचे माध्यम :** जागतिक राजकारणाचा अभ्यास करतांनाही बाब स्पष्टपणे जाणवते की, राज्याच्या प्रत्यक्ष व्यवहारात अनेकवेळा राज्यां-राज्यांमधील राजनयिक संबंध अनेकवेळा तुटत असले तरी ही परिस्थिती कायम ठेवण्याकडे राज्यांचा कल आढळत नाही. उलट गंभीर संघर्षाचे प्रश्न असणारे शत्रु राष्ट्रे ही संवादा करीता पुढे येतांना आढळतात. भारत- चीन व भारत पाक यातील द्विपक्षीय चर्चा हे याचे उत्तम उदाहरण होय. मूल वादाच्या मुद्दयांना बाजुला ठेवून भारत- चीन व भारत - पाक यांनी इतर अनेक मुद्दयांवर परस्पर सहकार्याची भूमिका स्वीकारलेली दिसते. याकरीता या राष्ट्रांकडून संवाद करीता राजनयिक व्यवस्थेचाच प्रभावी उपयोग करून घेतलेला दिसतो.

४. **महासत्ताक राष्ट्रांमधील समन्वयाचे माध्यम :** जगाची द्विधृवीय विश्वरचना ही राजनयिक व्यवस्थेच्या दृष्टीने एक प्रमुख आव्हान वाटत असली तरी राजनयिक यंत्रणेनेचे दोन महासभांमधील संवादाची कोंडी फोडण्याचे कार्य पार पाडलेले दिसते. उदा. अमेरिका व सोव्हीएट रशियात शीत युद्धाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली होती व जग तिसऱ्या महायुद्धाच्या उबंरठ्यावर होते त्यावेळी ही कोंडी फोडण्याचे महान कार्य राजनयज्ञांनीच केले व दोन राष्ट्रप्रमुखांमध्ये (Hot Line) ची कल्पना प्रत्यक्षात उतरली. आज जगातील सर्व महासत्ताक राष्ट्रे ही "Hot Line" च्या माध्यमातून एकमेकांशी जोडली गेलेली दिसतात. राजनयिक प्रयत्नांमुळे अमेरिका व चीन, अमेरिका व सोव्हीएट रशिया, अमेरिका व द. कोरिया, चीन व जपान, अमेरिका व इजिप्त यांतील संवाद परत सुरू झालेला दिसतो.

५. **परस्परावलंबन :** आज जागतिक राजकीय व्यवस्थेचे स्वरूप हे केवळ राजकीय न राहता त्यास सांस्कृतिक, आर्थिक अंगानी ही प्रभावित केलेले दिसते. संचार व दळणवळणाच्या साधनात झालेल्या प्रचंड वाढीमुळे कोणतेही राज्य जागतिक प्रवाहापासून स्वत:ला वेगळे ठेवू शकत नाही. आपल्या गरजांच्या पूर्ततेकरिता अगदी शत्रूराष्ट्रांशी ही संबंधित राहने एक अपरिहार्य गरज म्हणून पुढे आली आहे. त्यामुळे सर्वच राष्ट्रांना सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक संबंधाची वाढ करणे आवश्यक ठरत आहे. ते राजनयाच्या माध्यमातूनच प्रत्यक्षात येऊ शकते.

६. **सह अस्तित्वाच्या राजनयाची अनिवार्यता :** आजच्या राजनयाचे स्वरूप हे परंपरागत राजनयापेक्षा अनेक अंगानी व अनेक अर्थांनी वेगळे आहे यात दूमत नाही. मात्र यावरून शासनाचे आजच्या काळातील महत्वच संपले आहे का राजनय ही यंत्रणाच अप्रस्तुत ठरली आहे असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरते. आजच्या राजनयाचे स्वरूप हे प्रामुख्याने ‘सहअस्तित्वाच्या राजनयाचे आहे. या राजनयाने जागतिक शांततेच्या दृष्टीने शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्यात पुढाकार घेतलेला दिसतो. आज कार्यन्वीत असणारे राजनयाचे मुक्त व लोकतांत्रिक राजनयाचे प्रतिमान हे उलट पारंपारिक राजनया पेक्षा अधिक जबाबदारीने व प्रभावीपणे कार्यन्वीत झालेले दिसते. भविष्यातही राजनयाचे महत्व वृद्धींगत होत राहणार हे समकालिन संदर्भावरून स्पष्ट दिसते.

**निष्कर्ष :** सारांश राजनय हे राष्ट्रा-राष्ट्रातील संवादाचे, राष्ट्रीय हितसंबंध साध्य करण्याचे व राष्ट्रांचे परराष्ट्रधोरण निर्धारीत करण्याचे एक महत्वाचे माध्यम आहे. प्राचीन काळापासून राजनयाचे तंत्र प्रचलित होते याचे संदर्भ पहावयास मिळतात. गुप्त राजनय हे राजनयाचे पारंपारिक तंत्र पहिल्या महायुद्धाचे प्रमुख कारण ठरले त्यामुळे राजनयज्ञ व राजनय या व्यवस्थेविषयी एक प्रकारे नकारात्मक प्रतिक्रिया उमटली. त्यातून बाहेर पडण्यासाठी राजनयिक व्यवस्थेचे स्वरूप अधिकाधिक प्रकट करण्याचा प्रयत्न झाला. आधूनिक काळात परिषद राजनय, शिखर राजनय, लोकतांत्रिक राजनय व संसदीय राजनय हे राजनयाचे प्रकार मुख्यत: प्रचलित असलेले दिसतात. दळणवळण व संचार माध्यमांमध्ये झालेल्या अचाट क्रांतीने, राजनयच्या आलेल्या राजकीय करणाने राजनयापुढे काही आव्हाने निर्माण झालेली दिसतात. महासत्ताक राष्ट्रांच्या भूमिका व राष्ट्र व राज्यांच्या किचकट ध्येयवादाने त्यात काही भर ही टाकलेली दिसते. असे असले तरी आजच्या काळात व भविष्यातही राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये संवाद साधण्याचे, युद्धापासून जागतिक जनसमूदायास वाचविण्यांचे जागतिक शांतता व सौहादर्य निर्माण करण्याचे व सहअस्तित्वाचा वैश्विक दृष्टीकोन विकसित करण्याचे कार्य राजनया शिवाय पूर्णत्वास जाऊ शकणार नाही या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## ३.३ आंतरराष्ट्रीय कायदा

प्राचीन काळापासून राज्या-राज्यातील व्यवहार काही निश्चित नियमांनुसार निश्चित झालेले दिसून येतात. बदलत्या परिस्थितीप्रमाणे या नियमांमध्ये सातत्याने भर पडलेली दिसते. राष्ट्र-राज्य व्यवस्थेचया उद्यमानंतर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राज्याराज्यातील संबंध काही निश्चित नियमानुसार निश्चित करण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यातूनच आंतरराष्ट्रीय कायद्यांची निर्मिती झालेली दिसते. आधूनिक काळात दळणवळणाच्या व संचार माध्यामांच्या क्रांतीने जगास अधिकाधिक जवळ आणले. त्यातून विश्व सत्याची व विश्व समाजाची कल्पना अधिकाधिक वृद्धींगत झाली. राष्ट्र-राज्यांचे परस्परावंलबन ही उत्तरोत्तर अधिकाधिक वृद्धींगत होत गेले त्याप्रमाणे विश्वसमूदायास काही वैश्विक नियमांप्रती बांधील करण्याची प्रवृत्ती बळावत गेली जी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या निर्मितीचे एक प्रमुख कारक ठरली. विकसित आंतरराष्ट्रीय संबंधामधून राष्ट्रांच्या परस्पर व्यवहारांकरीता सर्वमान्य अशा प्रथा, संकेत व रूढी निर्माण झाल्या व या प्रथा, संकेतामधूनच आंतरराष्ट्रीय कायद्यांचा ही उगम झाला. समकालीन संदर्भात, आंतरराष्ट्रीय कायदा हा आंतरराष्ट्रीय व्यवहारातील महत्वाचा घटक आहे. या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायदा या संकल्पनेचा संकल्पनात्मक अर्थ, आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायदा यातील मूलभूत स्वरूपाचा फरक, आंतरराष्ट्रीय कायद्यांची उगमस्थाने व संहितीकरण या घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. या दृष्टीने या घटकात ही संकल्पना मांडण्यात आली आहे.

### ३.३.१ आंतरराष्ट्रीय कायदा अर्थ व व्याख्या :

साधारणतः आंतरराष्ट्रीय कायदे म्हणजे सभ्य राज्यांनी परस्परात व्यवहार करण्याकरीता मान्य केलेल्या नियमांचा संग्रह होय. या संग्रहात मान्यताप्राप्त चालीरीती, प्रथा, संधी वा करार आंतरराष्ट्रीय न्यायालायांचे निर्णय व आंतरराष्ट्रीय संस्था यांचाही समावेश असतो.

आंतरराष्ट्रीय कायदा ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

१. **ब्रायली :** 'सभ्य राष्ट्रे परस्परांशी संबंध ठेवताना जे नियम व सिद्धांत त्यांच्यावर बंधनकारक आहेत असे मानतात अशा व सिद्धांताचा संग्रह म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदा होय.

२. **ओपन हाईम :** आंतरराष्ट्रीय कायदे अशा परंपरागत प्रथेवर आधारित नियमांचे नाव आहे की, ज्यास सभ्य राष्ट्रे परस्पर व्यवहार करताना कायदेशीररित्या बंधनकारक मानतात.

३. **हॅन्स कॅलसन :** सभ्य राष्ट्रांना परस्परांमध्ये व्यवहार ठेवणे ज्यामुळे शक्य होते अशा नियम व सिद्धांताचे संकलन म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदे होत.

४. **लॉरेन्स :** सुसंस्कृत राज्यांच्या सामान्य समूहाच्या परस्पर व्यवहाराचे निर्धारण करणाऱ्या नियमांना आंतरराष्ट्रीय कायदे असे म्हणतात.

५. **प्रो. हाईड :** 'सार्वभौम राज्यांचे परस्परांमधील व्यवहारांचे नियम म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदा होय.

**आंतरराष्ट्रीय कायदा वैशिष्टये :**

आंतरराष्ट्रीय कायदा या संकल्पनेच्या वरील व्याख्यांवरून आंतरराष्ट्रीय कायदा या संकल्पनेची काही प्रमुख वैशिष्टये पुढील प्रमाणे मांडता येतील.

१. जागतिक क्षेत्रात विविध राष्ट्रे परस्परांशी जे व्यवहार करतात त्या व्यवहारासंबंधीचे नियम असे आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप असते.

२. आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप हे प्रामुख्याने स्वच्छेवर आधारलेले असते. या नियमांचा स्वीकार सार्वभौम असणाऱ्या राष्ट्र राज्यांनी स्वेच्छेने केलेला असल्यामुळे ते त्यांच्यावर बंधनकारक मात्र नसतात.

आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या अंमलबजावणी व पालना संदर्भात सद्सद विवेक बुद्धी व सहभागी राष्ट्रांची सदिच्छा हा घटक महत्वाचा असतो.

**आंतरराष्ट्रीय कायदा स्वरूप :**

आंतरराष्ट्रीय कायदा हा कायदा या संज्ञेस पात्र ठरतो की नाही हा आंतरराष्ट्रीय कायदा या संकल्पनेच्या स्वरूपातील प्रमुख कळीचा मुद्दा मानला जातो. साधारणत: कायदा या संकल्पनेची आपण कोणती व्याख्या स्वीकारतो यावरून आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपाविषयीचा आपला दृष्टीकोन निश्चित होतांना आपणास दिसतो. आंतरराष्ट्रीय कायद्यास कायद्याचा दर्जा नाकारणे व आंतरराष्ट्रीय कायद्यास कायद्याचा दर्जा बहाल करणारे असे दोनही विचारप्रवाह आंतरराष्ट्रीय संबंधाच्या विचार प्रवाहात आठळतात त्याची मांडणी साधारणत: पुढील प्रमाणे करता येईल. आंतरराष्ट्रीय कायदा संकल्पनेस 'कायदा' ही संज्ञा नाकारणारा विचारप्रवाह :

### ३.३.२ आंतरराष्ट्रीय कायदा हा 'कायदा' या संज्ञेस पात्र ठरत नाही या समर्थनार्थ साधारणतः पुढील मुद्दे प्रस्तुत केली जातात.

**१. दंडशक्तीचा अभाव :** आंतरराष्ट्रीय कायदा हा प्रामुख्याने सद्सविवेक व सदिच्छा यावर आधारलेला आहे. त्यामुळे जॉन ऑष्टीन यासंदर्भात विवेचन करतांना म्हणतात, “ आंतरराष्ट्रीय कायद्यास दंडशक्तीचा आधार नसल्याने त्याचे उल्लघंन करणाऱ्या राष्ट्रांना कोणताही दंड केला जाऊ शकत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यास कायदा ही संज्ञा न वापरता त्यास आंतरराष्ट्रीय नैतिकतेचे नियम असे संबोधावे.”

**२. वैधानिक दृष्टया अपात्र :** हॉलंड यांनी कायद्याची वैधानिक दृष्टीकोनातून व्याख्या करतांना आंतरराष्ट्रीय कायद्यास 'कायदा' ही संज्ञा लागू करता येऊ शकत नाही हे स्पष्ट केले आहे. हॉलंड यांनी यासंदर्भात मांडणी करतांना म्हटले आहे. “आंतरराष्ट्रीय कायद्याच्या मागे कोणतीही सार्वभौम व वैधानिक शक्ती नाही. शिवाय आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी कोणत्याही सार्वभौम व्यवस्थेद्वारा होत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायदा या शब्दातील कायदा हा शब्द चुकीचा ठरतो.” हॉलंड यांच्या या मतास दुजोरा देतांना सॅलीसबरी असे म्हणतात की, 'आंतरराष्ट्रीय कायद्याचे कोणत्या न्यायालयाकडून सक्तीने पालन करून घेतले जात नसल्यामुळे यातील कायदा हा शब्द चुकीचा व भ्रम निर्माण करणारा ठरतो.

३. **अमंलबजावणी करणाऱ्या व्यवस्थेचा अभाव :** थॉमस हॉब्ज यांनी कायद्यासंदर्भात मांडणी करतांना कायद्यात भीती व शिक्षा या दोन तत्वांना प्राधान्य दिले होते. कायद्यामध्ये भीती व शिक्षा या दोन बाबी अंतर्भुत असल्याशिवाय मानवी समाज त्याचे पालन करणार नाही असे हॉब्ज यांना वाटते. त्यांच्या मते, 'मानवी समाज जो निसर्गत:च दुष्ट स्वार्थी व हिंसक आहे तो कायद्याचे पालन करणार नाही. समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याकरिता दंड शक्तीची कल्पना अत्यावश्यक असते. परंतु आंतरराष्ट्रीय कायद्याचा विचार करता याबाबी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संदर्भात अंतर्भूत असलेल्या दिसत नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उल्लघंनामुळे शिक्षा होईल अशी भीती राज्यांना वाटत नाही. परिणामी आंतरराष्ट्रीय कायदा अंमलात आणणे कठीन होते व जो कायदा अंमलात आणने शक्य नाही त्यास कायदा हे संबोधन वापरणे चुकीचे ठरते असे टिकाकारांना वाटते.

४. **दुय्यम दर्जा :** आंतरराष्ट्रीय कायदा व राष्ट्रीय कायदा यांमध्ये वास्तविकता आंतरराष्ट्रीय कायद्यांना प्रथमस्थान प्राप्त होणे आवश्यक आहे. मात्र वास्तवामध्ये राष्ट्रीय कायद्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्यांवर कायम कुरघोडी केलेली दिसते. आंततराष्ट्रीय कायदे व राष्ट्रीय कायदे हे परस्परांशी सुसंगत व समन्वय साधणारे असणे अपेक्षित आहे. मात्र राष्ट्रीय कायदे हे प्रत्येक राष्ट्र आपले राष्ट्रहित डोळ्यासममोर ठेवून करत असल्यामुळे ते स्वाभाविकत:च आंतरराष्ट्रीय कायद्यांशी विसंगत ठरतात. तरीही आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय कायद्यांचा अंमल व बोलबाला कायम राहतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्याचे दुर्बलत्व सिद्ध होते.

५. **लवचिकतेचा अभाव :** कायदा हा काळाचे अपत्य असतो. बदलत्या काळ व परिस्थिप्रमाणे त्या कायद्यात ही बदल वा दुरूस्ती होने अत्यावश्यक असते. मात्र आंतरराष्ट्रीय कायद्यामागे दुरुस्ती करणारी कोणतीही निश्चित अशी एकमेव संस्था वा व्यवस्था नसल्यामुळे बरेच आंततराष्ट्रीय कायदे अनावश्यकच नव्हे तर कालबाह्य ह ठरलेले आहेत. सोलारिज यासंदर्भात टिका करतांना म्हणतात की, आंतरराष्ट्रीय कायदा हा अनिश्चितता व भ्रम निर्माण करणारा आहे.

अशा पद्धतीने आंतरराष्ट्रीय कायदयांना कायदा ही संज्ञा वापरता येणार नाही याकरीता समर्थनार्थ मुद्दे मांडले जातांना दिसतात. न्या. लिडर यांनी यासंदर्भात टिप्पणी करतांना म्हटले होते की, 'आंतरराष्ट्रीय कायदा हा मुख्यात्वेकरून अलिखित व मान्यप्राप्त नसलेला कायदा आहे." दोन्हीं महायुद्धांच्या काळात आंतरराष्ट्रीय कायद्यांचा योग्य प्रमाणात भंग घडून आला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यांना 'कपोल कल्पना' अशी संज्ञा वापरण्यात आली होती.

### ३.३.३ आंतरराष्ट्रीय कायद्याचे समर्थन :

आंतरराष्ट्रीय कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा या संज्ञेसपात्र ठरत नाही या समर्थनार्थ बिनतोड युक्तीवाद करण्यात येत असले तरी आंतरराष्ट्रीय कायदा या संज्ञेस पात्र ठरतो हे मानणारा व त्याचे समर्थन करणारा विचारवंताचा एक मोठा प्रवाह असलेला दिसतो. आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार ही राष्ट्रीय कायद्याप्रमाणेच आहे. आंतरराष्ट्रीय समाज, विश्व समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायद्याशिवाय पर्याय नाही. अशी भूमिका घेत सर हेन्री मेन, हॉल, स्टॉर्क, पिट् कानेट, लॉरेन्स, ओपन टाईम यासारख्या विचारवंतानी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या समर्थनार्थ पुढील मुद्यांची मांडणी केलेली दिसते.

१. **आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार मान्यताप्राप्त :** आंतरराष्ट्रीय कायदा हा 'कायदा' या संज्ञेस पात्र ठरतो हे स्पष्ट करतांना आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार ही राष्ट्रीय कायद्याप्रमाणेच असल्याचे सप्रमाण दाखवून देतात. राष्ट्रीय कायद्याप्रमाणेच आंतरराष्ट्रीय कायद्यांचा उगम ही प्रथा परंपरा यातूनच झालेला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील एखादी प्रथा जर एखाद्या राष्ट्राने मोडली तर त्याविरोधात जागतिक जनमत तयार होते त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेले संकेत वा प्रथा कोणतेही राष्ट्र सहसा मोडत नाहीत. राजदूतांचे वर्तणूकीसंबंधीचे नियम वा संकेत हे आंतरराष्ट्रीय प्रथांमधूनच अधिकाधिक दृढ झालेले दिसतात हे संकेत प्रथाच आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या उगमांचा महत्वाचा आधार असल्याकारणाने हॉब्ज या संदर्भात मांडणी करतांना म्हणतात, 'आंतरराष्ट्रीय कायदे हे खऱ्या अर्थाने कायदे आहेत. कारण इतर कायद्यांप्रमाणे त्यांचा उगम साठी व परंपरांमधूनच झालेला आहे व त्याचे पालन करणे अनिवार्य ठरले आहे.

२. **स्वइच्छा हाच कायदा पालनाचा महत्वाचा आधार :**आंतरराष्ट्रीय कायदा हा 'कायदा' या संज्ञेस पात्र नाही या समर्थनार्थ आंतरराष्ट्रीय कायद्यामागे अंमलबजावणी करिता भीती व दंडशक्तीचा अभाव आहे हे कारण प्रामुख्याने प्रस्तूत केले जाते. परंतु आंतरराष्ट्रीय कायद्याचे समर्थक हे दाखवून देतात की, 'मानव कोणत्याही कायद्याचे पालन केवळ भीतीमुळे करत नसून कायद्याच्या पालनास आपले हित आहे या भावनेतूनच कायद्याचे पालन प्रामुख्याने घडून येते. प्राचीन काळात कोणतेही सरकार नव्हते तरीही लोक कायद्याचे पालन करत होते हे ऐतिहासिक तथ्य त्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याचे समर्थक प्रस्तूत करतात. राष्ट्रीय कायद्यांच्या अंमलबजावणीची वस्तुस्थिती समोर ठेवतांना ते म्हणतात, "आजही प्रत्येक राष्ट्रीय कायद्यासाठी अंमलबजावणी राष्ट्रीय सरकार ही करू शकत नाही. राष्ट्रीय सरकारांनाही जनतेच्या इच्छे वरच विसंबून रहावे लागते. त्यामुळे राष्ट्रीय कायद्याप्रमाणेच आंतरराष्ट्रीय कायद्यांचीही स्थिती आहे. आंतरराष्ट्रीय जगतात राष्ट्रे स्वेच्छेने कायद्याचे पालन करतात कारण त्यात त्यांचे हित असते यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यामागे कोणतीही सार्वभौम सभा नाही. या कारणावरून आंतरराष्ट्रीय कायदा हा कायदा नाही असे प्रतिपादन करणे चुकीचे ठरते. म्हणूनच हेन्री मेन यासंदर्भात म्हणतात की, आंतरराष्ट्रीय कायद्यामागे त्याचे पालन करून घेण्याकरीता सार्वभौम सभा असण्याची आवश्यकता नाही.

३. **अमंलबजावणीची शाश्वती :**आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी दुर्मिळ असते त्यामुळे त्यास कायदा ही संज्ञा देने अप्रस्तुत ठरते त्यास फारतर नैतिक नियम संबोछावे असे मत मांडणाऱ्या विचारप्रवाहास पीट कॉबेट यांनी उत्तर देतांना असे म्हटले आहे की, "आंतरराष्ट्रीय कायद्यास कायद्याचा दर्जा देने आवश्यक आहे. कारण आंतरराष्ट्रीय कायद्यास केवळ नैतिक नियम मानणे चुकीचे आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यातील नियमांचे पालन हे ऐच्छिक नसून वास्तवात ते अनिवार्य ठरते. आंतरराष्ट्रीय कायद्याची कित्येक वेळा सक्तीने ही अंमलबजावणी केली जाते." हे ही ते सोदाहरण दाखवून देतात. आज आंतरराष्ट्रीय कायद्यामागे जागतिक लोकमत, आंतरराष्ट्रीय संघटना, सुरक्षा मंडळाची प्रभावी शक्ती उभी आहे. या घटकांनी आंतरराष्ट्रीय कायद्यांचा भंग करणाऱ्या अनेक राष्ट्रांविरोधात सक्तीने कार्यवाही करून आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करण्यास भाग पाडलेले दिसतात.

**४. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अस्तित्व :**संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता विविध संस्थाची निर्मिती केली आहे. त्यातही आंतरराष्ट्रीय न्यायालय व आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय यांचे निर्णय हे सभासद राष्ट्रांवर बंधनकारक मानले जातात. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या माध्यमातून तर दंड वा शिक्षा ही दिली जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची दंडशक्ती आंतरराष्ट्रीय कायद्याच्या पाठीशी असल्याने आंतरराष्ट्रीय कायद्यास 'कायदा' ही संज्ञा लागू होते असे समर्थन या दृष्टीने प्रस्तुत केले जाते.

**५. आवश्यक घटकांची पूर्तता :** कायदा ही प्रक्रिया प्रत्यक्षात येण्याकरिता व कार्यन्वीत करण्याकरिता काही घटकांची आवश्यकता वा अस्तित्व अनिवार्य मानले जाते. आंतरराष्ट्रीय कायद्याचे समर्थकांचे म्हणणे या दृष्टीने असे दिसते की, आंतरराष्ट्रीय कायदा या अटींची पुर्तता करतो. ओपन टाईम यांनी यासंदर्भात मांडणी करताना असे म्हटले आहे की, साधारणत: कायद्या करीता तीन बाबी आवश्यक असतात. एक म्हणजे समाजाची आवश्यकता, दूसरे म्हणजे विकसित असे सामाजिक व्यवहाराचे नियम व तिसरे म्हणजे अशा पद्धतीच्या नियमांना असणारी समाजाची मान्यता. या तीनही निकषांच्या आधारे आंतरराष्ट्रीय कायद्यास पडताळून पाहता आजच्या काळात आंतरराष्ट्रीय समाज निर्माण झाला आहे हे स्पष्ट दिसते. त्याचबरोबर पॅरीस घोषणापत्र, हे सम्मेलन संयुक्त राष्ट्रांची सनद, विभिन्न राष्ट्रांमधील करार, इत्यादीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दृष्टीने परस्पर व्यवहारांचे नियम निश्चित झालेले दिसतात. या नियमांना जगातील बहुतांश राष्ट्रांनी स्वीकारून मान्य केलेले दिसते. त्यामुळे 'कायदा' या संज्ञेस आवश्यक अटींची पुर्तता करण्यात आंतरराष्ट्रीय कायदा यशस्वी होतांना दिसतो.

एकंदरीत, राष्ट्रीय कायद्याप्रमाणेच आंतरराष्ट्रीय कायदाही रूठी, प्रथा, परंपरा, संकेत, तह यातून विकसित झाले आहेत. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या पालनात आपले हित आहे हे विश्व जनसमूदायास व राष्ट्र-राज्यांनाही उत्तरोत्तर मान्य होत आहे. जागतिक लोकमत व संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संघटनांचा आधार व बळ आंतरराष्ट्रीय कायद्यामागे उभे आहे. त्यामुळे आंततराष्ट्रीय कायद्यास 'कायदा' हा दर्जा प्राप्त होण्यास हरकत नसावी. तरीही आंतरराष्ट्रीय कायदा हा कायदा आहे किंवा नाही हे मूलत: आपण कायदा या संकल्पनेची कोणती व्याख्या स्वीकारतो यावर मुख्यत: अवलंबून आहे. हॉब्ज हॉलंड व ऑल्टीन यांनी कायद्याची वैधानिक दृष्टीकोनातून व्याख्य करतांना म्हटले आहे की, “सार्वभौम सत्तेची आज्ञा म्हणजे कायदा" या व्याख्येप्रमाणे आंतरराष्ट्रीय कायदा 'कायदा' या संज्ञेस पात्र ठरत नाही. परंतु वास्तवात कायद्याची निर्मिती केवळ सार्वभौम शक्तीच्या इच्छेचा परिपाक असतो हे म्हणजे वस्तूस्थितीचा विपर्यास ठरतो. कारण समाजातील रूढी, परंपरा चालीरीती, समाजमान्यता यातून ही कायद्याच्या निर्मितीस चालना मिळते, हातभार लागतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात ही आज कोणतेही राष्ट्र स्वतंत्र वा अलिप्त राहू शकत नाही. परस्परावलंबन व परस्पर सहकार्य या भावनेतून आंतरराष्ट्रीय राजकारणात ही काही संकेत - प्रथा निर्माण झालेल्या दिसतात. त्यास जागतिक लोकमताचा ही पाठींबा वृद्धींगत होतो आहे, संयुक्त राष्ट्रे, सुरक्षा परिषद, आम सभा, आंतरराष्ट्रीय न्यायालये यांची शक्ती या कायद्यांना कार्यन्वीत करण्यात महत्वाची भूमिका बजावत आहेत त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायदा ही राष्ट्रीय कायद्याप्रमाणेच आज प्रभावी ठरतांना दिसतो आहे.

### ३.३.४ आंतरराष्ट्रीय कायद्याची उगमस्थाने :

आंतरराष्ट्रीय कायद्याचा विकास झाला व त्याची उगमस्थाने कोणती यासंदर्भात आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासकांमध्ये मतमतांतरे आढळतात. साधारणत: असे म्हणता येईल की, आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्थान म्हणजे ते कायदे पालन करण्यास बाध्य ठरविण्याऱ्या शक्ती होत. हा विचार प्रामुख्याने ओपन हाईम यांच्या मांडणीमध्ये आढळतो. तर काही विचारवंत मात्र आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्थान म्हणून आंतरराष्ट्रीय प्रथा, परंपरा, संकेत व विभिन्न राष्ट्रातील करार व संधीना अधिक प्राधान्य देतात. तर काही विचारवंताना मात्र आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे निर्णय व त्यासंदर्भातील लिखित स्वरूपाचे प्रलेख ही आंतरराष्ट्रीय कायद्याची प्रमुख उगमस्थाने वाटतात. आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेतील ३८व्या कलमात आंतरराष्ट्रीय कायद्याची उगमस्थाने मांडलेली दिसतात. आंतरराष्ट्रीय सम्मेलने, आंतरराष्ट्रीय रीतीरिवाज, राज्यांनी मान्यता दिलेले सिंध्दात व निरनिराळ्या राष्ट्राच्या विधिवेत्त्यांनी न्यायासंबंधी दिलेले निर्णय ही प्रमुख चार उगमस्थाने आंतरराष्ट्रीय न्यायालायाने प्रस्तुत केलेली दिसतात. आंतरराष्ट्रीय कायद्याची काही प्रमुख उगमस्थानांची चर्चा पुढील मुद्दयांच्या आधारे करता येईल.

१. **प्रथा-परंपरा व संकेत :** प्रथा, परंपरा व संकेत हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे सर्वात प्राचीन व प्रमुख उगमस्थान मानले जाते. प्रथा, परंपरा व संकेत हे प्रत्येक देशातील ऐतिहासिक प्रगतीबरोबर उत्पन्न होत असतात व कालांतराने देशाच्या कायद्यात त्या विलीन होऊन जातात. ज्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय कायदे व संधी यांची व्याख्या करणे शक्य होत नाही अशा ठिकाणी रीतिरिवाज वा संकेताचा दाखला घेतला जातो. उदा. पॅक्वेट हवाना व लोला' या खटल्याचा आंतरराष्ट्रीय न्यायालयाने ही राज्यांच्या चालीरीतींचा संदर्भ घेऊनच निर्णय दिला होता.

   यासंदर्भात अशी मांडणी केली जाते की, "एखादी प्रथा जेव्हा प्राचीन व तर्कसंगत असते. जिचे सदैव पालन केले जाते. जिच्यात एकरूपता, सुनिश्चितता व अनिवार्यता असते. तेव्हा त्यास चालीरीतीचे स्वरूप प्राप्त होते. अशा रूढी व चालीरीतींचे वर्षानुवर्ष पालन झाल्यानंतर त्यांचा कायद्यात समावेश होतो. अशा पद्धतीच्या काही प्रथा व संकेताना राज्यांनी मान्यता दिल्या नंतर त्याचे आज आंतरराष्ट्रीय कायद्यात रूपातर झालेले दिसते. उदा. नाविक युद्धकाळात ही मासे पकडणाऱ्या जहाजांचे नुकसान करू नये, राजदूतांना प्रदेश बाह्यतेचा नियम लागू असावा, रेड क्रॉसला कार्य करण्याची पूर्व मुभा असावी इत्यादी. अशा रीतीने रूढी, परंपरा, संकेत हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रमुख उगमस्थान असले तरी त्यांचा विकास मात्र अतिशय मंदगतीने होत असलेला दिसतो. त्याचबरोबर अशा पद्धतीच्या प्रथा- संकेतांना इतर राज्यांची मान्यता देणे, त्या परस्परांना पूरक व सोयीस्कर असणे ही तेवढेच आवश्यक असते.

२. **संधी किंवा तह :**

   विभिन्न राष्ट्रांमध्ये होणारे तह, करार वा संधी हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे एक महत्वाचे उगमस्थान मानावे लागेल. परस्पर हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने ज्यावेळी राष्ट्रे एकत्र येऊन तह वा करार करतात तेव्हा ही संधी वा करार आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्थान म्हणून ही भूमिका पार पाडतो. परंतु तह वा संधी ही केवळ दोन राष्ट्रांपुरती मर्यादित असेल तर मात्र त्यास आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्थान मानता येत नाही.

असा करार वा संधीना ज्यावेळी इतर राष्ट्रे मान्यता देता तेव्हा हे करार आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्थान म्हणून महत्वाची भूमिका पार पाडतात.

आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्थान म्हणून १६४८ च्या वेस्टफालियाच्या तहाचे, १८५६ च्या पॅरीस घोषणापत्राचे, १८१५ च्या व्हिएन्ना संमेलनाचे, संयुक्त राष्ट्रांच्या सनदेचे, मानवी हक्क जाहीर नाम्याचे संधी, करार वा घोषणापत्राच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्थान म्हणून भूमिका अधोरेखित करणारे आहे. अशा पद्धतीच्या संधी या तहातून आंतरराष्ट्रीय कायद्याच्या निर्मिती संदर्भात भाष्य करतांना ओपन हाईम म्हणतात, "जरी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात केंद्रिय स्वरूपाची विधिमंडळे नसली तरी संधी पालनाद्वारे आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन सक्तीने केले जाऊ शकते. या राष्ट्रांमध्ये संधी पालन हाच खरा व्यवहाराचा नियम असतो. राष्ट्रा-राष्ट्रातील अशा संधीना संबंधित राष्ट्रांची विधिमंडळे व राष्ट्र प्रमुख यांची मान्यता मिळणे आवश्यक असते.

**३. न्यायालयांचे निर्णय :**

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उगमस्थानामध्ये न्यायालयीन निर्णयांनी ही वेळोवेळी महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या उगमाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय न्यायालय, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय, पंच न्यायालय, अधिग्रहण न्यायालये व राष्ट्रीय न्यायालयांनी महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. राष्ट्रीय न्यायालयाच्या निर्णयातूनही आंतरराष्ट्रीय कायद्याच्या निर्मितीस मदत आलेली दिसते. उदा. मान्यतेविषयीच्या आंतरराष्ट्रीय कायद्यास राष्ट्रीय न्यायालयीन प्रक्रियेनेच हातभार लावला हे सर्वश्रूत आहे. पंच न्यायालयामध्ये न्यायाधिशा ऐवजी एखाद्या पंचाकडे वाद सोपविला जातो व त्यांनी दिलेला निर्णय बंधनकारक मानला जातो तर अधिग्रहण न्यायालये ही युद्धमान राष्ट्रांची समुद्रावर जप्त केलेल्या मालाची वैधता पारखण्यांसाठी निर्माण करण्यात आलेली न्यायालये असतात. अधिग्रहण न्यायालये ही विधिमंडळे वा कार्यपालिकांच्या दडपणापासून मुक्त राहत असल्याकारणाने त्या न्यायालयांनी दिलेले निर्णय हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे एक उगमस्थान म्हणून महत्वाची भूमिका बजावताना दिसते.

या सर्व न्यायालयांमध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयांनी दिलेले निर्णय हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रमुख उगमस्थान ठरते हे मान्य करावे लागेल. कारण आंतरराष्ट्रीय न्यायालयांनी दिलेले निर्णय हे प्रभावी आंतरराष्ट्रीय कायदे, प्रथा, परंपरा व जागतिक लोकमत इत्यादी बाबी लक्षात घेऊन दिलेले असतात. प्रादेशिक सार्वभौमत्व, राज्याचे क्षेत्राधिकार, तटस्थता यासंदर्भात आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेले निर्णय हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रमुख उगमस्थान ठरले आहेत. आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेचे ५९ वे कलम यादृष्टीने महत्वाचे मानले जाते. या कलमान्वये हे स्पष्ट होते की, 'या न्यायालयाचे निर्णय संबंधित राज्यांना विशिष्ट विषयाबाबत लागू होतात. या निर्णयांच्या नंतर इतर खटल्यात कायद्याप्रमाणे उपयोग केला जातो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायालय हे आंतरराष्ट्रीय कायद्यांचे प्रमुख उगमस्थान ठरते.

### ४. न्यायिक बुध्दी व ग्रंथ :

आंतरराष्ट्रीय न्यायालय व इतर ही प्रचलित न्यायालये अस्तित्वात असणाऱ्या कायद्यान्वये निर्णय देण्याचे प्रमुख कार्य पार पाडणं असतात. परंतु अपवादात्मक परिस्थितीत न्यायालया समोर अशा काही समस्या वा प्रश्न येतात ज्या संबंधीचे नियम प्रचलित नसतात. अशावेळी परिस्थितीचा सारासार विचार करून न्यायाधीश आपल्या सदसद्विवेक बुद्धीचा वा न्यायबुध्दीस अनुसरून निर्णय देतात. पुढे हे निर्णय अशाच स्वरूपाच्या खटल्यात एक प्रकारे कायद्याचे स्वरूप धारण करतात.

त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय कायद्यांचा अभ्यास करणारे न्यायालीन प्रक्रियेत निष्णात असणारे कायदेपंडीत, विधिज्ञ, विचारवंत, तत्वज्ञ हे आपल्या अभ्यास व चिंतनातून वेळोवेळी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संदर्भात भाष्य करतात, टिका टिप्पणी करतात, लेखन व ग्रंथाची निर्मिती करतात त्याचा संदर्भही अनेक वेळा आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उगमस्थानास पूरक ठरतो. ग्रोरियस, जेन्टली, डी. वेटेल, डामसी इत्यादींचे यासंदर्भातील योगदान महत्वपूर्ण आहे.

### ५. आंतरराष्ट्रीय शिष्टाचार :

आंतरराष्ट्रीय व्यवहारात विभिन्न राष्ट्रे परस्परांशी संबंध ठेवताना शिष्टाचाराचे पालन करतात. काही संकेत पाळतात. यातूनही आंतरराष्ट्रीय कायद्याच्या निर्मितीच्या दृष्टीने महत्वाची पार्श्वभूमी निर्माण होतांना दिसते. पुढील काळात हेच संकेत वा प्रथा आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूपही धारण करतात. उदा. राजदूताचे स्वागत करणे, त्यांना देण्यात येणारा सन्मान व स्वातंत्र्य याबाबी शिष्टाचार म्हणूनच सर्वप्रथम प्रस्तुत झाल्या होत्या. कालांतराने त्याचे आंतरराष्ट्रीय कायद्यात रूपांतर झालेले दिसते. ओपन टाईम या संदर्भात म्हणतात, "आंतरराष्ट्रीय शिष्टाचारांनी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विकासास हातभार लावला आहे. "

### ६. ऐतिहासिक दस्ताऐवज :

ऐतिहासिक दस्ताऐवज वा कागदपत्रे ही आंतरराष्ट्रीय कायद्याचे एक उगमस्थान म्हणून मान्य करावे लागेल. यामध्ये प्रामुख्याने विभिन्न देशांमध्ये होणारा पत्रव्यवहार राजनयज्ञांना वेळोवेळी राष्ट्रप्रमुखांकडून होणारे मार्गदर्शन काही नोंदी, अनुभव यांचे संकलन कालांतराने उजेडात येते पुढे ते आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उगमाचे एक प्रमुख कारण ही ठरतांना दिसते.

अशा पद्धतीने आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्थान म्हणून विभिन्न घटक आपली भूमिका पार पाडतांना दिसतात. आंतरराष्ट्रीय कायद्याची अशी विविध उगमस्थाने वा स्त्रोत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने काही पेच प्रसंग ही निर्माण झालेले दिसतात. त्यातील प्रमुख समस्या ही आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकणा संदर्भात आढळते. आंतरराष्ट्रीय कायद्याची अशी अनेक उगमस्थाने आढळत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यांना अनिश्चितता व अस्पष्टतेच्या दोषाने ही ग्रासलेले दिसते. यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण करणे अत्यावश्यक ठरते. बुल्जे यासंदर्भात म्हणतात की, " हे संहितीकरण शास्त्रीय पद्धतीने व्हावयास हवे. तसेच सर्व संबंधित राष्ट्रांना ते मान्य असले पाहिजे. आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण केल्यास त्यास सुनिश्चित स्वरूप प्राप्त

होईल व कोठेही व कोणत्याही बाबतीत संभ्रम राहणार नाही. न्यायाधिशानांही निर्णय देणे सुलभ होईल." पुढे यावर भाष्य करतांना ते म्हणतात, "परिणामत: आंतरराष्ट्रीय स्तरावर एक वैधानिक व्यवस्था तयार होऊन जागतिक शांतता तर निर्माण होईल परंतु त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय कायदे सार्वभौम राष्ट्रांना विश्वसमूदायात परावर्तित करतील."

### ३.३.५ आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण :

साधारणत: कायद्याचे संहितीकरण म्हणजे विधि नियमांचे एकत्रीकरण होय. कायद्याचे संहितीकरण या प्रक्रियेत एखाद्या विशिष्ट विषयावरील सर्व कायदे व नियमांचे संकलन केले जाते. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संदर्भात सर्वच बाबतीत विखूरलेपणाचा दोष सार्वत्रिक स्वरूपात आढळत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकणाची सर्वाधिक निकड प्रतिपादन केली जाते. आंतरराष्ट्रीय कायदे हे प्रामुख्याने राज्यांच्या विभिन्न प्रथा, रूढी, संधी व न्यायालयीन निर्णयात विखुरलेल्या आढळतात. या दृष्टीने एखाद्या विषयावरील सर्व विस्कळीत वा विखुरलेल्या नियमांचे एकत्रीकरण करून त्यात आवश्यक त्या सुधारणा वा बदल करून त्यांचे योग्य भाषांतर करून त्याची पुर्नरचना वा सूत्रबद्ध मांडणी करणे म्हणजे संहितीकरण होय' असे म्हटले जाते. संहितीकरण म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्यांना सुव्यवस्थित, क्रमबद्धतेत आणि स्पष्ट अर्थ ध्वनित होईल अशा शब्दात मांडून त्या नियमांना एकत्र संकलित करणे होय. यादृष्टीने आंतरराष्ट्रीय कायद्याचे होणारे संहितीकरण हे शास्त्रशुद्ध तर असलेच पाहिजे परंतु त्याचबरोबर ते संबंधित राष्ट्रांना एवढेच नव्हे तर सर्व राष्ट्रांना मान्य असले पाहिजे. या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणास प्राधान्य देणे गरजेचे ठरते.

### ३.३.६ संहितीकरणाचे गुण :

संहितीकरणाचे गुण पुढील प्रमाणे स्पष्य करता येतील.

१. **अनिश्चितता दूर होते :** संहितीकरणामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यातील अनिश्चितता दूर होते. आज विभिन्न राज्यांचे परस्परविरोधी नियम आढळतात. कायद्याच्या संहितीकरणामुळे हे नियम एकत्र आणले जाऊन त्यांच्यात एकसूत्रता निर्माण केली जाते.

२. **न्यायाधिशांकरीता मार्गदर्शक:** काळजीपूर्वक तयार करण्यात आलेल्या संहितीकरणामुळे आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायधिशांना न्याय देतांना आंतरराष्ट्रीय कायद्यांचे योग्य मार्गदर्शन होते त्यामुळे न्यायधिशांना न्याय देणे सुलभ होते.

३. **नव दृष्टीकोनाची ओळख:** समाजाच्य प्रगती बरोबर बदलत्या काळाशी सुसंवादी होण्याकरिता प्रचलित प्रथा वा नियम बदलने ही आवश्यक असते. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यात नवनवीन संशोधन करण्यास व नवदृष्टीकोन आत्मसात करण्यास मदत होते.

४. **क्लिष्टता दूर होते :** आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणामुळे राज्या-राज्यातील मतभेद दूर करण्याकरिता मदत होते. कायद्याच्या संहितीकरणाने आंतरराष्ट्रीय कायद्यांचे सुस्पष्टता येणष. त्याचबरोबर त्यातील क्लिष्टता जाऊन त्यातून सहजता येते.

**३.३.७ संहितीकरणातील दोष :**

आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या संहितीकरणातून काही दोष ही निर्माण होतांना दिसतात. त्यांची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

१) **नैसर्गिक विकास थांबतो :**संहितीकरणाच्या प्रक्रियेने आंतरराष्ट्रीय कायद्याची नैसर्गिक वाढ थांबते अशी टिका केली जाते. आंतरराष्ट्रीय कायदे हे जागृत, वृध्दींगत होणारे व सतत विकसित होणारे असे असले पाहिजेत असे टिकाकारांना वाटते. आंतरराष्ट्रीय कायद्यांना लेखबद्ध करणे म्हणजे बदलत्या परिस्थितीत त्यांचा उपयोग न घेणे ठरेल. टिकाकारांच्या मते आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणामुळे नवीन समस्या निर्माण होतील. कारण संहितीकरणामुळे कायद्यामध्ये गतिशीलता राहणार नाही व ते कुचकामी ठरतील.

२) **न्यायिक तत्वांचा लोप :**आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण झाल्यास कायद्याचा अर्थ लावीत असतांना न्यायाधीश शब्दांचा किस पाडतील व त्यामुळे त्यातील न्यायिक तत्वच नष्ट होण्याचा धोका उत्पन्न होतांना दिसतो.

**३.३.८ आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरणाचे प्रयत्न :**

१) **व्यक्तिगत प्रयत्न :** आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणाचा प्रथम प्रयत्न जेरेमी बेथॉम यांनी केलेला दिसतो. सुसंस्कृत राज्यांमधील परस्पर व्यवहार सुरळीत व्हावेत व शांतता नांदावी याकरीता संहितीकरण करणे गरजेचे आहे असे जेरेमी बेथॉम यांनी विशद केले होते. त्यानंतरच्या काळात १८६३ साली फ्रॉंसीस लीबर यांनी "A code for the Goverment Armies" या ग्रंथातून आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणाचा प्रयत्न केला. १८६८ मध्ये डेव्हीड हूडले ने आंतरराष्ट्रीय करार व त्याकाळातील राज्यांच्या व्यवहारांबाबत ही संहितीकरण करून एक ग्रंथ प्रकाशित करून आंतरराष्ट्रीय कायदच्या संहितीकरणाचा महत्वाचा प्रयत्न होता. १८७२ मध्ये डेव्हीड डूडले फिल यांनी Drft Out Line of International Code हे पुस्तक लिहून आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण करण्याच्या दृष्टीने महत्वाचे योगदान दिले.

२) **संस्थात्मक प्रयत्न:** आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणामध्ये विचारवंताच्या बरोबरीने काही संस्थात्मक प्रयत्न ही महत्वाचे ठरले. उदा. १८७३ मध्ये पॅरीसमध्ये स्थापन झालेल्या 'Istitute - De Dorit International' या संस्थेने Manual of the Laws of Land हे पुस्तक आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहतीकरणाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले. जर्मनीतील 'कील' येथील 'German Institute for International Recht' व १९१२ साली 'American Institute of International Law या संस्थानी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणात महत्वाचे योगदान दिलेले दिसते.

३) **यूरोपिय राष्ट्रांचे प्रयत्न :** आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणामध्ये यूरोपिय राज्यांनी वेळोवेळी आयोजित केलेल्या परिषदांनी मोठी कामगिरी बजावलेली दिसते. उदा. इ.स. १८६४ मधील जिनेव्हा परिषदेने युद्धातील घायाळ सैनिकांच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय नियमांचे संहितीकरण करण्यास महत्वाचे योगदान दिले. १८७४ साली भरलेल्या ब्रुसेल्स परिषदेने ही स्थल युद्धाच्या नियमांचे संहितीकरण करण्याचा प्रयत्न केला परंतु राज्यांनी त्यास संमती दिली नाही. पुढे १८९९ साली पाहिली हेग सभा

संपन्न झाली. या परिषदेत स्थल युद्धाचे नियम व युद्धातील घायाळ आजारी सैनिकांना देण्याच्या वागणूकी बाबत संहितीकरणाचे प्रयत्न झाले. १९०७ साली झालेल्या दुसरे हेग संमेलन पार पाडले. या संमेलनात जलयुद्धाचे नियम, तटस्थ राज्यांचा अधिकार व त्यांच्या कर्तव्यांविषयी विचार मांडण्यात आला.

४) **आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रयत्न :** आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणामध्ये आंतरराष्ट्रीय संघटनांचे ही योगदान महत्वाचे मानले जाते. उदा. राष्ट्रसंघाने १९२४ मध्ये या संदर्भात एक विशेषज्ञांची समिती नेमून त्यावर आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणाचे कार्य सोपविले होते. या समितीने दिलेल्या अहवालावर विचारविनिमय करण्याकरीता राष्ट्रसंघाच्या वतीने १९३० मध्ये हेग येथे एका परिषदेचे आयोजन करण्यात आले. हेग सभेमध्ये राष्ट्रीयता, प्रादेशिक समुद्र व परकीयांच्या संपत्तीविषयक नुकसान भरपाई बाबतच्या नियमांचा विचार करण्यात आला. मात्र ही परिषद यशस्वी होऊ शकली नाही. तरीही आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणाच्या आंतरराष्ट्रीय संघटनाच्या पातळीवरून झालेला तो पहिला प्रयत्न मानला जातो.

५) **संयुक्त राष्ट्रे व आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण :** १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेनंतर आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरण व अंमलबजावणीस खऱ्या अर्थाने वेग आला. या दृष्टीने संयुक्त राष्ट्र संघटनेने १९४७ साली आंतरराष्ट्रीय विधि आयोगाची स्थापना केली. या आयोगाकडे प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या संहितीकरणाचे कार्य सोपवण्यात आले होते. या आयोगाने आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण करताना पुढील तीन बाबींना प्रामुख्याने अग्रक्रम दिला. १) संधीचे कायदे २) संवाद पद्धती व ३) महासमुद्रा संबंधीचे कायदे. जवळ जवळ २० वर्ष या आयोगाने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणाचे कार्य करून १९७१ साली या आयोगाने आपला अंतिम अहवाल संयुक्त राष्ट्रांकडे सोपवला. या आयोगाने आपल्या अहवालात आठ विषया संबंधीच्या नियमांचे संहितीकरण केलेले आढळते. ते प्रमुख आठ विषय पुढील प्रमाणे होते.

१) महासमुद्रावरील अधिकार २) प्रादेशिक समुद्रावरील अधिकार ३) राष्ट्रीयता ४) राज्यविहिनता ५) संधी संबंधातील कायदे ६) राजनैतिक व्यवहार आणि स्वातंत्र्य ७) कौन्सुलरचे अधिकार व स्वातंत्र्य आणि ८) लवादाची पद्धती.

आंतरराष्ट्रीय विधिआयोगाने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहिती करणाबरोबरच राज्याचे अधिकार व कर्तव्यही आपल्या अहवालात नमूद केली.

आंतरराष्ट्रीय विधिआयोगाने राज्याची चार प्रमुख अधिकार बहाल केलेले दिसतात. त्यात प्रामुख्याने १) स्वसंरक्षण २) स्वातंत्र्य ३) प्रादेशिक सार्वभौमत्व व ४) राष्ट्राराष्ट्रामधील समानता यांचा समावेश होतो.

आंतरराष्ट्रीय विधिआयोगाने राज्यास ज्याप्रमाणे अधिकार बहाले केले आहेत त्याप्रमाणेच काही मूलभूत कर्तव्य ही सांगितली आहेत. त्यात प्रामुख्याने पुढील कर्तव्य नमूद करण्यात आलेली दिसतात.

१. दुसऱ्या राज्याच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

२. दुसऱ्या राज्यातील गृहयुद्धास प्रोत्साहन न देणे.

३. आंतरराष्ट्रीय शांततेस धोका निर्माण होईल अशी परिस्थिती स्वत:च्या राज्यात निर्माण न होऊ देणष.

४. कोणत्याही राज्याच्या प्रादेशिक एकता व राजकीय स्वातंत्र्य यास धोका न पोहचविणे.

५. युद्धाच्या मार्गाचा अवलंब न करणे.

६. आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करणे.

७. आंतरराष्ट्रीय वाद व संघर्षाचे शांतीपूर्वक वाटाघाटीच्या मार्गाने निवारण करणे.

८. राज्याने आपल्या नागरिकांना अधकार देताना धर्म, जाती, भाषा, लिंग इत्यादी आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणे.

अशा पद्धतीने आंतरराष्ट्रीय विधि आयोगाने राज्यांची कर्तव्य स्पष्ट केलेली दिसतात. आंतरराष्ट्रीय विधिआयोगाने आंतरराष्ट्रीय गुन्हे याची ही निश्चित व्याख्या करून त्याचे प्रकार स्पष्ट केले आहेत. आंतरराष्ट्रीय विधिआयोगाने प्रामुख्याने पुढील सात गुन्ह्यांना आंतरराष्ट्रीय गुन्हे म्हणून संबोधले आहे.

१. दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करणे.

२. आक्रमणाची धमकी देणे

३. सैनिकी कार्यवाही करणे

४. दुसऱ्या राष्ट्राचा प्रदेश बळकाविणे.

५. जाती व वंश संहार करणे.

६. अमानवीय कृत्य करणे.

७. नागरिकांना अमानुष वागणूक देणे.

आंतरराष्ट्रीय विधिआयोगाने अशा पद्धतीने आंतरराष्ट्रीय गुन्हे या संकल्पनेची निश्चित व्याख्या करून न्युटेबर्ग तत्वाच्या बाबतीत ही सूत्रबद्धता आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या दृष्टीने आंतरराष्ट्रीय विधिआयोगाने सात तत्वे प्रतिपादन केली आहेत. ती पुढील प्रमाणे मांडता येतील.

१. शासन प्रमुखा सह कोणतीही व्यक्ती जी आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करेल त्यासाठी जबाबदार राहील. तसेच त्या अपराधाबद्दल शिक्षा करण्यात येईल.

२. आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीचे कोणत्याही राष्ट्रीय कायद्याद्वारा संरक्षर करता येणार नाही.

३. अशा व्यक्ती राष्ट्र प्रमुख म्हणून त्यांनी केलेल्या अपराधापासून मुक्त राहू शकत नाही.

४. राज्याच्या कायद्यानुसार वा राष्ट्रहिता करीता आपण आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन केले या आधारावर कोणतीही व्यक्ती निर्दोष ठरू शकणार नाही.

५. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने दोषी ठरविलेल्या व्यक्तीस कायदा आणि पुराव्याच्या आधारावर आपले निर्दोषत्व सिद्ध करण्याचा अधिकार राहिल.

६. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार युद्ध करणे, शांततेचा भंग करणे हा संपूर्ण मानवजाती विरूद्धचा अपराध समजून दंड देण्यात येईल.

७. युद्ध, शांतता भंग करण्याच्या कार्यवाहीत ज्या व्यक्ती सहभागी असतील त्यांनाही शिक्षा केली जाईल कारण अशा कार्यात सहकार्य करणे हा सुद्धा आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने अपराध आहे.

**निष्कर्ष :** सारांश, आंतरराष्ट्रीय कायदा हा घटक जागतिक राजकारणातील एक महत्वाची संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय कायदेपालना संदर्भात वा अंमलबजावणीबाबत अनेक समस्या असल्यातरी जागतिक संघर्ष सोडविण्याचे व संघर्ष नियंत्रणाचे एक साधन व पद्धती म्हणून ही आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्व कायम आहे. आंतरराष्ट्रीय कायदे देखील राष्ट्रीय कायद्यांप्रमाणेच निश्चित स्वरूपाचे कायदे आहेत. समकालिन संदर्भात आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये या कायद्यांना विशेष महत्व देण्यात येत आहे. जागतिक युद्धामध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याचे काही प्रमाणात उल्लंघन होत असले तरी तेवढया कारणाने आंतरराष्ट्रीय कायद्याचे अस्तित्व व महत्व कमी लेखून चालणार नाही. युद्ध नियम व तटस्थतेच्या कायद्यांचे पालन अगदी युद्धकाळात ही काटेकोरपणे होत असल्यानेच मोठ्या जीवितहानी पासून वाचता येणे शक्य होत आहे. दोन महायुद्धांच्या अनुभवातून आंतरराष्ट्रीय कायद्याच्या पालनातूनच जागतिक शांततेची हमी मिळू शकते या निष्कर्षाप्रत जागतिक जनमत पोहचलेले दिसते. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय कायद्याची अपरिहार्यता स्पष्ट करतांना टाफ्ट नावाचे विचारवंत म्हणतात, “जोपर्यंत राष्ट्राराष्ट्रांचे संबंध निर्धारित करणारे निश्चित कायदे नाहीत तोपर्यंत शांतता स्थापन होणे संभवनीय नाही. तर पामर व पार्किंस आंतरराष्ट्रीय कायद्याची प्रस्तुता स्पष्ट करतांना म्हणतात, “आंतरराष्ट्रीय कायदे वैधानिक व्यवस्था निर्माण करतात या कायद्याअभावी जागतिक शांततेस धोका निर्माण होऊ शकतो."

## ३.४ राज्य बाह्य घटक

राष्ट्र - राज्य व्यवस्था हा जागतिक राजकारणातील व आंतरराष्ट्रीय संबंधातील एक महत्वाचा घटक जागतिक राजकारणास प्रभावित करणारा व निर्णायक वळण देणारा घटक वा शक्ती म्हणून राष्ट्र-राज्य व्यवस्था आंतरराष्ट्रीय संबंधात दिर्घकाळ मध्यवर्तीस्थानी राहिलेला दिसतो. मात्र १९५० च्या दशकानंतर मात्र आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासविषयाच्या कक्षा रूंदावत गेल्या. १९९० नंतरच्या दशकात तर आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यास कक्षा फार मोठ्या प्रमाणात विस्तारल्या. राष्ट्र-राज्य व्यवस्थेबरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारणास प्रभावित करणारे. बिगरराज्य घटक अधिक क्रियाशिल झालेले दिसतात. या घटकांनी राष्ट्र राज्याच्या सीमा ओलंडून जागतिक राजकारणास व एकूण आंतरराष्ट्रीय संबंधाच्या व्यवहारास प्रभावित केलेले दिसते. त्यात प्रामुख्याने बहुराष्ट्रीय कंपन्या आंतरराष्ट्रीय संघटना, क्षेत्रीय संघटना व नागरी समाज यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. यादृष्टीने या भागात आंतरराष्ट्रीय संबंधाच्या दृष्टीने राज्यबाह्य घटकांची भूमिका, स्थान व एकूण आव्हाने यांची मांडणी करण्यात झाली आहे.

### ३.४.१ बहुराष्ट्रीय कंपन्या व आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थ व्यवस्था :

समकालिन जागतिक राजकारणात अर्थकारण व राजकारण या दोन्हीं संकल्पना पूर्णपणे एकमेकांमध्ये गुंतलेल्या आहेत हे बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या जागतिक राजकारणातील भूमिकेतून व एकूण प्रभावातून स्पष्टपणे जाणवते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या यांची जागतिक राजकारणातील भूमिका हे आंतरराष्ट्रीय संबंधाचे एकूण आकलन करून घेण्यासाठी अभ्यासणे अत्यंत आवश्यक ठरते. आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेच्या व बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या अभ्यासातून आंतरराष्ट्रीय संस्थाविषयीचा आपला दृष्टीकोण अधिक व्यापक व सखोल होऊ शकतो.

आंतरराष्ट्रीय व्यापार, व्यापारासाठी असणारे किंवा ठरणारे आंतरराष्ट्रीय नियम, ते अमलात आणणाऱ्या संघटना, बाजारपेठा, बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य व स्पर्धा यांचा मुख्यत्वे आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेच्या अभ्यासात समावेश केला जातो. यासारख्या संकलानांचा राष्ट्राच्या अंतर्गत घडामोडींवर तसेच परराष्ट्र धोरणांवरही परिणाम होत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो आहे. याचाच अर्थ असा की केवळ आर्थिक व्यवहारांचा व घडामोडींचा राजकारणावर परिणाम होतो असे नाही तर राजकीय प्रक्रिया व राजकीय निर्णय अर्थव्यवस्थेत बदल करणारे वा त्यास एखाद्या विशिष्ट दिशेने चालना देणारे घटक ठरू शकतात. त्यातच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राज्यबाह्य घटक असणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या सारख्या घटकांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. या घटकांनी आंतरराष्ट्रीय संबंधाची सैध्दांतिक व संकल्पनात्मक चौकटही बदलण्यास सुरूवात झालेली दिसते.

आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था ही संकल्पना साधारणत: दोन दृष्टीकोनातून अभ्यासली जाते. एक म्हणजे हा घटक आंतरराष्ट्रीय संबंध या विषयातील मुद्दयांचा व समस्यांचा अभ्यास करणारा दृष्टीकोन म्हणून अभ्यासला जातो. तर दुसऱ्या दृष्टीकोनातून जागतिक राजकारण व अर्थकार यासंबंधी विचार करण्याची पद्धती म्हणून त्यास प्राधान्य देतो. समकालिक जागतिकीकरणाचा प्रभाव असणाऱ्या काळात आंतरराष्ट्रीय अर्थकारण हे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचा जवळ जवळ केंद्र बिंदु बनलेले दिसते. आज गतिमान व जागतिक राजकारणशस प्रभावित करणाऱ्या जागतिकीकरणाची ही मुख्य शक्ती ही आर्थिक घटकांमध्ये आहे. जगभर पसरलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्याच्या वाढत्या विस्तारामुळे वित्तपुरवठ्याचे जागतिकीकरण झालेले दिसते. याशिवाय मारिनी - तंत्राज्ञानाच्या अचाट क्रांतीमुळे संबंध जागतिक मानवी समूदाय एकमय समाज बनत चालला आहे.

साधारणत: राष्ट्रा-राष्ट्रामधील राजकीय व आर्थिक संबंधानाच आंतरराष्ट्रीय संबंध ही संज्ञा वापरली जाते परंतु काही विचारवंताच्या मते राष्ट्रां- राष्ट्रांमधील राजकीय व आर्थिक संबंध हे शेवटी आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवस्थेचाच एक भाग असतात. जोशुआ गोल्डस्टाईन हे आंतरराष्ट्रीय संबंधाचे अभ्यासक या संदर्भात असे म्हणतात की, " आंतरराष्ट्रीय सुरक्षा संबंध व आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था अशाप्रकारची दोन आंतरराष्ट्रीय संबंधाची मुख्य उपक्षेये आहेत. आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत व्यापार, वित्तीय संबंध, बहुराष्ट्रीय कंपन्या, युरोपचे आर्थिक एकीकरण, जागतिक पर्यावरणाचे राजकारण, उत्तर दक्षिण यांच्यातील आर्थिक दरी, विकासाचे वेगवेगळे प्रश्न यांचा अभ्यास यामध्ये येतो. सारांश आंतरराष्ट्रीय राजकारणातील विविध प्रकारच्या प्रक्रिया समजऱ्यासाठीचे आवश्यक साधन

बनले आहे. यामध्ये एकूण प्रक्रियेन राज्ये व त्यांच्यामधील संबंधावर झोत असला तरी या दृष्टीकोनानुसार अराज्य घटकांनाही अर्थपूर्णता व महत्व आहे.

### ३.४.२ बहुराष्ट्रीय कंपनी / निगम

बहुराष्ट्रीय कंपनी वा निगम हा आंतरराष्ट्रीय संबंधातील बिगर राज्य घटकांमधील प्रभावित करणारा एक प्रमुख घटक म्हणून उद्यास आलेला दिसतो. साधारणत: जिचा एका देशापेक्षा जास्त देशांमध्ये प्रसार झालेला असतो व जिचे उत्पादन व सेवा स्वदेशाशिवाय इतर व विदेशांमध्ये निर्माण होत असतात त्यास बहुराष्ट्रीय कंपनी वा उद्योग म्हणतात. बहुराष्ट्रीय कंपनी वा निगम ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

१. **आय. बी. एम. वल्ड ट्रेड कार्पोरेशन :** आय.बी.एम. वर्ल्ड ट्रेड कार्पोरेशन यांनी बहुराष्ट्रीय कंपनीची व्याख्या करतांना म्हटले आहे, “जे विविध देशांमध्ये कार्य करते, त्या देशांमध्ये अनुसंधान विकास व निर्मितीचे कार्य करते, ज्यांचे बहुराष्ट्रीय व्यवस्थापन असून ज्याचे स्कंध स्वामित्व बहुराष्ट्रीय असते त्यास बहुराष्ट्रीय निगम असे म्हणतात.

२. **संजयलाल व स्ट्रीटन :** संजय लाल व स्ट्रीटन यांनी बहुराष्ट्रीय कंपनीची संकल्पना स्पष्ट करतांना दोन दृष्टी कोनातून व्याख्या केलेली दिसते.

आर्थिक दृष्टीकोन, “ज्यात शंभर मिलियन पासून कित्येक हजार मिलियन डॉलर्सपर्यंत शुद्ध विक्री होते, प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक ही सामान्यत: कंपनीच्या एकूण गुंतवणुकीच्या १५ ते २० टक्क्यापर्यंत असते तो बहुराष्ट्रीय निगम होय.”

**३.४.३ संघटनात्मक दृष्टीकोन :** “जो एक संघटनात्मक महत्तीकरणाच्या रूपात सर्व यूनिट्सच्या एका प्रभावी उद्दिष्टाला महत्व देतो संपूर्ण जगाला आपले कार्यक्षेत्र मानतो तसेच 'अ' अथवा 'ब' यांस आपल्याकडे वळविण्याकरिता सर्वच कार्याचे संयोजन करतो तोच खरा बहुराष्ट्रीय निगम होय.

सारांश ज्याचा कार्यभार वा कार्यप्रणाली स्वत:च्या देशाच्या बाहेर विविध देशांमधये पसरलेली किंवा कार्यान्वीत झालेली असते असा उद्योग म्हणजे बहुराष्ट्रीय निगम होय.

**३.४.४ बहुराष्ट्रीय निगमाची वैशिष्टये:** बहुराष्ट्रीय निगमाची काही प्रमुख उद्दिष्टये पुढील मुद्दयांच्या आधारे मांडता येतील.

१. **आंतरराष्ट्रीय व्यवहार:** बहुराष्ट्रीय कंपनीचा व्यवहार हा केवळ एखाद्या देशापुरता मर्यादित नसतो, तर तो विविध देशांशी संबंधित असतो. याकरीता स्वत:च्या देशात मुख्य-निगम व विदेशांमध्ये त्याच्या शाखा वा सहाय्यक कंपन्या कार्यरत असतात. या सहाय्यक कंपन्यांमध्ये मुख्य निगमाचा वाटा हा ५१ टक्केपेक्षा अधिक असतो. ' मुख्य निगमावर शाखा व सहाय्यक निगम यावर नियंत्रण स्थापित करण्यात आलेले दिसते.

२. **साधनांचे हस्तांतरण :** बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्याकडे असलेल्या साधनांचे सहाय्यक कंपन्या व शाखा यांच्याकडे हस्तांतरण करताना. तसेच हे निगम आपल्याकडील तंत्रज्ञान व्यवस्थापकीय सेवकवग, कच्चा माल व पक्का माल इत्यादी आपल्या सहाय्यक कंपन्या व शाखा यांच्याकडे पाठवित असते.

३. **प्रचंड आकार :** बहुराष्ट्रीय कंपनीचा आकार फार मोठा असतो. यांचे भांडवल व विक्री ही अब्जावधी डॉलर्स मध्ये असलेली दिसते.

४. **बहुराष्ट्रीय स्कंध स्वामित्व :** बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भांडवलांमध्ये कित्येक राष्ट्रांचा हिस्सा असतो.

५. **बहुराष्ट्रीय व्यवस्था :** बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवस्थापन मंडळांत विविध देशातील व्यक्तींचा समावेश असतो.

### ३.४.५ बहुराष्ट्रीय नियमांचा विस्तार :

बहुराष्ट्रीय नियमांची आंतरराष्ट्रीय गुंतवणूक तर असतेच परंतु त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय उत्पादन, व्यापार, वित्त व तंत्रज्ञान यात सुद्धा निगमाच्या महत्वपूर्ण भाग असतो. रेमंड वरमन यांनी १९७१ साली यासंदर्भातील अध्ययन मांडताना म्हटले आहे, " ३०० बहुराष्ट्रीय निगमांची वस्तू व सेवा यांच्या उत्पादनाची दरवर्षी किमंत ३५० बिलियन डॉलर्सपेक्षा जास्त आहे. या सर्वांमध्ये विशाल निगम म्हणजे "जनरल मोटर्स" असून तिथे एकूण जागतिक विक्री व बिलियन डॉलर्स होती. ही विक्री १९७० मध्ये १०-१२ देश वगळता इतर सर्व देशांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त होती.

१५ नोव्हेंबर १९७१ रोजी अमेरिकन पत्रिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार ५० विशाल अमेरिकन निगम यांच्या एकूण राजस्वाच्या ४० टक्के हिस्सा बगिचे, औषध निर्माण, प्रसाधन साहित्य खाद्य उत्पादन, औद्योगिक उत्पादनांची निर्मिती तसेच उपभोग्य वस्तू, तेल, संशोधन, ऑटोमोबाईल्स रसाय व खते इत्यादीपासून प्राप्त होतो.

संयुक्त राष्ट्रसंघाने अलिकडे जाहीर केलेल्या अध्ययनानुसार जगभरात पण हजारापेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्या वा निगम कार्यरत असून जगभरातील एकूण खाजगी संपत्तीच्या एक तृत्तीयांश हिस्सा त्यांच्याकडे आहे. यावरून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विस्ताराची कल्पना आपणास येऊ शकते.

### ३.४.६ बहुराष्ट्रीय निगमांचे लाभ वा गुण :

बहुराष्ट्रीय निगमांचे लाभ वा गुण पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

१. **गुंतवणुकीचा धोका पत्करतात :** बहुराष्ट्रीय निगम हे ऊर्जा, वाहतुक, दळणवळण इत्यादी सोयी सवलती पुरेशा नसताना तसेच बाजार मागणी पुरेश नसताना सुद्धा अल्पविकसित देशांमध्ये भांडवल गुंतवणूक जोखिम स्वीकारत असतात. ज्याचा त्या भागात वा राष्ट्रामध्ये विकासाच्या दृष्टीने लाभ होतो.

२. **अल्पिवकसित देशांना भांडवलाचा पुरवठा :** बहुराष्ट्रीय निगम हे वित्तीयदृष्टया अत्यंत प्रभावशाली असल्यामुळे प्रत्यक्ष गुंतवणुकीद्वारा अल्पविकसित देशांना अधिक व स्वस्त भांडवल पुरवितात.

३. **लाभ मिळवून देतात :** बहुराष्ट्रीय निगम हे नवीन प्रकारची साहसी कार्य प्रांभ करून तसेच उच्च प्रतीचे शिक्षण व प्रशिक्षण देऊन अल्पविकसित देशांचा फायदा करीत असतात.

४. **राहणीमानाचा दर्जा उंचविण्यास मदत :** बहुराष्ट्रीय निगम हे R & D वर आधारित प्रचलित फर्म्सद्वारे उच्च प्रकारचे तंत्रज्ञान अल्पविकसित देशांना पुरवित असतात. याकरीता लागणारा प्रचंड पैसा खर्च करण्याची बहुराष्ट्रीय कंपन्यांची तयारी असते. उच्च प्रकारच्या तंत्रज्ञानापुढे अल्पविकसित देशांमध्ये विभिन्न प्रकारची नवीन उत्पादने तयार होऊन त्यांच्या जीवनमानाचा दर्जा वाढतो.

५. **स्पर्धेस प्रोत्साहन :** बहुराष्ट्रीय कंपन्या बाजार संशोधनाच्या माध्यमातून अल्पविकसित देशांमध्ये नव्या प्रकारचे बारजपेठीय तंत्रे प्रचलित करतात. कल्पक जाहिरात तंत्राचा वापर करून बाजारात ग्राहकांची इच्छा उत्तेजित करून एक प्रकारे स्पर्धा निर्माण करतात. त्यातून बाजारव्यवस्थेत स्पर्धेस प्रोत्साहन मिळतांना दिसते.

६. **अल्पविकसित देशांना उपयुक्त :** बहुराष्ट्रीय कंपन्यांची उपयुक्तता ही अल्पविकसित राष्ट्रांच्या दृष्टीने सिद्ध झाली आहे असे अभ्यासकांना वाटते. बहुराष्ट्रीय नियमांमुळे भांडवलनिर्मिती, उत्पादन व रोजगार निर्माण होण्यास मदत होते हे सिद्ध झाले आहे.

### ३.४.७ बहुराष्ट्रीय निगमाची तोटे / उणीवा :

बहुराष्ट्रीय निगमांची उणीवा वा तोटे प्रामुख्याने पुढील प्रमाणे मांडली जातात.

१. **अल्पविकसित देशांचे शोषण :** टिकाकारांच्या मते बहुराष्ट्रीय कंपन्या हे प्रामुख्याने अमेरिका व विकसित राष्ट्रांचे हितसंबंध जोपासण्याचे प्रामुख्याने कार्य पार पाडतात. बहुराष्ट्रीय कंपन्या या अल्पविकसित देशांमध्ये शंभर टक्के मालकी हक्क प्रस्थापित करण्यावर भर देतात. सिंगापूर, मेक्सिको, हाँगकाँग, ब्राझील, तैवान या देशांमधील बहुराष्ट्रीय कंपन्याची कृती याची साक्ष देते. यामुळे अमेरिका व विकसित देशांना लाभ प्राप्त झाला याच अल्पविकसित देशांना मात्र नुकसान सहन करावे लागते हे स्पष्ट झाले.

२. **प्रचंड लाभाची हव्यासी वृत्ती :** नफा हा भांडवलशाही व्यवस्थेचा आत्मा मानला जातो तर प्रचंड लाभाचा हव्यास हा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा आधार आहे हे स्पष्ट जाणवते. प्रचंड लाभ मिळविण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या कोणत्याही स्तरास जाऊ शकतात हे अनेकवेळ सिद्ध झालेले दिसते.

३. **सामाजिक - आर्थिक विषमतेत भर :** बहुराष्ट्रीय कंपन्या ज्या देशात स्थायिक होतील त्या देशातील सामाजिक - आर्थिक विषमतेची दरी अधिक ठळक करण्याचे काम त्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे करतांना दिसतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वेतन हे देशातील आर्थिक विषमता वाढवणारे असते तर गुणवत्ता हा निकष सामाजिक विषमतेस प्रोत्साहन देणारे ठरते. उच्चवर्गीय व उच्चवर्णीय लोकांना बहुराष्ट्रीय कंपन्याचे धोरण नेहमीच अनुकूल ठरलेले दिसते.

४. **क्षेत्रीय असमानेत भर :** बहुराष्ट्रीय कंपन्या अपने मुख्य प्रकल्प हे विकसित देशांमध्येच स्थापित करतात व छोटया उद्योगांना वा प्रकल्पांना अविकसित भागात कार्यन्वीत ठेवतात. त्यामुळे क्षेत्रीय विकासाचा असमतोल सातत्याने वाढतांना दिसतो.

५. **शोधनशेषावर प्रतिकुल परिणाम :**बहुराष्ट्रीय कंपन्या या शोषनशेषावर प्रतिकूल परिणाम करतांना आढळून येतात. अभ्यासकांच्या मते, बहुराष्ट्रीय कंपन्या इतर देशात प्राप्त झालेल्या प्रचंड लाभ, व्याज, रॉयल्टी या आपल्या स्वदेशात पाठवितात. त्यामुळे अल्पविकसित देशांच्या शोधनशेषावर त्यांचा विपरीत परिणाम होतो.

सारांश, बहुराष्ट्रीय विभागांची भूमिका ही आंतरराष्ट्रीय संबंधाच्या एकूण व्यवहारावर प्रभाव टाकणारी आहे. भारतासारख्या विकसनशील देशांसमोर या बहुराष्ट्रीय निगमांच्या दृष्टीने असणारी प्रमुख समस्या म्हणजे या बहुराष्ट्रीय निगमांच्या हानीकारक प्रभावाना कशाप्रकारे नियंत्रित करून त्यांच्यापासून महनत लाभ कसा मिळवावा हीच आहे हे स्पष्टपणे जाणवते.

### ३.४.८ आंतरराष्ट्रीय संघटना :

साधारणत: भिन्न-भिन्न राष्ट्रातील शासकीय यंत्रणांनी वा खाजगी व्यक्तींनी एकत्र येऊन काही विशिष्ट हेतु साध्य करण्याकरिता स्थापन केलेली स्थायी स्वरूपाची यंत्रणा म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटन होय असे म्हणता येईल. समान हितसंबंध असणाऱ्या राष्ट्र-राज्यांनी समान बंधने स्वीकारून घेणे हे प्रत्येक राष्ट्राच्या हितास पूरक ठरते. या पूरकतेतूनच आंतरराष्ट्रीय संघटनांचा जन्म होतांना दिसतो. यातील काही संघटनापैकी काही संघटना या जागतिक स्तरावर कार्यरत असतात तर काही संघटना या प्रादेशिक वा विशिष्ट राष्ट्रगटांपुरत्याच मर्यादित असतात. संयुक्त राष्ट्रे, राष्ट्रसंघ, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संघटना पहिल्या प्रकारचे उदाहरण होत तर ओपेक, यूरोपियन संघ, सार्क या संघटना दुसऱ्या प्रकारात मोडतात. याशिवाय आंतरराष्ट्रीय संघटनाचे वेगळ्या दृष्टीकोणातून आणखी दोन महत्वाचे प्रकार पुढे आले आहेत. एक म्हणजे शासकीय वा राज्यपुरस्कृत संघटना व दुसरे म्हणजे बिगर शासकीय वा अ- राज्य घटकांनी व खाजगी सभासदांनी कार्यन्वीत केलेल्या संघटना ज्या संघटनेत सभासद राष्ट्रांतील शासनयंत्रणेस प्रतिनिधीत्व प्रदान करण्यात आलेले असते त्यास शासकीय संघटन असे म्हटले जाते. या शासकीय संघटनांमध्ये खाजगी व्यक्ती वा संस्थाना स्वतःच्य अधिकारात भाग घेता येत नाही. मात्र खाजगी संघटनांमध्ये मात्र भिन्न-भिन्न राष्ट्रातील व्यक्ती अगर खाजगी संस्था या सहभागी होऊ शकतात. आज जगभरात १५०० हून अधिक खाजगी आंतरराष्ट्रीय संस्था कार्यरत आहेत यावरूनच खाजगी आंतरराष्ट्रीय संस्थाची जागतिक राजकारणातील भूमिका आपल्या लक्षात येते.

### ३.४.९ आंतरराष्ट्रीय संघटनांचा इतिहास :

१९व्या शतकाच्या शेवटपर्यंत यूरोपिय राष्ट्रांचे आशिया, आफ्रीका व इतर बऱ्याच भागांवर वर्चस्व प्रस्थापित झालेले होते. त्यामुळे १६व्या ते १९व्या शतकापर्यंतच्या कालखंडात लागलेले शास्त्रीय शोध, निर्माण झालेल्या राजकीय परंपरा, सामाजिक व सांस्कृतिक संबंध, आंतरराष्ट्रीय समाजाची कल्पना यासारख्या जागतिक राजकारणातील महत्वाच्या कल्पना व संकल्पना यूरोपखंडातील राजकाणातूनच उद्यास आलेल्या दिसतात. त्यामुळे आधूनिक आंतरराष्ट्रीय संघटनांचा उगम व विकास हा एक प्रकारे यूरोपीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे असे दिसते.

यूरोपिय इतिहास ग्रीक नगरराज्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. राज्यशास्त्रातील अनेक महत्वाच्या संकल्पनांचा उद्य जास्त प्राचीन ग्रीक नगरराज्यांमध्ये पाहावयास मिळतो. त्या प्रमाणेच आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय संघटनांच्या निर्मितीची पार्श्वभूमी ही प्राचीन ग्रीक नगर राज्यांच्या सभ्यतेमध्ये आढळते. ग्रीक नगर राज्यांमध्ये करार करून संघ निर्माण करून राहण्याची प्रवृत्ती सामान्यत: प्रत्ययास येत होती. या संघ निर्मितीमागे आत्मरक्षण हा प्रमुख हेतु असला तरी व्यापार अगर दळणवळण व्यवहारासंबधी ही योजना योजना तयार करण्यात येत असत. त्यामुळेच आधूनिक आंतरराष्ट्रीय संघटनांचा उगम हा प्राचीन ग्रीक नगर

राज्यांमध्ये पाहिला जातो. मध्यमयुगीन काळात ही युरोपमधील आकाराने मोठ्या असणाऱ्या नगरराज्यांनी आंतरराष्ट्रीय संघटनांच्या दृष्टीने महत्वाचे योगदान दिले असे दिसते. यूरोपमधील मोठया नगरराज्यांनी व्यापाराच्या संवर्धनाकरीता 'हॅन्सी अँटिक लीग' नावाची एक संस्था स्थापन केली होती. या संस्थेस या नगरराज्यांनी काही राजकीय स्वरूपाचे अधिकारही बहाल केले होते. आधूनिक आंतरराष्ट्रीय संघटनांची मूळ अशा रीतीने प्राचीन व मध्ययुगीन काळातील यूरोपीय नगरराज्यांमध्ये शोधली जात असली तरी ही मूल प्राथमिक स्तरावर होती हे मान्य करावे लागेल. स्थायी स्वरूपाची आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याची दूरदृष्टी स्थान नव्हती हे स्पष्टपणे जाणवते. त्यानंतरच्या काळात 'पवित्र रोमन साम्राज्य वा ख्रिश्चन चर्च, अशा शीर्षका खाली धार्मिक संस्थांना राजकीय महत्व देण्याचा मोठा प्रयत्न झाला असला तरी आधूनिक काळातील आंतरराष्ट्रीय संघटनांमधील तत्वांची त्यात वानसा होती हे स्पष्टपणे दिसते.

### ३.४.१० आंतरराष्ट्रीय संघटनांचा विकास :

आधूनिक अर्थाने २०व्या शतकात उद्यास आलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनाचा विकास हा स्थूलमानाने तीन टप्यांमध्ये विभागला जातो. त्याची मांडणी साधारणत: पुढील प्रमाणे करता येईल.

१. **पहिला टप्पा :** पौर्वात्य रोमन साम्राज्य नष्ट झाल्यापासून नेपोलियनचे साम्राज्य नष्ट होईपर्यंतचा सुमारे तीन-चार शतकांचा कालखंड हा आंतरराष्ट्रीय संघटनांच्या विकासचा प्रथम कालखंड मानला जातो. या प्रथम कालखंडाचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे या कालखंडात जागतिक शांतता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने अगर त्यासाठी संघटना निर्माण करण्याच्या दृष्टीने फारसी प्रगती झालेली दिसत नसली तरी या दृष्टीने वैचारिक चालना मात्र गतिमान होती. राज्या-राज्यांमधील संघर्ष कमी व्हावेत याकरिता तत्वज्ञ- विचारवंत कार्यन्वीत झालेले होते. त्यासाठी त्यांच्याकडून वेळोवेळी विविध योजनांची मांडणी ही करण्यात आलेली दिसते. टॉमस अली, विल्यमपेन, रूसो, सेथॉम, कांट यासारख्या तत्वज्ञांचा या कालखंडातील प्रभाव हा अनन्य साधारण असाच होता. प्रथम कालखंडात यूरोपमध्ये दोन शांततावादी चळवळींनीही आपला ठसा उमटवलेला दिसतो. १७व्या शतकाच्या मध्यावर स्थापन झालेली 'सोसायटी ऑफ फ्रेंडस' या नावाची एक संस्था यादृष्टीने महत्वाची ठरली. कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराचा प्रतिकार हा अंहिसक मार्गानेच करण्यात यावा हे या संस्थेचे प्रमुख घोषवाक्य होते. १८व्या शतकात अमेरिका व ब्रिटनमध्ये लोकप्रियता मिळवलेली 'केंकर संघटना' ही या दृष्टीने महत्वाची मानली जाते. कोणत्याही प्रकारच्या युद्धास केंकर संघटनेचा प्रखर विरोध होता. सोसायटी ऑप फ्रेंडस व केकर सारख्या संघटनाच्या विचारांचा व्यवहारात फार मोठा प्रभाव जाणवत नसला तरी युद्धास कंटाळलेल्या सामान्य जनतेच्या मनावर त्याचा नि:संशय परिणाम झाला हे स्पष्टपणे निदर्शनास येते. २०व्या शतकात उद्यास आलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनामागील तत्वज्ञानचे बीज त्या काळात या संघटनांच्या माध्यमातून पेटले गेले होते हे स्पष्टपणे प्रत्ययास येते. प्रथम कालखंडातील आंतरराष्ट्रीय संघटनांच्या विकासातील एक महत्वाची घटना वा घटक म्हणून त्याकालखंडात भरविण्यात आलेल्या विविध परिषदांचा ही उल्लेख करावा लागेल. या कालखंडातच आंतरराष्ट्रीय

वाटाघाटींकरीता परिषदा भरविण्याची पद्धती सुरू झाली असे दिसते. परिषदांचे होणारे आयोजन आंतरराष्ट्रीय संघटनांना पाया भक्कम करणारे ठरले. याचे महत्वाचे उदाहरण म्हणजे वेस्ट फेलिया व उडोक्त चे तह हे होत. या तहांपासून अशा पद्धतीच्या परिषदा भरविण्याची पद्धती आंतरराष्ट्रीय राजकारणात रूढ झालेली दिसते. या कालखंडात विशेषत: १७व्या व १८ व्या शकतका भरविण्यात आलेल्या विविध परिषदांच्या माध्यमातून युरोपमध्ये राजे-महाराजे यांच्या अधिकारांवर नियंत्रण ठेवणारे अनेक करार अस्तित्वात आलेले दिसतात. एकंदरीत आंतरराष्ट्रीय संघटनाच्या विकासाच्या दृष्टीने प्रथम कालखंड हा वाटाघाटी व परिषदा यांचे युग समजण्यात येतो. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने आवश्यक स्थायी स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय संघटना मात्र या कालखंडात निर्माण होऊ शकल्या नाहीत हे स्पष्टपणे जाणवते.

२. **दुसरा टप्पा :** आंतरराष्ट्रीय संघटनांच्या विकासाच्या दृष्टीने मानण्यात येणारा द्वितीय कालखंड हा नेपोलियनच्या पराभवानंतर भरविण्यात आलेल्या व्हिएन्ना परिषपदेपासून ते पहिल्या महायुद्धापर्यंतचा काळ होय. तो जवळ-जवळ शंभर वर्षाचा कालखंड ठरतो. नेपोलियनच्या काळात यूरोपला नकाशा नव्हता असे म्हटले जाते. नेपोलियनच्या पराभवानंतर यूरोपिय राजकारणात पुन्हा सभेच्या समतोलपणाचे राजकारण सुरू झाले. १८१४-१५ मध्ये भरलेली व्हिएन्ना परिषद हे त्याचे महत्वाचे उदाहरण मानले जाते. या परिषदेतूनच 'कॅन्सर्ट ऑफ यूरोप' नावाची अनौपचारिक आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात आली. रशिया, प्राशिया, ऑस्ट्रेलिया व ब्रिटन यांनी नेपोलियनच्या पाडावानंतर या संघटनेचा पाया घातला होता.

कॉन्सर्ट ऑफ यूरोप या संघटनेचा प्रभाव युरोपच्या राजकारणावर जवळपास शतकभर कायम राहिलेला दिसतो. या संघटनेचे खास वैशिष्टये म्हणजे या संघटनेस निश्चित स्वरूपाची घटना नव्हती. सभेस उपस्थित राहण्याची सभासद राष्ट्रांवर सक्ती नव्हती, शिवाय सभेच्या कामकाजाचे नियमन ही करण्यात आलेले नव्हते, तसेच सभासद राष्ट्रे आपआपले हित संबंध सुरक्षित राखण्यातच ??? होते अशा परिस्थितीतही 'कॉन्सर्ट ऑफ यूरोप ने ऑटोमन साम्राज्याचे यूरोपमध्ये विसर्जन झाल्यानंतरची राजकीय परिस्थिती उत्कष्टपणे हाताळली होती. शतकभराच्या कालखंडात या संघटनेने यूरोपियन राष्ट्रांना युद्धाच्या अनेक प्रसंगातून सही सलामत बाहेर काढण्याचे मोठे कार्य पार पाडले. या संघटनेने यूरोपची राजकीय घडी पुन्हा नव्याने नीट बसवली असे म्हणावे लागेल. या संघटनेच्या माध्यमातूनच आर्थिक व सामाजिक सहकाराची प्रवृत्ती ही वाढीस लागली. 'कॉन्स्ट ऑफ यूरोप' ने गुलामगिरीची अमानुष पद्धती नष्ट करण्याकरीता राबवलेली मोहीम स्त्युत्य मानली जाते. 'कॉन्सर्ट ऑफ यूरोपच्या पुढाकारातूनच ऱ्हाईन व इतर महत्वाच्या नद्यांवरील वाहतुकीचे नियंत्रण करण्याकरिता लेखी करार करून यंत्रणा निर्माण करण्यात आली. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्याकरीता आंतरराष्ट्रीय पातळीवर तयार झालेला तो पहिला कायदा मानला जातो.

दुसऱ्या कालखंडातील या शंभर वर्षाच्या काळात राजकीय स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन होऊ शकल्या नाहीत मात्र इतर काही संघटना या कालखंडात कार्यन्वीत झालेल्या दिसतात. या संघटनांच्या निर्मितीस १९व्या शतकातील शास्त्रीय व आर्थिक क्षेत्रातील विकासाने हातभार लावला. लोकसंख्या वाढ, रेल्वे, तारायंत्रे,

जहाज यासारख्या दळणवळणाच्या साधनांनी आंतरराष्ट्रीय जीवनास एकप्रकारे गतिमानता बहाल केली. त्यातून व्यापरांची भरभराट निर्माण झालेली. समृद्धी यांसारख्या घटकांनी आंतरराष्ट्रीय सहकार्याची अपरिहार्यता अधोरेखित केली. त्यातूनच १९व्या शतकात अनेक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाल्या. या कालखंडात स्थापन झालेल्या या संघटनांमध्ये १८५६ साली स्थापन झालेल्या डॅन्यूब आयोग, १८६५ मध्ये स्थापन झालेली आंतरराष्ट्रीय तारजंज्या, १८७४ साली स्थापन झालेली टपालसंज्या या महत्वाच्या मानल्या जातात. अर्थात या संस्थांना राजकीय महत्व नव्हते त्यामुळे आंतरराष्ट्रीय ऐक्य व शांतता या दृष्टीने या संस्थांना फार मोठी महत्वाची भूमिका बजावता आली नसली तरी भविष्यकाळात आंतरराष्ट्रीय शांतता व आंतरराष्ट्रीय संबंधाच्या दृष्टीने कशा संज्या निर्माण होणे आवश्यक आहे याचा वस्तूपाठ या संघटनांनी घालून दिला हे नि:संशय.

३. **तिसरा टप्पा :** पहिल्या महायुद्धाच्या सुरवातीपासूनचा कालखंड ते आजतागयतचा कालखंड हा आंतरराष्ट्रीय संघटनांचा विकासाचा तृतीय कालखंड होय. या कालखंडात खऱ्या अर्थाने आधूनिक आंतरराष्ट्रीय संघटनांची उत्क्रांती झाली. पहिले महायुद्ध संपल्यानंतर ???? चा जोर नष्ट झाला त्यातच राष्ट्रसंघाची घटनाही अंतर्भुत करण्यात आली होती. त्या माध्यमातून स्वसंरक्षणासाठी कोणत्याही राष्ट्रास केवळ स्वत:च्या बळावर अवलंबून राहण्याचा प्रसंग येऊन नये म्हणून सामुदायिक संरक्षणाची योजना करण्यात आली.

पहिल्या महायुद्धानंतर स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रसंघ या प्रमुख आंतरराष्ट्रीय संघटनेबरोबरच आणखी दोन संघटनेचे योगदान ही महत्वाचे मानावे लागेल. एक म्हणजे हेग येथे स्थापन करण्यात आलेले आंतरराष्ट्रीय न्यायालय व दूसरे म्हणजे जिनेव्हा येथे मुख्यालय असलेली आंतरराष्ट्रीय मजूर संघटना. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या लाटेत राष्ट्रसंघ जरी नष्ट झाला तरी या दोन्हीं संस्था अद्याप ही कार्यरत आहेत यावरून या संघटनांची उपयुक्तता व सामर्थ्य स्पष्ट होते. १९३९ ते १९४५ मध्ये जगास दुसऱ्या महायुद्धाचा सामना करावा लागला. १९१९ साली महायुद्ध टाळण्यासाठी स्थापन झालेल्या राष्ट्रसंघ सपशेल अपयशी ठरला असला तरी दुसऱ्या महायुद्धानंतर जगात शांतता निर्माण करण्याकरिता व जागतिक मानवी समुद्यास महायुद्धाच्या धोक्यापासून रोखण्याकरिता प्रमुख राष्ट्रधुरिणांना राष्ट्रसंघाच्याच मुलभूत तत्वज्ञानाचा आश्रय घ्यावा लागला हे स्पष्टपणे दिसते. अमेरिकेचे तत्कालिक अध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट व ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांचे 'अ‍ॅटलांटिक सनद' संयुक्त राष्ट्रांची घोषणा, मॉस्को, याल्टा येथील शिखर परिषद, उंबार्टन, ओक्स येथे भरलेल्या सभा व अंतिमतः सनफ्रान्सिसको येथे भरलेली आंतरराष्ट्रीय परिषद यातून संयुक्त राष्ट्र संघटना ही आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात आली. राष्ट्रसंघा पेक्षा ही संघटना अनेक अर्थांनी मोठी व प्रभावी ठरली.

संयुक्त राष्ट्रांनी आपल्या कर्याची व्याप्ती विस्तारण्याकरिता व अधिक परिणामकारकरीत्या कार्यन्वीत होण्याच्या दृष्टीनी विशिष्ट कार्याकरिता स्वतंत्र आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती केली. त्यामुळे आज संयुक्त राष्ट्रांच्या जोडीला विशिष्ट कार्याकरिता निर्माण झालेल्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था कार्यरत असलेल्या

दिसतात. त्यांचे मूळ जरी राष्ट्रसंघाच्या कार्यप्रणालीत असली तरी त्यांचे कार्य अत्यंत विस्तृत प्रमाणावर असलेले दिसते. आधूनिक पद्धतीने शेतीचा विकास करून, अन्नधान्य व इतर खाद्यपदार्थांच्या उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने सभासद राष्ट्रांना सल्ला व आर्थिक मदत देणारी अन्न व शेती संघटना (FAO), जगात निर्माण होणाऱ्या विविध साथींचा प्रतिकार, वैद्यकिय मदत व सल्ला देणारी जागतिक आरोग्य संघटना (WHO) शिक्षण व शास्त्रीय शोध या द्वारे जगातील विविध राष्ट्रातील जनतेमध्ये समजूतदारपणाची भावना निर्माण करण्याकरिता व त्यासाठी सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणास उत्तेजन देण्याच्या दृष्टीने स्थापन करण्यात आलेली संयुक्त राष्ट्रे शैक्षणिक, शास्त्रीय व सांस्कृतिक संघटना (UNESCO), सभासद राष्ट्रांना मोठया प्रमाणावर उद्योगधंदे वा धरणांसारखे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता त्यामाध्यमातून औद्योगिक विकास साध्य करण्याकरिता आर्थिक सहाय्य करणारी जागतिक बँक (IBRD), आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विकासाकरीता, राष्ट्रीय चलनाची स्थिरता कायम राखण्याकरिता परकीय चलन उपलब्ध करणारी आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) ही संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार सहज व सुलभ करणारी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (WTO) यांचे स्थान आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या क्षेत्रात अत्यंत महत्वाचे आहे हे नि:संशय.

संयुक्त राष्ट्रांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांच्या उपयुक्ततेचे मूल्यमापन करताना प्रामुख्याने एक बाब लक्षात येते की, राष्ट्रसंघ वा संयुक्त राष्ट्रे या दोन्ही संघटनांची निर्मिती ही पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर झाली. त्यामुळे युद्धाचे प्रसंग टाळून संघर्षापासून मानवी समाजाला वाचवणे हा त्यांच्यासमोरील मुख्य कार्यक्रम होता. त्यामुळे संघर्षाचे निवारण करणे यास या संघटनांच्या कार्यप्रणालीत प्रथम स्थान प्राप्त होत गेले व सहकार्याची उपयुक्तता यास तुलनेने दुय्यम स्थान प्राप्त झाले. वास्तविकता संघर्षाचे प्रसंग कमीत कमी येतील व सहकार्याचे क्षेत्र विस्तृत होत जाईल अशी परिस्थिती निर्माण करणे हेच आंतरराष्ट्रीय संघटनांचे ध्येय होते. साधारणतः सभासद राष्ट्रांनी स्वखुशीने आपल्या सार्वभौम अधिकारांवर नियंत्रण मान्य करूनच आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण होत असतात. अशा संघटनांची शक्ती सभासद राष्ट्रे त्यास किती मान देतात यावर अवलंबून असते. संयुक्त राष्ट्रातील कोणताही ठराव नाकारण्याचा अधिकार सभासद राष्ट्रांना प्राप्त असल्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या एकूण प्रभाव क्षमतेवर नकारात्मक परिणाम झालेला दिसतो. उदा. वर्ण विद्वेष व वसाहतवाद विरोधी ठराव संयुक्त राष्ट्रांनी संमत करून ही दक्षिण अफ्रीका, पोतुर्गाल सारख्या राष्ट्रांनी त्यास धुडकावून लावले यातून संयुक्त राष्ट्रांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. त्यामुळेच टिकाकारांना जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या कामी असलेला विलंब या संघटनांची निरूपयोगीता स्पष्ट करतो असे वाटते. टिकाकारांच्या मते, सर्व स्वतंत्र राष्ट्रांचे एकच एक असे जागतिक संघराज्य निर्माण झाल्याशिवाय हा प्रश्न मार्गी लागणार नाही. अभ्यासकांच्या मते आज आंतरराष्ट्रीय संघटनांमधून घटक राष्ट्रांना बाहेर पडण्याची शाश्वती आहे. जागतिक राज्य अस्तित्वात आल्यानंतर त्यातून बाहेर पडण्याचा संविधानात्मक मार्ग राष्ट्रांकडे राहणार नाही. सारांश, जागतिक राज्य निर्माण होण्याची शक्यता आजतरी दुरापास्त वाटते. परंतु अस्तित्वात असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा पूर्ण लाभ घेण्याचा निश्चय जगातील राष्ट्रांनी केला व त्यासाठी आवश्यक तेथे आपल्या सार्वभौम सत्तेस मुरड घालण्याची तयारी दर्शविली तर आजच्या आंतरराष्ट्रीय संघटनाही जगात शांततेचे व समृद्धीचे राज्य प्रस्थापित करू शकतील या निष्कर्षाप्रत आपण येतो.

### ३.४.११ क्षेत्रीय संघटना

क्षेत्रीय वा प्रादेशिक संघटन हा आंतरराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रातील एक नवीन प्रयोग मानला जातो. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात भिन्न-भिन्न राज्यांनी परस्परांमध्ये आर्थिक व राजकीय स्वरूपाचे संघटन वृद्धींगत करण्यावर भर दिलेला दिसतो. आधूनिक काळातील राष्ट्रांचे परस्परावंलन अधिकाधिक वाढल्याने क्षेत्रीय संघटनांच्या स्थापनेस मोठया प्रमाणात पूरक परिस्थिती निर्माण झालेली दिसते. क्षेत्रीय संघटन म्हणजे समान उद्देशांच्या प्राप्तीकरिता राज्याच्या समुदायांनी एकत्र येऊन स्थापन केलेले संघटन होय असे म्हणता येईल. क्षेत्रीय संघटन या संकल्पनेत स्पष्टतेचा अभाव आहे. कारक काही क्षेत्रीय संघटनांमध्ये त्या राष्ट्रसमूहांच्या दूर असलेल्या राष्ट्रांना सुद्धा सामावून घेतले जाते. जसे की अमेरिका जगातील पाच संरक्षणा संधीमध्ये समाविष्ट आहे. सीटोसारख्या लष्करी करारात परराष्ट्रांपैकी पूर्व आशियातील थायलंड व फिलीपाईन्स या दोन राष्ट्रांव्यतिरीक्त इतर चार राष्ट्रे हे इतर खंडातील आहेत. त्यामुळे हे स्पष्ट होते की, क्षेत्रीय संघटना संदर्भात निश्चित स्वरूपाचे नियम नाहीत. नॉर्मन हिल यांनी 'क्षेत्रीय संघटन' या शब्दाऐवजी 'सीमित आंतरराष्ट्रीय संघटन' असे नाव त्यादृष्टीने सुचविले आहे. त्यास प्रादेशिक व्यवस्था, प्रादेशिक समझोते असे ही शब्द योजले जातात.

### ३.४.१२ संयुक्त राष्ट्रसंघ व क्षेत्रीय संघटना :

क्षेत्रीय संघटनांना १९१९ साली स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाने ही मान्यता दिलेली होती. दोन महायुद्धाच्या दरम्यानच्या काळात अनेक क्षेत्रीय संघटनांची स्थापना ही झाली होती. मात्र दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभा बरोबर या क्षेत्रीय संघटना विसर्जित झालेल्या दिसतात. त्यानंतर अस्तित्वात आलेल्या सयुक्त राष्ट्रांनी आपल्या घटनेत क्षेत्रीय संघटनांना वैधानिक स्थान दिले. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत कलम ५२ ते ५४ मध्ये यासंदर्भातील तरतूदी करण्यात आलेल्या दिसतात. कलम ५२ प्रमाणे संयुक्त राष्ट्राचे उद्देश व सिद्धांतानुसार शांतता व सुरक्षिततेकरिता क्षेत्रीय संघटनांना स्वीकृती देण्यात आली तर कलम ५३ प्रमाणे आंतरराष्ट्रीय वाद शांततापूर्ण मार्गाने सोडविण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय संघटन व्यवस्थेस मान्यता देण्यात आली. तर कलम ५४ मध्ये हे स्पष्ट करण्यात आले की, क्षेत्रीय संघटनांना शांततेच्या स्थापनेकरीता कोणतीही कार्यवाही पूर्ण करण्याकरिता सुरक्षा मंडळास सूचना देणे आवश्यक राहिल.

क्षेत्रीय संघटन व्यवस्थेस संयुक्त राष्ट्रांनी अशा पद्धतीने घटनात्मक स्थान दिलेले असले तरी संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत क्षेत्रीय संघटनांच्या स्वरूप व उद्देशाबाबत मात्र कोणतेही स्पष्टीकरण दिलेले आढळत नाही. वास्तिवकता संयुक्त राष्ट्रांनी प्रस्तुत केलेली सामूहिक सुरक्षिततेची कल्पना यशस्वीरीत्या कार्यन्वीत झाली असती तर क्षेत्रीय संघटनाचे समर्थक असणारे अभ्यासक असे प्रतिपादन करतात की, क्षेत्रीय संघटना या संयुक्त राष्ट्रांच्या उद्देश पुर्ततेकरिता आवश्यक आहेत. संयुक्त राष्ट्रांद्वारा ज्यावेळी सक्रिय कार्यवाही होत नाही अशा परिस्थितीत संयुक्त राष्ट्रांच्या सनदेनुसार सामूहिक संरक्षणाचे अधिकार अशा क्षेत्रीय संघटनांद्वारे राज्यांना देण्याकरिता ही तरतूद करण्यात आली आहे असे ते प्रतिपादन करतात.

क्षेत्रीय संघटना या बहुतांश वेळा संयुक्त राष्ट्रांच्या ध्येयास अनुसरून कार्यरत दिसत असल्या तरी वास्तवात अनेकवेळा क्षेत्रीय संघटना या संयुक्त राष्ट्राच्या ध्येयातील एक अडसर ठरत

असल्याचे ही निदर्शनास येते. जसे की क्षेत्रीय संघटन एका किंवा काही राष्ट्रांविरोधात सैनिकी करार करण्यासाठीही होऊ शकते. त्यातून जागतिक तणाव आणखी वाढण्याची शक्यता असते त्यामुळे या संघटनांचा मूळ उद्देश्य पूर्णत्वास जाऊ शकत नाही. प्रो. गुडिरच यासंदर्भात म्हणतात की, 'अनेक क्षेत्रीय संरक्षणात्मक संघटनांच्या निर्मितीमुळे जागतिक संघटनेस मजबूत बनविण्यात अडथळे निर्माण होत असतात.

अशा पद्धतीने संयुक्त राष्ट्रांच्या उपयुक्ततेच्या दृष्टीने क्षेत्रीय संघटनांवर टिका होत असली तरी आजच्या काळात तरी या संघटना नष्ट करणे योग्य ठरणार नाही. आज या संघटनांना संयुक्त राष्ट्राचे श्रेष्ठत्व मान्य करावयास लावणे आवश्यक आहे. शांतता व संरक्षणाच्या संदर्भात राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रे हे प्रभावीरीत्या यशस्वी होऊन शकलेले नाहीत. अशा परिस्थितीत राष्ट्रांनी क्षेत्रीय संघटनांचा आधार घेतलेला दिसतो. विशेषत: कोरिया युद्धाच्या अनुभवानंतर जग क्षेत्रीय संघटनाकडे अधिक वळलेले दिसते.

गैरराजकीय स्वरूपाच्या क्षेत्रीय संघटनांना संयुक्त राष्ट्रांनी क्षेत्रीय दृष्टीने युरोप, आशिया, अतिपूर्व आशिया लॅटिन अमेरिका व अफ्रीका आशा चार भागात विभागलेले आहे. क्षेत्रीय संघटनांमुळे लोकांच्या मनात राष्ट्रोत्तर निष्ठा निर्माण होण्यात मोठी मदत झालेली दिसते. काही राज्यांनी का होईना परंतु एकत्र येऊन संघटन निर्माण केले. यातून जागतिक सहकार्याची भावना वाढीस लागते हे स्पष्टपणे प्रत्ययास येते. दुसऱ्या महायुद्धानंतर क्षेत्रीय संघटनांची निर्मिती अधिक वेगाने झालेली दिसते. आज जगातील कोणताही भाग क्षेत्रीय संघटनांपासून मुक्त नाही. या संघटनांच्या निमित्ताने एकत्र आलेल्या राष्ट्रांना स्वत:च्या प्रभुत्वाचा पूर्ण विसर पडलेला नसला तरी किमान क्षेत्रीय पातळीवर विभिन्न राज्यांमध्ये परस्पर सहकार्य निर्माण होणे हे ही स्वागताहार्य आहे. त्यामुळे अभ्यासकांना असे वाटते की, अशा संघटनाना व्यवस्थित स्वरूप देणे अत्यावश्यक आहे. संयुक्त राष्ट्रे व इतर आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर त्यांचे योग्य समायोजन झाल्यास या संघटनांपासून जागतिक समुदायास निश्चित फायदा होऊ शकतो. त्या करीता या संघटनांचा मुख्य कार्यभाग म्हणून, 'विश्वराज्याची कल्पना वृद्धींगत करून संकुचित राष्ट्रीय वृत्तींना तिलांजली देण्यास राष्ट्रांना प्रवृत्त करणे. त्यातून आंतरराष्ट्रीय समाजास पोषक वातावरण निर्माण करणे यास कटिबद्ध करणे आवश्यक आहे.

### ३.४.१३ नागरी समाज:

जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या अचाट क्रांतीने एकूण मानवी समूहाच्या सामाजिक अवकाशाच्या कक्षा रूंदावलेल्या दिसतात. संचार साधनांच्या प्रगतीपुढे जगातील कोणत्याही कोपऱ्यांतील व्यक्तींशी जनसमूदायांशी संवाद होणे. त्यांच्या भाव-भावनांना प्रतिसाद देणे, त्यांच्या प्रश्नांमध्ये, लढ्यांमध्ये सहभागी होणे सहज शक्य झाले आहे. त्यामुळे आजच्या काळातील समाज हा आंतरराष्ट्रीयत्वाच्या सीमा ओलांडून खऱ्या अर्थाने जागतिक समाज आला आहे. भारतातील शेतकरी आंदोलनावर रिआना, ग्रेटा एक ट्विट करतात व त्यास जगभरातील समाज प्रतिसाद देतो त्याचे सकारात्मक व नकारात्मक प्रभाव भारतीय राजकीय व्यवस्थेवर पडतात हा ताजा अनुभव नागरी समाजाची प्रभावक्षमता सिद्ध करण्यास पुरेसा आहे. आज जगभरात नागरी समाजाची संकल्पना गतिमान झालेली दिसते. नागरी समाजाच्या माध्यमातून अनेक संघटना, चळवळी कार्यरत आहेत. त्यांनी एकूण जागतिक राजकारणाला प्रभावित करून आपले स्वतंत्र अवकाश निर्माण केले आहे. यादृष्टीने

नागरी समाज या संकल्पनेच्या संकलनात्मक अभ्यासाबरोबर नागरी समाजाची भूमिका व उदयाची कारणे याची मांडणी वा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

### ३.४.१४ नागरी समाज संकल्पनेचा विकास :

नागरी समाज ही संकल्पना अगदी अलिकडच्या काळात प्रकाशझोतात आलेली असली तरी या संकल्पनेची मूळ बरीच जुनी आहेत असे दिसते. सिलेरो, लॉक, हेगेल, राजकीय या अभिजात विचारवंताच्या लिखाणात ही नागरी समाज या संकल्पनेची मांडणी स्पष्टपणे आढळते. रोमन तत्वज्ञ असणाऱ्या किलेरो यांनी समाजाच्या दोन अवस्थांचे चित्रण केले आहे. त्याप्रमाणे दिबेरो असे म्हणतात की, 'एका अवस्थेत समाज कायद्यांवर आधारित असतो तर दुसऱ्या अवस्थेत कायदे अस्तित्वात नसतात. किलेरोच्या मते कायद्यावर आधारित समाजात सुसंस्कृत राजकीय लक्ष्य निर्माण होतो. दुसऱ्या समाजात मात्र नागरी संबंध प्रस्थापित करणष कठीन होऊन बसते. जॉन लॉक या ब्रिटिश विचारवंताने ही नागरी समाजाची संकल्पना १७व्या शतकात मांडताना नागरी व ग्रामसी समाज हा एकच असतो' असे प्रतिपादन केलेले आढळते. लोक यांच्या मते नागरी समाजामध्येच राज्यसंस्था निर्माण होऊ शकते. नागरी समाजातच शिस्त, व्यवस्था व सुरक्षा यासारख्या बाबींची हमी मिळणे शक्य होते. १८व्या शतकात जर्मन विचारवंत हेगेल यांनी नागरी समाज संकल्पनेच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिलेले दिसते. हेगेल यांनी जॉन लॉक यांची नागरी व राजकीय समाज हे एकच असतात ही संकल्पना नाकारून नागरीसमाज व राजकीय समाज या वेगळ्या न स्वतंत्र संस्था आहेत हे प्रथम स्पष्ट केले. हेगेल यांच्या मते, नागरी समाज ही कुंटूबसंस्था व राज्यसंस्था यांच्या मधली अवस्था असते.

ल यांनी हे ही स्पष्ट केलेले दिसते की राज्य ही सर्वोच्च सामाजिक संस्था असली तरी राज्याच्या निर्मितीमुळे नागरी समाज नष्ट होत नाही. २०व्या शतकात नागरी समाज संकल्पनेच्या विकासात इटालियन विचारवंत ग्राम्सी यांनी महत्वाचे योगदान दिलेले दिसते. ग्राम्सी यांच्या मते, 'राज्य दमनावर आधारित असते तर नागरी समाज हा सहमतींवर आधारलेला असतो.'

सारांश, नागरी समाज ही संकल्पना प्राचीन काळापासून सातत्याने विकसित होत आजच्या स्वरूपापर्यंत पोहचलेली दिसते. प्रारंभी नागरी समाज या संकल्पनेचा विचार केवळ राज्याच्या संदर्भातच केला जात होता सध्या मात्र ही संकल्पना स्वतंत्र व तुलनात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर अभ्यासली जात असलेली दिसते.

### ३.४.१५ नागरी समाज संकल्पनेची व्यवस्था :

नागरी समाज या संकल्पनेची निश्चत स्वरूपाची व्याख्या मान्य झालेली दिसत नाही. तरीही साधारणत: असे म्हणता येईल की, "नागरी समाज हे एक असे अवकाश आहे जिथे राज्य व बाजार यांच्या व्यतिरिक्त स्वयंस्फूर्तीने व्यक्ती समान हितसंबंध जोपासण्याकरिता एकत्र येतात. कालदौर यांनी नागरी समाजाची संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे, “नागरी समाज ही एक प्रक्रिया आहे जिच्यामध्ये व्यक्ती आपपसात आणि आर्थिक व राजकीय सत्ताकेंद्राबरोबर वाटाघाटी, वाद, संघर्ष वा समझौता करतात. "

### ३.४.१६ नागरी समाजाचे स्वरूप :

नागरी समाजाचे स्वरूप पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

१. **समान उद्देश प्राप्तीचे मुक्त संघटन :** नागरी समाज म्हणजे समान उद्देशाच्या प्राप्तीकरीता निर्माण झालेले व्यक्तींचे मुक्त संघटन होय. नागरी समाज हा कायद्यावर आधारित असतो. नागरी समाजात दमनापेक्षा सहमतीच्या तत्वास अधिक प्राधान्य दिले जाते.

२. **स्वतंत्र राजकीय अवकाश :** नागरी समाजाचे स्वरूप स्पष्ट करणारे दूसरे वैशिष्टये म्हणजे नागरी समाजास स्वतंत्र राजकीय अवकाश असतो. मात्र राज्यसंस्थेशी नागरी समाजाचा संबंध असतोच असे नाही.

३. **बाजारव्यवस्थेपासून स्वतंत्र :** नागरीसमाज जसा राज्यसंस्थेपासून स्वतंत्र असतो तसाच तो बाजार व्यवस्थेपासून ही मुक्त असलेला दिसतो. बाजारव्यवस्थेत नफा हा प्रधान घटक असतो. परंतु नागरी समाज नफा या घटकास कधीही प्राधान्य देत नाही. त्यामुळे नागरी समाजास 'ना नफा ना तोटा क्षेत्र' असे ही संबोधन वापरले जाते.

४. **लोकशाहीची उद्दिष्टये आधारभूत :** नागरी समाज हे लोकशाहीची आधारभूत उद्दिष्टये साध्य करण्याचे एक महत्वाचे माध्यम मानले जाते. त्यामुळे नागरी समाज ही संकल्पना फॉसिस्ट, वांशिक, दहशतवादी, गुन्हेगारी स्वरूपाच्या गटांशी वा घटकांशी जोडली जाऊ शकत नाही.

### ३.४.१७ जागतिक नागरी समाजाच्या उदयाची कारणे :

जागतिक नागरीसमाजाच्या उद्याची प्रमुख कारणे या घटक पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

१. **साम्यवादाचे आव्हान व नागरीसमाजाची पुर्नमांडणी :** नागरी समाजाच्या उद्यास राष्ट्रीय पातळीवर नागरी समाजाच्या संकल्पनेची पुर्नमांडणी व साम्यवादाचे आव्हान हे पूरक ठरलेले दिसते. प्रामुख्याने ऐंशीच्या दशकात दक्षिण अमेरिका व पूर्व युरोप मधील साम्यवादी राजवटींमध्ये कम्यूनिस्ट हुकूमशाहीस विरोध करण्याकरीता जनता एकवटू लागली. शांतता व मानवी हक्क यास जागतिक मान्यता प्राप्त झाल्यामुळे या राष्ट्रीय आंदोलनाला जागतिक पाठींबा मोठ्या प्रमाणात प्राप्त झाला. सोव्हीएट रशिया ज्या विघटनानंतर साम्यवादाचे आव्हान मोडीत निघून शीतयुद्धाची समाप्त झाली असली तरी संक्रमणावस्थेत असणाऱ्या समाजांनी नागरी संघटनांना आर्थिक व राजकीय पुनर्रचनेच्या संदर्भात महत्वाची भूमिका दिली. नागरी समाज आपणास योग्य दिशा दाखवेल हा विश्वास साम्यवादाकडून भांडवलवादाकडे वा बंदिस्त व्यवस्थेकडून मुक्त व्यवस्थेकडे प्रवेशित होणाऱ्या समाजांना वाटला व त्यातूनच नागरी समाजाच्या उद्यास पोषक वातावरण निर्माण झालेले दिसते.

२. **राज्याचे बदलते स्वरूप :** नागरी समाजाच्या उद्यास राज्याचे बदलते स्वरूप हा घटक महत्वाचा ठरला असे दिसते. आधूनिक काळात कल्याणकारी राज्याचे तत्व मागे पडून नवउदारमतवादी राज्य ही संकल्पना प्रबळ झाली. याचे विकसित व अविकसित राज्य व तेथील समाजावर नकारात्मक प्रभाव मोठ्या प्रमाणात पडले. जसे की, विकसित राज्यांमध्ये नागरिकांचे कल्याणकारी अधिकार नवउदारमतवादी राज्याने हिरावून

घेतले. त्यामुळे विकसित राज्यामधील जनतेस मिळणाऱ्या सवलती, विविध अनुदाने बंद झाल्या, तर विकसनशील देशांमध्ये याचा फटका आर्थिक व सामाजिकदृष्टया दुर्बल घटकांना मोठया प्रमाणात बसला. या दुर्बल घटकांना राज्याचे असणारे संरक्षणच नष्ट झाले. त्यामुळे नागरीकांच्या या अधिकारांकरीता लढणाऱ्या नागरी समाजाच्या संघटना उद्यास येण्यास पोषक परिस्थिती निर्माण झाली.

३. **गुड गव्हर्नंसची संकल्पना :** ई-गव्हर्नस, गुड गव्हर्नस या राज्याच्या नवीन प्रयोगांनी ही नागरी समाजाच्या उद्यास हातभार लावलेला दिसतो. यासारख्या संकल्पनामुळे सार्वजनिक सेवांच्या कार्यक्षमतेसंदर्भास व योग्यतेबाबत सामान्य जनतेच्या मनात शंका निर्माण झाल्या. त्यामुळे सार्वजनिक सेवाविरोधात दाद मागण्याकरिता जनता संघटित होऊ लागली. त्याचा एकूण परिणाम म्हणून नागरी समाजाच्या शासनाच्या कार्यातील सहभागामुळे प्रशासनातील पारदर्शकता, जबाबदारी व नागरिकांचा प्रशासन प्रक्रियेतील सहभाग वाढीस लागला आहे असे दिसते.

४. **विश्वरचनेतील बदल :** विश्वरचनेत झालेले काही बदल ही नागरी समाजाची उभारणी होण्यास कारणीभूत ठरलेले दिसतात. जागतिक स्तरावर झालेल्या काही रचनात्मक बदलांनी स्वयंसेवी संस्थाच्या सहभागास वाव मिळाला. जागतिकीकरणामुळे आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बदल वेगाने घडून आले. नागरी समाजाने या सर्वच क्षेत्रात आपले कार्य विस्तारले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने निर्माण झालेल्या समस्या सोडवणे हा नागरी समाजाचा प्रधान हेतु होता. उदा. जुबीली २००० या संस्थेने विकास, धर्म व मानवी हक्क या क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना तिसऱ्या जगातील देशांच्या आंतरराष्ट्रीय कर्जाच्या प्रश्नाच्या संदर्भात एकत्र आणले आहे.

५. **माहिती व तंत्रज्ञानातील क्रांती :** नागरी समाजाच्या उद्यास कारणीभूत ठरलेला पाचवा महत्वाचा घटक म्हणून माहिती व संपर्क तंत्रज्ञानात झालेली क्रांती या घटकाकडे पाहिले जाते. माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जगभरातील नागरी संघटनांना एकमेकांशी संपर्कात राहून आपल्या कार्यात सूसुत्रता आणणे शक्य झाले आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रगतीने राष्ट्रीय सीमांच्या पलीकडे जाऊन संघटन करणे, संसाधने उपलब्ध करणे सहज शक्य झाले आहे. भारतातील शेतकरी आंदोलन, चीन मधील विद्यार्थ्यांचे आंदोलन हा विषय जगभर पसरला हे याचेच एक उदाहरण होय.

### ३.४.१८ नागरी समाजाची भूमिका :

नागरी समाजाची समकालीन जगातील भूमिका पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

१. **सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेत योगदान :** जागतिक राजकारणात सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी नागरी समाजाची भूमिका महत्वाची ठरलेली दिसते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने सामाजिक न्यायाच्या पेच प्रसंगांना मोठया प्रमाणात निर्माण झालेले दिसतात. सामाजिक व आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. नागरी समाजातील मानवी हक्क, कामगार व विकासाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांनी याची विशेष दखल घेतलेली दिसते. नागरी समाजाने जागतिक बँक, आंतर राष्ट्रीय नाणेनिधी व जागितक व्यापार संघटनेसारख्या संघटनांच्या उदारमतवादी धोरणांविरोधात जन आंदोलन उभारून जागतिक जनमताचा निषेध व्यक्त करण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला दिसतो. जागतिक असमानता दूर करणे व

सामाजिक न्यायाचा पूरस्कार करण्याच्या दृष्टीकोनातून पाहता गरीब देशांवरील कर्जाचा बोजा हलका करण्यात नागरी संघटनांनी महत्वाची भूमिका बजावली आहे हे सर्वश्रूत आहे.

२. **प्रशासनाचे लोकशाहीकरण :** जागतिक लोकशाही प्रक्रिया गतिमान करण्यात नागरी समाजाने महत्वाचे योगदान दिलेले दिसते. प्रशासनाच्या लोकशाही करणाच्या दृष्टीने ज्या सामाजिक गटांना कुठेच प्रतिनिधित्व मिळत नाही अशा गटांचा आवाज जगासमोर मांडून नागरी संघटना महत्वाची भूमिका बजावत आहेत. जागतिक बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक व्यापार संघटना यांचे समकालीन जागतिक राजकीय व्यवस्थेतील स्थान अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. या तीनही आंतरराष्ट्रीय संस्थाच्या व्यवहारांमध्ये लोकशाही तत्वांचा आग्रह धरून त्याप्रमाणे सुधारणा घडवून आणण्याकरिता नागरी समाज मोठ्या प्रमाणात आंदोलन उभारतांना दिसतो. नागरी समाजाच्या मते या तीनही संस्था जगातील सर्व राष्ट्रांचे योग्य प्रतिनीधीत्व करीत नाहीत. त्यांचे वर्तन बेजबाबदारपणाचे आहे. या तीनही संस्थाच्या कारभारात पारदर्शकतेचा अभाव असून त्यांनी निर्णय प्रक्रियेत अधिकाधिक घटकांना सामावून घेण्याची आवश्यकता आहे. नागरी समाजाच्या या भूमिकेचा या तीन ही आंतरराष्ट्रीय संघटनांवर प्रभाव पडलेला दिसून येतो आहे. त्यामुळे या संस्था प्रशासनाचे लोकशाहीकरण करण्यास बाध्य होतांना दिसत आहेत. उदा. जागतिक बँक व आंतरराष्ट्री नाणे निधीने स्वत:च्या कार्याच्या स्वतंत्र लेखापरीक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारून यांची सुरूवात केलेली दिसते.

३. **विकासा संबंधीचा टिकात्मक व पर्यायी दृष्टीकोन :** आधूनिकता व विकासाच्या नावाखाली पर्यावरण व मानवी विकासाची जी अवहेलना चालू होती त्या विरोधात जागतिक नागरी समाजाने जी टिकात्मक भूमिका घेतली व विकासाचा जो पर्यायी दृष्टीकोन संबंध जागतिक समूदायस दिला तेही जागतिक राजकारणास निर्णायक वळण देणारे ठरले आहे. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगी करणाने विकासाच्या ज्या अदृरदर्शी व भडक विकासाच्या कल्पना प्रस्तुत केल्या होत्या त्यास नागरी समाजाने विरोध करून सामाजिक न्याय, जनसहभाग, टिकाऊपणा व महिलांचे आणि निसर्गाचे सबलीकरण यावर आधारीत विकासाचे पर्यायी दृष्टीकोन ही प्रस्तुत केले. संयुक्त राष्ट्रांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध परिषदांना समांतर परिषदा भरविण्याची मोहीम जागतिक नागरी समाजाने अंगिकारलेली दिसते. शिवाय जागतिक सामाजिक परिषद ही प्रत्येक वर्षात आयोजित केली जाते.

४. **संघटना व सल्लागाराची भूमिका :** जागतिक संदर्भात नागरी समाजाने संघटना व सल्लागाराची भूमिका अशा दोन्हीं स्तरावर ही महत्वाची भूमिका पार पाडलेली दिसते. बाल मजूरी, पर्यावरणाचा ऱ्हास मानवी हक्कांचा भंग या क्षेत्रात स्वयंसेवी नागरी संघटनेनी महत्वाचे योगदान दिलेले आहे. नागरी समाजाच्या भूमिकेमुळे या क्षेत्रात महत्वाचे सकारात्मक बदल घडून येतांना दिसतात उदा. बालमजूरी विरोधात नागरी समाजाने घेतलेल्या प्रखर भूमिकेमुळे अनेक देशांना बालमजूरी विरोधी कायदे करणे भाग पडले आहे.

५. **विविध सेवांचे वितरण :** जागतिक नागरी समाज जगभर जीवनावश्यक वस्तूंच्या व सेवांच्या वितरणातही महत्वाची भूमिका पार पाडतांना दिसतो. जगात कोठेही मानवनिर्मित वा नैसर्गीक संकट उभे राहिले तरी नागरी समाज अशा संकटाच्या प्रसंगात मानवी, कल्याणकारी मदत पूरविण्यात महत्वाचे योगदान देतांना दिसतात. अनेकदा तर त्यांचे कार्य हे राज्यसरकारांपेक्षा ही अधिक प्रभावी असते. रेड क्रॉस, कझ्युमर्स इंटरनॅशनल ॲम्नेटी इंटरनॅशनल या संघटनांचा या दृष्टीने आदराने उल्लेख केला जातो.

६. **माहितीचा प्रसार करणे :** सुयोग्य माहितीचा प्रसार करण्यातही नागरी समाजाचे योगदान दिसते. नागरी संघटना स्वतंत्र संशोधन करून नागरी समस्यांविषयीची मते जनता व शासनासमोर मांडतात. नागरी समाजाने संशोधन करून आजतागायत अंधारात वा दुर्लक्षित राहिलेल्या विषयांना प्रकाशात आणून त्यावर जागतिक समुदायाचे लक्ष वेधलेले दिसते. त्यामुळे जगभर अशा विषयांवर चर्चा घडून येते. उदा. पर्यावरण, विकासाची प्रतिमाने, स्त्रीवाद यासारख्या दुर्लक्षित विषयांना जागतिक नागरी समाजाने जागतिक विचार विश्वाचा भाग बनवलेले दिसते. त्यामुळे नागरी समाजाच्या माध्यमातून सामान्य जनतेच्या व शासनकर्त्यांच्या जाणिवांच्या कक्षा रूंदावण्याचे महत्वाचे कार्य पार पाडले जाते.

७. **संयुक्त राष्ट्रांमध्ये सल्लागाराचा दर्जा :** संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील ७१ व्या कलमामध्ये आर्थिक व सामाजिक परिषदेने निर्णय घेताना, ठराव करताना स्वयंसेवी संस्थांशी सल्लामसलत करावी अशी तरतूद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे १९५० साली संपूर्ण राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक परिषदेने तशा आशयाचा कायदा पारित केलेला आहे. त्या कायद्याप्रमाणे तीन प्रकारच्या संस्थाना मान्यता देण्यात आली आहे. १) परिषदेच्या कार्याशी थेट संबंधित काही मोजक्या संस्था २ ) विशिष्ट क्षेत्रात मान्यताप्राप्त अशा संस्था ३) इतर छोटया संस्था त्यामुळे १९५० नंतर ज्या काळात नागरी समाजास संयुक्त राष्ट्रांचे सल्लागार म्हणून ही महत्वाचे योगदान देता आले असे दिसते.

एकंदरीत मागील काही दशकांमध्ये जागतिक राजकारणात नागरी समाजाची भूमिका अनन्यसाधारण स्वरूपाची राहिली आहे. नागरी समाजातील बहुतांश संघटना या आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या दिसतात. काही संघटनानी तर इतर राष्ट्रातील संघटनाबरोबर राष्ट्रातील स्वरूपाचे करार ही केले आहेत. नागरी समाजात कार्यरत असणाऱ्या संघटनांमध्ये आकारमान, कार्यपद्धती व ध्येय धोरणांमध्ये वेगळेपणा असला तरी काही भूमिकांच्या संदर्भात त्यांच्यात एकवाक्यता आढळते. साधारणतः सार्वभौम शासनव्यवस्था व स्वयंसेवी नागरी संघटनांमध्ये नेहमीच संघर्ष उद्भवतांना दिसतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे नागरी संघटनांना मानवी हक्कांच्या संरक्षणाकरीता राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणे योग्य वाटते. मात्र सार्वभौम शासन व्यवस्था अशा पद्धतीचा हस्तक्षेप मान्य करावयास तयार नसतात. त्यात काही स्वयंसेवी संस्थाची भूमिका व कार्यक्रम हे वादग्रस्त ठरतांना दिसतात. तरीही राज्य व नागरी समाजातील स्वयंसेवी संस्थांचे संबंध अद्यापही विकसित होत आहेत. सारांश, या दोन्ही व्यवस्था भक्कम होण्यामध्येच सामान्य जनतेचे व लोकशाही व्यवस्थेचे यश सामावलेले आहे या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## ३.५ सारांश

राजनय, आंतरराष्ट्रीय कायदा व अ राज्य घटक यांचे स्थान आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. राजनय हे प्राचीन काळापासून आंतरराष्ट्रीय संबंधाना व परराष्ट्र धोरणास निर्धारीत करण्यात महत्वाची भूमिका बजावत असलेले दिसते. राजनय ज्यावेळी अपयशी ठरते त्यावेळी युद्ध घडूनयेते व युद्धानंतरही पुन: शांतता प्रस्थापित करण्यासाठी राजनय तंत्राचाच आधार घ्यावा लागतो यातून आंतरराष्ट्रीय संबंधामधील राजनयाची अपरिहार्यता आपल्या लक्षात येते. आंतरराष्ट्रीय कायदा हा विश्व राज्याचे स्वप्न पूर्वत्वास नेण्याचे एक महत्वपूर्ण दिर्घपल्याचे साधन आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करणे व आंतरराष्ट्रीय संबंधाना वैधानिक आधार देण्याचे महत्वाचे कार्य आंतरराष्ट्रीय कायद्याच्या माध्यमातून पार पाडले जाते. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपावर काही मुलभूत स्वरूपाचे आक्षेप घेतले जात असले वा त्यावर काही गंभीर मर्यादा असल्या तरी आज जागतिक राजकारणात आंतरराष्ट्रीय कायद्याची अपरिहार्यता सर्वांनी मान्य केलेली दिसते. जागतिकीकरण, उदारीकरणाच्या प्रक्रियेने विश्व रचनेत काही मूलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणलेले दिसतात त्यातून अराज्य घटकांची भूमिका ही आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाशाखेत महत्वाची ठरली आहे. संपूर्ण राष्ट्रे, राष्ट्रसंघ या जागतिक संघटनांबरोबर सार्क, आवियान, ओपेक, यूरोपियन महासंघ, नाटो यासारख्या क्षेत्रीय संघटना बहुराष्ट्रीय कंपन्या व नागरी समाजाची जागतिक भूमिका यांनी एकूण आंतरराष्ट्रीय संबंधाच्या कक्षा मोठया प्रमाणात विस्तारलेल्या दिसतात.

## ३.६ आपण काय शिकलो?

१) राजनय ही संकल्पना स्पष्ट करा. राजनयाचे महत्व लिहा.
२) राजनयाचा अर्थ स्पष्ट करून राजनयाचे प्रकार वर्णन करा.
३) राजनयाचे स्वरूप स्पष्ट करून राजनयासमोरील आव्हानांची चर्चा करा.
४) आंतरराष्ट्रीय कायदा ही संकल्पना स्पष्ट करा.
५) आंतरराष्ट्रीय कायदा म्हणजे काय? आंतरराष्ट्रीय कायद्याचे उगमस्त्रोत लिहा.
६) आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप स्पष्ट करून आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्व लिहा.
७) आंतरराष्ट्रीय कायद्याच्या मर्यादांवर निबंध लिह
८) अ-राज्य घटक म्हणून बहुराष्ट्रीय निगम या घटकाचे स्थान स्पष्ट करा.
९) जागतिक राजकारणातील आंतरराष्ट्रीय संघटनांची भूमिका वर्णन करा.
१०) नागरी समाज ही संकल्पना स्पष्ट करून नागरी समाजाची जागतिक राजकारणातील भूमिका विशद करा.
११) टिपा लिहा.
    १. नागरी समाज
    २. आंतरराष्ट्रीय कायदा
    ३.राजनय
४. आंतरराष्ट्रीय संघटना
५. क्षेत्रीय संघटना
६. नागरी समाज उद्याची कारणे

## ३.७ संदर्भ सूची


१) भोगले शांताराम, ‘आंतरराष्ट्रीय संबंध', विद्या प्रकाशन, नागपूर, २००१

२) रायपूरकर वसंत, ‘आतरराष्ट्रीय संबंध', श्री मंगेश प्रकाशन नागपूर, २००१

३) बोर्जेस जॉन्सन, 'संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

४) देवळाणकर शैलेंद्र, ‘आंतरराष्ट्रीय संबंध, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०१२, २०११

५) तोडकर बी.डी., 'आंतरराष्ट्रीय संबंध', डायमंड पब्लिकेशन्स पुणे २०१२

६) Joshua Goldstein, International Relations', Longman, New York, २००२

७) Michal Roskin, Internation Relations', New Delhi Prentice Hall, २००२

८) Vinay Kumar Malhotra, International Relations', New Delhi, Anmol Publications, २००३

९) E. H. Carr, 'International Relations Between The Two World Wars, McMillan Londan, १९५१.

१०) Johri J. C. 'International Relations and Politics; Therotical Perspective, Sterling Pub, New Delhi, १९८१.

११) Chomsky N., 'World Order Old and New, Pluto Press London, 9998.


❄❄❄❄❄❄❄

# ४

# शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरणाचे उपाय

## (Arms Control and Disarmament Measures)

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे
४.२ प्रस्तावना
४.३ निशस्त्रीकरण
४.४ शस्त्रनियंत्रण
४.५ पारंपारिक अस्त्रे
४.६ आण्विक अस्त्रे
 ४.६.१ जागतिक अण्वस्त्रस्पर्धा
 ४.६.२ अण्वस्त्रांचे शस्त्रनियंत्रण
 ४.६.३ भारताची अण्वस्त्रप्रसारविषयक भूमिका
४.७ इतर सर्वसंहारक अस्त्रे
 ४.७.१ जैविक अस्त्रे
 ४.७.२ रासायनिक अस्त्रे
४.८ समारोप
४.९ सरावप्रश्न
४.१० संदर्भ

## ४.१ उद्दिष्टे

- शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरण या संकल्पना समजावून घेणे
- पारंपारिक अस्त्रांच्या शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरणाशी निगडीत प्रयत्नांचा अभ्यास करणे
- आण्विक अस्त्रांच्या शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरणाशी निगडीत प्रयत्नांचा अभ्यास करणे
- इतर सर्वसंहारक अस्त्रांच्या शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरणाशी निगडीत प्रयत्नांचा अभ्यास करणे

## ४.२ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरण या आंतरराष्ट्रीय संबंधाशी निगडीत संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत. रुढार्थाने या दोन संकल्पना शितयुद्ध कालखंडातील सत्तास्पर्धेशी निगडीत मानल्या जातात. परंतू शितयुद्धोत्तर काळातही

शस्त्रास्त्रांची स्पर्धा चालू असून तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे संहारक अस्त्रांची निर्मीती होतांना दिसते.

हॅन्स मॉर्गेन्थॉ सारख्या वास्तववादी सिद्धांतकारांनी जागतिक राजकारणातील अनिवार्य सत्तास्पर्धा आणि त्यातून निर्माण होणारी 'सुरक्षेची कोंडी' (Security Dilemma) अधोरेखित केली आहे. या सुरक्षेच्या कोंडीतून विविध देशांनी स्वतःला अण्वस्त्रसंपन्न केले आहे.

## ४.३ निशस्त्रीकरण (Disarmament)

शस्त्रनियंत्रण (Arms Control) आणि निशस्त्रीकरण (Disarmament) या संकल्पना अनेकदा समान अर्थाने वापरल्या जातात. प्रत्यक्षात या संकल्पना परस्परसुसंगत असूनही कमालीच्या भिन्न आहेत. सर्वप्रथम निशस्त्रीकरण ही संकल्पना आपण समजून घेऊयात. निशस्त्रीकरण या संकल्पनेमध्ये शस्त्रास्त्रांच्या संख्येमध्ये कपात आणि व्यापक नियंत्रण घडवून आणणे अभिप्रेत असते. निशस्त्रीकरण या संकल्पनेचा वापर १८९९ च्या हेग परिषदेमध्ये सर्वप्रथम करण्यात आला. यानंतर हेन्री फोर्ब्स यांनी आपल्या The Strategy of Disarmament या ग्रंथामध्ये निशस्त्रीकरणाची सांगोपांग चर्चा केली असून फोर्ब्स यांनी शस्त्रास्त्रांची गुणात्मक व संख्यात्मक कपात, अमानवी युद्धतंत्रावर निर्बंध आणि भौगोलिक भूभागाचे निर्सैन्यीकरण करणे यासारख्या संकल्पनांचा समावेश निशस्त्रीकरणामध्ये केला आहे.

दुसऱ्या महायुद्धातील अण्वस्त्रांच्या वापरानंतर 'सर्वसंहारक अस्त्रे' (Weapons of Mass Destruction) ही संकल्पना मूळ धरु लागली. त्यामुळे निशस्त्रीकरणाच्या प्रयत्नांमध्ये आण्विक, रासायनिक व जैविक अस्त्रांचीही चर्चा करणे अनिवार्य बनले. या दृष्टीने संयुक्त राष्ट्राने २०१५ मध्ये स्विकारलेल्या अहवालात निशस्त्रीकरणाची सर्वसमावेशक व्याख्या मांडली आहे. या अहवालानुसार:

निशस्त्रीकरण म्हणजे सर्वसंहारक अस्त्रांचा (Weapons of Mass Destruction) समूळ उच्चाटन करीत करारातील सहभागी राष्ट्रांच्या सशस्त्र सैन्य तसेच पारंपारिक अस्त्रांमध्ये संतुलित घट घडवून आणणे व असे करतांना त्या देशांच्या सुरक्षेच्या गरजा लक्षात घेऊन पायाभूत सैन्य क्षमतेच्या संवर्धनास प्रोत्साहन देणे होय.

ढोबळमानाने निशस्त्रीकरणाचे दोन प्रकार मानले जातात. यापैकी पहिला प्रकार म्हणजे 'सामान्य व संपूर्ण निशस्त्रीकरण' (General and Complete Disarmament) तर दुसरा प्रकार 'क्षेत्रीय निशस्त्रीकरण' (Regional Disarmament) हा आहे. 'सामान्य आणि संपूर्ण निशस्त्रीकरण' हे उपलब्ध सर्व शस्त्रास्त्रांना नष्ट करण्याशी निगडीत आहे. ही काहीशी आदर्शवादी अवस्था असून त्यामुळे चिरंतन शांतता आणि परस्पर सहकार्य वाढीस लागेल असा विचार आंतरराष्ट्रीय संबंधाचे उदारमतवादी अभ्यासक मानतात.

याउलट 'क्षेत्रीय निशस्त्रीकरण' ही संकल्पना विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील आण्विक तसेच इतर संहारक अस्त्रांच्या चाचणीस विरोध करते. या प्रकारातील निशस्त्रीकरणातून ट्लाटेलोल्को संधी (१९६७), अंटार्क्टिका संधी (१९५९), बाह्य अवकाश संधी (१९६७) यासारख्या संधींची निर्मीती झाली आहे. या संधींद्वारे निशस्त्रीकरणाची उद्दिष्टे साध्य करणे काही अंशी शक्य झाले आहे असे आपणास म्हणता येईल.

## ४.४ शस्त्रनियंत्रण (Arms Control)

निशस्त्रीकरणाच्या तुलनेत शस्त्रनियंत्रण ही संकल्पना काहीशी वास्तवदर्शी आहे. शस्त्रनियंत्रणाच्या विविध व्याख्या मांडण्यात आलेल्या आहेत. यापैकी बॅरी कोलोड्कीन यांनी मांडलेली व्याख्या आकलनाच्या दृष्टीने महत्वाची मानली जाते. बॅरी कोलोड्कीन यांच्या मते:

जेव्हा एक किंवा काही देश शस्त्रांस्त्रांचा विकास, उत्पादन, साठा, प्रसार, वितरण आणि वापर करण्यास प्रतिबंध घालतात तेव्हा त्यास शस्त्रनियंत्रण म्हणतात. शस्त्रनियंत्रणामध्ये पारंपारिक तसेच सर्वसंहारक अशा सर्वच अस्त्रांवर निर्बंध घालण्याचा प्रयत्न होतो.

शस्त्रनियंत्रण ही संकल्पना अणुयुगातील विशिष्ट परिस्थितीतून निर्माण झाली आहे. सैद्धांतिकदृष्ट्या शस्त्रनियंत्रणाचा उगम १९५० च्या उत्तरार्धात उदयास आली. सैन्यशक्तीवर मर्यादा घालणे हाही शस्त्रनियंत्रणाचा घटक असून शक्तीच्या वापरास प्रतिबंध करणे (त्याद्वारे युद्धास प्रतिबंध), युद्धादरम्यान शक्तीचा वापर सीमित करणे (युद्धातील नुकसान घटवणे) आणि शांतताकाळात शस्त्रांचा वापर आणि उत्पादन घटवणे (शस्त्र मर्यादा साधणे व निशस्त्रीकरण घडवून आणणे) ही शस्त्रनियंत्रणाची उद्दिष्ट्ये (Goals) सांगता येतील. ही उद्दिष्ट्ये पाहता आपणास शस्त्रनियंत्रण या संकल्पनेची पाळेमुळे विविध मध्ययुगीन नैतीक धर्मशास्त्रे व आधुनिक आंतरराष्ट्रीय कायद्यातही पहावयास मिळतात.

शस्त्रनियंत्रणाद्वारे विविध देश शस्त्रास्त्रांचे उत्पादन थांबवण्याचा अथवा न करण्याचा निर्धार करतात. यासाठी विविध आंतरराष्ट्रीय संघटनांची (जसे की आंतरराष्ट्रीय अणुउर्जा आयोग, OPCW इ.) मदत घेतली जाते. शस्त्रनियंत्रण ही संकल्पना दोन किंवा अधिक पक्षांनी एकत्र येऊन काही समान स्विकार्य मुद्यांच्या आधारे (जसे की, शस्त्रांची संख्या, शस्त्रांचा पल्ला, संहारकता, इ.) शस्त्रांवर नियंत्रण आणण्याशी संबंधित आहे.

या संकल्पनांच्या संक्षिप्त परिचयानंतर आपण निशस्त्रीकरण आणि शस्त्रनियंत्रणाशी निगडीत प्रमुख प्रयत्नांचा अभ्यास करणार आहोत.

प्रस्तुत प्रकरणाची विभागणी तीन भागांत करण्यात आली असून पारंपारिक अस्त्रे (Conventional weapons), आण्विक अस्त्रे (Nuclear weapons) आणि इतर सर्वसंहारक अस्त्रे (Other Weapons of Mass Destruction) या घटकांचा आधार घेत शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरणाची चर्चा करण्यात आली आहे.

## ४.५ पारंपारिक अस्त्रे (Conventional weapons)


पारंपारिक अस्त्रे म्हणजे सर्वसंहारक अस्त्रे (WMD) वगळता अस्तित्वात असलेली सर्व अस्त्रे होय. सशस्त्र संघर्ष (Armd Conflict) आणि गुन्हेगारी कृतींमध्ये (Criminal Activities) सर्रासपणे वापरली जाणारी अस्त्रे म्हणुनही पारंपारिक अस्त्रांकडे पाहिले जाते. यात प्रामुख्याने युद्ध रणगाडे, दीर्घ पल्ल्याच्या तोफा, लढाऊ विमाने, लढाऊ जहाजे, मिसाईल आणि मिसाईल प्रक्षेपक, मानवरहित लढाऊ हवाई वाहके (Unmanned Combat Aerial Vehicle) लढाऊ हेलिकॉप्टर, लहान शस्त्रे इ. चा समावेश होतो.

संयुक्त राष्ट्राच्या वैश्विक जाहिरनाम्यातील नमूद निर्देशांनुसार, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करीत जर सदस्य राष्ट्रे पारंपारिक अस्त्रे बाळगत अथवा वापरत असतील तर त्यावर कसलेही

बंधन घालण्यात येत नाही. त्यामुळेच पारंपारिक अस्त्रांबाबत निशस्त्रीकरणापेक्षा (Disarmament) शस्त्रनियंत्रण (Arms Control) करण्याचाच आग्रह जास्त होतांना दिसतो.

सर्वसंहारक अस्त्रांच्या तुलनेत पारंपारिक अस्त्रे ही कमी घातक असतात. तेव्हा पारंपारिक अस्त्रांच्या वापरावर निर्बंध घालण्याची किंवा शस्त्रनियंत्रण करण्याची खरंच गरज आहे का ? असा प्रश्न येथे विचारला जाणे स्वाभाविक आहे. पारंपारिक अस्त्रे ही तुलनेने कमी घातक असली तरी त्यांच्या वापारातून होणारे नुकसान हे नक्कीच जास्त असते. विशेषतः एखाद्या राज्यातील सशस्त्र संघर्षामुळे मानवी हानी होऊन वांशिक हत्या, बलात्कार, पलायन आणि स्थलांतरे यासारखे मानवी सुरक्षेशी निगडीत प्रश्न निर्माण होतात. शस्त्रास्त्रीकरण ही संकल्पना आधी नमूद केल्याप्रमाणे सुरक्षा कोंडीवर (Security Dilemma) आधारित आहे. तेव्हा, पारंपारिक अस्त्रांचा वापर हा स्थानिक पातळीवर हिंसेस चालना देऊन असुरक्षिततेची भावना निर्माण करतो तर क्षेत्रीय पातळीवर शस्त्रास्त्रस्पर्धा वाढीस लागल्याने राष्ट्रा-राष्ट्रांत अविश्वास वाढीस लागतो. पारंपारिक अस्त्रांच्या वापरामुळे देशातील पायाभूत सुविधा जसे की; रस्ते, दळणवळणाच्या सेवा, उद्योगधंदे इ. चे नुकसान होऊन आर्थिक व राजकीय अस्थिरता निर्माण होते. देशा-देशांतील शस्त्रास्त्रस्पर्धेमुळे शस्त्रास्त्रखरेदीस अत्याधिक महत्त्व दिले जाते व आर्थिक विकास साधणे कठिण बनते. याशिवाय परकिय मदतीवर अत्याधिक अवलंबून रहावे लागल्याने देशावरील कर्जाचा बोजा वाढतो. वाढत्या पारंपारिक अस्त्रांच्या वापराशी निगडीत असलेला दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे या अस्त्रांच्या लहान आकारांमुळे त्यांचा होणारा अवैध व्यापार आणि दहशतवादी संघटनांसारख्या अराज्यीय घटकांकडे (Non-state actors) या अस्त्रांचे होत असणारे हस्तांतरण.

तेव्हा वरील अडचणींचा विचार करता पारंपारिक अस्त्रांचे शस्त्रनियंत्रण व्हावे यादृष्टीने जगभरात मागणी होतांना दिसते. वर्तमान परिस्थितीत पारंपारिक अस्त्रांच्या शस्त्रनियंत्रणासाठी पुढील उपाय योजले जातांना दिसतात.




***आकृती क्र. १ पारंपारिक अस्त्रांचे शस्त्रनियंत्रण***
***(Arms Control of Conventional Weapons)***

**शस्त्रांवर मर्यादा घालणारे उपाय (Measures to Control Arms):**

पारंपारिक अस्त्रे ही सर्वसंहारक अस्त्रांच्या तुलनेत कमी घातक असूनही त्यांच्या अनिर्बंध वापरातून मानवतेस घातक प्रश्न उपस्थित होतांना दिसतात. सर्वसामान्य नागरिक आणि

युद्धातील सैनिक यांच्यावर या शस्त्रांच्या वापरातून दूरगामी परिणाम होतांना दिसतात. विशेषतः बुबीट्रॅप, लेसरशस्त्रे, युदधातील स्फोटक उर्वरके आणि भुसुरुंगे यांच्या अमानवी वापरामुळे नागरिक आणि सैनिकांना कायमचे जायबंदी व्हावे लागते. यादृष्टीने Conventions on Prohibitions or Restrictions on the Use of Certain Conventional Weapons (CCW) (१९८०) यासारख्या संधीची निर्मीती झाली. या संधीद्वारे वर नमूद केलेल्या शस्त्रास्त्रांच्या अनावश्यक व अमानवी वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. सध्या या संधीवर जगभरातील ११४ देशांनी स्वाक्षरी केल्या आहेत.

### ४.५.१ शस्त्रव्यापाराचे नियमन करणारे उपाय (Measures to regulate Arms Trade):

जगभरातील शस्त्रास्त्र व्यापाराचे नियमन करण्यासाठी उचलण्यात आलेल्या प्रमुख पाऊलांपैकी एक म्हणजे Wassenaar Arrangement (WA). या करारामध्ये सध्या ४२ देश सहभागी असून पारंपारिक अस्त्रे आणि दुहेरी वापराच्या साधन व तंत्रज्ञानाच्या निर्यातीवर देखरेख ठेवणारी ही एक महत्वाची बहुस्तरीय यंत्रणा आहे. या कराराच्या माध्यमातून सहभागी राष्ट्रांनी तयार केलेल्या सूचीतील शस्त्रास्त्रे व दुहेरी वापराची साधने व तंत्रज्ञान यांचे हस्तांतरण करण्यासाठी पारदर्शक कार्यपद्धती तयार केली आहे. ज्यामुळे ही शस्त्रास्त्रे व साधने गैरकामासाठी वापरली जाऊ नये यावर लक्ष ठेवणे शक्य झाले आहे.

पारंपारिक अस्त्रांच्या व्यापारावर नियंत्रण असावे व त्यांच्या अवैध व्यापारास पायबंद बसावा या हेतूने २०१३ मध्ये Arms Trade Treaty (ATT) चा स्वीकार करण्यात आला. जगभरात शस्त्रास्त्रांच्या अवैध हस्तांतरणातून गरीबी, मानवाधिकाराचे उल्लंघन आणि संघर्षास खतपाणी मिळते. तेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा हस्तांतरणाला थांबवणारी व शस्त्रव्यापाराचे नियमन करणारी नियमावली ATT द्वारे निर्माण करण्यात आली आहे. या संधीवर जगभरातील १५४ देशांनी स्वाक्षरी केली आहे.

### ४.५.२ पारदर्शकता घट्ट करणारे उपाय (Measures to strengthen transparency)

Arms Trade Treaty (ATT) चा स्वीकार करण्याआधी संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने २००१ मध्ये लहान व हलक्या शस्त्रास्त्राच्या अवैध व्यापारास चाप बसावा यासाठी कृती कार्यक्रम स्विकाण्यात आला. हा कृती कार्यक्रम Programme of Action to Prevent, Combat and Eradicate the Illiit Trade in Small Arms and Light Weapons in All its Aspects (PoA) या नावाने ओळखला जातो. लहान व हलक्या आकाराची ही शस्त्रास्त्रे तुलनेने कमी घातक असली तरीही त्यांच्या अनिर्बंध साठ्यावर नियंत्रण बसावे यादृष्टीने अंकन (Marking), व्यवस्थापन (Management) आणि पडताळणी (Tracing) करणे गरजेचे आहे असा सूर या कृतीकार्यक्रमाचा होता. संयुक्त राष्ट्राने आपल्या 'शाश्वत विकास उद्दिष्टां'मध्ये (Sustaible Development Goals) २०३० पर्यंत जगभरातील अवैध शस्त्रव्यापारात कमाली घट घडवून आणण्यावर भर दिला आहे. २००१ च्या PoA चा आधार घेत संयुक्त राष्ट्राने International Tracing Instrument (ITI) या नियमावलीचा २००५ मध्ये स्वीकार केला. संयुक्त राष्ट्राने या नियमावलीनुसार लहान शस्त्रास्त्रांचे खात्रीशीर अंकन पडताळणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा आग्रह धरण्यात आला आहे.

संयुक्त राष्ट्राच्या PoA आणि ITI या उपक्रमांचे स्वरुप हे काहीसे मार्गदर्शक आणि मूल्याधिष्ठीत आहे. या उपक्रमांची अंमलबजावणी करतांना राष्ट्रांनी नियमित अहवाल संयुक्त राष्ट्राकडे सादर करणे गरजेचे आहे.

## ४.६ आण्विक अस्त्रे (Nuclear Weapons)

१६ जूलै १९४५ रोजी अमेरिकेने आपल्या मॅनहॅटन प्रकल्पाचा महत्वाचा भाग असलेल्या ऑपरेशन ट्रिनीटीच्या माध्यमातून नेव्हाडा प्रांतात सर्वप्रथम अणुबाँबची चाचणी केली. या चाचणीमुळे अमेरिका अण्वस्त्रसज्ज देश बनला होता. या चाचणीनंतर लगेचच अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धाचा शेवट घडवून आणण्यात अण्वस्त्रांचा (Atomic weapons) वापर केला. हिरोशिमा आणि नागासाकी या जपानमधील शहरांवर अनुक्रमे ६ ऑगस्ट आणि ९ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेकडून टाकण्यात आलेल्या अणुबाँबद्वारे दुसरे महायुद्ध संपले.

या अण्वस्त्रांची भयावहता पाहता त्यांना 'समूह संहारास्त्रे' (Weapons of Mass Destruction- WMD) या नावाने ओळखले जाते. या अण्वस्त्रांची विनाशक शक्ती पाहता, दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरात कुठेही अण्वस्त्रांचा पुन्हा वापर झाला नाही. अर्थात केवळ अण्वस्त्रे हिच समूह संहारास्त्रे नसून या गटात जैविक व रासायनिक अशा इतर अस्त्रांचाही समावेश होतो. पारंपरिक अस्त्रांच्या तुलनेत ही 'समूह संहारास्त्रे' भिन्न असून विनाशकता, व्यापक क्षेत्रावर होणारा परिणाम आणि या अस्त्रांतून निर्माण होणारे प्ररोधन हे हेतू त्याद्वारे साधले जातात.

दुसऱ्या महायुद्धानंतर या अण्वस्त्रांचा वापर जरी झाला नसला तरी शितयुद्धकाळातील दोन महासत्तांमधील सत्तास्पर्धेमुळे अण्वस्त्रांचे उत्पादन करणे व त्यांवर नियंत्रण प्रस्थापित करणे याकरिता शस्त्रास्त्रस्पर्धा घडून आली. शितयुद्धकाळातील या द्विधृवीकरणाची धार विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे अधिक तीक्ष्ण झाली. यातूनच आण्विक शस्त्रास्त्रीकरणास (Nuclear armament) सुरवात झाली. शितयुद्धकाळातील या शस्त्रास्त्रस्पर्धेचे मुलभूत तत्व हे 'सुरक्षा कोंडी'च्या (Security Dilemma) तर्कावर आधारलेले आहे. सुरक्षा कोंडीच्या तर्कानुसार जेव्हा एखादे राष्ट्र स्व-रक्षणासाठी शस्त्रास्त्रीकरण करु पाहते तेव्हा त्या राष्ट्राचे असे पाऊल अन्य राष्ट्रांच्या दृष्टीने घातक ठरते आणि प्रत्युत्तरादाखल अन्य राष्ट्रेही शस्त्रास्त्रीकरणाच्या दिशेने वाटचाल करतात. शस्त्रास्त्रस्पर्धा ही भय (Fear) आणि अनिश्चितता (Uncertainty) यांतून जन्माला येते असे मानले जाते.

### ४.६.१ जागतिक अण्वस्त्रस्पर्धा-

दुसऱ्या महायुद्धातील अण्वस्त्राच्या वापरानंतर जगात पुनश्च अण्वस्त्रांचा वापर झाला नाही. महायुद्ध संपताच अमेरिका आणि सोव्हियत रशिया यांच्यात जागतिक नेतृत्वासाठी स्पर्धा सुरु झाली. विचारप्रणालीच्या आधारे निर्माण झालेल्या संघर्षातून जगाचे विभाजन भांडवलशाही आणि साम्यवादी अशा दोन गटात झाले. यामुळे जग हे शितयुद्धाकडे वळाले.

दुसऱ्या महायुदधाचा निर्णायकी शेवट करणाऱ्या अणुबाँबच्या चाचणीविषयी अमेरिकेने अखेरच्या क्षणापर्यंत कमालीची गुप्तता पाळली होती. सोव्हियत रशियास अमेरिकेने अणुचाचणीबाबत ऐनवेळी माहिती दिल्याने काहीसे संशयाचे व नाराजीचे वातावरण निर्माण झाले. अण्वस्त्रसंपन्नतेबाबत अमेरिकेची मक्तेदारी निर्माण झाल्याने महायुद्धानंतरच्या काळात

अन्य राष्ट्रेही अण्वस्त्रनिर्मितीच्या स्पर्धेत उतरली. अमेरिकेनंतर सोव्हियत रशियानेही अण्वस्त्रतंत्रज्ञान विकसीत करीत १९४९ मध्ये चाचणी केली. यानंतर अमेरिका आणि सोव्हियत रशिया या दोघांनीही आपले अण्वस्त्रतंत्रज्ञान अद्ययावत करीत अधिकाधिक संहारक अस्त्रे तयार करण्यास सुरवात केली. यातूनच सोव्हियत रशियाने १९५५ मध्ये हायड्रोजन बाँबची चाचणी केल्याने शस्त्रास्त्रस्पर्धा अधिक घातक बनली.

अण्वस्त्रांच्या माध्यमातून 'संहारकता' आणि 'प्रभावी प्ररोधन' करणारा घटक अशा दुहेरी हेतूंची पुर्तता होत असल्याने अमेरिका व सोव्हियत रशियाबरोबरच युनायटेड किंगडम (१९५२), फ्रान्स (१९६०), आणि चीन (१९६२) या देशांनीही अणुचाचण्या घडवून आणल्या. सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य असलेल्या या P-५ देशांनी अण्वस्त्रे प्राप्त केल्याने जागतिक राजकारणात भीती व संशयाचे वातावरण निर्माण झाले. यानंतरच्या काळात अण्वस्त्रे व त्यांच्याशी निगडीत तंत्रज्ञान इतर देशांकडे जाऊ नये याची काळजी ही P-५ घेऊ लागली. परस्परस्पर्धा असूनही या राष्ट्रांनी शस्त्रनियंत्रणासाठी आटोकाट प्रयत्न केल्याने एक प्रकारची उर्ध्वगामी (Vertical) शस्त्रास्त्रस्पर्धा निर्माण झाली. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणजे अण्वस्त्रप्रसारबंदी संधी (Non Proliferation Treaty-NPT) सारख्या संधींची निर्मीती झालेली दिसते.

यानंतर भारत (१९७४), पाकिस्तान (१९८० च्या दशकात) आणि उत्तर कोरिया (२००५) यासारख्या देशांनीही स्वतःला अण्वस्त्रसंपन्न घोषित केल्याचे दिसते. यापैकी भारत आणि पाकिस्तान यांनी NPT वर स्वाक्षरी केलेली नाही. NPT मधील तरतूदी भेदभावजनक असल्याचा युक्तिवाद भारताने मांडला आहे. उत्तर कोरिया हा सुरवातीच्या काळात NPT चा सदस्य देश होता. मात्र २००३ मध्ये उत्तर कोरियाने आपले सदस्यत्व मागे घेतले आहे. या देशांव्यतिरिक्त इस्त्राइलसारख्या देशाकडेही अण्वस्त्रतंत्रज्ञान असल्याचे मानले जाते. सध्या या सर्व देशांकडे एकत्रितपणे १४९०० अण्वस्त्रे असल्याचे मानले जाते. याशिवाय बेल्जीयम, जर्मनी, इटाली, नेदरलँड आणि टर्कीसारख्या देशांनी नाटोअंतर्गत अण्वस्त्र देवाणघेवाणीचे तत्व स्विकारल्याचे दिसते.

अण्वस्त्रसंपन्नतेच्या या शर्यतीमुळे शितयुद्ध आणि शितयुद्धोतर कालखंडातही जागतिक राजकारण हे अस्थिर बनले आहे.

### ४.६.२ अण्वस्त्रांचे शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरण

अण्वस्त्रनिर्मिती करून त्याद्वारे प्ररोधन साधण्याचे प्रयत्न जगभरातील प्रमुख राष्ट्रे करतांना दिसत आहेत. प्रमुख अण्वस्त्रसंपन्न राष्ट्रे आपल्या अण्वस्त्रांच्या क्षमतेमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ करतांनाही दिसतात. काही राष्ट्रे अण्वस्त्रतंत्रज्ञान प्राप्त करण्याच्या प्रयत्नात आहेत. १९४५ पासून आजपर्यंतचा जागतिक इतिहास पाहता ही गोष्ट वारंवार सिद्धही होतांना दिसते. या पार्श्वभुमीवर आण्विक शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरण या संकल्पना समजून घेण्याआधी आण्विक शस्त्रास्त्रीकरण का घडून आले हे समजून घेणे गरजेचे आहे.

हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवरील अणुहल्ल्यांनंतर जागतिक राजकारणात अणुयुगाची (Nuclear era) सुरवात झाली. वरील शहरांवर झालेल्या अणुहल्ल्याने दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला हा तात्कालिक परिणाम वगळता अणुयुगाच्या सुरवातीमुळे

शितयुद्धाची दिशा निश्चित झाली. याचे कारण म्हणजे दुसरे महायुद्ध संपताच सोव्हियत रशियाने अमेरिकेचे धुरिणत्व (Hegemony) स्विकारावे आणि पुर्व युरोपात आपले नियंत्रण असावे यादृष्टीने अमेरिकेने स्वतःला अण्वस्त्रसंपन्न देश म्हणुन घोषित केले. मात्र याचा परिणाम उलट झाला व सोव्हियत रशियानेही अण्वस्त्रसंपन्नतेसाठी पाऊले उचलीत शस्त्रास्त्रीकरणास सुरवात केली.

त्याशिवाय आण्विक शस्त्रास्त्रीकरण होताच जागतिक पटलावरील युद्धांचे स्वरुप बदलले. याचे कारण म्हणजे अण्वस्त्रांचा वापर झाल्यास होणाऱ्या संभाव्य जीवीतहानीचा विचार करता सर्वच राष्ट्रे न्याय्य युद्धे (Just War) या संकल्पनेचा आग्रह धरु लागले. या पार्श्वभुमीवर शितयुद्ध तसेच शितयुद्धोत्तर कालखंडातही या सर्वसंहारक अस्त्रांतून होणाऱ्या 'परस्परनिश्चित संहारा'स (Mutual Assured Destruction) टाळण्यासाठी निशस्त्रीकरण आणि शस्त्रनियंत्रण या दोन्ही दृष्टीने प्रयत्न होतांना दिसतात.

यादृष्टीने उचलण्यात आलेले पहिले पाऊल म्हणजे १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्राने स्थापन झालेला अणुउर्जा आयोग (UN Atomic Energy Commission). आमसभेने अणुउर्जेच्या निर्मीतीतून निर्माण झालेल्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन केलेल्या या आयोगास पुढील विषयांवर प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना केल्या होत्या : १) शांततामय कार्यासाठी वैज्ञानिक माहितीचे राष्ट्रा-राष्ट्रांत आदानप्रदान, २) केवळ शांततामय कार्यासाठी अणुतंत्रज्ञानाचा वापर मर्यादीत ठेवणे, ३) सर्वसंहारक स्वरुपातील सर्व अण्वस्त्रे नष्ट करणे, ४) आणि, राष्ट्रांनी नियमांचे उल्लंघन व टाळाटाळ करु नये यासाठी निरिक्षण व अन्य माध्यमाचे उपाय शोधणे.

या आयोगाने केलेल्या सुचनांचा आधार घेत संयुक्त राष्ट्र अणुउर्जा आयोगाचे सदस्य बर्नार्ड बरुच यांनी जून १९४६ मध्ये स्वतंत्रपणे आपली योजना मांडली. या योजनेस 'बरुच योजना' (Baruch Plan) असे म्हटले जाते. बर्नार्ड बरुच योजना मांडत असतांना काही महत्वपूर्ण मुद्दे मांडले होते. 'बरुच योजने'नुसार अमेरिका आपल्याकडील सर्व अण्वस्त्रे काढून घेत आपल्याकडील तंत्रज्ञान इतर देशांना हस्तांतरीत करण्यास होकार दर्शवेल. त्याशिवाय निरिक्षण, देखरेख आणि निर्बंध लादू शकेल अशा स्वतंत्र यंत्रणेच्या निर्मितीसही अमेरिका आपली संमती देईल. मात्र असे करतांना इतर देशांनी मिळालेल्या तंत्रज्ञानाचा वापर करीत अण्वस्त्रांची निर्मीती करू नये अशी गळ अमेरिकेने घातली. सोव्हियत रशियाने बरुच योजनेबाबत 'संयुक्त राष्ट्र हि संघटना अमेरिका आणि इतर पाश्चात्य देशांच्या दावणीस बांधली आहे' अशी भूमिका मांडत ही योजना पुर्णपणे नाकारली. सोव्हियत रशियाने बरुच योजनेस दर्शवलेला नकार हा नंतरच्या काळातील शस्त्रास्त्रस्पर्धेस कारण बनला असे मानले जाते.

यानंतर १९५३ मध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ड्वाईट आयसेनहॉवर यांनी आपला 'शांततेसाठी अणू कार्यक्रम' (Atom for Peace Program) मांडला. या कार्यक्रमाद्वारे आयसेनहॉवर यांनी अमेरिकन राजकारणात अणुतंत्रज्ञानाविषयी असलेली गोपनियतेची (Secrecy) कोंडी फोडली. युरोपियन राष्ट्रांच्या मनातील संभाव्य अणुयुद्धाची भीती नष्ट करणे, अणुतंत्रज्ञान मनुष्याला उपकारक करणे, अणुभट्टीसाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढवून अण्वस्त्रस्पर्धा आटोक्यात आणणे ही या कार्यक्रमाची ठळक उद्दिष्टे सांगता येतील. प्रत्यक्षात 'शांततेसाठी अणू कार्यक्रम' हा अमेरिकेच्या शीतयुद्धातील प्रचारतंत्राचा (Propoganda) भाग होता. या

कार्यक्रमाद्वारे अमेरिकेने इस्त्राईल आणि पाकिस्तानसारख्या देशांना अणुभट्टी उभारण्यासाठी मदत पुरवून एकप्रकारे सोव्हियत रशियाच्या 'अटकावा'स (Containment) सुरवात केली. 'शांततेसाठी अणू कार्यक्रमाची' सकारात्मक बाजू म्हणजे या कार्यक्रमाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर अणुतंत्रज्ञानाच्या विधायक वापराचा आग्रह केला जाऊ लागला आणि १९५७ मध्ये आंतरराष्ट्रीय अणुउर्जा आयोगाची (International Atomic Energy Commision-IAEA) स्थापना झाली.

यानंतरच्या कालखंडात सोव्हियत रशिया आणि अमेरिका यांनी अणुबाँबपेक्षा अधिक घातक अशा हायड्रोजन बाँबच्या चाचण्या केल्या. १९५० ते १९६० या कालावधीत सर्वाधिक अण्वस्त्रचाचण्या घडून आल्या. जमिनीवरील तसेच समुद्रतळाशी अण्वस्त्रचाचण्या घेण्यात येत असल्याने पर्यावरणीय हानीच्या समस्या उभ्या राहू लागल्या. अमेरिकेने १९५४ मध्ये केलेल्या अणुचाचणीचा परिणाम होऊन तब्बल ११,००० चौ. किमी. भुभागावर किरणोत्सारी धूळ पसरली. याच वर्षी सोव्हियत रशियाने केलेल्या अणुचाचणीमुळे जपानपर्यंत किरणोत्सारी धूळ पसरली. या सर्व घटनांचा परिणाम पाहता पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी आण्विक पुर्णविरामाची (Nuclear Standstill) मागणी केली. स्पुटनिक या सोव्हियत उपग्रहाच्या प्रक्षेपण (१९५७) तसेच क्युबा संघर्षानंतर (१९६२) अण्वस्त्रचाचणीवर बंदी घालण्याच्या प्रयत्नांना गती प्राप्त झाली. यातूनच १९६३ मध्ये आंशिक अण्वस्त्र चाचणी बंदी करारास (Partial Nuclear Test Ban Treaty-PTBT) स्विकृती मिळाली. PTBT द्वारे वातावरण (Atmosphere), बाह्य अवकाश (Outer space) आणि पाण्याखालील (Under water) सर्व अणुचाचण्यांवर निर्बंध घालण्यात आले. PTBT हे शस्त्रनियंत्रण घडवून आणणारे महत्वाचे माध्यम मानले जाते. भारतासह १२६ देशांनी PTBT या करारावर स्वाक्षरी केली आहे.

यानंतर १९६८ मध्ये अण्वस्त्रप्रसारबंदी (Non- proliferation), निशस्त्रीकरण (Disarmament) आणि आण्विक तंत्रज्ञाना शांतता वापरण्याचा अधिकार (Right to peacefully use nuclear technology) या तिहेरी उद्दिष्टांसाठी स्वित्झर्लंड येथे अण्वस्त्रप्रसारबंदी संधी (Nuclear Non- Proliferation Treaty-NPT) संमत करण्यात आली. सुरवातीला केवळ २५ वर्षांसाठी सादर झालेल्या NPT संधीला १९९५ मध्ये अमर्याद काळासाठी मंजूरी देण्यात आली. NPT द्वारे अण्वस्त्रे नसलेले देश आणि अण्वस्त्रसंपन्न देश यांच्यात वाटाघाटी घडून आल्या. या वाटाघाटीनुसार, अण्वस्त्रे नसलेल्या देशांनी भविष्यात कधीही अण्वस्त्रे मिळवायची नाहीत व त्यामोबदल्यात अण्वस्त्रसंपन्न देशांनी शांततामय कार्यासाठी आण्विक तंत्रज्ञान द्यावे व स्वतःकडील अण्वस्त्रसाठा नष्ट करावा असे ठरले. या संधीचे वैशिष्ट्य म्हणजे अण्वस्त्रसंपन्न देशाच्या शस्त्रसाठ्याबाबत मौन बाळगण्यात आले आहे. NPT वर तब्बल १९१ देशांनी स्वाक्षरी केली असून भारत, इस्त्राइल, उत्तर कोरिया, पाकिस्तान आणि दक्षिण सुदान या देशांनी स्वाक्षरी केलेली नाही. उत्तर कोरियाने या संधीवर सुरवातीला स्वाक्षरी केलेली असली तरी २००३ मध्ये माघार घेत स्वतःला अण्वस्त्रसंपन्न बनवले. भारताने १९७४ आणि १९९८ मध्ये पोखरण येथे अणुचाचणी करीत स्वतःचे आण्विक सामर्थ्य सिद्ध केले आहे. भारताच्या मते, NPT द्वारे जगाचे विभाजन आहे रे आणि नाही रे या दोन गटात झाले असून अण्वस्त्रे बाळगण्याची मक्तेदारी केवळ मुठभर देशांकडे राखण्यात आली आहे. याशिवाय अण्वस्त्रांचे निशस्त्रीकरण कशा पद्धतीने व्हावे यासंबंधात

कुठलाही ठोस कृतीकार्यक्रम या संधीद्वारे देण्यात आलेला नाही. भारताप्रमाणे पाकिस्ताननेही या संधीस भेदभावजनक असल्याने नाकारले आहे.

आण्विक निशस्त्रीकरण तसेच शस्त्रनियंत्रणाच्या दृष्टीने जागतिक राजकारणात उचलण्यात आलेले पुढचे ठोस पाऊल म्हणजे सर्वंकष चाचणी बंदी संधी (Comprehensive Test Ban Treaty- CTBT). NPT प्रमाणे CTBT हीदेखील एक बहुस्तरीय संधी आहे. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेकडून १९९६ मध्ये स्वीकृत झालेल्या या संधीनुसार नागरी अथवा सैन्य अशा कोणत्याही कारणाकरिता व वातावरणातील कोणत्याही स्तरावर (भुमिगत, जमीनीवर, पाण्याखाली आणि आकाशात) अणुचाचणी करता येणार नाही असे ठरले. CTBT द्वारे International Monitoring System (IMS) या यंत्रणेची कल्पना मांडण्यात आली असून त्याद्वारे जगभरातील अणुस्फोटांवर देखरेख करणे शक्य होणार आहे. अण्वस्त्रांची गुणात्मक (Qualitative) कपात करणे, नवीन अण्वस्त्रांच्या निर्मितीस व उपलब्ध अण्वस्त्रांच्या विकासास विरोध करणे, अणुचाचण्यांतून होणाऱ्या आरोग्य व पर्यावरणाच्या नुकसानास थांबविणे या उद्दिष्टांसाठी CTBT ची निर्मीती केली आहे. जगभरातील १८५ देशांनी या संधीवर स्वाक्षरी केली असून त्यापैकी १७० देशांनी याला मान्यता दिली आहे. तर भारत, उत्तर कोरिया आणि पाकिस्तान या देशांनी CTBT वर स्वाक्षरी करण्यास नकार दिला आहे. भारताने CTBT मध्ये कालबद्ध निशस्त्रीकरणाच्या तरतूदींचा अभाव, राजकीय, प्रक्रियात्मक, सुरक्षाविषयक त्रुटी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे CTBT मधील सहभागाबाबत ऐच्छिक स्वातंत्र्यावर येणारी गदा या तीन कारणांसाठी आपला विरोध दर्शवला आहे.

अण्वस्त्रांच्या निशस्त्रीकरण आणि शस्त्रनियंत्रणासाठी शितयुद्ध कालखंडात आणि त्यानंतरही तितक्याच जोरकसपणे प्रयत्न झाले. यामध्ये सामरिक शस्त्रकपात चर्चा (Stratgic Arms Reduction Talks START) चा समावेश प्रामुख्याने होतो. १९९१ मध्ये झालेल्या या चर्चाबैठकांतून अमेरिका आणि सोव्हियत रशिया यांनी सामरिक क्षेपणास्त्रांच्या नियंत्रणासाठी संयुक्त पावले उचलण्याचा निर्णय घेतला. या वाटाघाटींचा आधार घेत दोन्ही देशांनी (सोव्हियत रशियाचे पतन झाल्यानंतर विभाजीत राष्ट्रांनी) २००१ पर्यंत आपल्याकडील आंतरखंडीय क्षेपणास्त्रे (ICBM), बॉंबर्स, आणि इतर अण्वस्त्रांच्या एकूण साठ्यापैकी ८०% साठा नष्ट केला. २००१ नंतर START च्या दुसऱ्या टप्प्यास सुरवात झाली. याला START-II असे म्हटले जाते. मुळात १९९३ मध्ये START-II वर स्वाक्षरी झाली असली तरी २००० मध्ये त्याला स्विकृती मिळाली. MIRV या प्रकारातील अस्त्रांच्या वापरावर बंदी घालणे हे START-II चे उद्दिष्ट होते. मात्र त्याला तितके यश मिळू शकले नाही आणि त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. रशिया आणि अमेरिका यांच्यातील या चर्चांमधून रशियाने २००२ मधून काढता पाय घेतल्याने START-II अपयशी ठरली.

### ४.६.३ भारताची अण्वस्त्रप्रसाराविषयी भूमिका-

भारताने नेहमीच अण्वस्त्रमुक्त जगाचे स्वप्न पाहिले आहे. यामुळेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने अणुकार्यक्रमाविषयी आपली भूमिका स्पष्ट करतांना सर्वप्रथम शांततामय अणुकार्यक्रमाची (१९४७ ते १९७४) घोषणा केली. भारताने उर्जाक्षेत्रात स्वयंपुर्णता मिळावी या हेतूने होमी भाभा यांच्यासारख्या वैज्ञानिकांच्या मदतीने याकाळात अणुकार्यक्रमाची घोषणा केली. या अणुकार्यक्रमातूनच भारतातील अप्सरा, सायरस आणि झर्लिना या प्रायोगिक तर तारापूर,

मद्रास, कैगा यांसारख्या व्यावसायिक अणुभट्ट्यांची निर्मीती झाली. त्याकरिता पाश्चात्य देशांकडून वेळोवेळी तांत्रिक सहकार्यही घेण्यात आले. या काळात भारताने अण्वस्त्रे विकसीत करावीत का ? या विषयावर बऱ्याच प्रमाणात खल चालू होता. चीनसोबत झालेल्या युद्धातील पराभव, भारत- पाकिस्तान युद्ध आणि १९६४ मध्ये चीनने केलेल्या अण्वस्त्रचाचणीमुळे भारतातील धोरणकर्त्यांमध्ये अलिप्ततावादी धोरणाविषयी दोलायमान परिस्थिती निर्माण झाली. १९६८ मध्ये स्वीकृत NPT करारास भारताने स्पष्ट शब्दांत विरोध दर्शवला. नोव्हेंबर १९६४ मध्ये लालबहादूर शास्त्री यांनी शांततामय कार्यासाठी अणूतंत्रज्ञानाच्या प्रस्तावास तत्वतः मंजूरी दिली. परंतू या प्रस्तावास प्रत्यक्षात उतरण्यासाठी दीर्घ काळ उलटावा लागला. नंतर, इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात भारताने १८ मे १९७४ रोजी पोखरण या ठिकाणी सर्वप्रथम शांततामय अणुविस्फोट (Peaceful nuclear explosion) घडवून आणला. भारताने या चाचणीद्वारे दक्षिण आशियात आपला दबदबा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

पोखरण- I चाचणीनंतर भारताने आपल्या अणुकार्यक्रमास विविध कारणांमुळे स्थगित केले. १९७४ ते १९९८ हा कालखंड भारताच्या आण्विक सशस्त्रीकरणाचा कालखंड मानला जातो. इंदिरा गांधीच्या मृत्युनंतर राजीव गांधी यांनी अलिप्ततावादी धोरणाला वास्तववादाची जोड देत शेजारील राष्ट्रांसह पाश्चात्य व इतर देशांशी संबंध दृढ करण्यास महत्त्व दिले. राजीव गांधी यांनी संयुक्त राष्ट्रापुढे अण्वस्त्रमुक्त व हिंसाविहीन जागतिक व्यवस्थेसाठी कृतीकार्यक्रम (Action Paln for a Nuclear Weapons free and Non Violent World order) सादर केला. या कृतीकार्यक्रमाचे जागतिक स्तरावर कौतुक झाले. भारताने निशस्त्रीकरणाचे आपले प्रयत्न चालू ठेवत असतांना अणुक्षेत्रात तांत्रिक सहकार्य मिळावे याकरिता सोव्हियत रशिया (नंतरच्या काळात रशिया), अमेरिका, फ्रान्स या देशांशी महत्वाचे करार केले. १९९६ मध्ये भारताने CTBT सारख्या करारावर आपली भूमिका कठोर शब्दांत स्पष्ट केली. १९९५ नंतरच्या काळात भारताने अण्वस्त्रतंत्रज्ञानाच्या आपल्या कार्यक्रमास नवसंजीवनी दिली. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही नरसिंह राव यांनी अणुचाचण्यांसाठी प्रयत्न सुरु केले. मात्र या प्रयत्नांची माहिती अमेरिकेस मिळाल्याने त्यास थांबवावे लागले. १९९८ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पुनश्च पोखरण येथे दोनदा अणुचाचण्या घडवून आणत भारताला 'अण्वस्त्रसंपन्न देश' म्हणुन घोषित केले. या चाचणीनंतर भारताने आपली भूमिका पुन्हा स्पष्ट करीत 'प्रथम वापरास नकार' (No first use) 'विश्वासार्ह किमान प्ररोधन' (Credible minimum deterrence) ही यापुढील आपली दोन धोरणे असतील असे स्पष्ट केले.

१९९८ ते २००९ हा भारताच्या अणुक्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने महत्वाचा मानला जातो. या काळात भारताने अमेरिकेसोबत आपले संबंध घट्ट करीत २००५ मध्ये नागरी अणुकरार केला. या करारामुळे भारतास नागरी कार्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून अणुइंधन मिळवणे सहज शक्य झाले आहे. २००९ नंतर भारताने आपल्या उर्जासुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची पाऊले उचलण्यास सुरवात केली आहे. या धोरणाचाच एक भाग म्हणुन भारताने आपल्या अणुउर्जा प्रकल्पांना आंतरराष्ट्रीय अणुउर्जा आयोगाच्या (IAEA) नियमावलीनुसार निरिक्षण व पर्यवेक्षणासाठी खुले केले आहे. सध्या भारताने रशिया, अमेरिका, युनायटेड किंगडम, दक्षिण कोरिया, कॅनडा, अर्जेंटीना, कझाकस्तान, मंगोलिया, ऑस्ट्रेलिया, जपान, व्हियतनाम इ. देशांशी आण्विक सहकार्यासाठी विविध करार केले आहेत.

वरील नागरी क्षेत्रातील सहकार्य वगळता भारताने NPT, CTBT करारांबाबत आपली भूमिका कायम ठेवली असून जरी या करारांवर भारताने स्वाक्षरी केलेली नसली तरी अणुचाचण्या करण्यास एकमार्गी स्थगिती दिली आहे.

## ४.७ इतर सर्व संहारक अस्त्रे (Weapons of Mass Destruction- WMD)

सर्वसंहारक अस्त्रे ही अलीकडच्या काळात प्रचलित झालेली संकल्पना आहे. अगदी सोप्या भाषेत या संकल्पनेचा अर्थ सांगायचा झाल्यास ही अस्त्रे संपूर्ण विनाश घडवू आणणारी आहेत असे सांगता येईल. १९७७ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या आमसभेतील ठरावानुसार सर्वसंहारक अस्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

**सर्व संहारक अस्त्रे म्हणजे:**

अशी अस्त्रे ज्यात आण्विक स्फोट घडवून आणणारी अस्त्रे, किरणोत्सार घडवून आणणारी अस्त्रे, घातक रासायनिक आणि जैविक अस्त्रे, आणि भविष्यात वरील नमूद अस्त्रांप्रमाणे व्यापक प्रमाणात नाश घडवून आणू शकतील अशा अस्त्रांचा समावेश आहे.

क्षमतेच्या भाषेत बोलायचे झाल्यास सर्वसंहारक अस्त्रे ही एका क्षणात लक्षावधी माणसांचा नाश, पर्यावरणाची हानी व भावी पिढीवर दूरगामी परिणाम करु शकतात. विषारी रसायनांचा वापर होत असल्याने व्यक्तींचा मृत्यू होतो. अनेकदा जैविक अस्त्रांद्वारे साथ परसवणारे जीवचक्र तयार केले जाते.

याआधीच्या भागात अण्वस्त्रे आणि त्यांच्या शस्त्रनियंत्रणाशी निगडीत मानवी प्रयत्नांची चर्चा करण्यात आली आहे. याभागात सर्वसंहारक अस्त्रांचा महत्वपुर्ण भाग असलेल्या जैविक आणि रासायनिक अस्त्रांची चर्चा करण्यात आली आहे.

### ४.७.१ जैविक अस्त्रे

जैविक अस्त्रे या संकल्पनेत प्रामुख्याने सजीव (जीवाणू, बुरशी, कृमी इ.) आणि निर्जीव (उदा. विषाणू) माध्यमांचा वापर करून प्रतिपक्षाचे, प्रतिपक्षातील नागरीकांचे तसेच तेथील भूमीचे नुकसान केले जाते. जैविक अस्त्रांचा वापर ही संकल्पना 'आक्षेपार्ह जैविक युद्धतंत्रा'शी (Offensive biological warfare) जोडली गेली असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरांवरील विविध करार आणि संधींच्या माध्यमातून अशा अस्त्रांचा वापर हा 'युद्धगुन्हा' (Warcrime) मानला गेला आहे. जैविक अस्त्रांच्या वापराशी संबंधित दुसरा पैलू म्हणजे ही संकल्पना 'बचावात्मक जैविक युद्धतंत्र' (Defensive biological warfare) या अर्थानेही वापरली गेली असून या संकल्पनेनुसार जैविक अस्त्रांचा वापर करून विशिष्ट भुभाग/ भुभागावरील व्यक्ती, व्यक्तींचा समूह यांना हटविण्यासाठी केला जाऊ शकतो. या दुसऱ्या बाजूने जैविक अस्त्रांच्या वापराचे काही अंशी समर्थनही होतांना दिसते.

जैविक अस्त्रांच्या वापराचे दाखले इतिहासाच्या विविध टप्प्यावर बघायला मिळतात. प्राचीन ग्रिक कालखंडात अरगोट या विशिष्ट बुरशीचा वापर करीत प्रतिपक्षाच्या पिक व पाण्याचे नुकसान केले जाई. मध्ययुगीन कालखंडात साथीच्या रोगाने पिडीत जीवीत/ मृत व्यक्तीस शत्रूभूमीवर पाठवले जाई व त्यातून व्यापक नुकसान घडवून आणले जाई. आधुनिक काळात अँथ्रॅक्स, ग्लँडर यासारख्या जैविक माध्यमांचा वापर करुन शत्रुपक्षाचे नुकसान घडवून आणण्याचा विचार होतांना दिसतो. वस्तुतः या जैविक माध्यमांतून निर्माण होणारी रोगराई/

जीवीतहानी ही इतकी सहज असते की त्यांचा वापर युद्धातील अस्त्र म्हणुन झाला की खरोखरच अशी रोगराई निर्माण झाली होती असा प्रश्न यातून उपस्थित होतो.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फ्रान्स, जपान, इंग्लंड अशा प्रमुख युरोपिय देशांनी जैविक अस्त्रे विकसीत करण्याच्या दृष्टीने पाउले उचलली होती. मात्र या अस्त्रांचा वापर झालेला दिसत नाही. जपानने मात्र चीनमधील विविध सैनिक आणि नागरिकांवर जैविक अस्त्रांचा वापर करुन मानवी प्रयोग (Human experiment) केलेला दिसतो. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर शीतयुद्धाच्या सुरवातीच्या काळात ब्रिटन, अमेरिका यांनी प्लेग, क्यु- फिवर सारख्या आजारांचा वापर करीत जैविक अस्त्रे विकसीत करण्यास सुरवात केली होती. मात्र या प्रयत्नांना नंतर थांबविण्यात आले. सोव्हियत रशियाने मात्र गुप्तपणे जैविक अस्त्रे विकसीत करणे चालूच ठेवले होते.

**जैविक अस्त्रांवरील बंदी व शस्त्रनियंत्रण**

जैविक अस्त्रांच्या वापरावर बंदी घालण्यासाठी सर्वप्रथम १९२५ च्या जिनेव्हा प्रोटोकॉलमध्ये चर्चा करण्यात आली. या प्रोटोकॉलनुसार जैविक अस्त्रांचा वापर करणे, बाळगणे आणि त्यांचा विकास करणे यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे.

१९७२ च्या Biological Weapons Convention (BWC) द्वारे जिनेव्हा प्रोटोकॉलचे समर्थन करण्यात आले आहे. BWC या संधीद्वारे जैविक अस्त्रांचा विकास, निर्मीती, स्वीकार, हस्तांतरण अथवा साठा अशा सर्व कृतींवर बंधने घालण्यात आले आहे. BWC च्या माध्यमातून सर्वसंहारक स्वरुपातील सर्वच अस्त्रांचे निशस्त्रीकरण करण्याचा घाट घालण्यात आला आहे. जगभरातील १८३ देश या संधीमध्ये सहभागी आहेत. याव्यतिरिक्त १९८५ मध्ये स्थापित ऑस्ट्रेलिया गटानेही जैविक व रासायनिक अस्त्रांच्या वापर व प्रसारास विरोध दर्शवला आहे.

२००४ मध्ये, संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेने १५४० ठराव संमत करीत सर्व संयुक्त राष्ट्र सदस्यांना जैविक व रासायनिक अस्त्रविरोधी यंत्रणा विकसीत करण्याचे बंधन घातले आहे.

**४.७.२ रासायनिक अस्त्रे (Chemical weapons)**

रासायनिक अस्त्रे ही संकल्पना जैविक अस्त्रांशी जोडली गेली असली तरीही ती मूलतः भिन्न आहे. रासायनिक अस्त्रांची व्याख्या करायची झाल्यास ती पुढीलप्रमाणे करता येईल.

रासायनिक अस्त्रे म्हणजे मनुष्यांना इजा करण्यासाठी अथवा ठार मारण्यासाठी रसायनांचा वापर करुन तयार करण्यात आलेली शस्त्रास्त्रे.

जैविक अस्त्रांप्रमाणे रासायनिक अस्त्रांचा वापर दीर्घकाळापासून होत आला आहे. आधुनिक काळात विशेषतः पहिल्या महायुद्धादरम्यान रासायनिक अस्त्रांचा वापर करण्यात आला. त्याशिवाय इराण- इराक युद्ध (१९८०-८८) मध्येही रासायनिक अस्त्रांचा वापर झाला. सशस्त्र संघर्षामध्ये रासायनिक अस्त्रांचा वापर केला जाऊ नये असे वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय कायद्यांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

रासायनिक अस्त्रांच्या वापरावर निर्बंध घालण्यासाठी जिनेव्हा प्रोटोकॉल (१९२५) मधील आणि १९९३ मध्ये संमत झालेल्या Chemical Weapons Convention (CWC) चा आधार घेतला जातो. या दोन्ही करारांच्या माध्यमातून रासायनिक अस्त्रांचा वापर, निर्मीती, हस्तांतरण, साठा यांवर निर्बंध घालण्यात आले आहे. Organization for the Prohibition

of Chemical Weapon (OPCW) ही CWC च्या अंमलबजावणीवर देखरेख करणारी प्रमुख आंतरशासकीय संघटना आहे. या संघटनेची स्थापना १९९७ मध्ये झाली असून १९३ देश या संघटनेचे सदस्य आहेत. भारत हा या संघटनेच्या प्रमुख संस्थापक सदस्य देशांपैकी एक देश आहे. एखाद्या युद्धादरम्यान रासायनिक अस्त्रांचा वापर झाला आहे अथवा नाही याची तपासणी करण्याचे अधिकार या संघटनेला असून नियमित कालावधीनंतर सदस्य देश आपला अहवाल या संघटनेस पाठवत असतात. भारताने १९९७ मध्ये आपल्याकडील रासायनिक अस्त्रांचा साठा घोषित केला. २००६ पर्यंत भारताने आपल्याकडील एकूण साठ्याच्या ७५ % रासायनिक अस्त्रे नष्ट केली होती. भारताच्या या पावलाचे जगभरात कौतुकही झाले. २००९ मध्ये भारताने आपल्याकडील संपूर्ण रासायनिक अस्त्रे नष्ट केल्याची घोषणा केली.

## ४.८ समारोप

जागतिक राजकारणाचे स्वरुप हे गतीमान आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जग पुन्हा शितयुद्धाकडे लोटल्या गेले व याकाळातील दहशतीचे संतुलन साधण्यासाठी शस्त्रास्त्रस्पर्धा वाढीस लागली. शितयुद्ध कालखंड हा द्विधृवी जागतिक राजकारणाचे निदर्शक होता. मात्र दोन्ही महासत्तांना आपण विकसित केलेल्या शस्त्रास्त्रांची संहारकता ज्ञात होती. यातूनच शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरणाचे प्रयत्न गतीमान झाले. १९९१ मध्ये सोव्हियत रशियाचे पतन झाल्यानंतर जागतिक राजकारणातील प्रत्यक्ष सत्तेसाठी संघर्ष संपला असला तरी सर्वसंहारक अस्त्रांचे स्वरुप दिवसेंदिवस बदलत चालले आहे. शितयुद्धोत्तर काळात भारतानेही अणुचाचणी करीत स्वतःला अण्वस्त्रसंपन्न केले असले तरी आपला अणुकार्यक्रम शांततेच्या कामासाठी असेल असे स्पष्ट केले आहे. सर्वसंहारक अस्त्रांची आजची आकडेवारी आणि दहशतवादासारख्या समस्या पाहता वर्तमान काळातही शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरण या संकल्पना तितक्याच महत्वाच्या आहेत हे पटते.

## ४.९ सरावप्रश्न

१. शस्त्रनियंत्रण आणि निशस्त्रीकरण या संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

२. टिपा लिहा

पारंपारिक अस्त्रांचे शस्त्रनियंत्रण

आण्विक अस्त्रांचे शस्त्रनियंत्रण

जैविक व रासायनिक अस्त्रांचे निशस्त्रीकरण

भारताचे आण्विक धोरण

## ४.१० संदर्भ पुस्तके

Theoretical Aspects of International Politics: Mahendra Kumar (Shivkumar Agrawal & Co.)

International Relations: Palmer & Perkins (CBS Publishers)

आंतरराष्ट्रीय संबंध: डॉ. प्रशांत अमृतकर (चिन्मय प्रकाशन)

❄❄❄❄❄❄❄❄